म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.

REFBK-0005273

श्री

श्री. रं. रा. चिरंतास मराठी ग्रंथसंग्रहालय
ठाणे यांस

सप्रेमभेट

त्र्यंबकशास्त्री दाते
मंत्री गुरुदेव पुरस्कार मंडळ नाशिक
२।१।३६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
स्थल प्रत
सं. चरित्र ५१२
ता. ३।१।३६
नोंद नं. ७४०६

। धन्वन्तरये नमः ।

भिषगाचार्य

# गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर

## यांचें चरित्र

नासिक येथील वैद्यकीय परंपरा व शिष्यवृंद यांचें वृत्तासह

REFBK-0005273

ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्र. क्र. ५२७३

मार्गशीर्ष व॥ ११ शके १८५७

( २१ डिसेंबर १९३५ )

---

लेखकः– वैद्यभूषण वामनशास्त्री दातार

प्रकाशकः– प्रो० डॉ० परशराम लक्ष्मण वैद्य एम्. ए. डि. लिट्.

मुद्रकः– वैद्यरत्न विष्णु गणेश केळकर नासिक.

---

किंमत १। रुपाया.

लोकसत्ता छापखाना
घर नं. १२६ कापडबाजार
नासिक शहर.

शिष्य- वृंदाकडून

ही अल्प कृती

# गुरुवर्यांच्या पुण्यचरणीं

सादर समर्पण

# शुद्धिपत्रक.

| पृष्ट | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| **भाग पहिला.** | | | |
| १ | २ | राईएवढय | राईएवढ्या |
| १५ | १९ | चिरंजीव | नातु |
| १९ | १८ | नमल्यानें | न झाल्यानें |
| २० | १ | चांगलीच | चांगली |
| २० | ५ | अनृण्य | आनृण्य |
| २४ | २१ | त्यांचे आवडते ग्रंथ, | त्यांच्या आवडत्या ग्रंथाचा |
| **भाग दुसरा.** | | | |
| ११ | २ | यांना | त्यांना |
| १४ | ११ | वेळच्या | त्या वेळच्या |
| २५ | २१ | चि० गंगूबाई | चि० सौ० गंगुबाई |
| २७ | १३ | व दुसऱ्यावर | व ती दुसऱ्यावर |
| ३२ | ५ | कल | काल |
| ३५ | २ | महिन्यांन | महिन्यांत |
| ३५ | १७ | घरांतीम | घरांतील |
| ४१ | ९ | भाडण्याचा | धाडण्याची |
| ५२ | १९ | धद्यास | धंद्यास |
| ४७ | १७ | म्हणून | म्हणून |
| ५३ | ६ | कै. भाऊसाहेब प्रभुणे यांचें नांव चुकीनें विद्यमान् मित्र-परिवारांत पडलें आहे. | |
| ५३ | ८ | कडील | येथील |
| ६५ | ११ | लागलें | लागेल |
| ६५ | १६ | शरः संधान | शिरः संधान |
| ६८ | ८ | त्या | त्याच्या |
| ६९ | १६ | या | ही |
| **भाग तिसरा.** | | | |
| २ | २१ | शके १८८८ | शके १७८८ |
| ८ | १४ | गजानन विनायक | गजानन वामन |

# अनुक्रमणिका


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रस्ताव पूजन | | | १ ते ४ |
| भूमिका | | | १ ते ४ |
| **भाग पहिला** | | | |
| प्रकरण १ | लें | उपोद्घात | १ |
| ,, २ | रें | कांहीं वैद्यक घराणीं | ६ |
| ,, ३ | रें | गु० कै० गणेशशास्त्री तरटे | १५ |
| ,, ४ | थें | कै० मनोहर मामा देव | २८ |
| **भाग दुसरा** | | | |
| प्रकरण १ | लें | शिक्षणाची तळमळ | १ |
| ,, २ | रें | अलीबागचा मुक्काम | ५ |
| ,, ३ | रें | अध्ययन व गृहस्थाश्रम | ९ |
| ,, ४ | थें | आयुर्वेद पारंगतता | १२ |
| ,, ५ | वें | व्यवसायारंभ | १६ |
| ,, ६ | वें | व्यवसायांतील परमोत्कर्ष | २० |
| ,, ७ | वें | कुलपुरुष देवधर | २३ |
| ,, ८ | वें | गुरुसेवा | २८ |
| ,, ९ | वें | आदर्श संसार | ३५ |
| ,, १० | वें | अध्यापन | ३९ |
| ,, ११ | वें | भारतीय सन्मान | ४५ |
| ,, १२ | वें | मित्रपरिवार व दातृत्व | ५२ |
| ,, १३ | वें | महाराष्ट्रांतील प्रमुख वैद्य परंपरा | ५८ |
| ,, १४ | वें | आयुर्वेदीय शिक्षण पद्धति | ६३ |
| ,, १५ | वें | चरित्र लेखनाची फलश्रुति | ७० |
| **भागतिसरा** | | शिष्यांचीं अल्प चरित्रें | १ ते ४९ |
| **परिशिष्ट** | | समारंभाचें इतिवृत्त व जमाखर्च | |



गु० भिषगाचार्य कृष्णशास्त्री देवधर.

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ............

# प्रस्तावपूजन

माझे परममित्र वैद्यभूषण रा० वामनशास्त्री दातार यांनीं गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचें लहानसें चरित्र लिहून त्याला प्रस्तावना लिहिण्याची कामगिरी मजवर अकल्पितपणें सोंपविली. मी या कामाला अपात्र आहे व 'प्रसूतितंत्र, आयुर्वेदीय व पाश्चात्य' हें माझें पुस्तक हल्लीं छापत असल्यामुळें मला यत्किंचितहि फुरसत नाहीं, असें मी त्यांना कळविलें. कल्पना अशी कीं, माझ्यापेक्षां लायक माणसाकडे हें काम त्यामुळें जाऊन तें अधिक चांगलें होऊन उठावदार दिसेल. पण शेवटीं त्यांनीं तें मजवरच सोंपवलें. भारतीय आयुर्वेद परंपरेला भूषणभूत झालेल्या गुरुवर्यांच्या चरणीं लहानशी पुष्पांजली वाहण्याचा हा सुयोग असा मला लाभला. त्यांच्या परंपरेंत तयार झालेल्या एखाद्या शिष्यवरानें एतदर्थ वाहिलेल्या कुसुमांजलीचा सुगंध खात्रीनें अधिक दरवळला असता. पण तदभावीं मजजवळ असलेलीं साधीं फुलेंच मी त्यांच्या चरणांवर उधळून त्यांचें यथामति पूजन करीत आहे.

गुरुवर्य देवधरांचें व माझें साक्षात् गुरुशिष्य संबंधाचें नातें नसलें तरी मनांत आयुर्वेदाबद्दलच्या शिक्षणाची तळमळ असल्यानें व ते प्रथितयश वैद्यसम्राटांपैकीं एक असल्यानें त्यांना एकलव्याप्रमाणें मी गुरुस्थानीं मानीत आलों आहे. अर्थात् ही उपमा फारशी खेचावयाची नाहीं. कारण मी एकलव्याप्रमाणें त्या शास्त्रांत निष्णात नाहीं. पण राज्यकर्त्यांनी व आमच्या पुष्कळशा भारतीय पुढाऱ्यांनींहि आयुर्वेदाची उपेक्षा व हेटाळणी मांडली असतांहि त्यांत अप्रतीम यश मिळवून प्रख्यात पाश्चात्य वैद्यांशीं बरोबरीनें स्पर्धा करणारे जे कांहीं थोडेसे वैद्यशिरोमणी ह्या भरतभूंत चमकत आहेत त्यांत गुरुवर्य देवधरांची गणना होत असल्यानें कोणताही

आयुर्वेदाचा अभ्यासू त्यांना गुरुस्थानीं मानीलच यांत संदेह नाहीं. त्यांतहि त्यांचे गुरु कै० गणेशशास्त्री तरटे यांचा व खास गु० देवधरांचा व माझा पुष्कळच जुना परिचय असल्यानें, त्यांच्याबद्दल माझ्या मनांत अत्यंत आदर पूर्वीपासूनच वसत आहे. त्यांच्या वैद्यकपटुत्वाचाहि मला स्वतःला आजारी असतांना अनुभव आला आहे. म्हणून मी जरी प्रत्यक्ष त्यांच्या शिष्यांच्या प्रभावळींत उभा राहूं शकत नाहीं तरी देवळांत गाभाऱ्याच्या बाहेर उभे राहून दुरूनच देवपूजेसाठीं तुलसीदलें व पुष्पें देवास वाहून कृतकृत्य मानणाऱ्या भक्तांप्रमाणें मी आहे. आणि मला अशी खात्री आहे कीं ही माझी पूजा गुरुदेवांच्या चरणीं रुजूं होईल.

चरित्रलेखक माझे मित्र दातारशास्त्री यांनी म्हटल्याप्रमाणें ( देवधर चरित्राचीं पृष्ठें २८।२९ ) आम्हां आर्यांची गुरुशिष्यपरंपरा अपूर्व, अद्भुत, कौतुकास्पद व आदर्शभूत आहे. त्या संस्थेच्या पुण्य–प्रवाहांत त्यांनीं यथेच्छ अवगाहन केलें असल्यानें त्यांचें तद्विषयक वर्णन लहान पण उत्कृष्ट काव्यच झालें आहे. तें येथें शब्दशः उतरण्याचा दुस्तर मोह मला होत असताहि नाइलाजानें त्याकडे वाचकांना अंगुलिनिर्देश करून तो मी आवरून धरीत आहे. ही भारतीयांची पुण्यपरंपरा, हें ज्ञानसत्र ज्यांनीं अनवरत चालूं ठेवलें त्यांनाच, या आयुर्वेदाच्याच काय पण भारतीय संस्कृतीच्या अंगभूत असलेल्या सर्व शास्त्रांच्या अवहेलनेच्या काळांत, त्या विद्यांना जिवंतच नव्हे तर प्रभावी ठेवण्याचें श्रेय आहे. अशा पावन परंपरेंत अंशभाक् होणारे गुरुवर्य देवधर आहेत हें त्यांनीं आजवर ४० विद्यार्थ्यांना ज्ञानदान देऊन, प्रसंगविशेषीं त्यांच्या चरितार्थाचाच नव्हे तर इतर खर्चाचाहि भार सोसून, एका दिव्यावर दुसरे दिवे लावल्यानंतर मुळचा कोणता हें जसें समजेनासें होतें त्याप्रमाणें तेजस्वी करून ठिकठिकाणीं आपल्या आयुर्वेदाचे दीप प्रज्वलित ठेवले आहेत यावरून कळून येतें. त्यांतहि गुरुवर्यांना ज्ञानार्जनासाठीं ज्या आपत्तिपरंपरेच्या प्रखर वणव्यांतून भाजत, होरपळत निघावें लागलें त्या दुःखाची जाणीव सदैव त्यांना असल्यानें ज्ञानार्जनासाठीं येणाऱ्या व मधुकरी वृत्तीवरहि जीवित कंठून आयुर्वेदाच्या ज्ञानगंगेंतून आपणाप्रमाणेंच पैलतीर गाठूं इच्छिणाऱ्या कांहीं गरीब होतकरू विद्यार्थ्यांना ( प्रो० वैद्य व

कै० दुर्गाताई खर्डीकर यासारख्या ) स्वतःचे घरीं ठेवून त्यांच्यावर ज्ञानाचाच काय पण अपत्य निर्विशेष प्रेमाचाहि वर्षाव ते सदैव करीत व अद्यापहि करीत असतात. कांहीं वर्षे मधुकरी तर कांहीं काळ मूदभर भातावर, भर तारुण्यांत अर्धपोटी राहून विद्यादेवीची एकनिष्ठेनें तपश्चर्या करणाऱ्या गुरुवर्यांनांच ' गुणराशिनाशी दारिद्र्याची ' जाणीव अंतःकरणाला कायमची घरें पाडण्याइतकी तीव्र व तीक्ष्ण आहे. अशा ' रंजल्या गांजल्या ' विद्यार्थ्यांना त्यांनीं जवळ करून, त्यांना आपले म्हणवून, आपल्या साधुत्वाची साक्ष जगास पटवून दिली याबद्दल गुरुदेवांचें कोण कौतुक करणार नाहीं ? " एक वेळ मूदभर भात मिळण्याचा पोटांत न मावणारा आनंद " ! ही गुरुवर्यांची विपन्नावस्था किती होती याचें ज्वलच्चित्र आहे ! पण त्यांतहि अशा विपत्तीत " शिकण्यास मिळणार " या त्यांच्या आनंदाचें अमृतसिंचन या धगधगलेल्या व सदैव होरपळणाऱ्या आपत्तींच्या ज्वालांवर होत असल्यानेंच ते त्यांतून सहीसलामत निघाले आणि म्हणूनच ते अशा विपद्ग्रस्त विद्यार्थ्यांना आश्रयस्थान होऊन बसले. हजारो होतकरू तरुणांच्या सदिच्छांचें दारिद्र्य हें जरी स्मशान आहे तरी या स्मशानांतच वास करणारे भगवान् श्रीशंकर कांहीं तपस्व्यांना भेटून त्यांचें इच्छित पूर्ण करूं शकतात. असे तपस्वी गुरुवर्य होते म्हणूनच त्यांना कै० तरटेशास्त्री यांच्यासारख्या श्रीशिवमूर्तीचा लाभ झाला व त्यांच्या आयुष्याची पावन गंगा अनेक विद्यार्थ्यांना उद्धरूं शकली.

गुरुवर्यांचें आयुष्य-चरित्र, लेखकानें सुंदर तऱ्हेनें रेखाटलें आहे. त्यांत लेखकाचा गुरुजींच्या बद्दलचा परमादर पदोपदीं व्यक्त होतो. आणि गु० देवधरांचें चरित्रहि तसेंच अद्भुतरम्य असल्यानें वाचकांचें अंतःकरण केव्हां करुणरसानें सद्गदीत होतें तर केव्हां आनंदानें, कौतुकानें उल्हसितहि होतें. एकनिष्ठशिष्य, अतिशय बुद्धिमान विद्यार्थि, विद्यार्थ्यांवर पुत्रांहूनहि अधिक प्रेम करून त्यांना पूर्ण विद्यादान करणारा गुरू, " दक्षस्तीर्थात्तशास्त्रार्थो दृष्टकर्मा शुचिर्भिषक् " या वचनाप्रमाणें तंतोतंत असणारा निस्पृह वैद्य, देशकालपात्र पाहून दान करणारा दानशूर, आदर्शभूत संसार थाटणारा गृहस्थाश्रमी, या सर्व दृष्टीनीं गु० देवधरांचें चरित्र अष्टपैलू हिऱ्या-

प्रमाणें मोठें खुलून दिसतें. असा चरित्रनायक व माझे मित्र वामनशास्त्री दातार यांच्यासारखा लेखक मिळाल्यावर चरित्रग्रंथ विविधवृत्तींच्या अलंकारांनीं सजला जावा यांत नवल तें काय असणार ?

चरित्रलेखकाचा हेतू हें चरित्र लिहून गुरूपूजन करण्याचा तर आहेच पण ज्या कालखंडांत ही विद्वत्परंपरा चालत आली त्या काळांतील आयुर्वेदाचा थोडासा तरी इतिहास त्यांत उमटावा हाहि त्यांतला अंतस्थ हेतू आहे. नाथसंप्रदायांतील मत्स्येंद्रनाथांना रिझवण्याचें निमित्त करून मृदंग वाजवणाऱ्या गोरखनाथांचा जसा अन्य हेतू होता तसाच माझ्या मित्राचा हा अंतस्थ हेतू ही गुरुशिष्य–परंपरा सतत पण प्रभावितेनें चालविली जावी हें सूचित करण्याचा आहे. या एक शतकांतली आयुर्वेदाची शिक्षणपद्धति देशकालवर्तमानाला साजेशी नाहीं, तिच्यांत सुधारणा व्हावयास हवी, व ती या परंपरेंत तयार झालेल्या लोकांनींच करावयास पाहिजे हें त्यांनीं ठिकठिकाणीं दिग्दर्शित केलें आहे. गुरुवर्यांचें पुण्यचरित्र आयुर्वेदाच्या शिक्षणपद्धतींत सुधारणा करूं इच्छिणाऱ्यां आयुर्वेद सेवकांना अंशतः तरी मार्गदर्शी होईल अशी खात्री वाटते. प्रतिकूल कालांत व फारसें शिक्षण नसतांहि कै० गोपाळराव बिवलकरांसारखे व्यवहारकुशल वैद्य ज्या विद्येच्या अंशानेंहि होऊं शकतात त्या आयुर्विद्येचें यथासांग शिक्षण झाल्यास व राजाश्रय मिळाल्यास तीच विद्या आहे यापेक्षां सहस्त्रपटीनें अधिक प्रभावशाली होईल यांत शंका नाहीं. गुरुवर्य देवधरांच्या चरित्र प्रकाशनानें हें इष्ट कार्य अंशतः तरी सिद्धीस जाईल अशी आशा वाटते. त्यांच्या शिष्यपरंपरेपैकीं चरित्रलेखक दातारशास्त्री यांनीं नासिक येथें भरलेल्या वैद्यसंमेलनापासून तों तहत नुकत्याच काशीस हिंदू विश्वविद्यालयांत भरलेल्या व बहुतांशीं यशस्वी झालेल्या पंचमहाभूत व त्रिदोष परिषदेपर्यंत तें कार्य नेटानें व एकनिष्ठेनें चालवलें आहे. सुदैवानें माझ्या मित्राप्रमाणेंच माझे दुसरे मित्र आयुर्वेदाचार्य नानलशास्त्री व डॉ० लागू यांनीं पुण्यास, वैद्यपंचानन गुणे यांनीं अहमदनगरास, डॉ० पोपट प्रभुराम व वैद्य गुर्जर यांनीं मुंबईस, श्रीमंत पुराणीक यांनीं पनवेलीस, डॉ० आगाशे वगैरे मंडळींनीं साताऱ्यास, श्री० वल्लभदास मुरलीधरदास यांच्या आश्रयानें मी येवल्यास, वैद्यभूषण हिर्लेकर यांनीं उमरा-

वतीस, व इतर वैद्यडॉक्टरांनीं अनेक ठिकाणीं हा आयुर्वेदाचा नंदादीप तेवत ठेवला आहे. या प्रयत्नांना अंशतः तरी यश मिळाले हें पाहण्याचें भाग्य गुरुवर्यांना लाभलें आहे. या प्रयत्नांस अधिक यश आलेलें पाहण्यास परमेश्वर गु० देवधरांना उदंड आयुरारोग्य देवो व त्यांच्या हातून आयुर्वेदाची व त्यामुळें जनतेची अधिकाधिक सेवा घडो हीच त्या जगन्नियंत्या परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

माझे मित्रश्रेष्ठ दातारशास्त्री यांनीं ही गुरूपूजनाची संधि आकस्मिक आणून दिली याबद्दल त्यांचे आभार मानून ही अल्पशी प्रस्तावना पुरी करतो.

दत्तजयंती, मार्गशीर्ष शु॥ १५,<br>येवलें } विष्णु महादेव भट.

# निवेदन.

गुरुवर्यांच्या चरित्र लेखनाचें कार्य त्यांच्या शिष्य वृंदानीं प्रेमानें व एकमतानें मजकडे दिल्यानें गुरुसेवा करण्याचा अत्यंत महत्वाचा व पवित्र योग लाभला, व ही अल्पस्वल्प सेवा गुरुचरणीं सादर करता आली याबद्दल आमच्या सर्व गुरुबंधूंचा मी अत्यंत नम्रपणानें आभारी आहे. या चरित्र लेखनांत जें कांहीं वैगुण्य असेल तें माझ्या असमर्थतेचें द्योतक होय. मिळा-लेल्या माहिती वरून चरित्र लिहिण्याचा मी यथाशक्ति प्रयत्न केला आहे.

तसेंच हें चरित्र लिहीत असतांना जे जे विचार प्रदर्शित केलें आहेत त्या संबंधीची सर्व तऱ्हेची जबाबदारी वैयक्तिक माझेवर आहे. चरि-त्रांतील सर्वोत्कृष्ट भाग हा गुरुवर्यांच्या पुण्याचरणाचा व त्यांच्या शिष्य-वृंदाच्या निर्मळ चारित्र्याचाच परिणाम होय.

या चरित्रलेखनाचें कामीं रा० रा० केशव गोपाळ दाते सहसंपादक लोकसत्ता, श्री. दत्तात्रय धोंडो पुराणीक व चि० रामचंद्र शंकर महाजन यांचें सहाय्य झालें हें येथें नमूद करणें मी माझें कर्तव्य समजतो.

प्रस्तावना लेखक मित्रवर्य डॉ० विष्णु महादेव भट, भूमिकाकार प्रो० परशराम लक्ष्मण वैद्य व सत्कार मंडळाचे मंत्रिद्वय श्री० त्र्यंबकशास्त्री दाते व श्री० सदाशिवशास्त्री लवाटे यांच्या सहाय्यानें चरित्र-लेखनाची पूर्ती झाली आहे तेव्हां आभार-प्रदर्शनांत त्यांचीं नांवे उल्लेखिणें आवश्यच आहे.

या चरित्र ग्रंथांतील सर्व ब्लॉक श्री० वडनेरे ब्रदर्स फोटो झिंको ब्लॉक मेकर्स नासिक रोड यांनी तयार केले आहेत. ब्लॉक्स वेळेवर व शक्य तों उत्तम करण्याचे त्यांनी परिश्रम घेतले याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

माझे परममित्र वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांनीं आपल्या लोकसत्ता छापखान्यांत सदर पुस्तक छापण्याची जबाबदारी स्वीकारून पुस्तक सुंदर व वक्तशीर छापून दिलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सर्व शिष्यवृंदानी आपापली माहिती पुरविली याबद्दल त्यांचे पुनः मी आभार मानतो.

**वैद्य वामन केशवशास्त्री दातार**

# भूमिका.

गुरुवर्य तीर्थरूप कृष्णशास्त्री देवधर वैद्य यांच्या गेल्या पाउणशें वर्षांच्या आयुष्याचें आणि पन्नास पंचावन वर्षांच्या कामगिरीचें सिंहावलोकन त्यांचा शिष्यवर्गाकडून आज प्रसिद्ध करण्यांत येत आहे. यांत नुसत्या गुरुभक्तीपेक्षां अधिक खोल अर्थ आहे. तीं० शास्त्रीबुवांच्या शिष्यांची संख्या सुमारें ४० वर आहे. यापेक्षां जास्त शिष्य-संख्या असलेले गुरु पुष्कळ असतील, पण आपल्या उज्वल चारित्र्याचा ठसा प्रत्येक शिष्यावर ठेवून, त्यास आयुष्यांत प्रामाणिक आणि स्वतंत्र जीवनाचा मार्ग दाखवून, आणि असें करण्यांत पदरचे पैसे घालवून, विद्या देणारे गुरु क्वचितच आढळतील. तीं० शास्त्री-बुवांच्या आयुष्याचें ध्येय कोणास आकुंचित वाटेल–पण उत्तम आणि आदर्शभूत नागरिक होण्यास लोकोत्तर ध्येयापेक्षां सर्व साधारण व्यक्तीच्या आटो-क्यांत असणारें लौकिक ध्येयच जास्ती उपयोगी पडतें; तें ध्येय ह्मणजे जन्मतः दरिद्री असलेल्या मनुष्यास सुद्धां बुद्धीच्या व उद्योगाच्या जोरावर स्वतंत्र जीवनाचा मार्ग काढतां आला पाहिजे, नंतर त्यानें आपली दानत संभाळली पाहिजे, चारित्र्य संशयातीत शुद्ध ठेवलें पाहिजे, आणि हेंच ध्येय पुढील पिढींत उतरविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तीं० शास्त्रीबुवांच्या चरित्राचा विचार केला तर त्यांनीं हें ध्येय आपल्या विद्यार्थ्यांपुढें सतत ५२।५३ वर्षे टेविलें आहे; स्वतःही तें आचरणांत आणिलें आहे.

माझी आणि तीं० शास्त्रीबुवांची पहिली भेट सन १९०६ सालच्या मार्च महिन्यांत झाली. सांगलीच्या व्याकरणशाळेंत कौमुदीचें अध्ययन संप-वून मी सन १९०५ च्या सप्टेंबरमध्यें माझे सांगलीचे दोघे सहाध्यायी मित्रवर्य रामभाऊ शेवडे व ग्रामबंधु मित्रवर्य नारायणशास्त्री कोनकर यांसह कोल्हापूरचे के० गुरुवर्य हणमंतशास्त्री पाध्ये यांचेजवळ वैद्यकाचा अभ्यास करण्यासाठीं गेलों. पण सुमारें १५।२० दिवसांतच तेथें प्लेगचा उपद्रव सुरू झाला. आम्हां तिघांपैकीं मि० रामभाऊ शेवडे यांना प्लेगचा ताप आला.

गांवात कोणी आम्हास आपल्या घरीं राहूं देईना, म्हणून त्यांस शेवटीं प्लेग हॉस्पिटल मध्यें पोंचवावें लागलें; पण त्यांची आयुष्याची दोरी बळकट म्हणून म्हणा, किंवा आम्हा मित्रांच्या शुश्रूषेस यश द्यावयाचें होतें म्हणून म्हणा, कारण हॉस्पिटलमध्यें आम्हांस रोग्याजवळ शुश्रूषेस राहण्याची विशेष परवानगी मिळाली होती. रामभाऊ दहा बारा दिवसांत बरे झाले. त्यांस घरीं पोंचविल्यानंतर मी पुन्हा घरीं येऊन बसलों. पण शिकण्याची उत्कट इच्छा असल्यामुळें, आणि इंदूर येथील सरकारी संस्कृत पाठशाळेंत वैद्यक शिकण्याची सोय आहे अशी बातमी लागल्यामुळें थोडेच दिवसांत तेथें जाऊन कै० गु० चिंतामणशास्त्री खरे यांचेजवळ शिकण्यास सुरवात केली. मित्रवर्य हरीभाऊ पराडकर हे तेथें माझे सहाध्यायी होते. पण तेथेंही थोडेच दिवसांत प्लेगचा प्रादुर्भाव होऊन पाठशाळेंतील एका विद्यार्थ्याचा त्यानें बळी घेतल्यामुळें मला इंदूरही सोडावें लागलें. पण गु० चिंतामणशास्त्री यांनीं घरीं परत न जातां नाशकास आपले गुरु कृष्णशास्त्री देवधर यांचेकडे जाण्यास सांगितलें, त्यामुळें मी नाशकास आलों. गुरुवर्य शास्त्रीबुवांची मी गांठ घेतली, व शिकण्यासाठीं तेथें राहण्याची इच्छाही दर्शविली. पण नाशकांतही प्लेग असल्याने त्यांनीं मला पुन्हा दोन महिन्यांनी येण्यास सांगितले व प्लेग संपताच येण्याबद्दल त्यांनी मला पत्राने कळविलेंही. त्या प्रमाणें मी सन १९०६ च्या मे महिन्यांत नाशकास दाखल होऊन अभ्यासास सुरवात केली. थोड्याच अवधींत सांगली–कोल्हापूरचे माझे सहाध्यायी मि० रामभाऊ शेवडे व इंदूरचे सहाध्यायी मि० हरीभाऊ पराडकर हेही नाशकास आले, आणि आम्हा त्रिवर्गाचा अभ्यास जोरानें सुरू झाला.

वर प्रमाणें ती० शास्त्रीबुवांच्या घरीं आल्यापासून तो सन १९१० जून मध्यें पुण्यास इंग्रजी शिक्षणासाठीं येईपर्यंत मी त्यांच्याच घरीं राहात असें व जेवत असें. मधुकरी वृत्तीने राहण्याची तयारी व पूर्वाभ्यास असतांही ती० शास्त्रीबुवांनीं मला मधुकरी मागूं दिली नाहीं किंवा शागीर्दवृत्तीनेंही वागूं दिलें नाहीं. तेव्हांपासून त्यांनीं मजवर आपल्या पुत्रांना सुद्धां हेवा वाटावा इतक्या तऱ्हेनें प्रेम केले, आणि तसेंच प्रेम ते आज तागायत मजवर करीत आले आहेत. माझ्या समजुतीप्रमाणें ती० शास्त्रीबुवांचा प्रत्येक शिष्य त्यांविषयीं असेंच आपणाशीं म्हणत असेल.

माझे सहाध्यायी मि० शेवडे आणि पराडकर यांबरोबर आमचा अभ्यास उत्तम रीतीनें चालला होता. सन १९०८ साली आम्ही तिघेही पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वैद्यक विषयाच्या पहिल्या यत्तेस परीक्षेस बसून ती० शास्त्रीबुवांचे परीक्षक डॉ० गर्दे यांच्या हातून लेखी व तोंडी परीक्षांत उत्तम रीतीनें पासही झालों. या पूर्वीच्या २५ वर्षांत म्हणजे ती० शास्त्रीबुवांनीं पुण्यास परीक्षा दिल्यानंतर वैद्यकांत कोणीच परीक्षेस आला नव्हता, व आतांही पूर्वीच्या परीक्ष्याचेच शिष्य परीक्षेस आल्यामुळें त्यावेळचे सभेचे चिटणीस रा० नारायण दासो बनहट्टी यांनीं सभेच्या वृत्तांतांत ती० शास्त्रीबुवांचा आणि आम्हा तिघांचाही गौरवपूर्वक उल्लेख केला होता. नंतर १९०९ साली आम्ही तिघेही वैद्यकाच्या दुसऱ्या परीक्षेस बसलों, पण आह्मांपैकीं मि० पराडकर व मी असे दोघेच पास झालों.

या नंतर मि० शेवडे आणि पराडकर यांनीं वैद्यकीचा धंदा सुरू करण्याची तयारी चालविली. मी तिघांत वयाने लहान असल्यामुळें एक प्रकारें धंदा सुरू करण्यास योग्य नव्हतों. म्हणून म्हणा किंवा योगायोगामुळें ह्मणा माझ्या मनांत इंग्रजी शिकण्याची इच्छा उत्पन्न झाली, व सुमारें ३।४ महिन्यांत पहिल्या तीन यत्तांस लागणाऱ्या इंग्रजीची तयारी करून ती० शास्त्रीबुवांच्याच घरीं येऊन व राहून नाशिक हायस्कूल मध्यें, सन १९०९ नवंबर मध्यें इंग्रजी चौथ्या यत्तेंत दाखल झालों. पुढील जूनमध्यें ती० शास्त्रीबुवांचे परम मित्र कै० प्रो० नानासाहेब पानसे यांच्या उत्तेजनानें न्यू इंग्लिश स्कूल, पुणें, या शाळेंत पांचव्या यत्तेंत बसलों. वैद्यकांत आपली शिष्यपरंपरा निर्माण करून आचार्यऋण फेडण्याचें काम मात्र मजकडून झालें नाहीं, पण ती० शास्त्रीबुवांनीं मात्र मजवर या नंतरही पूर्वी इतकेंच प्रेम करून माझ्या प्रत्येक अडचणीच्या वेळीं अपत्यनिर्विशेष मदत केली, येवढेंच नव्हे, तर मी मेडिकल कॉलेजांत गेल्यास तेथील अवाढव्य खर्च करण्याचीही तयारी त्यांनीं दर्शविली होती. पण माझ्या मनानें असें घेतलें कीं, ती० शास्त्रीबुवा मजवर आपल्या मुलांपेक्षांही जास्त खर्च करीत आहेत, हें बरोबर नाहीं, मजवर खर्च करावयाचा पैसा यापुढें त्यांनी आपल्या मुलांच्या विद्येकरितांच ठेविला पाहिजे.

ती० शास्त्रीबुवांना आपल्या लहानपणीं किती अडचणींत व कष्टांत

दिवस काढावे लागले होते ही हकीकत चरित्र ग्रंथांत आलीच आहे. सामान्य मनुष्य जन्मतः दरिद्री असून पुढें श्रीमंत झाला तर पूर्ववृत्त विसरतो, असामान्य मनुष्य त्या दिवसांची आठवण ठेवून अडचणींत असलेल्या लोकांना शक्त्यनुसार मदत करितो, अशा असामान्य मनुष्यांपैकींच एक ती० शास्त्रीबुवा आहेत. त्यांनीं शिष्य म्हणून स्वीकारलेल्या विद्यार्थ्यांस तशा अडचणी त्यांनीं येऊं दिल्या नाहींत येवढेंच नव्हे, तर परमगुरु के० तरटेशास्त्री यांनीं ज्या ज्या बाबतींत ती० शास्त्रीबुवांना मदत केली होती त्या प्रत्येक बाबतींत यांनींही आपल्या शिष्यांस मदत केली इतके सांगितलें म्हणजे या मुद्याचा विस्तार करण्याचें कारण नाहीं.

ती० शास्त्रीबुवांचा मित्रपरिवार मोठा आणि विविध आहे. नव्या जुन्या मतांचे लोकही यांत असत. ती० शास्त्रीबुवांच्या सर्वच मतांशीं जुळणारी त्यांची वागणूक नसे, पण यामुळें त्यांच्या स्नेहसंबंधास मात्र कधींही बाध आला नाहीं, याचें मुख्य कारण ह्मणजे ती० शास्त्रीबुवांची परमतसहिष्णुता हेंच होय. दुर्वृत्त माणसाच्या सोंवळ्यापेक्षां सुवृत्ताचें ओवळें त्यांस आवडतें. बडबडीपेक्षां कृतीकडे त्यांचें लक्ष असतें. अशक्य गोष्टीपेक्षां शक्य गोष्टी करण्याबद्दल त्यांचा उपदेश असतो.

ती० शास्त्रीबुवांच्या शिष्यांच्या सर्व आठवणी संगृहीत करणें हा या चरित्र-ग्रंथाचा मुख्य हेतु नाहीं, तर चरित्र नायकाच्या आयुष्याचें चित्र यथातथ्य रेखाटणें हा आहे, म्हणून माझ्या भूमिकेनें मी यापेक्षां जास्त जागा अडवीत नाहीं. ती० शास्त्रीबुवांविषयीं त्यांच्या शिष्यवर्गास काय वाटतें हें थोडक्यांत दर्शित करणें हें या भूमिकेचें मुख्य प्रयोजन आहे. ती० शास्त्रीबुवांनीं आपल्या शिष्यवर्गाला लौकिक आणि लोकोत्तर अशीं दोन्ही प्रकारचीं ऋणें दिलीं आहेत, त्या पैकीं लौकिक ऋण जरी शिष्यवर्गानें पूर्णांशानें फेडलें तरी लोकोत्तर ऋण फेडण्यापेक्षां तें सदैव मस्तकीं धारण करणें यांतच या शिष्यवर्गास भूषण वाटतें हे सांगण्यासाठीं मी ही शिष्यवर्गाची भूमिका लिहिली आहे.

वाडिया कॉलेज, पुणें
ता. १।१२।३५
परशराम लक्ष्मण वैद्य

भाग पहिला.

# वैद्यक घराणीं व गु. तरटेशास्त्री

## प्रकरण १ लें

# उपोद्घात.

अवाढव्य विश्वाचा पसारा अगम्य व अतर्क्य. या विश्वाच्या पसाऱ्यांत या पृथ्वीमातेचें स्थान राईएवढें गणलें जातें. त्या राईएवढ्य पृथ्वीच्या पोटांत एका मनुष्यप्राण्याचें जीवन तें किती मोठें असणार? व त्या जीवनलेखनाचा परिणाम व उपयोग कोणावर व किती होणार? अखंड दंडायमान कालाच्या अप्रतिहत गतीमध्यें कोणच्या भूत-वर्तमानभविष्य अशा गत्यंशाच्या स्पंदनांत या जीवनाचें स्पंदन उमटून दिसणार? कारण या कालाच्या सतत स्पंदनाचें भव्य व विराट स्वरूप किती भयानक, किती आश्चर्यकारक आणि बुद्धिच्या मर्यादेपलिकडचे आहे याचा विचार केला असतां सतत व सारख्या वेगानें प्रवाहित होणाऱ्या या कालचक्रांत एकच काय पण अनंत विश्वाची गती व आगती जेथें सुरू आहे व या गतागतांचा जेथें उल्लेखही सांपडणार नाहीं व ज्याच्या परिणामाची कल्पनाही होऊ शकत नाहीं त्या काला-च्या सर्व विश्ववेष्टित प्रवाहांत एका मनुष्यप्राण्याचें जीवन तें काय असणार? केवढें असणार? व कालाच्या कोणत्या अंशाच्या मर्यादेंत कोणत्या फलकावर किती उमटणार? क्रीडाकौतुक परमेश्वराच्या विश्व-कंदुक क्रीडेंत मनुष्यप्राण्यांचा पार काय लागणार? या कंदुकाच्या चालू असलेल्या टप्प्यांपेकींच एखाद्या टप्प्याचा एखादा क्षुद्रांश म्हणजेच मनुष्याचें जीवन असणें शक्य आहे; तर मग त्याची गणना ती काय करावयाची, व कशी ध्यानांत आणावयाची? ‘ प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ’ ‘ कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ’ या वाक्याप्रमाणें सर्व विश्वां-

तील सृष्ट प्राण्यांच्या प्रत्येक श्वासनिश्वासाचें चेष्टितच जेथें परतंत्र, परप्रवर्तित चालू आहे तेथें अशा श्वासनिश्वासांची मोजदाद करून त्याचें वर्णन करण्यांत काय फायदा? आणि इतकेही बाजूस सारून आपण एखाद्या मनुष्यप्राण्याचा जीवनांश चित्रित केलाच तर सर्वंकष विस्मृतीचा बोळा त्यावरून फिरून फलक पुन्हां कोराचाकोरा राहतोचना? मग जीवनचरित्र चित्रित कशासाठीं करावयाचें असे निराशाग्रस्त व अंधकाराच्या घनदाट प्रदेशांत नेऊन सोडणारे विचार उत्पन्न होतात व प्रयत्नांचें वैयर्थ्य सत्यस्वरुप धारण करतें.

## चरित्रलेखनाची उपयुक्तता

याही मोठ्या अगम्य अशा अनेक विश्वांच्या वा गोलांच्या अवाढव्य फापट पसाऱ्यांतही अत्यंत क्षुद्रांश अशा मनुष्यप्राण्यास स्वतःला परप्रेरित का असेना पण स्पंदत राहावे लागतेचना? विश्वकंदुकांतील अगणनीय व अलक्षित क्षुद्राहून क्षुद्र अशा अंशाला त्या स्पंदनोत्पन्न गतींत समाविष्ट होऊन कंदुकाची स्पंदन-गति पूर्णांशानें पूरित करण्याचें कार्य अनिर्वाहपक्षानें का होईना करावेंच लागतेनां? अखंड दंडायमान कालालाही पलेंविपलें या क्षुद्रांशानेंच परिगणित आणि त्याच्याचमुळें अखंडित असें व्हावें लागतेंचना? त्या अंशाला सोडून कालाचेंही सातत्य व अखंडत्व असूं शकत नाहीं. सहस्ररश्मी भगवान् सूर्यनारायणाच्या, अनंतकोटि किरणांपैकीं प्रत्येकाला प्रकाशित व दूरोत्सारित व्हावेंच लागतें व त्यामुळेंच त्यालाही सहस्ररश्मी ही संज्ञा पूर्णत्वानें प्राप्त होते. अर्थात् अपरिमित संख्येंत एकाचेंही महत्व वाटत नाहीं पण त्याचें असलेलें महत्व जाणवल्याशिवाय व मान्य केल्याशिवाय भागत नाहीं. कारण अपरिमित तत्वाचा प्रारंभच परिमिततेच्या कल्पनासापेक्षावर व परिमित अशा एकं या संख्येवरच प्रारंभित व गृहीत धरावाच लागतो. इतकें महत्व एकंलाही आहेच. या विचारसरणीनें एका मनुष्यप्राण्याचें जीवनस्पंदनाचेंही महत्व नाहीं, असें म्हणतां येणार नाहीं.

चेंडुफळीच्या खेळांत चेंडूला मिळणाऱ्या अनेक धक्क्यांत जसे कांहीं विशिष्ट मर्यादेपर्यंत किंवा त्या मर्यादेपेक्षांही विशिष्ट दिशेनें

मिळणाऱ्या व आपल्या मिळालेल्या गतीच्यो वेगांत दुसऱ्याचा प्रति-रोध न जुमानणाऱ्या धक्क्यालाही, खेळाच्या यशापयशाचें व जनतेच्या हर्षोत्पादनाचें जनकत्व व महत्व लाभतें. तसेंच सहस्रावधि मनुष्य-प्राण्यांपैकीं ज्याचें विश्वस्पंदनांतील स्वतःचें स्पंदन सर्वातिशायी, अनेका-तिशायी, सामान्यातिशायी असें असूं शकतें त्याच्या स्पंदनालाही त्या त्या दृष्टीनें महत्व आहेच. याच दृष्टीनें आपल्यामध्यें पूर्णावतार, अंशावतार व अवतार या कल्पनांचा उद्भव होऊन, "यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा । तत्तदेवावगच्छ त्वं ममतेजोंशसंभवम् ॥" या सामान्या-तिशायी तेजोंशसंभवाच्या कल्पनेचा उगम झाला आहे व ह्याच कल्पनेवर विश्वसित होऊनच मनुष्यप्राण्याच्या जीवनाव्यतिरिक्तही, सर्व जड किंवा चेतन सृष्टींतही या सामान्यातिशायित्वाचें-'मासानां मार्ग-शीर्षोहं' इत्यादि वाक्यांनीं श्रीभगवंतानें आपणच तीं तीं आहोंत असें उल्लेखून महत्व वर्णित केलें आहे. तर मग मनुष्याचें जीवनस्पंदन किती महत्वाचें असूं शकेल किंवा किती महत्वाचें असावें किंवा आहे; हें त्यावरून समजून येईल. या एका आधारावरूनच विभूतिमान् मनुष्याच्या चरित्रलेखनाचें समर्थन करतां येईल.

## गुरुवर्यांच्या चरित्रलेखनाचा हेतु.

हा आधार घेऊनच आम्ही आमच्या गुरुवर्यांचें चरित्र व त्यांची विशिष्ट कार्यपरंपरा यांचें वर्णन यापुढें करण्याचें योजिलें आहे. वर उल्लेखित केलेल्या सामान्यातिशायी या सदरांत जरी आमच्या गुरु-देवांचा समावेश झाला असला तरी तो अतिशायित्वानें युक्त असल्यानें व "तत्तस्य किमपिद्रव्यं योहि यस्य प्रियोजनः" या कव्युक्तीनें आमचे गुरुदेव हें आमचे किमपि (अनिर्वचनीय) असें द्रव्य असल्यानें व द्रव्याला कांहीं किंमतही असतेच म्हणून त्या किंमतीचें स्वरुप आम्ही जगापुढें मांडण्याचा प्रयत्न करणें हें वावगें तर होणार नाहींच, उलट वस्तुमूल्याच्या पारखी असलेल्या अशा मानवी जगांत ती किंमत पटवून देण्याचें महत्श्रेय आम्हांस मिळणार आहे. व आमच्या गुरु-देवांच्या चरित्रवर्णनानें एका विशिष्ट शास्त्रपरंपरेच्या जीवनप्रवाहाचें दर्शनही समाजास करून देतां येणार आहे.

## आयुर्वेदाच्या इतिहासाची आवश्यकता.

आयुर्वेद किंवा आर्यवैद्यक या विशिष्ट शास्त्राचा इतिहास इतर शास्त्रांच्या इतिहासाप्रमाणेंच आपल्या देशांत लुप्तप्रायच आहे. शास्त्रांनाही इतिहास असतो किंवा असा इतिहास असणें त्या त्या शास्त्रांच्या जीवनास अथवा प्रगतीस अवश्य आहे ही कल्पनाच अद्यापि आपणामध्यें प्रामुख्यानें उद्भूत झालेली नाहीं असें म्हणावें लागतें. इतिहासाची सामान्य कल्पना, लढाया, राज्यांची उलथापालथ, व तीं करणारे वीर पुरुष, किंवा राजकारणी यांचें संकलित वृत्त म्हणजे तेवढा इतिहास येवढीच असल्याचें आढळून येते. परंतु ही कल्पना अत्यंत संकुचित होय. इतिहासांत मानवी जीवनाच्या विकासाचें जें जें अंग असूं शकेल त्या त्या प्रत्येक अंगाचा समावेश झाला पाहिजे. अशा सर्व अंगांचें अद्ययावत् स्वरूप ज्यामध्यें समाविष्ट होत असेल तोच खरा इतिहास होय. अर्थात् सर्व शास्त्रें, कला, उद्योगधंदे, समाजाच्या विशिष्ट, धार्मिक, नैतिक, शैक्षणिक, शारीरिक, बौद्धिक, आर्थिक, आयुष्यिक, तेजसिक, साहसिक अशा सर्व घडामोडींना व त्या घडवून आणणाऱ्या व्यक्तींनां इतिहासांत स्थान पाहिजे. इतिहासमंदिरांत, या सर्वांच्या राहण्याची सोय निरनिराळ्या दालनांत झालीच पाहिजे व तीं सर्व दालनें, जागतीं व जिवंत पाहिजेत; तरच तें भव्य असें इतिहास-मंदीर खुलून व बोलून उठेल आणि राष्ट्राच्या अभ्युदयास साधनीभूत होईल. यादृष्टीनें आयुर्वेदाचा इतिहास लिहिला गेला पाहिजे. असा इतिहास लिहिण्यास फार परिश्रम करावे लागतील व त्याला अनेक साधनांची आवश्यकता असून तें कार्य तडीस नेण्यास कालाच्याही अवकाशाची जरूरी आहे. तें इतिहासलेखनाचें कार्य कोणी करील तें करो. आयुर्वेदाच्या इतिहासाच्या एका कालखंडांतील, निदान प्रकरणवजा तरी कांहीं लिहीलें जावें येवढाच उद्देश या पुस्तकाचा आहे.

## आयुर्वेदाचा पडता काल.

हा कालखंड म्हणजे गेलीं सुमारें १०० वर्षें होत. आयुर्वेदाचा सर्वतोपरी पडता काल जर कोणता असेल, तर तो हाच होय. अशाहि सर्वस्वी पडत्या कालांत ज्यांनीं आयुर्वेदाची जोपासना करून

त्याला जीवंत ठेवलें व त्याच्या अभ्युदयाची आशा धरली व प्रयत्न केले, त्यांची थोरवी काय वर्णावी ? गाढ अंधारांत प्रकाशाचा एक अंधुक किरण दृष्टीस पडणें जितकें महत्वाचें, मार्गदर्शक व आनंद-दायक असतें, तसाच हा प्रयत्न आहे. स्वराज्यवैभव रसातळास पोंच-लेलें, पराक्रम नष्ट झालेला, संपत्तीला ओहटी लागलेली, श्रीमंत सरदार दरकदार घराणीं उध्वस्त झालेलीं, पोशिंदे नाहींसे झालेले, पाश्चात्यांच्या सत्तेनें सर्वत्र नवीन अम्मल बसविलेला, सर्वांच्या वृत्ती भयचकित, हताश व गांगरून गेलेल्या, सर्व जें कांहीं पूर्वी होतें तें नाहींसें होऊन डोळ्यास जें कधीं पाहिलें नव्हतें तें दिसूं लागलेलें, अशा स्थितींत कोण कोणाची पूसतपास करतो ? रोजच्या जीवनाची जेथें पंचाईत तेथें शास्त्रांची कोण फिकीर करतो ? असा तो बिकट काल होता. अशाही दुर्घट परिस्थितींत ज्यांनीं शास्त्रसेवा करून आपलें सत्व रक्षण केलें व आयुर्वेद जिवंत ठेवला, शास्त्रें जिवंत ठेवलीं व तींही स्वतःचे जबाबदारीवर कष्ट करून ठेवलीं त्यांचें महत्व काय कमी आहे ? आयुर्वेदाची सेवा ज्यांनीं पडत्या कालांत अविश्रांत केली त्या पुण्यश्लोकांचें वर्णन करण्याचें भाग्य आम्हाला या प्रसंगानें लाभलें त्याबद्दल खरोखर धन्यता वाटत आहे. आमच्या गुरुदेवांचें चरित्र या कालखंडाच्या आयुर्वेदीय इतिहासानें निगडित झालेलें आहे आणि या चरित्राचें मिषानें हा इतिहासही थोडाफार लिहिला जावा, हाही उद्देश मनांत धरून हा उपक्रम करण्याचें योजिलें आहे.

## वैद्यकाची जागती परंपरा.

नाशकास वैद्यपरंपरा सारखी जिवंत ठेवण्याचें व ती दिवसें-दिवस वाढीस लावावयाच्या महत्वाच्या कार्याचें बीजारोपण महनीय परमपूज्य पंडीत वैद्यराज के० गणेशशास्त्री तरटे यांनीं प्रथम केलें. त्यांचे अगोदर आर्यवैद्यकाची जागती परंपरा नाशकास आढळून येत नाहीं. त्यावेळीं नाशकास विद्वान् व पढिक वैद्य कोणीच नव्हतें असें नाहीं; तथापि आयुर्वेदाच्या पद्धतशीर पठनपाठनाचा सारखा उपक्रम ठेऊन, तीच परिपाठी सारखी कायम ठेवण्याचें महत्वाचें कार्य के० गणेशशास्त्री तरटे यांनींच केलें यांत मुळींच शंका नाहीं.

## प्रकरण २ रें.

# कांहीं वैद्यक घराणीं.

### वैद्य उमाशंकरभाई.

कै० तरटेशास्त्री नाशकास येऊन स्थाईक होईपावेतोंच्या कालांत कांहीं नामांकित विद्वान् वैद्य नाशकास होते. त्यांमध्यें गुजराथी वैद्य उमाशंकरभाई हेच प्रमुख होते. कै० उमाशंकरभाईविषयीं जी सर्व-साधारण त्रोटक माहिती आम्हांस मिळाली ती देत आहों. रा० रा० कै० उमाशंकरभाई हे गुजराथी ब्राह्मण शुक्ल यजुर्वेदीय कंडोलिया. यांचें गोत्र 'बंधुरस' होय. हे काठेवाडांतून इकडे आले व नासिक येथें स्थाईक झाले. फार नामांकित विद्वान् व अधीत वैद्य अशी यांची ख्याती होती. यांनां आपल्या यशस्वी धंद्यामुळें नासिक तालु-क्यांतील लहित व सिरसाट गांवीं दोन इनाम जमिनी मिळाल्या असून त्या अद्याप त्यांच्या वंशजांकडे आहेत. यांना नासिक येथें गंगेवर क्षेत्रोपाध्यायाची वृत्तीही दिक्षित उपनांवाच्या गृहस्थास रोग-मुक्त केल्यामुळें मिळाली, तीही त्यांचे वंशजाकडे चालू आहे. तसेंच एका कष्टसाध्य रोग्यास बरें केल्यामुळें त्याचेकडून श्रीकाळेरामास एक मोठी देणगी, यांनीं देवविली; असा यांचा लौकिक ऐकूं येत आहे. इतकें हे नामांकित वैद्य होऊनही, त्यांचें घराण्यांत मात्र ती परंपरा राहिली नाहीं.

### चांदोरकर घराणें.

त्यांचे शिष्य मोरेश्वर उर्फ बापूजी सदाशिव चांदोरकर यांचेकडेस ती गेली. या घराण्यांत मात्र ही परंपरा अद्याप चालूं आहे. यांचे चिरंजीव चिंतामण मोरेश्वर हेही वैद्यच होते. त्यांचे चिरंजीव रा० रा०

ग्रंथ क्र. ता.

सिताराम चिंतामण उर्फ सितारामशास्त्री हेही प्रसिद्ध वैद्य होते. यांचे शिक्षण आपल्या वडिलांजवळच झालें, व कांहीं श्री० रा० रा० गोविंदशास्त्री निरंतर यांचे जवळ झालें. त्यांनीं आपलें कारकीर्दीत धंद्याचा जम फार उत्तम बसविला. आबालवृद्ध गोरगरीबांना सिताराम-शास्त्री यांचा फार उपयोग होत असे. हे वयाचे ५२ व्या वर्षी प्लेगनें सन १९१२ सालांत वारले. त्यावेळेस त्यांचे पुतणे रा० रा० वामनशास्त्री हे लहान असून इंग्रजी शिकत होते. त्यामुळें परंपरेचें शिक्षण त्यांना मिळालें नाहीं; परंतु वामनशास्त्री यांनीं कै० गणेश-शास्त्री तरटे यांचेजवळ अध्ययन केलें व ही वैद्यराज उमाशंकरभाईंची परंपरा तरटे यांचे परंपरेंत येऊन विलीन झाली. याशिवाय वैद्यकाच्या स्वतंत्र परंपरा म्हणजे पुढें लिहिल्याप्रमाणें कै० गोविंदशास्त्री निरंतर व वैजनाथ लक्ष्मण उर्फ आबाशास्त्री दाते यांच्या होत.

## निरंतरांचें घराणें.

कै० गोविंदशास्त्री निरंतर यांचा जन्म शके १७५७ अश्विन शु॥ ९ रोजीं नासिक येथें झाला. यांचें शिक्षण कांहीं नासिक येथें व कांहीं ग्वाल्हेर येथें झाले. यांस प्राचीन शास्त्रांच्या पोथ्या जमविण्याचा अत्यंत नाद असे. यांनी अत्यंत श्रम करून अनेक शास्त्रां-च्या पोथ्या मिळविल्या. डॉ० भांडारकर, निर्णयसागर, आनंदाश्रम वगैरे ठिकाणीं त्या मुद्रित व प्रकाशित करण्याकरतां म्हणून नेहमीं यांचेकडून जात असत. त्यामुळें यांचें नांव फार प्रसिद्धीस आलें. हे शके १८०५ सालीं वारले. यांचे पश्चात् यांचे चिरंजीव सखारामशास्त्री हे वैद्यक-शास्त्राचें अध्ययन करून धंदा करीत असत. हे कै० गणेशशास्त्री तरटे यांचे शिष्य कै० मनोहरमामा देव यांचेजवळ वैद्यकी शिकत असत. यामुळें हीही शाखा पुढें कै० तरटे यांचे शाखेतच येऊन मिळाली. श्री० सखारामशास्त्री निरंतर यांचा जन्म शके १७८२ सालीं झाला व मृत्यु शके १८२२ साली झाला. वयाच्या ऐन ४० वें वर्षी हे दिवंगत झाले. यांचेच घराण्यांतील रा० पांडुरंग गणेश निरंतर हे गु० रा० रा० कृष्णशास्त्री यांचेजवळ वैद्यकाचें अध्ययन करून सध्यां धंदा करीत आहेत.

## दाते यांचें घराणें.

रा० रा० वैजनाथ लक्ष्मण दाते उर्फ आबाशास्त्री हे मूळचे नाशिकचे रहिवासी असून यांचे वडील कै० रा० रा० वे० शा० सं० लक्ष्मणशास्त्री हे अत्यंत विद्वान् व ग्रंथकारशास्त्री होऊन गेले. यांची प्रगाढ व्युत्पन्न म्हणून नाशकांत प्रसिद्धी होती. यांचे अभिनवरामायण-चंपू व आमोदमंदार हे संस्कृत व गजेंद्रमोक्ष हा मराठी असे ग्रंथ प्रकाशित आहेत. यांना बरेचसे कोश मुखोद्गत असल्यानें यांच्या काव्यांत अने-कार्थी श्लोकांचा फार भरणा आहे व त्यामुळें त्यांचीं काव्यें अत्यंत क्लिष्ट पण अनेकार्थी म्हणून प्रसिद्ध आहेत. रा० रा० आबाशास्त्र्यांचें संस्कृताचें शिक्षण, वडिलांजवळ झालें व वैद्यकाचें शिक्षण गुरुमुख न करतांच त्यांनी स्वतः संपादन केलें. हे धंद्याकरितां मुंबईस गेले तेथें धंदा चांगला चालला परंतु वडिलांचे मागे घरची व्यवस्था व संपादन केलेली, गंगेवरील वृत्ति फार मोठी असल्यानें ते परत नाशकास येऊन धंदा करूं लागले. हे अनुभवी वैद्य म्हणून पुढें प्रख्यातीस आले. यांचा जन्म सन १८३५ सालीं झाला. हे वयाचे ७६ व्या वर्षी इसवी सन १९११ त दिवंगत झाले. यांचे दोन्ही चिरंजीव श्री० आप्पाशास्त्री व श्री० गोपिनाथशा० उर्फ बापूशास्त्री हेही वैद्यकी शिकले होते व धंदा करीत असत. सध्या कै० आबाशास्त्री यांचे नातू वैद्य त्र्यंबक-शास्त्री, हे वैद्यकीचा व्यवसाय करीत आहेत. यांचे शिक्षण गु० रा० रा० कृष्णशास्त्री देवधर यांचेजवळच झाले आहे. दाते यांचे घराणें नाशकांत फार नामांकित समजले जात असून श्रीगोदावरीचे क्षेत्रउपा-ध्याय म्हणून हे प्रख्यात आहे. गावांत कोकणस्थ हिरण्यकेशीयांचे ग्राम म्हणून या घराण्यास पहिला मान मिळत आहे.

## बिवलकरांचें प्रसिद्ध घराणें.

नाशकांत त्यावेळेस जें एक मोठें वैद्याकाचें घराणें होतें तें म्हणजे रा० रा० बिवलकर यांचें होय. यांचें घराण्यांतील मूळपुरुष रा० रा० धोंडो नारायण बिवलकर हे प्रथम नाशकास आले. यांचें कोकणांतील गांव पालशेत ता० राजापूर जि० रत्नागिरी हें होय. यांस



कै० आबाशास्त्री दाते.



कै० प्राणाचार्य गोपाळराव विठलकर.

भाऊ विवलकर असेंही नांव असून ते मोठे प्रख्यात होते. यांचे चिरंजीव रा० रा० चिंतामणशास्त्री हेही वैद्यकीच करीत. यांचे चिरंजीव 'रामादादा' मोठे अधीत व सिद्धहस्त वैद्य होते, अशी त्यांची अद्यापि लोकांचें तोंडीं ख्याती आहे. यांनींच आपल्याजवळ वैद्यक ग्रंथाचा संग्रह केला व आपली एक स्वतंत्र अनुभविक चिकित्सा पद्धति रूढ केली; यावरून हे मोठें बुद्धिमान् आणि कर्तबगार पुरुष होऊन गेले असें दिसतें. यांस दोन चिरंजीव एक निलकंठ व दुसरे गोपाळ होत. रा० रा० निलकंठराव हे अत्यंत हुषार असून आयुर्वेदाचें त्यांचें अध्ययन वाखाणण्यासारखें होतें, पण ते व्यापाराचे उद्योगांत असल्यानें त्यांनीं वैद्यकीचा धंदा केलाच नाहीं.

रा० रा० रामादादांचें दुसरे चि० रा० गोपाळराव यांचा जन्म सन १८५५ सालीं नासिक येथें झाला. त्यांचें पालनपोषण त्यांचे मातुःश्रीनें केलें. त्यांचें संस्कृत अध्ययन नासिक येथें पाठशाळेंत झालें. वैद्यकीचें अध्ययन कोणाजवळ केलें नाहीं. घरींच के० रा० रा० रामादादांनीं करून ठेवलेल्या वह्यावरूनच त्यांनीं वैद्यकीचा धंदा सुरूं केला. रा० रा० गोपाळरावकाका बुद्धिनें कुशाग्र असल्यानें लौकरच त्यांनीं आपल्या धंद्यांत चांगला जम बसविला. त्यांना या धंद्यांत त्यावेळेस रामादादांचें बैठकींत असलेले रा० रा० गोविंद भाऊ शिवदे यांची मोठी मदत झाली. रा० रा० गोपाळराव हे त्यांचे हयातींत कांहीं काल नाशकास सर्वांत मोठें वैद्य म्हणून नांवाजले, यांत शंका नाहीं.

त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, भाषा गोड, शरीराचें सौष्ठव अत्यंत चांगलें, टापटीप व स्वच्छता वाखाणण्यासारखी, धंद्यांतील कौशल्य व बुद्धिचें सामर्थ्य व नाशकांतील प्रतिष्ठित लोकांची पूर्वीपासून त्यांचें येथें असणारी व पुढें काकांच्या जीवनावसानापर्यंत कायम राहिलेली मोठी बैठक, यामुळें काकांचें नांव नाशकांतच काय पण महाराष्ट्रांत व महाराष्ट्राचे बाहेरही बरेंच झालें. त्यांचें वजन मोठमोठ्या सरदार घराण्यांत व श्रीमंत लोकांत फार वाढलें व कांहीं काळ तर, असा गेला कीं, नाशकांत योग्य सल्लामसलत जर कोठें व कोणाकडून

मिळेल तर बिवलकरांकडूनच अशी लोकांची खात्री असल्यानें अनेक लोकांचीं कामें के० काकांकडून होऊं लागलीं.

के० काका हे सार्वजनिक कार्यांतही, आपल्या मगदुराप्रमाणें मोठ्या हौसेनें लक्ष घालीत असत व साह्य देत असत. प्रस्तुत लेखकानें 'मित्रमेळ्याच्या' सार्वजनिक अशा शिवाजी व गणपती उत्सवांतील कार्यक्रमांत व वेळोंवेळीं सार्वजनिक सभांचे वेळीं अध्यक्ष म्हणून त्यांची योजना करून साह्य मिळविलें आहे. इतर सार्वजनिक सभांतूनही लोकांनीं त्यांचें साह्य घेतलें आहे. लोकांचे विश्वासांतील प्रख्यात वैद्य, योग्य सल्लागार, कुशल शस्त्रवैद्य, सार्वजनिक सभा, उत्सव वगैरेमध्यें व हरएक सार्वजनिक अशा गांवकीच्याही कार्यांत कळकळीनें भाग घेणारे व साह्य देणारे, रुबावदार व दिलदार शोकीगृहस्थ म्हणून के० काकांची साऱ्या नाशकांत मोठी बोलबोला झाली असल्यास नवल नाहीं. के० गोपाळराव हे प्रख्यात शंकर दाजीशास्त्री पदे यांस, वैद्य-संमेलन व सनातनधर्मसभा यांचीं पहिली अधिवेशनें नाशकास १९०७ सालीं भरविण्याच्या कामांत प्रमुख सहाय्यक होते; इतकेंच नाहीं पण बराव संस्थानचे अधिपति या संमेलनाचे अध्यक्ष होते तरी सर्व सभांचें खरें कार्य के० काकांचें अध्यक्षत्वानेंच पार पडलें. यावेळीं के० गोपाळरावांचें सहाय्य जर के० पदे यांस नसतें तर ही सभा व संमेलनें यशस्वीपणानें पार पडलीच नसती. या संमेलनाचे वेळीं के० बिवलकरांचें अंगीं असलेलें संघटनाचातुर्य, मुत्सद्दीपणा, मनमिळाऊ स्वभाव, कार्याविषयीं कळकळ, आस्था व स्वार्थत्यागाची तयारी इत्यादि गुणांचा लोकांस फार उपयोग झाला; यांत कांहीं शंका नाहीं. या-पुढेंही पनवेल, मुंबई वगैरे ठिकाणीं भरलेल्या वैद्यकसंमेलनांत के० गोपाळरावांनीं प्रामुख्यानें भाग घेतला होता. संमेलनानेंही जाहीर रीतिनें गौरव करून त्यांना 'प्राणाचार्य' ही पदवी दिली होती; व ते त्या पदवीला सर्वथैव योग्य होते.

के० गोपाळरावजी आपल्या धंद्यांत तर सिद्धहस्त होतेच, पण त्यावेळेस आपल्या शस्त्रक्रियानैपुण्यानें अनेक अडलेल्या स्त्रियांस त्यांनीं

जीवदान दिलें आहे व अनेक लहान ऑपरेशनें करून लोकांना आपले शस्त्रक्रियानैपुण्य त्यांनीं दाखविलें आहे. हा त्यांचा गुण सर्व महाराष्ट्रांतील त्यावेळच्या वैद्य लोकांमधील विशेष होय. या वैशिष्ट्यानेंही त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें. हें वैशिष्टय त्यांचें बरोबरच नष्ट झाले, ही दुःखाची गोष्ट होय.

कै० गोपाळराव बिवलकर हे आपल्या हयातींत अनेक संस्थांचे ट्रस्टी, अनेक घराण्यांचे सल्लागार व व्यवस्था पहाणार म्हणून नांवाजले होतेच; पण त्यांनीं आपल्या इस्टेटींतून पैसाफंड कांचशाळेला व संस्कृत पाठशाळेला मोटी देणगी देऊन आपले औदार्य व स्वदेश आणि स्वधर्मप्रेम व्यक्त केलें. त्यांचे पश्चात् त्यांचे इस्टेटींतूनच, रविवारपेठेंत त्यांचें नांवाचें कारंजें बांधून शहरालाही मोठी शोभा आणली गेली. कै० गोपाळरावांचा मृत्यू त्यांचें वयाचें ६० वें वर्षी सन १९१४ सालीं झाला. अशारीतिनें आपलें प्रसिद्ध व यशस्वी आयुष्य संपवून हा पुरुष दिवंगत झाला. पुत्रसंतती नसल्यानें हें घराणें नष्ट झालें.

कै० गोपाळराव, यांचेजवळ त्यांचे शिष्य म्हणून ज्यांनीं व्यावहारिक (प्रॅक्टिकल) शिक्षण घेतलें त्यांत कै० अनंतशास्त्री हरी पाटणकर, कै० लक्ष्मणशास्त्री दांडेकर व रा० रा० नारायण मोरेश्वर रानडे उर्फ घारूआप्णा हे होते. रा० रा० अनंतशा० पाटणकर हे जरी कै० गणेशशा० तरटे व मनोहरमामा देव यांचेजवळ शिकले असले तरी ते कै० गोपाळरावांचे पट्टशिष्य मानले जात व ते स्वतःही तसेच मानीत व लोकांतही तीच प्रसिद्धि आहे म्हणून त्यांची माहिती थोडक्यांत देत आहों.

## श्री० अनंतशास्त्री पाटणकर.

रा० रा० अनंत हरी पाटणकर हे मूळचे नासिक जिल्ह्यांतील ता० निफाड यांतील कोठुरें या गांवचे राहणारे. विद्यार्थी दशेंतच हे नाशकास आले व मधुकरीवृत्तीनें राहून विद्याभ्यास करूं लागले. नाशिक येथील संस्कृत पाठशाळेंत त्यांनीं अध्ययन केलें व वैद्यकी शिकण्यास

कै० तरटेशास्त्री यांचेकडे रा० लक्ष्मणशास्त्री दांडेकर यांचेबरोबर जाऊं लागले. त्यानंतर त्यांनीं कांहीं दिवस रा० रा० मनोहरमामा देव यांचेकडे वैद्यकीचें शिक्षण घेतलें व प्रत्यक्ष व्यवहाराचें ज्ञान रा० रा० गोपाळराव बिवलकर यांजपासून संपादन केलें. नाशकांत कित्येक वर्षें रा० रा० पाटणकर, रा० रा० लक्ष्मणशा० दांडेकर व रा० रा० गोपाळराव बिवलकर असे तिघे एकदम रोग्याकडे फिरतीवर जात असल्याचा देखावा पाहण्यास लोकांस मिळत होता. पैकीं लक्ष्मणशा० दांडेकर हे लौकरच दिवंगत झाले व रा० रा० अनंतशा० पाटणकर व रा० रा० घारुआण्णा रानडे हे दोघे गोपाळरावांबरोबर जाऊं येऊं लागले. या दोघांनीं बराचकाळ प्रत्यक्ष शिक्षण घेण्यांत काढला. रा० रा० अनंतशा० हे अध्ययनापेक्षां धंद्यांत चांगलेच तरबेज झाले. त्यांचा स्वभावच मूळचा चलाख असल्यानें त्यांचे लोकांवर तेव्हांच वजन पडत असे. हेही अडलेल्या स्त्रियांची सुटका प्रसंगविशेषीं शस्त्रक्रिया करूनही चांगल्याप्रकारें करीत असत. रा० रा० पाटणकरांचा धंदा कांहीं काळ फार चांगला चालला व त्याना मानमरातब यश, धन यांची प्राप्ती उत्तम झाली. त्यांचा स्वभाव राजसी असल्यानें ऐषआराम, डामडौल व अनेकप्रकारच्या सुखसोयी उपभोगण्याकडे त्यांची प्रवृत्ति फार असे. व बराच पैसा व्रतेंवैकल्यें, स्मार्त हवन, तुलसीविवाह वगैरे धार्मिक कृत्यांकडे त्यांनीं खर्च केला. विशेषतः भिक्षुक मंडळी, अडाणी लोक व मुसलमान यांचेमध्यें यांचा धंदा फार जोरांत चालत असे व यांच्या या धार्मिक कृत्यांनीं या लोकांचें मनावर चटकन् चांगला परिणाम होई व त्यामुळें धंदा उत्तम चालण्यास त्यांना सहाय्य मिळत असे. कै० गोपाळराव बिवलकरांचे मृत्यूनंतर त्यांच्या संपत्तीची व्यवस्था मुख्य पंच म्हणून त्यांनींच केली. अशातऱ्हेनें यांच्या आयुष्याचा काळ मोठा भरभराटीचा व बोलबाल्याचा असा गेला. यांना पुत्रसंतान न राहिल्यानें यांची परंपरा खुंटली. रा० रा० अनंतशास्त्री पाटणकर हे सन १९२३ सालीं वारले.

### श्री० लक्ष्मणशास्त्री दांडेकर.

रा० रा० लक्ष्मणशास्त्री दांडेकर हे नासिक येथील प्रसिद्ध

दांडेकराचें घराण्यांतील असून यांचा जन्म शके १७८७ सालीं झाला. यांचें शिक्षण नासिक येथेंच झालें. संस्कृत अध्ययन रा० रा० मनोहर-मामा देव व संस्कृत पाठशाळा नासिक येथेंच झालें. वैद्यकीचें शिक्षण प्रथम कै० तरटेशास्त्री व नंतर रा० रा० मनोहरमामा देव व त्या-नंतर गोपाळराव बिवलकर यांचेकडे झालें. हे स्वतंत्र धंदा करून नांवारूपास येण्याच्या योग्यतेचे तयार झाले होते पण ते शके १८२५ सालीं एकाएकीं दिवंगत झाले. यांचे चिरंजीव वे० रा० रा० परशरामभट दांडेकर हे नाणावलेले दशग्रंथी वैदिक म्हणून नासिक येथें प्रसिद्ध आहेत.

## श्री० घारूआण्णा रानडे.

रा० रा० नारायण मोरेश्वर उर्फ घारूआण्णा रानडे राहणार थळ ता० अलिबाग जि० कुलाबा, कोकणस्थ ब्राह्मण. हे आपल्या वयाच्या १४–१५ वे वर्षी सन १८९० सालीं नाशकास आले व विद्यार्थी म्हणून कै० नारायणराव टिल्लू ( त्यावेळचे प्रसिद्ध वकील ) यांचे-कडे राहूं लागले. यांचें संस्कृत अध्ययन पाठशाळेंत प्रख्यात गुरुजी कै० वे० शा० रा० रा० वासुदेवशास्त्री वैद्य यांचेकडे झालें व कांहीं संस्कृताचें अध्ययन मनोहरमामा देव यांचेपाशी झालें. वैद्यकीचें शिक्षण प्रथम कै० तरटे यांजकडे नंतर रा० रा० मनोहरमामा देव यांचेजवळ झालें. त्यानंतर औपधें करणें, भट्टया लावणें वगैरे शिक्षण ९६ ते १९०० पावेतों कै० तरटे यांचेजवळच झालें. त्यांनीं धंद्याचें शिक्षण कै० गोपाळराव बिवलकर यांचेजवळ बरीच वर्षें राहून घेतलें. हेही वैद्यबुवांबरोबर रोग्याकडे अनुभवाची जोड मिळण्याकरतां जात असत. यांचाही धंदा एकंदरींत चांगला चालला. हे अद्यापही धंदा करीत असून नांवलौकिक संपादून आहेत.

## इतर कांहीं वैद्य.

कै० रामादादा बिवलकर यांचे शिष्य गणेश धोंडदेव जोशी ऊर्फ आबा हे चांगले अधीत वैद्य झाले पण वयाच्या ३३ व्या वर्षी यांचा देहांत झाला. हे शस्त्रवैद्यकी करीत असत. कै० रामादादांचे

मृत्यूनें के० रा० रा० गोपाळराव यांस संस्कृत व वैद्यकशास्त्र यांचें प्रत्यक्ष शिक्षण मुळींच न मिळाल्यानें व शास्त्राचें अंग कमी असल्यानें एकंदरींत बिवलकरांचे शिष्यांची परंपरा अध्ययन व अध्यापन या प्रणालिकेनें पुढें सारखी सतत राहूं शकली नाहीं व बिवलकरांचें घराण्यांतही कोणी राहिले नसल्यानें परंपरेचे व कांहीं विशिष्ट अनुभविक प्रयोग आतां दुर्मिळ झाले आहेत. अशारीतिनें नासिक येथील वैद्यकीची एक स्वतंत्र शाखा सन १७७६ पासून सुरू होऊन आजपर्यंत रा० रा० रानडे वैद्यांचे पर्यंत चालू असली असें गृहीत धरलें तरी शिष्यपरंपरा नसल्यानें यापुढें ही शाखा, लुप्तप्रायच झाली व या घराण्यांतील पशुरोगचिकित्सेचें व शस्त्रक्रियेचेंही वैशिष्टय नष्ट झालें हें निःसंशय होय. तथापि या शंभरसवाशें वर्षांचे अवधींत या घराण्याचा व परंपरेचा नाशकास फार उपयोग झाला यांत शंका नाहीं. आयुर्वेदीय चिकित्सा किती प्रभावी, यशस्वी व उपयुक्त असते याची जाणीव या घराण्यानें व या परंपरेनें नासिक येथील जनतेस इतकेंच नव्हे तर महाराष्ट्रांतही फार परिणामकारक रीतिनें पटवून दिली; यांत मुळींच शंका नाहीं. खानदेश, वऱ्हाड, मुंबई व इतर ठिकाणाहून अनेक रोगी धाव घेत नाशकास येण्यास, या घराण्याचा व परंपरेचा प्रभावही पुष्कळअंशी कारण आहे असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. या परंपरेंतील दोन वैद्य रा० रा० बिवलकरकाका व रा० रा० पाटणकर हे नांवाजलेले व प्रख्यात यशस्वी वैद्य होऊन गेले. अशातऱ्हेनें या परंपरेचा, आयुर्वेदाचे पडत्या काळांतही त्याचें तेज प्रगट करण्याचें कामीं फार उपयोग झाला. याकरतांच या परंपरेविषयीं सदोदित कृतज्ञच राहिलें पाहिजे. या घराण्याशिवायही के० गंगाधरशास्त्री भावे व के० नारायणबावा निरंतर या मंडळींचें नामांकित वैद्य म्हणून नांव ऐकूं येतें पण यांचेसंबंधीं विशेष माहिती उपलब्ध होत नसल्यानें देतां येत नाहीं.

---X---

प्रकरण ३ रें.

# कै. गणेशशास्त्री तरटे.

आमचे परमपूज्य परमगुरु कै० गणेश सखारामशास्त्री तरटे, शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण गोत्र भारद्वाज यांचा जन्म नासिक पंचवटी क्षेत्रांत शके १७५३ सन १८३१ सालीं झाला. शास्त्रीबुवांची मातोश्री पुण्याचे प्रख्यात विद्वान् शिवबा बापू श्रोत्री, यांची मुलगी गङ्गुबाई ह्या होत. वडील रा० रा० सखारामशास्त्री हे निरूपणी कीर्तन करीत असत. पंचवटींत रास्त्यांचें श्रीकृष्ण मंदीराजवळ यांचें घर होतें. शास्त्रीबुवांचें प्राथमिक शिक्षण पंचवटींतच झालें व थोडें संस्कृत शिक्षणही पंचवटींत झालें. नंतर ते आपले आजोबा शिवबापू श्रोत्री यांचेकडे शिक्षणासाठीं म्हणून पुण्यास गेले. तेथें त्यांनीं वे० शा० सं० रा० बंडूनाना रानडे यांचेजवळ संस्कृताचें अध्ययन केलें. रा० रा० बंडूनाना हेही रा० रा० शिवबापू श्रोत्री यांचे शिष्य होत. रा० रा० शिवबापू श्रोत्री हे एक मोठे नामांकित व्युत्पन्न म्हणून त्यावेळेस पुण्यास गाजलेले असत. त्यांचेप्रमाणेंच रा० रा० बंडूनाना रानडे हे नामांकित व्युत्पन्न तयार झाले. कै० बापूसाहेब मेहेंदळेही शिवबा बापूंचेच संस्कृत भाषाविषयाचे शिष्य व बंडूनाना रानडे यांचे गुरुबंधु होत. अशा नाणावलेल्या विद्वानाजवळ श्री० गणेशशास्त्रीबुवांचें संस्कृत भाषाविषयक अध्ययन फार उत्कृष्ट झालें. संस्कृतभाषेची तयारी झाल्यावर विश्रामबागवाड्यांतील संस्कृत पाठशाळेंतच कै० बाळशास्त्री माटे यांचेजवळ यांचें आयुर्वेदाचें शिक्षण झालें. कै० बाळशास्त्री माटे यांचे चिरंजीव हल्लीं पुण्यास वकील आहेत. रा० रा० बंडूनाना रानडे यांचें घर

शनिवार पेठेंत आहे. दोघा सुविख्यात पंडितांजवळ संस्कृत व वैद्यक विषयांचें अध्ययन झाल्यानंतर वे० शा० सं० गणेशशास्त्री तरटे हे नाशकास आले व त्यांनीं वैद्यकीचा धंदा सुरू केला.

शास्त्रीबुवांचा विवाह नाशकास येवलेकर यांचें घराण्यांतील गोविंदराव येवलेकर यांचे चुलतबहीणीशी झाला. त्यांचें नांव सौ० गोदूबाई होतें. शास्त्रीबुवा शिकून तयार होऊन आले त्यावेळेस नाशकास प्रख्यात उमाशंकरभाई व रा० रा० रामादादा बिवलकर हे वैद्यकी करीत असत. यावेळीं शास्त्रीबुवांचे वय २५ ते ३० असावें. कांहीं काल नाशकास घालविल्यावर नंतर ते धुळयास रहावयास गेले. तेथें प्रख्यातीस आलेले नामदार धोंडो शामराव गरुड हे शास्त्रीबुवांजवळ संस्कृताचें अध्ययन करीत असत. नंतर ते धुळयाहून मुंबईस रहावयास गेले व तेथें रा० रा० गणपत कृष्णाजीच्या प्रसिद्ध छापखान्यांत पगार रुपये ५० वर शास्त्री म्हणून राहिले. याच काळांत त्या छापखान्यांतून महाभारत, भागवत हे मोठे ग्रंथ सटीक असे प्रसिद्ध झाले. नासिकचे प्रख्यात विद्वान् आप्पाशास्त्री खार्डीलकर हे तेथें मुख्य शास्त्री म्हणून काम करीत असत. मुंबईस तरटे यांचा मुक्काम ५–६ वर्षें झाला. त्याच काळांत त्यावेळचे प्रख्यात पुढारी व नामांकित वकील विश्वनाथ नारायण मंडलिक यांचा व शास्त्रीबुवांचा संबंध येऊन विशेष परिचय वाढला. याचें कारण असें कीं, कै० गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत स्नेहभावानें व अन्यकारणें वरील मंडलीक येत असत. तेथें त्यांचा निकट संबंध असे. कै० मंडलीकांची मंडळी (कुटुंब) बरीच आजारी झाली. अनेक उपाय केले पण आराम कांहीं नाहीं तेव्हां त्यांचे कानावर तरटेशास्त्रीबुवांचें नांव गेले व त्यांनीं लागलीच त्यांना बोलावून परीक्षा करविली व उपचार चालू केले त्यामुळें बरें वाटलें. त्यावेळच्या एकमेकांच्या परिचयांत श्री० मंडलीकांना तरटेशास्त्रीबुवांची विद्वत्ता व योग्यता समजून येऊन, त्यांजवर त्यांचा लोभ जडला. रा० मंडलीकही मोठे संस्कृतज्ञ होते. त्यांनीं मनुस्मृतीची, उपलब्ध टीकांसह संशोधून सुंदर व अत्यंत शुद्ध अशी आवृत्ति प्रसिद्ध केली आहे.

मुंबईस ५ – ६ वर्षे अशारीतिनें छापखान्यांत काम केल्यानंतर शास्त्रीबुवा हे मे० सिंक्लेअर साहेब यांचें बोलावण्यावरून वऱ्हाडांत बावनवीर या गांवीं मराठी शिक्षकाचें कामावर ६० रु० पगारावर रुजू झाले. वऱ्हाडांत असतांना रा० श्रीराम भिकाजी जठार व रा० रघुनाथराव तळवलकर वगैरे .गृहस्थांशीं शास्त्रीबुवांचा स्नेह जडला. परंतु शास्त्रीबुवांस वऱ्हाडांतील उष्ण हवा मानवली नाहीं त्यामुळें त्यांनीं तिकडे ५–६ वर्षे कशीतरी काढली; पण पुढें ते आजारींच झाल्यानें त्यांनीं वऱ्हाड सोडून नाशकासच आपला मुक्काम कायम केला. इतक्या अवधींत शास्त्रीबुवांच्या कुटुंबाचें पुण्यास देहावसान झालें होते.

शास्त्रीबुवांनीं नाशकास कायमचें राहणें केल्यानंतर वैद्यकीबरोबर जोडधंदा म्हणून लेसनवेंडराचेंही काम कांहीं वर्षे केलें. त्यावेळेस, नाशकास रा० ब० विष्णू मोरेश्वर भिडे सेशनजज्ज् व रा० ब० गोपाळराव हरी देशमुख फ० स० जज्ज होते. शास्त्रीबुवांचा व या दोघांचा अत्यंत परिचय होता व त्यांच्यामुळें शास्त्रीबुवांनीं लेसनवेंडरीचा उद्योग, त्यांच्या आग्रहानें पत्करला. या अवकाशांत पंचवटींतील आपलें घर विकून आदितवार पेठेंत शके १७९७–९८ त नवीन घर त्यांनीं बांधिलें. रा० रा० गोपाळराव हरी देशमुख यांचे शिफारसीवरून शास्त्रीबुवांची, अलिबागचे श्री० भाऊसाहेब बिवलकर यांचेकडे वैद्य म्हणून येजा सुरू झाली. यावेळेस कच्चा खर्च व दरमहा रुपये ३० शास्त्रीबुवांस श्री० बिवलकरांकडून मिळत असत. शेवटीं मोठी रक्कमही पण शास्त्रीबुवांस श्री० भाऊसाहेबांकडून मिळाली. शास्त्रीबुवा मधून मधून धंद्यानिमित्त बाहेरगांवी जाऊं लागल्यानें वेंडरचें काम त्यांचे चिरंजीव रा० रा० गंगाधरपंत पाहूं लागले. शास्त्रीबुवांस गंगाधरपंत हे एकच चिरंजीव व चि० सौ० सीताबाई ह्या एकच कन्या होत्या. चिरंजिवांचें शिक्षण ( मराठी ) नाशकास झालें आणि संस्कृत व वैद्यकीचें शिक्षण शास्त्रीबुवांजवळ घरींच झालें. चि० गंगाधरपंतांचें लग्न नासिक येथें झालें. त्यांचे श्वशुर ओझरकर व सौभाग्यवतीचे नांव लक्ष्मीबाई होतें. शास्त्रीबुवांची मुलगी चि० सीताबाई खानदेशांत रा० माचवे यांचेकडे

दिली होती. रा० रा० गंगाधरशास्त्री तरटे यांना, दोन मुलगे रामकृष्ण व गोपाळ आणि दोन मुली भागुताई व बारूताई अशी संतति झाली; पैकीं रामकृष्ण हा प्लेगनें वारला. दोन्ही मुलीही सांप्रत हयात नसून सौ० बारूबाईची पुत्र व कन्या संतति नांदत आहे. धाकटा मुलगा म्हणजे हल्लीं नाशकास म्युनिसिपल आयुर्वेदिक दवाखान्यावर वैद्य असलेले रा० रा० गोपाळशास्त्री तरटे हे होत. रा० गंगाधर-पंतांचा स्वभाव अत्यंत शांत व अबोल असे. त्यांची शरीरप्रकृती बरीच अशक्त असल्यानें लेसनवेंडरचीं कामें सोडण्यास शास्त्रीबुवांनीं त्यांना भाग पाडलें. रा० गंगाधरपंत हे वडिलांचे शुश्रुषेंत अत्यंत तत्पर असत. मधून मधून शास्त्रीबुवा हे वऱ्हाडांत वैद्यकी करावयास जात तेव्हां घरच्या वैद्यकीचा धंदा रा० रा० गंगाधरशास्त्री पहात असत.

शके १८०० शें पासून श्री० शास्त्रीबुवा निव्वळ वैद्यकीच्या धंद्यावरच स्थिर झाले व नाशकास राहिले. श्री० शास्त्रीबुवांचा स्वभाव अत्यंत कडक व बराच लहरी असे. त्यामुळें त्यांचा धंदा चांगला चालण्यास मोठी अडचण येई. कारण त्यांचेजवळ रोग्यांनीं जाऊन मन मोकळें करून आपली हकीकत सांगणेंच भीतीमुळें कठीण होत असें. तथापि निस्पृह, स्पष्टवक्ते व निर्लोभ अशी शास्त्रीबुवांची वृत्ती व प्रखर पांडित्य प्रसिद्ध असल्यानें रोगी लोक त्यांचा स्वभा-वाचा तापटपणा पत्करूनही त्यांजकडे येत असत. स्वच्छतेचे ते अत्यंत भोक्ते, त्यामुळें घर अगदीं आरशासारखें स्वच्छ असें. स्नानसंध्या, टापटीप ठेवणें व आपला रोजचा कामधंदा करणें हीं कामें झाल्यावर श्री० शास्त्रीबुवा शिल्लकवेळ सारखा अध्ययनअध्यापनांत घालवीत. ज्याप्रमाणें गुरुवर्य शास्त्रीबुवा आयुर्वेद पंडीत होते, त्याचप्रमाणें साहित्य-शास्त्रांतही परम निष्णात आणि मोठे रसिक होते. त्यांची बाहेरची राहणी फणसाचे पाठीसारखी पण अंतःकरणवृत्ति आंतील गऱ्यासारखी अत्यंत मधुर असे; त्यामुळें एकदां लोभ जडल्यावर त्यांचें कोमल हृदय, प्रचुर पांडित्य, रसिकता तसेंच परमेश्वरभक्ति आणि उच्च विचारसरणी यांची पूर्ण जाणीव होऊन त्यांच्या सहवासाची उत्कंठा

लागत असे. ते आपलेकडे येणाऱ्या मनुष्याबरोबर आपलेपणानें वागत असत.

कै० शास्त्रीबुवांचे वैद्यकीचें पहिले शिष्य पंचवटींतील रा० रा० गोपाळशास्त्री बिवलकर हे होत. (सुप्रसिद्ध गोपाळराव बिवलकर हे नव्हत). प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांचा व शास्त्रीबुवांचा संबंध अलीबागेस शके १८०० शेंमध्यें आला. शास्त्रीबुवांजवळ रा० देवधर यांचे बरोबर गंगाधरशास्त्री कोळथरेकर हेही वैद्यकी शिकत होते. या-शिवाय आणखी रा० रा० मनोहरमामा देव, सितारामशास्त्री चांदोरकर, नारायण मोरेश्वर रानडे, गंगाधरशास्त्री वाळिंबे, तात्यासाहेब वहाळकर, सखारामशास्त्री निरंतर, गोविंदशास्त्री देव व अनंतशा० पाटणकर वगैरेही त्यांच्याजवळ शिकले पण पूर्ण अध्ययन केलेले खरे शिष्य कृष्णशास्त्री देवधर, कोळथरेकर, मनोहरमामा देव व वामनशास्त्री चांदोरकर हे चौघे होत. वऱ्हाडांत शास्त्रीबुवांबरोबर रा० रा० देवधर-शास्त्री हेही होते. तसेंच नाशकास धंद्याकरतां स्थिर होण्याचे अगोदर एकवार ते मुंबईसच धंदा करण्याचे उद्देशानें गेले होते तेव्हां त्यांनीं प्रख्यात डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे ह्यांच्या सहकार्यानें तेथें एक आयुर्वेद पाठशाला काढली होती. दोघांच्या मतभेदानें व शास्त्रीबुवांचें मुंबईस राहणेंही फार नसल्यानें सदर पाठशाळा फार दिवस चालू शकली नाहीं.

शास्त्रीबुवा नाशकासच कायमचे राहून धंदा करूं लागल्यावर त्यांच्या अध्ययन व अध्यापनादि कार्यास जोर चढून तें नियमित आणि यशस्वीपणानें चालूं राहिलें. त्यांच्या सर्व शिष्यांत रा० रा० मनोहरमामा देव व गु० कृष्णशास्त्री देवधर हेच दोघे प्रमुख होते. वे० शा० सं० कृष्णशास्त्री देवधर तर त्यांचे कल्याण शिष्यच झाले. त्यांचें 'रामोहरी' पासून सर्व संस्कृत काव्यांचें व वैद्यकग्रंथांचें अध्ययन तरटेशास्त्री यांचेजवळच झालें. शास्त्रीबुवांचा सहवास सतत घडल्यानें देवधरांचें अध्ययनास तेज चढलें. कै० तरटेशास्त्री यांनीं मोठ्या हौसेनें आपला शिष्य तयार केला व ते देवधरांना पुण्यास वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वैद्यक विषयाच्या दोन परीक्षा देण्यासाठीं बरोबर घेऊन गेले.

रा० रा० देवधरांचीही तयारी फारच चांगलीच असल्यानें दोन्ही परी-क्षेंत त्यांना अत्यंत उत्तम यश मिळालें. या त्यांच्या यशामुळें गुरुसही मूठभर मास अंगावर चढल्यासारखें होऊन ज्या पुण्यास शिष्यत्व पत्करून आपण विद्यादेवीचें उपार्जन केलें त्याच पुण्यास आपण आपला शिष्य तयार करून त्याच विद्यादेवीचें अनृण्य संपादिलें या-मुळें त्यांना अत्यंत आनंद झाला.

श्री० देवधरांवर तरटेशास्त्रीबुवांचें पुत्राप्रमाणें किंबहुना कांकणभर जास्तच प्रेम होतें. आपल्या कृष्णाला कौतुकानें आपल्या बरोबर घेऊन त्यावेळच्या शास्त्रीमंडळांस आमच्या कृष्णाची परीक्षा घ्या म्हणण्यांत त्यांचें अंगांत आनंदाचें, अभिमानाचें व प्रेमाचें भरतें येत असे अशी लोकवार्ता आहे. या लोकवार्तेप्रमाणें उभयतां गुरुशिष्यांचें पारस्परिक प्रेम व बुद्धि-वैभवही दांडगें होतें यांत शंका नाहीं. कै० तरटेशास्त्री यांना बाणाची कादंबरी व लक्ष्मीसहस्र व इतर काव्यग्रंथ व सबंध अष्टांग संग्रह हा वैद्यक ग्रंथ गायत्रीतुल्य मुखोद्गत असे यांत अतिशयोक्ति बिलकूल नाहीं. दमा लागला आहे, खोकला येत आहे, जीव घाबरतो आहे, बोलण्याची शक्ती नाहीं, अशा अवस्थेंत पांचपन्नास श्लोक आवेशांत ७०।७२ चे वयांत पाठाचे वेळेस किंवा प्रसंगावशात् जोरानें ह्मणून दाखवून त्यांचें विवेचन करण्यांत शास्त्रीबुवांचा दिसून येणारा उत्साह, स्मरणशक्ति आणि स्फूर्ति यांचा अनुभव अनेकवेळां आम्हांस आला आहे.

## अष्टांगसंग्रहाचें प्रकाशन.

यानंतर कै० तरटेशास्त्री यांची मोठी कामगिरी म्हणजे. अष्टांग-संग्रह किंवा वृद्धवाग्भट या वैद्यकग्रंथाच्या संशोधन-प्रकाशनाची होय. अष्टांगसंग्रह हा ग्रंथ ग्वाल्हेरहून कै० गोविंदशास्त्री निरंतर यांनीं स्वतः लिहून नाशकास आणला होता. शास्त्रीबुवांनीं तो ग्रंथ मिळवून त्याचें परिश्रमपूर्वक संशोधन करून तो प्रकाशित केल्यानें वैद्यक-शास्त्र अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांस सर्व हिंदुस्थानांत मोठें साधन उपलब्ध झाल्यासारखें झालें; कारण अष्टांगसंग्रह हा ग्रंथ यापूर्वी पठन-

पाठनाच्या व्यवहारांत बऱ्याच प्रांतांत संस्कृतांत इतकेंच नाहीं पण असा एक ग्रंथ आहे याची कल्पनासुद्धां कांहीं प्रांतांतील लोकांना अलिकडेदेखील नव्हती, असा आमचा स्वानुभव आहे. वाग्भटाचार्यांचे अष्टांगसंग्रह, अष्टांगहृदय व सिद्धसार या नांवाचे तीन ग्रंथ वैद्यकावर आहेत. त्यामध्यें हा वेळपावेतों अष्टांगहृदयाचेंच अध्ययन होत असे. पण सिद्धसार अजूनही अनुपलब्ध व अष्टांगसंग्रह, हाही हावेळपावेतों अप्रकाशित व दुर्मिळ असा असल्यानें अध्ययनाच्या क्रमांत नव्हताच. तो गुरुवर्य तरटेशास्त्री यांच्या संशोधन-प्रकाशनानें अध्ययनक्रमांत प्रथम आला. त्याचें पहिलें मोठें श्रेय केवळ त्यांसच आहे. हा ग्रंथ छापण्यासाठींच गुरुवर्य तरटेशास्त्री, गुरुवर्य देवधरशास्त्री यांचेसह सहा महिने मुंबईस जाऊन राहिले होते. रा० सा० मंडलिकांच्या विशेष आश्रयानें ह्या ग्रंथाचें प्रकाशन-कार्य त्यांनीं पार पाडलें. गुरुवर्य तरटेशास्त्री यांनीं हा ग्रंथ प्रकाशित करतांना ग्रंथावर विशेषस्थळीं टिप्पणीही दिल्या आहेत. हा ग्रंथ त्यावेळच्या सुप्रसिद्ध गणपत कृष्णाजी छापखान्यांत छापला गेला. ग्रंथाची दुर्मिळता, त्याचें महत्व, त्यास मिळणाऱ्या ग्राहकांची अल्पसंख्या, सुंदर छपाई, उत्तम कागद व झालेले अलोट परिश्रम या सर्व गोष्टींचा विचार करतां या ग्रंथाची किंमत रु० १२ ठेवणेंच त्यांना भाग पडलें. हल्लीं हा ग्रंथ सटीकही छापून प्रसिद्ध आहे. हा ग्रंथ शके १८१० मध्यें प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचें प्रसिद्धी-करणाचे प्रारंभीं, गुरुवर्य गणेशशास्त्रीबुवांनीं जे श्लोक लिहिले ते खालीं देत आहों.

॥ भिषग्वर्य-शिरोरत्न-बालशास्त्रि-पदांबुजे ।
॥ मिलिंदायितचित्तेन जनस्थाननिवासिना ॥
॥ तरटे इत्युपनाम्ना च भिषक्पदभृता गुरोः ॥
॥ सखारामतनूजेन गणेशेन प्रयत्नतः ॥
॥ देवधरकुलोत्पन्नभिषजः कृष्णशास्त्रिणः ॥
॥ साह्येनायं यथाबुद्धि शोधितश्च प्रकाशितः ॥
॥ आकाशचंद्रवसुभूमित ( १८१० ) शकसंवत्सरे शुचौ मासे ॥
॥ पक्षेऽसिते तृतिया तिथौ गुरोर्वासरेंकितश्चापि ॥

## शिकवण्याची पद्धत

गु० शास्त्रीबुवांची वैद्यक शिकविण्याची पद्धत मोठी सुंदर असे. अगोदर ज्याला संस्कृत भाषेचें व्युत्पत्तिज्ञान चांगलें आहे अशाच विद्यार्थ्यास शास्त्रीबुवा शिकवीत असत. विद्यार्थ्याची बुद्धिमत्ता, त्याचें अध्ययनाकडे असणारें अनुसंधान, त्याचा स्वभाव वगैरेची परीक्षा करूनच ते आपल्याजवळ त्यास थारा देत. प्रथम माधवनिदान शिकवीत, नतर वाग्भट–अष्टांगहृदय शिकविण्यास सुरवात करीत. प्रायः अष्टांगहृदय ग्रंथाचें सूत्र, शारीरकल्प व उत्तर हीं स्थानेंच शिकवीत असत. हें शिक्षण पूर्ण झाल्यावर जर विद्यार्थी टिकलाच तर, त्याला संग्रह वृद्ध वाग्भट शिकवीत असत. माधवनिदानाच्या पंचलक्षणी टीकेवर विशेष भर देत व ती फार सुंदर तऱ्हेनें शिकवीत असत. अष्टांगहृदयही सर्वांग सुंदरा टीका व हेमाद्री–टीका यासह शिकवीत. सर्वांगसुंदरेपेक्षां, हेमाद्रीच्या उपलब्ध टीकेवर त्यांचें विशेष प्रेम असे. निघंटु ग्रंथांपैकीं राजनिघंटु किंवा मदनपाल निघंटु शिकवीत. रसग्रंथांपैकीं रसरत्न समुच्चयाचे पहिले ११ । १२ अध्याय शिकवीत असत व त्याचबरोबर औषधीज्ञान म्हणजे रसायनें तयार करण्याचें व औषधी करण्याचें शिक्षणही विद्यार्थ्यांस देत. पारदनिष्कासन, हेमगर्भ, समीरपन्नग, रससिंदूर, अभ्रक, वंग, लोह, ताम्र, पंचामृत–पर्पटी, सु० मा० वसंत, सूतशेखर व इतर, रोगपरत्वें उपयोगीं पडणारीं औषधें तयार करून घेत असत. औषधें फार काळजीपूर्वक व उत्तम तयार करवीत. त्यांत परिपक्वता, स्वच्छता व सौंदर्य राहील अशी काळजी घेववीत असत. नासकीं कुचकीं अर्धवट अथवा कच्चीं, औषधें कितीही किंमतीचीं असलीं तरी फेकून देत व देववीत. चरकसुश्रुत ग्रंथाचें किंवा वर लिहिलेल्या ग्रंथांशिवाय इतर ग्रंथांच्या अध्ययन अध्यापनाची त्यावेळीं प्रायः प्रणाली नव्हती. प्रसंगविशेषीं, पाठ सांगताना चरक सुश्रुत ग्रंथाचा उपयोग केला जात असे. सांगितलेलें अध्ययन प्रायः कंठस्थ करून घेण्याकडे त्यांची प्रवृत्ती असे. या शिक्षणाच्या क्रमांत ज्याचेकडून दुर्लक्ष केले जाई, त्यास अध्यापन व घर दोन्हीही बंद केलीं जात. त्या वेळच्या एकदोन विद्यार्थ्यांना त्यांचें

शिक्षण अपुरें असतांनाच त्यानी बाजारांत बाटल्या ( औषधें साठविण्या-करतां ) खरेदी केल्याची वार्ता शास्त्रीबुवांचे कानीं आल्याबरोबर त्यांना घर व अध्ययन दुसरें दिवशीं वर्ज्य झालें. ( कै० अनंतशास्त्री पाटणकर व कै० लक्ष्मणशास्त्री दांडेकर या विद्यार्थ्यांना ). अजूनही गुरुवर्य देवधरांकडे शिक्षणाची पद्धत प्रायः अशीच थोड्याफार फरकानें चालू आहे.

## सांपत्तिक व इतर स्थिति.

गु० तरटेशास्त्री यांची सांपत्तिक स्थिति, शेवटपर्यंत अत्यंत चांगली होती असें म्हणवत नाहीं. त्यांचे चिरंजीव रा० रा० गंगाधरपंत हे व गु० देवधर यांनीं कांहीं दिवस एकत्र धंदा केला पण पुढें दोघेही स्वतंत्र धंदा करूं लागले; पण रा० गंगाधरपंतांच्या गरीब व अबोल स्वभावानें आणि शारीरिक अशक्ततेनें त्यांचें वजन लोकांवर फारसें पडूं शकलें नाहीं. तथापि कै० शास्त्रीबुवा व रा० गंगाधरपंत हे उभयतांही आपल्या धंद्यावर कुटुंबाचें पोषण चांगल्या तऱ्हेनें करीत असत. त्यांची घरची राहणी मोठी ख्यालीखुशालीची किंवा चैनीची जरी नव्हती, तरी सकस अन्न, उबदार कपडा व इतर आवश्यक गरजा उत्तम तऱ्हेनें वापरण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. व ही प्रवृत्ति सहज निभावेल इतकें त्यांना उत्पन्न होत असें. शास्त्रीबुवांनीं गंगाधरपंतांचीं दोन लग्नें, त्यांच्या मुलींचीं लग्नें व मुलांच्या मुंजी आपल्या हयातींतच केल्या. शिवाय नवीन घर घेऊन बांधलें. आपल्या घरांत मोकळ्या जागेंत श्रीकृष्णाचें लहानसें मंदीर बांधलें. संग्रह ग्रंथाचें प्रकाशन केलें. यावरून शके १८०० शें सालापासून नाशकास स्थिर झाल्यावर शास्त्रीबुवांचे धंद्यास स्थैर्य प्राप्त होऊन त्यांच्या संसाराचें बस्तान बसलें असें म्हणा-वयास प्रत्यवाय नाहीं. पण एकंदरींत त्यांचें आयुष्याचा विचार केला असतां तें दगदगींत, काळजींत व बरेचसें कष्टमय गेलें असेंच म्हणावें लागेल; कारण त्यांचें कुटुंब त्यांचे ऐन उमेदींत निवर्तलें व चिरंजीवांच्या दोन्ही बायका लवकरच निवर्तल्या. स्वतः त्यांनाही शके १८०० पावेतों धुळें, मुंबई, वऱ्हाड, अलिबाग वगैरे ठिकाणीं अस्थिर वृत्तींतच रहावें लागलें. त्यांतून शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीनें दम्याचा विकार जडल्यानें

त्यांना मोठें सुख नव्हतें. व मनासारखा महामूर पैसा न मिळाल्यानें अगदींच अडचणींत जरी नाहीं तरी मोठ्या स्वास्थ्यांतही राहण्यास मिळालें नाहीं. घरांत बायकामाणसांची वाणच असल्यानें सुखानें दोन वेळ विनाश्रम अन्न मिळण्यासंबंधीही अडचणच. अशा सर्व कारणांनीं व पुढें पुत्रपौत्रशोकाचा दुःसह प्रसंग ओढवल्यानें तर वर जे आयुष्यांत कष्ट झाले त्याला पुष्टी मिळाली.

शके १८०० शे सालच्या वैशाखाच्या अखेरीस कै० तरटेशास्त्री व गु० देवधरशास्त्री यांचा संबंध आला. व तो पुढें कायम टिकूनच शास्त्रीबुवा व देवधर व नाशिकची आयुर्वेदशाखा ह्यांचाही उत्कर्ष झाला. गु० देवधरशास्त्री यांना तयार करून त्यांना पुण्यास वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वैद्यक परीक्षा देण्यासाठीं तरटेशास्त्री आपण स्वतः घेऊन गेले व ज्या पुण्यास ते पढत होते, त्याच पुण्यांत आपला शिष्य परीक्षा देऊन उत्तम तऱ्हेनें उत्तीर्ण झाल्याबद्दलचा आनंद, लौकिक व यश संपादून ते शके १८०५ च्या वैशाखांत नाशकास परत आले.

आपल्या शिष्यासह नाशकास परत आल्यावर १ । २ महिन्यांनीं श्रीमंत तुकोजीराव होळकर यांचें बोलावण्यावरून ते इंदोर मुक्कामीं गेले. तेथें ते सरकारी पाहुणे म्हणून १ । २ महिने होते. महाराजांनीं त्यांची समक्ष भेट घेऊन त्यास ५०० रुपये व एक शाल देऊन त्यांचा मोठा गौरव केला. याचवेळेस त्यांचे शिष्य देवधरशास्त्री यांचीही राजवाड्यांत समक्ष परीक्षा घेतली गेली. त्यांचे आवडते ग्रंथ, नित्यस्वाध्याय, अध्ययन, अध्यापन, काव्यशास्त्रविनोद यामध्यें आणि स्नानसंध्येंत शास्त्रीबुवा आपला वेळ घालवीत. साहित्यांत काव्यप्रकाश, रसगंगाधर व अच्युतराय मोडकांचें साहित्यसार यावर त्यांचें फार प्रेम असे व तेच ग्रंथ त्यांच्या व्यासंगांतही असत. काव्यांत, कादंबरी, लक्ष्मीसहस्र, पंचकाव्यें, कालिदास व भवभूति यांचीं नाटकें यांचा अभ्यास विशेष असे. वैद्यकांत अष्टांग-संग्रह त्यांना प्रिय असे. त्यांचें सर्वांत अत्यंतिक प्रेम भागवतावर होतें. श्रीमत् भागवत, श्रीधरी, तोषणीटीका आणि

के० ह० भ० परायण प्रसिद्ध संत व कवि हरीबाबा यांचें भक्ति–रसायन यांवरील त्यांचा व्यासंग दांडगा असे. भागवताचें वाचन व मनन व त्यावर भक्तियुक्त अंतःकरणानें चर्चा केल्याशिवाय तर त्यांचा एक दिवसही जात नसे. ह्या कार्यक्रमास त्यांचे विद्वान् शिष्य रा० रा० मनोहरमामा देव व रा० रा० बाबासाहेब कुलकर्णी यांचें नेहमी सहाय्य होत असें. कारण ह्या दोघांचा विद्वान्, रसिक, धार्मिक, श्रद्धाळु व प्रेमळ भगवत्भक्त असा लौकिक त्यावेळीं होता. पुढेंपुढें तर शास्त्रीबुवांस भागवताचें पुराण नित्य ऐकण्याचा नाद लागला; व रोज नित्य नवा पुराणिक बोलावून त्यांस ते आठ आणे दक्षणा देत असत. पुराणिकांत अत्यंत अज्ञ विद्यार्थ्याचाही समावेश होत असे. पुराण सांगतानां नवीन विद्यार्थ्यास कापरें भरें. पण पुराण सुरूं केल्यावर शास्त्रीबुवांचें भगवत्प्रेम, रसिकवृत्ति, उच्च व सात्विक भाव, उत्तेजन देण्याची वृत्ति यांचा एकदम प्रादुर्भाव होऊन पुराण मोठ्या आनंदांत पार पडें.

## थोरवी व गुणग्राहकता.

शास्त्रीबुवा हे खरोखर उच्चकोटींतील पुरुष होते. ते गुणी व पंडित लोकांचा नेहमीं आदरसत्कार करीत असत व दुसरा मग तो अगदीं लहान कां असेना त्याच्या अंगांतील गुणांचें कौतुक करीत. त्यावेळेस नुकतेच अध्ययन संपून कीर्तन करूं लागलेले के० विनायक-बुवा साने व पुण्यास हल्लीं रहात असलेले वे० रंगशास्त्री नासिककर या बालहरिदासांची व कीर्तनाचा व्यवसाय नसतांही हौसेनें कीर्तन करणारे धार येथील वकील सुप्रसिद्ध विद्वान् भालचंद्रशास्त्री पटवर्धन यांचीं कीर्तनें स्वतः करवून त्यांना उत्तेजन देऊन त्यांचा यथोचित गौरव त्यांनी मोठ्या प्रेमानें केला. अशाचप्रकारें उत्तम वैदिक, शास्त्री वगैरे कोणी आल्यास यथाशक्ति त्यांचा सत्कार ते नेहमीं करीत असत. त्यांना सुपारीशिवाय कसलें व्यसन नसें. दमा कमी व्हावा म्हणून ते कधींकधीं विडी ओढीत असत, पण तीही धूम्रपानाच्या शास्त्रीयपद्धतीनेंच ओढीत असत. त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं विनाकारण

कोणाची उठाठेव किंवा गांवांतील कुटाळक्या किंवा आपल्या उद्योगा-शिवाय व अभ्यस्य विषयांशिवाय इतर गप्पागोष्टी कधींही केल्या नाहींत. मात्र ते अत्यंत कडक स्वभावाचे व सरळवृत्तीचे असल्यानें खोटे, अप्रशस्त, निंद्य, असें कांहींही त्यांच्या नजरेस आलेलें त्यांस बिलकूल खपत नसें; व त्यामुळें कडक भाषेंत वेळेस गालिप्रदान करूनही ते त्या गोष्टीचा तीव्र निषेध तेथल्यातेथें कोणाच्याही-मग तो कितीही मोठा असला तरी-तोंडावर केल्याशिवाय राहत नसत. वृत्ति निर्लोभी व मानी, चेहरा तेजस्वी व विद्वत्तादर्शक, शरीर सतेज, भाषण सडे-तोड, खणखणीत व सत्यप्रचुर, राहणी स्वच्छ अशी असल्यानें स्वारीला पाहिल्याबरोबर पाहणाराच्या मनावर भीति, आदर व दरारा यांची छाप बसल्याशिवाय राहत नसे.

## अखेरचा काल.

शास्त्रीबुवांचा वर वर्णन केल्याप्रमाणें काल जात असतांना पुढें नाशकास प्लेगाची स्वारी आली व त्यांतच त्यांचे एकुलतेएक व कर्ते चिरंजीव रा० रा० गंगाधरशास्त्री तरटे व त्यांचा एक मुलगा असे दोघे दोनतीन दिवसाचें अंतरानें शके १८२५ मध्यें दिवंगत झाले. पुत्रपौत्र निधनानें वृद्धापकालीं त्यांजवर दुःखाचा डोंगर कोसळला. शास्त्रीबुवा आधींच सांसारिक आपत्तीनें व या दुर्धर प्रसंगानें दीन झालेले परंतु त्यांचे सच्छिष्य गुरुवर्य देवधरशास्त्री यांनीं त्यांना व त्यांचे नातवाला घरींच आणून ठेवल्यानें व सर्वस्वी पूर्ण समाचार व सांभाळ केल्यानें निदान बाह्यतः तरी, त्यांचे होणारे हाल झाले नाहींत. मानसिक दुःखाच्या व शोकाच्या होणाऱ्या यातनांना कोण किती कमी करूं शकणार व त्याही एका विवेकाशिवाय कशा कमी होणार? तथापि गुरुवर्य देवधरांकडे आल्यावर शास्त्रीबुवा नेहमीं आनंदी वृत्तींतच राहण्याचा प्रयत्न करीत. पण वृद्धापकालच्या विका-राचा उठाव व दुःखावर दुःखें कोसळलेलीं, स्ववंशाचा व आशेचा एकटाच शेष राहिलेला अंकुर गोपाळ याचे संबंधीं वाटणारी काळजी, वस्तुतः नसणारी, पण मानी मनाला आंतून वाटणारी व न पटणारी

अशी परावलंबी व हताश स्थिति या सर्वांचा त्यांच्या विवेकशील मनावर परिणाम झाल्याशिवाय राहिला नाहींच. यामुळें दिवसेंदिवस शरीराची क्षीणता वाढत जाऊन वे० शा० सं० गणेशशास्त्री तरटे या प्रख्यात पुरुषाचा अंत शके १८२७ पौष शु॥ ११ शनिवारीं सकाळीं वयाच्या ७४ व्या वर्षी झाला.

या थोर पुरुषाकडून अष्टांगसंग्रह ग्रंथाच्या संशोधित आवृत्तीचें प्रकाशन होऊन पुन्हां शिक्षणक्रमांत तो ग्रंथ समाविष्ट होणें व महाराष्ट्रांत आयुर्वेद शिक्षणाची जागती परंपरा उत्पन्न होणें हीं दोन महत्वाचीं कार्यें झालीं. व त्यामुळें पडत्या काळांतही महाराष्ट्रांत आयुर्वेदास मोठेंच जीवन मिळालें. नासिकच्या या परंपरेचें जाळें सर्व महाराष्ट्रांत किती पसरलें आहे व ह्या परंपरेचें यापुढच्याही काळांत चिरस्थायित्व व वर्धिष्णुत्व कसें कायम आहे याचें ज्ञान व जाणीव उत्पन्न करून देणारें प्रकरण पुढें येणारच आहे, त्यावरून वाचकांचें ध्यानांत येईलच. अशी परंपरा निर्माण करणारा पुरुष महाराष्ट्रांत अभिमानास्पद व आयुर्वेदाच्या इतिहासांत गौरवास्पद कसा होणार नाहीं? म्हणूनच या थोर पुरुषांबद्दल महाराष्ट्रानें सदैव ऋणीच असावयास पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय

## प्रकरण ४ थें.

# रा. रा. मनोहरमामा देव.

रा० रा० मनोहरमामा देव यांचा जन्म सन १८४९ सालीं रावेर येथें झाला. त्यांचे वडील गणेश देव हे ग्वाल्हेर येथें मोठ्या अधिकारावर होते. हे कण्व शाखीय ब्राह्मण होत. काळकर या नामांकित घराण्यांतील मुलगी रुक्मिणीबाई ही गणेश देवांची पत्नी. या उभयतांचें प्रथम अपत्य मनोहरमामा हे होत. यांचें लहानपण व प्राथमिक शिक्षण रावेर येथें झालें. नंतर इंग्रजी शिकण्याची रावेरला सोय नसल्यानें ते स्वतःचे खर्चानेंच धुळयास राहिले. तेथें दाजीसाहेब गुप्ते या नांवाचें गृहस्थ मुनसफ होते. त्यांनीं मामांना बराच आश्रय दिला. ते मॅट्रिकची परीक्षा १८६८ सालीं पास झाले. त्यांना जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिपही मिळाली होती. त्यावेळचे त्यांचे समकालिन स्नेहीविद्यार्थी म्हणजे नामदार रावसाहेब उपासनी व रा० रा० लक्ष्मणराव देशपांडे वगैरे होते. पुढें ते उच्च शिक्षणाकरतां पुण्यास डेक्कन कॉलेजमध्यें गेले. उमरावतीचे प्रख्यात नामदार दादासाहेब खापर्डे, लोकमान्य टिळक व रा० सा० काथवटे वगैरे मंडळी त्यांचे बरोबर होती. मामांना प्रकृतिस्वाथ्य न लाभल्यानें कॉलेज शिक्षण सोडून देणें भाग पडलें. त्यांनीं वकिलीच्या परीक्षेचा अभ्यास करून परीक्षा दिली पण यश आलें नाहीं. नंतर ठाण्यास एका खाजगी इंग्रजी शाळेंत कांहीं दिवस त्यांनीं नौकरी केली. तेथेंच कांहीं दिवसांनीं डि० कोर्टांत त्यांना कायमची नौकरी लागली. ते नाशकास १८८२-८३ सालीं बदलून आले. रा० रा० मामांचें संस्कृत अध्ययन



कै॰ रा. मनोहरमामा देव.

धुळ्यासच नांदगांवचे ( जि० नासिक ) प्रख्यात विद्वान् चिंतामणशास्त्री थत्ते यांचेजवळ झालें. मामांची बुद्धिमत्ता पाहून त्यांनीं त्यांस प्रथम भारतचंपू सांगितला. कॉलेजमध्यें असतांनाही त्यांचा संस्कृतचा अभ्यास वाढतच गेला; पण त्यांचें संस्कृत भाषेंतील विविध शास्त्रांचें अध्ययन नाशकासच झालें. प्रथम त्यांनीं आपल्या शाखेचें वेदाध्ययन पूर्ण केलें. नंतर ऋग्वेदाचें अध्ययन त्यावेळचे प्रख्यात वैदिक निळंभटजी लोंढे यांचेजवळ केलें. न्याय, वेदांत वगैरेंचें अध्ययन योगानंद सरस्वति यांचेजवळ केलें. व्याकरण, महाभाष्याचें अध्ययन विद्वद्वर्य सदाशिव–शास्त्री जोशी कठोरकर यांचेजवळ केलें. त्यांचें आयुर्वेदाचें शिक्षण वैद्यराज गणेशशास्त्री तरटे यांचेजवळ झालें.

रा० रा० मनोहरमामा हे प्रथम अत्यंत नास्तिक होते परंतु रा० रा० तरटेशास्त्री यांच्या सतत सहवासानें ते पुढें पूर्ण आस्तिक बनले व त्यांनी आपली नौकरी संभाळून देवदेवतार्चन व अध्यापन यांतच आपला काळ व्यतीत केला. त्यांनीं आपल्या हयातींत बरेच शिष्य तयार केले. त्यांचें संस्कृत वाङ्मयाचे शिष्य प्रख्यात विद्वान् उत्कृष्ट कवि ‘कवि कौस्तुभ’ रा० रा० त्र्यंबक रामचंद्र उर्फ बाबासाहेब कुलकर्णी हे होत व वैद्यकाचे शिष्य बऱ्हाणपूरचे बाळशास्त्री फावडे, रावेरचे वामनशास्त्री तारे, मुंबईचे सुविख्यात वासुदेवशास्त्री भावे वसई-कर, धुळे येथील प्रख्यात वैद्य रा० रा० गंगाधरशास्त्री वाळिंबे, तात्यासाहेब बहाळकर व नासिकचे अनंतशास्त्री पाटणकर, लक्ष्मणशास्त्री दांडेकर, कै० गोविंदशास्त्री देव, कै० सखारामशास्त्री निरंतर, कै० शामराव लक्ष्मण चौधुले, वैद्यराज नारायण मोरेश्वर उर्फ धारूअण्णा रानडे व रा० रा० अनंतराव उर्फ नानासाहेब वेलदे हे होत. मामांनीं आयुर्वेदाचें अध्ययन व अध्यापन चांगलें केलें पण वैद्यकीचा व्यवसाय मात्र केला नाहीं.

मामांची रोजची बैठक २।३ तास रा० रा० गणेशशास्त्री तरटे यांचेकडेस असे. त्यावेळेस दोघांमध्यें साहित्य, वैद्यक, विशेषतः भागवत

या विषयांचा उहापोह व चर्चा चालत असे. कै० तरटेशास्त्री मनोहर मामास अत्यंत मानीत असत. मामांची योग्यता पण मोठीच होती, यांत शंका नाहीं. वेद, न्याय, व्याकरण, वेदांत, साहित्य, वैद्यक या निरनिराळ्या विषयांत प्रवीण असलेले व नित्य अध्ययन–अध्यापन, शास्त्र-चर्चा करणारे, कर्मठ, भाविक व अंतर्मुखवृत्तीचे श्रेष्ठ पुरुष, वैद्यक–विषयापुरते जरी, कै० तरटेशास्त्री यांचे शिष्य असले तरी बाकीच्या विष–यांतील विद्वत्तेनें ते कै० तरटेशास्त्री यांना आदरणीय कां वाटूं नयेत? शिवाय रा० गणेशशास्त्री तरटे हे परगुणग्राहक, सरळ व उत्तम स्वभावाचे असल्यानें त्यांच्या अंतःकरणांत मामांविषयीं वात्सल्यभरित आदर असणेंच जास्त शक्य होतें. रा० रा० मामांनीं कांहीं काव्य–रचनाही केली आहे त्यापैकीं उपलब्ध झालेले १।२ श्लोक खालीं दिले आहेत त्यावरून त्यांच्या कवित्वशक्तिचीही कल्पना करतां येईल.

गोदामुमा–प्रिय–जटोद्भवपावनां तां । अद्भिस्तिरस्कृतपयोनिधिमुत्तरंगां ॥
आबालवृद्ध–सुखदां बुधसेवितापां । सर्वप्रियां प्रलयपूर्वमहं नमामि ॥१॥
तीरे तीरे बध्यते यत्र घट्टो । घट्टे घट्टे चोत्तमं देव–गेहम् ॥
गेहे गेहे स्थाप्यते देव–लिंगम् । लिंगे लिंगे श्रूयते वेद–घोषः ॥२॥
उदकधवलिमानं वीक्ष्यते पूतविश्वं । खमणिरसहमानः प्रत्यहं तापमेति ॥
जित इव विधुरुर्व्यां क्षीण–गात्रः शुचाभूत् । अयि भगवति गंगे का
कथाऽन्यस्य तेऽग्रे ॥३॥

मामांच्या कुटुंबाचें नांव सरस्वतीबाई असून त्या अद्याप रावेर येथें हयात आहेत. मामांना ५ मुलें व २ मुली अशीं अपत्यें झालीं. पैकीं एक मुलगी व एक चिरंजीव विद्यमान् आहेत. चिरंजिवाचें नांव देवीदास हे असून ते बी. ए. झाले आहेत व ते रावेर येथेंच शिक्षक आहेत. मुलगी गोदूताई ह्या रावेर येथेंच बंधूजवळ असतात.

रा० रा० मामांनीं आपल्या आयुष्यांत अध्ययन, अध्यापन, शास्त्रचर्चा, स्नानसंध्या, ईश्वरभक्ति याशिवाय दुसरें कांहीं केलें नाहीं. विद्यार्थ्यांना तयार करण्यांत मामांना फार हौस व आनंद वाटे.

आपल्या नित्य रेखीव उद्योगाखेरीज ते निष्कारण काल दवडीत नसत. मामांची ह्याती जर परमेश्वरकृपेनें आणखी वाढली असती तर त्यांचे हातून आणखीही शिष्यगण तयार होऊन बाहेर पडला असता व त्यांचा कीर्तिदुंदुभि सर्वत्र निनादत राहिला असता यांत शंका नाहीं. तथापि आयुर्वेदाचे ११।१२ विद्यार्थी उत्तम तयार करून त्यांनीं आयुर्वेदाची मोठी सेवा केली. असा हा नित्य व्यासंगी, विरक्त, भक्त व विद्वान् पुरुष सन १८९९ मध्यें प्लेगाचे भयानक रोगास बळी पडून आपल्या वयाच्या ४९ व्या वर्षी नाशकासच दिवंगत झाला.


भाग दुसरा.

# गु. प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर

# गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांची

## जन्म लग्न कुंडली

श्रीगणेशायनमः । सजयति० ॥ अथ स्वस्ति श्रीमन्नृपशालिवाहन शके १७८२ रौद्रनाम संवत्सरे दक्षिणायने शरद् ऋतौ कार्तिके मासे कृष्ण पक्षे एकादश्यां तिथौ मंदवासरे घटी ४४ पलानि १५ चित्रा नक्षत्र घटी ४४ पलानि २० एवं पंचागशुद्धौ अस्मिन् दिने श्रीसूर्यास्तात् गत घटी १ पळे ४० वेलायां श्रीमतां जन्म ।




शुभं भवतु.

## प्रकरण १ लें.

# शिक्षणाची तळमळ.

### जन्म व बालपण

आमच्या गुरुवर्यांचा जन्म शके १७८२ सालीं कार्तिक व॥ ११ रोजीं झाला. गुरुवर्यांचें मूळ गांव सागवे हें लहान खेडें होय. हें खेडें ता० राजापूर बंदर विजयदुर्ग जि० रत्नागिरी यामध्यें आहे. तेथें देवधर उपनांवाचें, हिरण्यकेशी कौशिक गोत्राचें एक गरीब घराणें रहात असें. याच घराण्यांत गुरुवर्यांचा जन्म झाला. गुरुवर्यांचे आजोबा दिनकरभट देवधर हे नामांकित वैदिक होते. वडील जनार्दनभट हे भिक्षुकी करीत असत. घरचें उत्पन्न अगदींच थोडें म्हणजे सालींना ६ रु. साऱ्याचे जमीनींत जें काय होईल तेवढेंच. अर्थात् सर्व कुटुंबाचें पोषण आकाशवृत्तीवरच अवलंबून असें, असें म्हटल्यास हरकत नाहीं.

यांचें प्राथमिक शिक्षण तेथल्याच एका गांवठी शाळेंत झालें. ही शाळा त्या गांवचे खोत रा० रामभाऊ देसाई यांनीं घातली होती. त्या शाळेंतील शिक्षण आटोपल्यावर तेथें नवीनच सुरू झालेल्या सरकारी शाळेंत थोडें शिक्षण त्यांनीं घेतलें. पण ती शाळाही पुढें बंद झाल्यानें व दुसरी शिक्षणाची सोय तेथें नसल्यानें देवगड तालुक्यांतील पडेल या गांवीं शिकण्यास शके १७९३ सालीं गुरुवर्यांस जावें लागलें. त्या गांवीं रा० यशवंतभट मोडक यांचे घरीं राहून मधुकरीवृत्तीनें १७९७ पर्यंत मराठी पांचवे इयत्तेपर्यंत त्यांनीं शिक्षण घेतलें. तेथील शिक्षणक्रम संपल्यावर पुन्हां परत आपल्या घरीं सागवें येथें ते आले. पण अंतःकरणाचा शिक्षणाकडे ओढा असल्यानें पुढें

आणखी शिक्षण संपादन करण्याकरितां व आपली कांहीं सोय लावण्याकरितां म्हणून शके १७९८ सालीं त्यांनीं

## मुंबईस प्रयाण

केलें. तेथें ते रा० विष्णुशास्त्री जोशी वाडेकर यांचे येथें राहिले. रा० विष्णुशास्त्री हे अंध असल्याकारणानें त्यांनाही एकादा परिचारक पाहिजेच होता. मराठी शिक्षणाचा नाद सुटला म्हणून नव्हे तर पुढच्या शिक्षणाची सोय होणेंच अशक्य असल्यानें इच्छा असतांही तो नाद सोडून संस्कृताच्या अध्ययनाकडे त्यांना वळावें लागलें. संस्कृत शिक्षण संपादन करून कोठेंतरी पुराण वगैरे सांगून उदरनिर्वाह करावा यापेक्षां यावेळीं मोठें ध्येयही डोळ्यापुढें नव्हतें, कारण सदर शास्त्रीबुवांचा उद्योगही हाच होता. गुरुवर्यांच्याच शब्दांत लिहावयाचें म्हणजे "मनुष्यस्वभावच असा असतो कीं, ज्याचा निकट संबंध असतो तेंच त्याला करावेसें वाटतें" शिवाय स्वतःच्या अत्यंत कष्टमय आयुष्यापेक्षां थोडेंतरी वरचें आयुष्य अनुभविण्यास मिळण्याची स्थिति आली तरी हवीशी व मोठीच वाटणें स्वाभाविक होतें. असो. या अंध शास्त्रीबुवांची सर्व तऱ्हेची सेवा अनेक कष्ट सोसून केली तरी गुरुवर्यांचे पदरांत संस्कृत अध्ययनाचा म्हणण्यासारखा वाटा आला नाहीं. रूपावलि, समासचक्र, अमरकोश व रघुवंशाच्या दुसऱ्या सर्गाचे १० । २० श्लोक इतकेंच जेमतेम शिक्षण झालें. गुरुवर्य आपल्या छोट्याशा लिखाणांत लिहितात कीं, "तेथें १७९९ अखेरपर्यंत राहिलों, परंतु म्हणण्यासारखें शिकण्यास जमत नसे; कारण घरांतील काम करणारे सर्व आम्हीच म्हटलें तरी चालेल. शास्त्रीबुवांचा ( विष्णुशास्त्री जोशी ) स्वभाव अतिशय चमत्कारिक असल्यामुळें त्यांचें व माझें जमेनासें झालें, म्हणून मी घरीं गेलों—नव्हे—त्यांनीं मला पोंचविलें." नंतर तेथें कांहीं दिवस राहून शके १८०० च्या वैशाखमध्यें गुरुवर्यांचें

## पुनश्च मुंबईस आगमन

झालें.

कोठेंतरी जेवण्याची सोय पहावी व कथेचा अभ्यास करावा

या उद्देशानें गुरुवर्य आपले आतेबंधु रा० रा० केशवराव गाडगीळ यांचे बरोबर मुंबईस आले. गुरुवर्य लिहितात, " जवळ कांहीं नाहीं, ज्याचे येथें बिऱ्हाड ठेवण्याचे हेतूनें आलों तो, माझे दुर्दैवानें परलोकीं गेला होता. हा मनुष्य हरिदास होता व त्याचा माझा स्नेह होता, आणि त्याला माझ्यासारख्या मनुष्याची जरूरी होती. म्हणजे ही बिन-पगारी नोकरीच. असो. पुढें ती सोय नाहींशी झाल्यावर काय करावें हा विचार मनांत आला. मातुःश्रींनीं दिलेल्या पीठ पोह्यांवर कांहीं दिवस काढले, इतक्यामध्यें अलीबाग गांवीं मधुकरी मागणारांना श्रीमंत भाऊसाहेब बिवलकर एकेवेळीं पुरेल असा मूदभर भात देत असतात अशी सुवार्ता कानीं आली. मग काय ! आनंद पोटांत मावेनासा झाला, आणि माझ्या आतेबंधूंना सांगितलें कीं, मला अलीबाग येथें पोंचविण्याची तजवीज करा म्हणजे सोबत वगैरे पाहून द्या. त्याप्रमाणें त्यांनीं मोठया काळजीनें अलीबाग येथील कारकून मुंबईस आले होते, त्यांची व माझी भेट करून दिली. त्या कारकुनानेंही एक नवीन बातमी सांगितली कीं कोणी एक नाशिककर शास्त्री, अलीबागेस श्री० भाऊ-साहेबांना औषधोपचार करण्यासाठीं आले आहेत. ते याला संस्कृत शिकवितील. अलीबाग येथें जेवणाची एकवेळ कां होईना, सोय होणार आणि शिकण्यास मिळणार ! मग काय ? आनंद ! शिवाय सोबतही मिळाली.

## अलीबागेस प्रयाण

मी त्या कारकुनांबरोबर अलीबाग येथें दाखल झालों. त्यांचें नांव गणपतराव असें होते. हे पागेकडील नोकर होते. रात्रीं जेवण्याची अपेक्षा नव्हतीच. परंतु त्यांनीं शोध केला.

अलीबागेस नवीन ब्राह्मण उतरण्याची जागा ठरलेली होती. त्या ठिकाणीं वेदपठण करणारे विद्यार्थी पुष्कळ रहात होते. श्री० भाऊ-साहेब हे दानधर्म फार करीत असल्यामुळें तेथें भिक्षुक लोक पुष्कळ येत असत. "

अशा तऱ्हेनें आमचे गुरुवर्य मुंबईहून अलीबागेस दाखल झाले. मुंबईस आपल्या आतेबंधूंकडे गुरुवर्य असतांना, त्यांनीं आपली गरिबी

असतांही गुरुवर्य देवधरांची जी काळजी वाहिली तीबद्दल गुरुवर्य लिहितात, "माझे आतेबंधु रा० केशवराव गाडगीळ हे आंग्र्यांचे वाड्यांत मुंबईस रहात असत. त्यावेळीं हे एका शाळेंत असिस्टंट मास्तर होते, आणि पगार रुपये सात असावा असें वाटतें. परंतु त्यांनीं मजविषयीं फार काळजी वाहिली. तसेंच तेथें सातारचे एक मास्तर होते. त्यांनींही मजविषयीं बरीच काळजी वाहिली."

सागवें या कोंकणच्या लहान खेड्यांत जन्मलेला मुलगा घरच्या अत्यंत गरिबीमुळें शिक्षणाची अत्यंत इच्छा व बुद्धि असतांनाही केवळ आश्रयाच्या अभावीं गांवोगांव भटकत, कोठें मधुकरी मागत तर कोठें कोणाची सर्व तऱ्हेची चाकरी करीत एक वेळ मिळणाऱ्या मूदभर भाताची सोय ऐकून आनंद मानून काळ कंठीत आपल्या आयुष्याचीं १७।१८ वर्षें घालवितो, पण शिक्षणाची तळमळ सोडीत नाहीं! यावरून होतकरू तरुणांनीं आपलें कष्टमय आयुष्य कंठीत असतांना आपलें ध्येय व निश्चय यांची कास पक्की धरावी व हताश न होतां धीमेपणानें मार्ग आक्रमण करावा हा धडा त्यांना घेतां येणार नाहीं काय? तसेंच आपत्तीमुळें किंवा निर्धनतेमुळें किती होतकरू तरुणांच्या सर्व आयुष्याची खराबी होऊन त्यांना आपल्या सर्व महत्त्वाकांक्षांना मुकावें लागत असेल व अशा तऱ्हेनें ही राष्ट्राची बौद्धिक संपत्ति किती नाश पावत असेल याचाही विचार मनांत येऊन कोणाचें अंतःकरण विदीर्ण होणार नाहीं? तसेंच, "कष्टेंवीण फळ नाहीं। कष्टेंवीण राज्य नाहीं॥ केल्यावीण होत नाहीं। कांहीं एक॥ ही समर्थोक्ति मनांत बिंबल्याशिवाय राहणार नाहीं.

प्रकरण २ रें.

# अलीबागचा मुक्काम.

मागच्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें गुरुवर्य देवधरशास्त्री हे अलीबागेस येऊन दाखल झाले. गुरुवर्य लिहितात, "दुसरे दिवशीं वे० शा० सं० रा० रा० गणेशशास्त्री तरटे वैद्य जे माझ्या भावी सर्वोत्कर्षाचें मूळ त्यांजकडे रा० गणपतराव हे मला घेऊन गेले, आणि रीतीप्रमाणें त्यांनीं माझी माहीति सांगितली कीं, हा कोंकणचा आहे, गरीब आहे, मधुकरी मागून शिकण्यास आलेला आहे, संस्कृत शिकण्याचें याच्या मनांत आहे. तेव्हां आपण याला शिकवावें. यावर त्यांनीं "शिकत असेल तर सांगेन. हीं कोंकणचीं मुलें नाटकांत वगैरे जावयाचीं, एके ठिकाणीं राहणें कठीण, तथापि राहील तितके दिवस सांगेन," असें म्हणून त्या उदार अंतःकरणाच्या पुरुषानें मजकडे पाहून म्हटलें कीं, तूं दररोज म्हणण्यास येत जा. प्रथम अमरकोश वगैरे म्हटला पाहिजे. अमरकोशाचें पुस्तक नसेल तर घेऊन ठेव म्हणजे बरें पडेल. बिऱ्हाड वगैरे कोठें आहे. जेवण्याची कशी सोय आहे, याचीही चौकशी केली.

नंतर दररोज सकाळपासून दोनप्रहरपर्यंत व दोनप्रहरपासून संध्याकाळपर्यंत त्यांचेजवळ जाऊन बसावें व म्हणावें. माझेजवळ त्यावेळीं पैसे नव्हते व अमरकोशाचें पुस्तकही नव्हतें, म्हणून मी माझे आतेबंधु रा० केशवराव यांना लिहून कळविलें, व त्यांनीही मोठ्या उदारपणानें मजला तें पुस्तक पाठवून दिलें.

अलीबागेस त्यावेळीं रा० रा० केशवराव गाडगीळ यांचे चुलते, श्री० भाऊसाहेब यांचे कुटुंबाकडे कारभारी होते. बाईसाहेबांची त्यांचेवर मर्जीही फार होती. परंतु मला त्यांचा कांहींही उपयोग झाला नाहीं. यशवंतराव गाडगीळ या नांवाचे माझ्याच गांवचे एक गृहस्थ तेथें खाणावळ घालून होते. त्यांचेकडे आमचे गांवच्या उपाध्याचा मुलगा बाळू भिडे याच्या ओळखीनें मी बिऱ्हाड ठेविलें होतें. त्याचा उपयोग मधुकरी आणून तेथें खाणें व रात्रीं झोपणें, इतकाच होत असे. परंतु येथेंही कांहीं थोडथोडें काम – उष्टीं वगैरे काढणें – पडूं लागलें, त्यामुळें बराच त्रास होऊं लागला परंतु निरुपाय होता.

सुमारें पंधरा दिवसानंतर गु० शास्त्रीबुवांनीं मला पुन्हां विचारलें कीं, "खाण्याची वगैरे तजवीज कशी काय आहे?" माझें उत्तर, 'बरी आहे' असें होतें. तथापि त्यांनीं मला त्यांचेकडून कालवण वगैरे नेण्यास सांगितलें, आणि ब्राह्मणास, "याला पोळी वगैरे देत जा" अशी ताकीद दिली. त्यावेळेपासून मजला जी पोळी मिळत आहे ती आजतागायत. तोंपर्यंत पोळी म्हणजे मोठें पक्वान्न असें आम्हांस वाटत असे एका मुदींत सरासरी एकवेळ पोट भरत असे. दुसऱ्या वेळीं उपवास. त्या वयांत उपवास म्हणजे फारच कठीण. पण करणार काय? गांवांत मधुकरी जास्त मागावी, तर फार फिरूनही पुरेसें अन्न मिळत नसे, म्हणून गांवांत भिक्षा मागत नव्हतों. अशा स्थितींत माझे कांहीं दिवस गेले. त्यानंतर गु० शास्त्रीबुवांनीं श्री० भाऊसाहेब यांजकडे वर्दी लावून मला दोन मुदा मिळतील अशी व्यवस्था केली. श्री० भाऊसाहेबांकडे, वेदपठन करणाऱ्या विद्यार्थ्यांस दोन मुदा व इतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांस एक मूद देण्याची वहिवाट असे. त्यांत माझी सोय लागल्यामुळें मला दोनवेळ अन्न मिळूं लागलें.

कांहीं दिवसांनीं गु० शास्त्रीबुवांनीं मला आपले येथेंच राहण्यास सांगितलें. तेव्हांपासून, वाड्यांतून मुदा जरी मी आणीत होतों, तरी मधुकरीचें अन्न खाण्याचें बंद झालें. गु० शास्त्रीबुवांनीं मला आपल्या पंगतीस बसवून उत्तमप्रकारचें जेवण घालण्यास सुरुवात केली. त्याच-

प्रमाणें त्यांचे कृपेनें अजूनही तसेंच चाललें आहे.

## शागीर्दी.

कांहीं दिवसांनंतर मला श्री० भाऊसाहेबांचे येथें शागीर्दपेशांत दरमहा सहा रुपयावर नोकरी लागली. ही नोकरीही गु० शास्त्रीबुवांचेच कृपेनें लागली. नोकरी केवळ नांवाचीच होती. कारण काम कांहींच नव्हतें आणि पगार मात्र मिळत होता.

गु० शास्त्रीबुवांचे तैनातीस वाड्यांतून दिलेला ब्राह्मण व्यसनी होता, व शास्त्रीबुवा निर्व्यसनी होते. तेव्हां तो ब्राह्मण त्यांना पसंत नसे. म्हणून शास्त्रीबुवांनीं श्री० भाऊसाहेबांस सांगितलें कीं, " आपण दिलेला ब्राह्मण माझे उपयोगाचा नाहीं. त्याचेऐवजी दुसरा दिलांत तरी तो अशाचपैकीं असणार. तेव्हां मजजवळ कोंकणचा एक विद्यार्थी शिकत असून तो रात्रंदिवस मजजवळ असतो. त्यासच जर आपण पगार चालूं केलांत तर त्यालाही त्या पगाराचा त्याच्या गरजा भागविण्यास उपयोग होईल. माझी शुश्रूषा तर तो करीतच आहे. " श्रीमंतांनीं गु० शास्त्रीबुवांचें म्हणणें कारभाऱ्यांचे कानावर घातलें. कारभाऱ्यांनीं माझी सहा रुपयांवर नेमणूक केली, व श्रीमंतांचा दोन रुपये फायदा केला कारण त्या ब्राह्मणास आठ रुपये पगार होता.


## पगाराची व्यवस्था.

वाड्यांतील गडी व स्वयंपाकीणबाई, गु० शास्त्रीबुवांचीं सर्व कामें करीत असत. पंगतीला मला उत्तम जेवण मिळे. त्यामुळें हा सहा रुपये पगार घेणें मला प्रशस्त वाटेना. पहिल्या महिन्याचा पगार आणल्यावर मी तो गु० शास्त्रीबुवांपाशीं दिला. त्यांनीं सांगितलें कीं, हे रुपये तुझे आहेत त्यांचें तूं वाटेल तें कर. त्यावर मी म्हटलें मला हे रुपये नकोत; कारण मी कांहींही काम करीत नाहीं. त्यावर त्यांचे व बाईचे विचारें मी दोन व बाईनीं चार रुपये घ्यावे असें ठरलें, आणि त्याप्रमाणें क्रम सुरूं झाला. मलाही या दोन रुपयांचा उपयोग धोतरें, उपरणीं, बंड्या वगैरे करण्याकडे होऊं लागला. असा पगार ७।८ महिनेच मिळत राहिला. कारण त्यानंतर गु० शास्त्री–

बुवा कार्तिक मार्गशीर्षाचे सुमारास नाशकास परत आले. त्यावेळीं मीही त्यांचेबरोबर नाशकास आलों. त्यावेळीं त्यांचा व माझा बराच संवाद झाला. त्यांतील मुख्य भाग पुढीलप्रमाणें होता. ते म्हणाले, " तुला येथें नोकरी लागली आहे, व ती शागीर्दपेशांतली कां असेना पण कायमची आहे. नासिक येथें आल्यास, येथें जसें सध्यां उत्तम तूपसाखरेचें जेवण मिळतें तसें तेथें मिळणार नाहीं. इतकेंच नव्हें तर मी गरीब असल्यानें माझे येथेंही जेवण्याची सोय होईल कीं नाहीं याची शंका आहे. याचा विचार करून मग येण्याचें नक्की ठरव." मीं लगेच उत्तर दिलें, मला कांहीं एक विचार करा-वयाचा नाहीं. आपल्याबरोबर मी शिकण्यासाठीं नासिक येथें येणार आणि आपला निर्वाह मधुकरी मागून करीन, मजला आपण घेऊन जावें. याप्रमाणें माझें नासिक येथें येणें झालें."



# गु० कृष्णशास्त्री देवधर यांचें हस्ताक्षर.


रकवृक्षे॥ अन्येरक्तपुष्पमानूपंमत्स्याक्ष्यक इतिलोके प्रसिद्धमाहुः अर्कपुष्पीपयस्या अर्कपुष्पस्य
ल्सैव श्वेतादूर्वाविशेषणं केचिद्दूर्वामित्याहुः। पृथग्जातिमन्ये कैडर्यःपर्वतनिंबः संवत्सरंयावदेतेन
प्रयोज्याः अन्येद्वादशवर्षाण्याहुः॥ मासात्तुकैव॥ मन्त्रीसु मासकर्तमानाप्रतिपादकंवाक्यमपरितोषात्
नार्थविश्वामित्रोसंयाक्यमभिदधाति यथा॥ विडंगफलमात्रंतुजातमात्रस्यभेषजम्।एतेनैवप्रमाणे
सिमासिनवर्द्धितम्॥ कोलास्थिमात्रंक्षीरादेरप्याहुर्भिषजकोविदः॥ क्षीरान्नादेकोलमात्रमन्नादेदुवरं
समिति॥ इतिसुरभुनाविरचितेग्रंथेनामश्यानदशमोध्यायःसमाप्तिमगमत्॥१०॥ समाप्तंचेदंस्थानम्
इतिश्रीसुरेश्वरस्यानेयलक्षणविरचितेनिबंधसंग्रहेदशमोध्यायःसंपूर्णः॥१०॥ ॥ ॥
वेदाश्ववस्विंदुमितचित्रभान्वाभिधेशाके॥ ज्येष्ठेमासिसितपक्षेचतुर्थ्यांरविवासरे॥१॥ देवधरकुलीनेन
नार्दनतनूभुवा॥ कृष्णेनलिखितोग्रंथोभूयाद्देवमुदेसदा॥२॥ ॥७॥ ॥श्रीगुरुभ्योनमः॥ ६

श्री ग्रंथ संग्रहालय
स्थलांतर
सं. ...... नं. ......
ता. ......
ठाणे.

## प्रकरण ३ रें.

# अध्ययन व गृहस्थाश्रम.

आमचे गुरुवर्य, त्यांचे गुरुजी गणेशशास्त्री तरटे यांचेबरोबर नाशकास आल्यावर त्यांचेकडेच राहूं लागले. २।४ दिवसांनीं व पुढेंही १।२ वेळेस, "मी आतां पूर्वी सांगितल्याप्रमाणें मधुकरी मागून आणतों," असें त्यांनीं सांगून पाहिलें. पण श्री० तरटेशास्त्री यांनीं निरनिराळीं कारणें सांगून त्यांना मधुकरी मागूं दिली नाहीं. त्यावेळीं गु० तरटेशास्त्री यांचे घरांतील माणसें म्हणजे, ते स्वतः आणि त्यांचे चिरंजीव रा० गंगाधरपंत व एक स्वयंपाकाची बाई इतके असत, त्यांत यांची भर पडली. स्वयंपाकाची बाई फार तापट स्वभावाची असे, व गु० तरटेशास्त्रीही त्याच स्वभावाचे असल्यानें घरांत नेहमीं तंटे होत. त्यामुळें अलीबागेहून परत आल्यावर बाई निघून गेली. त्यामुळें स्वयंपाक वगैरे सर्व कामें तिघांवरच पडूं लागलीं.

अलीबागेहून परत आल्यावर गु० तरटेशास्त्र्यांनीं आपल्या मुलास व गु० देवधरशास्त्र्यांस वैद्यकीचे ग्रंथ शिकविण्यास सुरवात केली. नाशकास धंदा चालेना म्हणून मुंबईस धंदा करण्यासाठीं गु० तरटेशास्त्री गेले तेव्हां त्यांचेबरोबर गु० देवधरही होते. याचवेळीं डॉ० अण्णा मोरेश्वर कुंटे यांच्याशीं तरटेशास्त्र्यांची ओळख होऊन डॉ० कुंटे यांचे बंगल्यांत गु० शास्त्रीबुवांनीं आयुर्वेदाची पाठशाळा काढली. पण मतभेदानें ती लवकरच बंद पडली. यावेळेस गु० तरटेशास्त्री शांतारामाचे चाळींत रहात असत. त्या शाळेंत गु० देवधर हे एकटेच विद्यार्थी होते. ४।६ महिने मुंबईस राहून तेथील धंद्याचा जम नीट

न बसल्यानें गु० तरटेशास्त्री परत नाशकास आले. या मुंबईच्या ४।६ महिन्यांच्या मुक्कामांत गु० देवधरांचा, तेथील नेटिव्ह ओपिनियन प्रेसचे मालक श्री० हरीभाऊ परांजपे यांच्या सर्व मंडळींचा परिचय झाला व तो पुढें फारच वाढत गेला. गु० तरटेशास्त्री नाशकास आल्यावर त्यांना शेंगांव (वऱ्हाड) चे रा० बापू पाटील यांचेकडून बोलावणें आल्यावरून हे त्रिवर्ग, शके १८०२ मध्यें तिकडे गेले. यावेळीं माधव-निदान व अष्टांगहृदय या ग्रंथांचें अध्ययन चालूं होतें. येतांना गु० तरटेशास्त्री बावनबीर, अकोला व बाळापूर या गांवीं प्रवास करून नाशकास आले. या खेपेस गु० तरटेशास्त्र्यांस पैदास चांगली झाल्या-मुळें त्यांस थोडी स्वस्थता मिळाली. या सर्व प्रवासांत गु० देवधरांचें आयुर्वेदाचें शिक्षण चालूंच होतें.

## प्रथम विवाह.

गु० गणेशशास्त्र्यांनीं आपल्या चिरंजीवांचें लग्न शके १८०२ सालीं केलें, व गु० देवधरांचें लग्न पुढल्याच वर्षी म्हणजे शके १८०३ सालीं त्यांनींच केलें. या लग्नाचा योगही मोठ्या मजेनेंच जमून आला. गु० तरटेशास्त्री मुंबईस धंद्यानिमित्त असतांना, डॉ० कुंटे यांनीं वाग्भटाचें पुस्तक छापून व मोठी प्रस्तावना जोडून प्रसिद्ध केलें होतें. त्यांतील अशुध्दें व अपपाठ यांबद्दलची एक लेखमाला गु० तरटे यांनीं नेटिव्ह ओपिनियन पत्रांत सुरूं केली होती. त्या मालेंतील लेख नेऊन देण्यास गु० देवधर हे नेहमीं त्या छापखान्यांत जात असत. त्या पत्राचे व छापखान्याचे मालक रा० रा० नारायणराव व रा० रा० हरीभाऊ परांजपे असत, व त्यांना मदतनीस म्हणून रा० रा० मोरोपंत वाळवेकर या नांवाचे एक गृहस्थ असत. नेटिव्ह ओपिनियन पत्र रा० सा० मंडलीक यांचे देखरेखीखालीं जुन्या मताचें निघत असे. रा० वाळवेकर हे नवीन मताचे असल्यामुळें वर्तमानपत्राची व्यवस्था रा० परांजपे, आणि छापखान्याची व्यवस्था रा० वाळवेकर पहात.

गु० तरटेशास्त्री व रा० सा० मंडलीक यांचा लोभ होता. इतकेंच नव्हे तर त्यांचा गु० तरटेशास्त्र्यांना आश्रयही होता. रा० सा०

मंडलीक यांना दरसाल सरासरी शंभर रुपये तरी आमरण पोंचवीत असत. यामुळें सदर लेखमाला वरील पत्रांत प्रसिद्ध होऊं लागली होती. गु० देवधरशास्त्र्यांस वारंवार पाहिल्यानें रा० हरीभाऊंचें त्यांचे-विषयीं चांगलें मत होऊन, मला विचारल्याशिवाय याचें लग्न करूं नका असें त्यांनीं गु० तरटेशास्त्र्यांस सांगून ठेविलें होतें.

गु० देवधरांचा अभ्यास उत्तम चालला होता, वागणूक व्यवस्थित होती, गुरुजींचें प्रेमही संपादन झालें होतें यामुळें, गु० तरटेशास्त्री यांचे मनांत आपल्या शिष्याचें लग्न करावें असें येऊन त्यांनीं पूर्वी ठरल्याप्रमाणें रा० हरीभाऊंस कळविलें. परंतु त्यावेळीं रा० हरीभाऊंचें मनांत असलें तरी त्यांचे कुटुंबाचें मनास हें स्थळ न आल्यानें त्यांना नकार देणें भाग पडलें. ऐनवेळीं रा० हरीभाऊंनीं नकार दिल्यानें गु० तरटेशास्त्र्यांस राग आला व वाईटही वाटलें. ही हकीगत रा० मोरोपंत वाळवेकरांना समजतांच त्यांनीं आपले स्नेही रा० विष्णुपंत जोशी यांची उपवर मुलगी देऊं केली; व हें लग्न त्याचसालीं (शके १८०३) नाशकास झालें. रा० विष्णुपंत हे रेल्वेकडे नोकरीस होते. त्यांनीं दोन्ही बाजूंचा व मुलीच्या अंगावरील थोडयाफार जिनसांचा खर्च केला. अशा तऱ्हेनें गुरुवर्यांचा गृहस्थाश्रमांत प्रवेश झाला.

## प्रकरण ४ थें.

# आयुर्वेद पारंगतता.

गुरुवर्यांचें आयुर्वेदाचें शिक्षण पद्धतशीर व जोरांत चालूं असल्याचें मागच्या प्रकरणांत आलेंच आहे. त्यांनीं आपल्या गुरुंजवळ पंचकाव्यें, रामायण व भारतचंपू, कालिदास व भवभूति यांचीं नाटकें, लक्ष्मीसहस्र वगैरे व्युत्पत्तीच्या ग्रंथांचें अध्ययन केलें. वैद्यकीचे माधवनिदान, अष्टांगहृदय, रसरत्नसमुच्चय, राजनिघंटु हे ग्रंथ, आणि चरक व सुश्रुतांतील परीक्षेपुरता भाग यांचें अध्ययन शके १८०४ पर्यंत संपविलें. शके १८०५ सालचे चैत्रांत पुणें येथें वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या वैद्यकाच्या दोन्ही परीक्षा देण्यास आपल्या गुरुवर्यांसह गेले. त्यावेळीं त्या सभेचे चिटणीस, रा० सा० बळवंत रामचंद्र सहस्रबुद्धे हे होते. शास्त्रीबुवा पुण्यास गेल्यावर त्यांची परीक्षा घेण्याकरितां, प्रख्यात वैद्य श्री० रा० रा० बापूसाहेब मेहेंदळे, वे० शा० सं० बाळशास्त्री माटे व वाग्भटाचे मराठी भाषांतरकार व त्रिदोषवादाचे उत्पादक प्रख्यात डॉ० गणेश कृष्ण गर्दे यांना विचारणा झाली होती. परंतु वे० शा० सं० बाळशास्त्री माटे व श्री० रा० रा० बापूसाहेब मेहेंदळे यांचें विशेषसें सख्य नव्हतें. श्री० बापूसाहेब मेहेंदळे हे घराबाहेर बहुतेक पडतच नसल्यानें, त्यांनीं परीक्षक होण्याचें नाकारिलें. स्वतः वे० शा० सं० बाळशास्त्री माटे हे आपल्या शिष्याचाच शिष्य परीक्षेस आला असल्यानें स्वतःवर पक्षपातित्वाचा आरोप येऊं नये म्हणून परीक्षक होण्यास मनापासून तयार नव्हते. राहतां राहिले. डॉ०

गर्दे. यांचें व परीक्ष्य देवधरशास्त्र्यांचें डॉ० गर्दे यांच्या दवाखान्यांत वाग्भटाच्या चुकीच्या भाषांतराचे बाबतींत बरेंच विवादात्मक भाषण परीक्षेच्या आधीं थोडेच दिवस झाले असल्यानें व, " आम्ही परीक्षकच आहों, पुढें पाहून घेऊं, " असें त्यांनीं तोंडावर सांगितल्यामुळें पूर्व-ग्रहदूषित परीक्षक नेमावा किंवा नाहीं असा पेच रा० सा० सहस्रबुद्धे यांस पडला होता. अखेरीस वे० शा० सं० माटेशास्त्री व डॉ० गर्दे हेच परीक्षक कायम होऊन परीक्षा लेखी व तोंडी घेण्यांत आली. परीक्षेचीं प्रश्नपत्रें डॉ० गर्दे यांनाच श्री० माटेशास्त्र्यांनीं काढावयास सांगितलीं होतीं. पण पूर्वीच्या, दवाखान्यांतील झालेल्या वादविवादाचें उट्टें काढण्याकरतांच कीं काय डॉ० गर्दे यांनीं अवघड प्रश्न काढले. अर्थात् त्याबद्दल दोन्ही परीक्षकांत मतभेद झाला. त्यामुळें रा० सा० सहस्रबुद्धे यांना, प्रश्नपत्रें द्यावीं किंवा नाहीं असा प्रश्न पडला. त्यांनीं झालेली स्थिति परीक्ष्य देवधरशास्त्र्यांस सांगितली. त्यांनीं तींच प्रश्नपत्रें मागून घेतलीं व सोडविलीं. डॉ० गर्दे यांचें मत जरी प्रतिकूल होतें तरी त्यांना, प्रश्न उत्तमतऱ्हेनें सोडविल्यामुळें लेखी शें० ६० चे वर आणि तोंडी शें० ९० चे वर गुण देणें भागच पडलें. श्री० बापूसाहेब मेहेंदळे यांनीं जरी परीक्षक होण्याचें नाकारिलें होतें तरी रा० सा० सहस्रबुध्दे यांना, " ज्या विद्यार्थ्याची परीक्षा घ्यावयाची आहे तो मज-कडे हल्लीं रोज सहज येत असल्यानें त्याच्या अध्ययनाची मला कल्पना आहे. अर्थात् अशा विद्यार्थ्यास जो परीक्षक नापास करील, त्याची परीक्षा घेण्यास मात्र मी येईन, " असा निरोप त्यांनीं पाठ-विला होता.

गु० देवधरशास्त्री, सभेच्या दोन्ही परीक्षा एकाच वर्षी उत्तम-श्रेणींत उत्तीर्ण झाल्यानें त्यांना, त्यांचे गुरु वे० शा० सं० तरटेशास्त्री व परमगुरु बाळशास्त्री माटे यांना अत्यंत आनंद झाला. त्यावेळच्या ज्ञानप्रकाश वगैरे पत्रांतही गुरुवर्यांचें अभिनंदन केलें गेलें.

### बापूसाहेबांच्या सहवासांत.


गुरुवर्य परीक्षा देण्यासाठीं पुण्यास गेल्या दिवसापासून तों

नाशकास परत येईपावेतों सवड करून श्री० बापूसाहेब मेहेंदळे यांजकडे नित्य जात असत. गुरुवर्यांकडे श्री० बापूसाहेबांची, एक होतकरू, हुशार व आयुर्वेदशिक्षित विद्यार्थी, अशी दृष्टि असे. तेवढ्या सहवासांत श्री० बापूसाहेबांचें वैभव, त्यांची वैद्यकीचा व्यवहार करण्याची व रोगी तपासण्याची पद्धत, त्यांचा लहरी पण उमदा स्वभाव, त्यांची तीव्र बुद्धिमत्ता व रसिकता वगैरेंचा गुरुवर्यांस चांगलाच परिचय झाला होता. सर्व जग एकीकडे व श्री० बापूसाहेब स्वतः एकीकडे, अशी त्यांच्या मनाची ठेवण, व त्याप्रमाणें वागण्याची धीट वृत्ति पाहून त्यांचेविषयीं आदर, अभिमान, अपूर्वाई या भावनासह उद्वेगही वाटल्यावाचून रहात नसे. गुरुवर्यांना, त्यांनींच पुण्याच्या वेळच्या वैद्य डॉक्टरांची नामावलि, थोडयाशा उपहास बुद्धीनेंच श्लोकबद्ध करून दिली होती ती अशी:—

॥ दांभिकः प्रियवादी च, धैर्यवान् बलवान् युवा ॥
॥ मूर्खो लोभी दयाहीनो, भिषक् सर्वजनप्रियः ॥ १ ॥
॥ गर्दे विश्राम देसाई पारखी सेक्स्टनो विटी ॥
॥ शिवो भिकाजी बलवान् डॉक्टराः पुण्यपत्तने ॥ २ ॥
॥ दीक्षितत्रितयं शास्त्री–पंचकं राव–पंचकम् ॥
॥ भट्टानां त्रितयं चेति राजवैद्यास्तु षोडश ॥ ३ ॥
॥ औषधं बाटली तोयं, वैद्यो डॉक्टर–संज्ञकः ॥
॥ प्रत्यहं फी प्रदातव्या, दैवाधीनो गुणोभवेत् ॥ ४ ॥

गु० देवधरशास्त्री परीक्षा देऊन, आपल्या गुरुजींसह परत नाशकास आले. त्यानंतर कार्तिक महिन्यांत गु० तरटेशास्त्र्यांना, श्रीमंत तुकोजीराव महाराज होळकर यांचें निमंत्रण आल्यावरून, ते गु० देवधरांसह इंदूर येथें गेले. तेथें श्रीमंत महाराजांचे समोर गुरुवर्यांची वैद्यकाची परीक्षा तेथील विद्वान् वैद्यराज गणेशशास्त्री केळकर, (श्री० नानासाहेब केळकर यांचे वडील) वैद्यराज गणेशशास्त्री भागवत, वैद्यराज कन्हय्यालाल यांनीं घेतली. स्वतः हुजुरांनींही कांहीं प्रश्न

विचारिले. त्या परीक्षेंत उत्तीर्ण होऊन, दक्षिणा रुपये २५ व होळकर राज्यांत वैद्यकी करण्याची परवानगी देणारें प्रशस्तिपत्रक गुरुवर्यांस मिळालें. श्रीमंत महाराजांनीं, गु० तरटे शास्त्र्यांचा, एक जरीची शालजोडी व रुपये ५०० देऊन मोठा सन्मान केल्याचें मागें आलेंच आहे. ही गुरुशिष्यांची जोडी उज्जयिनी, महेश्वर वगैरे ठिकाणीं जाऊन नाशकास परत आली.



प्रकरण ५ वें.

# व्यवसायारंभ

गु० देवधरशास्त्री इंदूरचा प्रवास संपवून परत आल्यावर, स्वतंत्र औषधालय काढून धंदा करावा असें उभयतां गुरुवर्यांच्या मतानें ठरलें. हें औषधालय गु० तरटेशास्त्री यांचे चिरंजीव आणि गु० देवधर यांनीं चालवावें व जी प्राप्ति होईल ती दोघांनीं वाटून घ्यावी असें थोरल्या शास्त्रीबुवांचे विचारानें ठरलें. धंद्यास सुरवात करावयाची, पण त्यास लागणारें भांडवल कोठून आणावें ही पंचाइत पडली.

गु० गणेशशास्त्र्यांचे विचारानें, पंचवटींतील सार्वजनिक कार्यांत पुढाकार घेणारे व आर्यवैद्यकाचा अभिमान बाळगणारे, रा० रा० कृष्णराव भोंडे यांचे बंधु रा० सीतारामपंत उर्फ अण्णासाहेब भोंडे हे सावकारी व चांदीच्या भांड्यांचा व्यापार करीत असत, त्यांचेकडून रुपये चारशें बारा आणे मितीनें काढून औषधें करण्यास सुरवात झाली, व कांहीं बाटल्या, खुर्च्या, टेबल, कपाट वगैरे औषधालयास आवश्यक लागणारें सामान विकत घेतलें आणि शके १८०५ च्या फाल्गुन शु० १० रोजीं औषधालयाची सुरुवात केली. औषधालयाचें नांव “ हिंदुऔषधालय ” असें ठेविलें. या दोघांनीं शके १८०६ वैशाख पावेतों एकत्र धंदा केला. प्रत्येकास सुमारें १५।२० रुपये दरमहा मिळत असत. परंतु पुढें रा० गंगाधरपंतांनीं आपलें अंग काढून घेतलें. त्यांना वक्तशीर येणें आणि काम करणें वगैरे होत नसल्यामुळें गु० थोरलेशास्त्री व त्यांचे चिरंजीव यांचा नेहमीं तंटा होई. त्यामुळें शेवटीं गु० देवधरशास्त्री यांनींच औषधालय सांभाळावें असें ठरलें व

त्याप्रमाणें, कर्जाचा बोजा स्वतांचे अंगावर घेऊन हें औषधालय गुरुवर्यांच्या पूर्ण मालकीचें झालें. हें औषधालय नासिक येथें सडकेवर ( मेनरोड ) रा० रा० शंकरराव व काशीनाथपंत बरवे यांच्या घरांत शके १८०५ पासून शके १८३९ पर्यंत सारखें होतें.

## औषधालयाची मांडणी.

औषधालयाची मांडणी टेबल, खुर्च्या, बांक वगैरे नवीन पद्धतीची होती. बैठकीची नव्हती. रोग्यांचे रोज भरावयाचे कागद ( केसपेपर्स ) असत. महिनाअखेर किंवा आठवड्याचे शेवटीं हिशेब करण्यांत येऊन, रोजचा ठरावीक दोन आण्यापासून आठ आण्यापर्यंत आकार करून बिल केलें जाई. एकदम उक्ते पैसे घेण्यांत येत नसत. गांवांत रोगी पाहण्यास घरीं गेल्यास चार आणे घेत असत. कांहीं लोक दोन आणेही देत.

यांचे आधींची नासिकची धंद्याची पद्धत पुढीलप्रमाणें होती. रोग्याचे घरीं वैद्य गेले कीं शिवराई किंवा अर्धा आणा व सुपारी नमस्कारपूर्वक मिळावयाची, आणि " रिक्तहस्तं न पश्येत राजानं देवतां गुरुम् । वैद्यं " इ० श्लोकान्वयें त्यांची संभावना व्हावयाची. मग वैद्य-बुवांनीं रोग्याला तपासून औषधाचा काढा किंवा पुड्या, देणें असेल तें द्यावयाचें. विशेषें करून रोगी बरा होईतों उक्ती रक्कम ठरवून त्या रकमेचा चतुर्थांश, तृतीयांश किंवा द्वितीयांश अगाऊ घ्यावयाचा, व बाकीची रक्कम २।३ हप्त्यांनीं मिळत असे. कांहीं लोकांकडून औषध तयार करण्याकरितां म्हणून अगाऊ रक्कम घेऊन नंतर रोग्यास औषध देण्यांत येई. जुन्या वैद्यकग्रंथांत, गरीबांपासून किंव आर्तापासून वैद्यानें – विशेषतः ब्राह्मण वैद्यानें – कांहीं एक घेऊं नये. रोग्यासाठीं औषध तयार करावयाचें असल्यास तें तयार करावें. निम्मे रोग्यास देऊन निम्मे वैद्यानें घ्यावें, अशीं वचनें सांपडतात. कांहीं शक्तिवर्धक औषधें पाक किंवा सोनें, मोतीं, चांदी, हिरेमाणीक वगैरे मूल्यवान् वस्तूंचीं औषधें करावयाचीं असल्यास त्या त्या वस्तूंच्या याद्या तयार करून द्यावयाच्या, आणि रोग्यानें तें सामान आणून दिल्यावर वैद्यानें

औषध तयार करून द्यावयाचें, अशीही पद्धत असे. या सर्वतऱ्हेच्या पद्धति कमीजास्त मानानें खानदेश, वऱ्हाड, उत्तर हिंदुस्तान वगैरे भागांत अद्यापिही प्रचलित आहेत. पण या पद्धतींत रोगी व वैद्य यांचे उभयपक्षीं फायदे व तोटेही असल्यानें आणि एकंदरींत या सर्व पद्धति व्यवहाराला व सरळपणाला अनुपयुक्त व सदोष असल्यानें आमच्या गुरुवर्यांनीं डॉक्टर लोकांची पद्धति वैद्यव्यवहारांत आणून नाशकांत रूढ केली.

अद्यापही कांहीं वैद्य दोन आणे चार आणे घेऊन रोग्याचे घरीं जातात व औषधें देतात. गुरुवर्यांनीं अर्ध्या आण्यावरून चार आण्यावर लोकांना आणून ठेविलें. त्यांतही आतां पुष्कळच फरक झाला आहे. कांहीं काल असा होता कीं, नासिक शहरांत वैद्यांचाच धंदा उत्तम चाले, व डॉक्टरांचे पाय येथें स्थिर होत नसत. पण तो काल हल्लीं पालटला आहे. सध्यां येथें डॉक्टरांचाच भरणा वैद्यांपेक्षां पुष्कळ म्हणजे गरजेपेक्षांही अधिक झाला आहे. डॉक्टर लोकांची फी एकपासून दोन रुपयेपर्यंत असल्यानें वैद्यांनाही अलीकडे नव्या वळणाच्या लोकांत तीच फी मिळूं लागली आहे. आतां अर्धा आणा सुपारी बुडालीच पण दोन आणे चार आणे मात्र जिवंत आहेत.

प्राणाचार्य गोपाळराव बिवलकर हे पुढें पुढें गांवांत आठ आणे घेऊं लागले. एका गुरुवर्यांखेरीज त्या वेळीं सर्व वैद्यांची व्यवहाराची पद्धत बिल आकारण्याची नसून वर वर्णन केल्यापैकीं जी ज्या वेळीं सोईची व फायद्याची वाटेल तिचा ते उपयोग करीत असत. गुरुवर्यांच्या नवीन पद्धतीनें रोगी आणि वैद्य यांचा व्यावहारिक संबंध अगदीं स्वच्छ राहून एकमेकांची नुकसानही होत नसे. निदान गिऱ्हाइकाचे अवास्तव जास्त पैसे जाण्याचे थांबत. मग वैद्यालाच, रोग्यानें बिल न दिल्यामुळें काय तोटा यावयाचा तो येई. हीच पद्धत येथील वैद्य लोकांत सध्यां प्रचलित आहे.

गुरुवर्यांनीं रुग्णपत्रिका ठेवून त्यांत रोजची औषधयोजना मांडण्याची पद्धतही वैद्यांत रूढ केली. नाहींतर रोगी रोज डोळ्यासमोर

आल्यावर जी आठवण होईल व रोग्याची जी अवस्था असेल व ती पाहून वैद्यास स्फूर्ति होईल तशी औषधयोजना व्हावयाची असा वैद्यव्यवहार निदान त्या वेळीं सर्वत्र, व अद्यापही बऱ्याच ठिकाणीं रूढ आहे. गुरुवर्यांनीं अशा तऱ्हेनें नासिकच्या वैद्यव्यवहारांत क्रांति केली. गुरुवर्यांच्या धंद्याचा जमही दिवसेंदिवस बरा बसूं लागला. त्या वेळेला वैद्य, प्राणाचार्य गोपाळराव बिवलकर, आबाशास्त्री दाते, चांदोरकर, अनंतशास्त्री पाटणकर, गंगाधरबाबा भावे, नारायण तात्या निरंतर, सीतारामशास्त्री चांदोरकर इ० मंडळी धंदा करीत होती. या सर्वांचा जम निरनिराळ्या तऱ्हेचा पण चांगला बसला होता. अर्थात् या सर्वांबरोबर टिकून धंद्याचा जम जमणें हें एकदम शक्य नव्हतें. तथापि वैद्यकीच्या धंद्यांत हलके हलके पण निश्चितपणें दरवर्षी प्रगति होत राहिली यांत शंका नाहीं. धंद्याकरतां काढलेलें रा० भोंडे यांचें कर्ज सव्याज देऊन टाकिलें हें लिहिणें नकोच. त्याबद्दल गुरुवर्य लिहितात. “ मला उदार अंतःकरणाचा सावकार लाभला होता. कारण त्यांनीं, मीं दिलेल्या तीन रुपये दोन आणे या लहान रकमे-पासून सर्व रकमा कर्जाच्या मूळ जमेंत धरून कटमितीनें हिशेब केला. त्या कालांत काय किंवा हल्लींचे कालांत काय तसा सावकार मिळणें कठीण आहे. मीही त्यांच्याशीं प्रामाणिकपणानें वागून त्यांची पैन् पै चुकती केली. वैद्यकीचे संबंधानें त्यांनीं माझा उपयोग करून घेतल्यास ते जे देतील त्यावर माझा अत्यंत संतोष असे. ”

व्यवसायास सुरवात करण्याचे वेळीं गुरुवर्यांचें वय २२।२३ वर्षांचें होतें. यापुढील प्रकरणें वयाच्या क्रमानें न देतां विषयवारीनें दिलीं आहेत. त्यामुळें निरनिराळे विषय संगतवार येऊन एकंदर चरित्राचा परिपोष चांगला होईल

———×———

## प्रकरण ६ वें.

# व्यवसायांतील परमोत्कर्ष.

गुरुवर्य कृष्णशास्त्र्यांच्या व्यवसायाची वाढ वर्धिष्णुचंद्राप्रमाणें एकेका कलेनें होत गेली. प्रथम नासिक शहरांत व आसपासचें गांवीं त्यांचा जम बसत चालला. यांचेकडे चिकित्सेसाठीं येणाऱ्या रोग्यांना चिकित्सेमुळें आरोग्यप्राप्ति होऊं लागली. तसें त्यांच्या निस्पृह, नीटनेटक्या व रोग्याची काळजी वाहणाऱ्या स्वभावाची छाप लोकांवर पडूं लागली. गुरुवर्यांना कंटाळा व हयगय कशी ती माहीत नाहीं. सकाळीं स्नानसंध्या, व पूजा आटोपून पोशाख करून ७ । ८ चे दरम्यान् ते व्यवसायानिमित्त बाहेर पडत. ते प्रथम ज्यांना कबूल केलें असेल, किंवा ज्यांचेकडे जाणें जरूर असेल अशा रोग्यांकडे जाऊन मग ८ । ९ चे दरम्यान् ते औषधालयांत येत. तेथें सरासरीं ९ ते ११ वाजेपावेतों दवाखान्याचें काम करून फिरून ज्यांचेकडे नवीन जाणें जरुरीचें होईल त्यांचेकडे ते जात, व ११ । १२ यांचे दरम्यान् दवाखान्याचें सर्व काम संपवून घरीं जात असत. संध्याकाळींही ठरलेल्या वेळीं औषधालयांत येऊन तास दोन तास थांबून तेथील काम संपवून व कोठें जावयाचें असल्यास जाऊन ८ चे आंत घरीं परत येत. त्यांचा दवाखान्यांत जाण्याचा हा नित्याचा क्रम असे.

गांवांत फिरण्यास ते कंटाळत नसत. पायांत वहाणा, हातांत छत्री, लोंबतें उपरणें, अंगांत काळें जाकीट व त्याला लावलेली घड्याळाची लोंबती साखळी, काळा लांब कोट, डोक्यावर पागोटें, व तांबडें उभें गंध असा जो पोशाख ठरला तो अद्यापही तसाच

कायम आहे. ह्या एकाच पद्धतीच्या पोशाखांत असलेली स्वारी, नासिकच्या चढउतार असलेल्या निरनिराळ्या रस्त्यांतून हिंडतांना, व झपझप पाउलें टाकतांना जनतेच्या सारखी लक्षांत राहिलेली आणि कौतुकाचा विषय झालेली आहे.

रोग्यास पाहिल्यावर आपलें मत स्पष्टपणें देणें, उगाच रोग्यास झुलवीत न ठेवणें, आपल्या शक्तीच्या मर्यादेपलीकडील दुखणें असल्यास चिकित्सा न करणें, किंवा जबाबदारी न घेतां सांगूनसवरून चिकित्सा करणें, रुग्णाकडून अवास्तव प्राप्तीची आशा न धरणें वगैरे गुणांमुळें लोकांत गुरुवर्यांबद्दल मोठा वचक व आदर उत्पन्न झाला. गुरुवर्यांना मोठमोठ्या ठिकाणचीं, श्रीमंत व सरदार घराण्यांतून आणि परगांवांतील मोठाल्या नामांकित लोकांकडूनही चिकित्सेसाठीं बोलावणीं येऊं लागलीं. गांवांतील श्रीमंत चांदवडकर, राजेबहाद्दर, सुकेणकर, सरदार विंचूरकर, श्रीमंत हिंगणे चांदोरीकर, शेटसावकार, वकील, मॅजिस्ट्रेट, सरकारी अधिकारी वगैरेंकडून नेहमीं बोलावणीं येत असत. यांपैकीं कांहीं थोर घराण्यांचा आणि गुरुवर्यांचा कायमचा ऋणानुबंध जडला. श्रीमंत नामदार सरदार गणपतराव माधवराव ऊर्फ आबासाहेब विंचूरकर यांचे तर हे चिकित्सकच होते.

परगांवीं म्हणजे जळगांव, अकोला, वणी, बरोडा वगैरे ठिकाणीं व इतरत्रही अनेक मोठाल्या लोकांकडून यांना वारंवार बोलावणीं येत असत. त्यांमध्यें, अकोल्याचे श्री० ओक वकिलांचा, वणीवरोड्याचे प्रसिद्ध श्री० बापूजी पुराणिक व नागपूरचे रा० रा० भाऊसाहेब व हरीभाऊ करमरकर यांचा अत्यंत ऋणानुबंध जडला. गुरुवर्य मुंबई, पुणें वगैरे ठिकाणींही अनेक वेळीं चिकित्सेसाठीं जात असत.

गुरुवर्य हे नासिक जिल्ह्यांतील सुरगाणें संस्थानच्या राजेसाहेबांचे कित्येक वर्षें चिकित्सक होते. त्यांना श्रीमंत थोरल्या राणीसाहेब ( शिंदे सरकार ) यांचेकडून बोलावणें आल्यावरून त्यांचेकडे चिकित्सेसाठीं जावें लागलें. तसेंच वांसदा, देवास, धरमपूर संस्थानांतूनही

गुरुवर्यांस बोलावणीं आलीं होतीं. यावरून गुरुवर्यांची चिकित्सेसंबंधीं कीर्ति किती दूरवर परसली आहे याचा अंदाज करतां येईल.

वयाचे मानानें आणि शारीरिक अशक्ततेमुळेंच आतां जास्त दगदग करवत नाहीं व सोसतही नाहीं यामुळें काय तो धंद्यास कमीपणा आला असेल तेवढाच. पण अद्यापही मुंबईचे प्रख्यात शेट लक्ष्मीदास लवजी तेरसी वगैरे सारखे अनेक मोठमोठे व्यापारी, आणि वऱ्हाड, खानदेश, माळवा, नागपूर वगैरे ठिकाणाहून दरसाल अनेक लोक चिकित्सेसाठीं येत आहेत. थोडक्यांत इतकेंच लिहितां येईल कीं, जन्मापासून वयाच्या २६ । २७ वर्षांपावेतों जे अत्यंत आपत्तींत, कष्टांत, अपमानांत, व कांहीं कालतर एका मुदीच्या आशेकरतांही हिंडावें लागून जें खडतर संकटग्रस्त व निराशेच्या गाढ अंधकारांतलें आयुष्य कंठावें लागलें. त्या आयुष्यांत श्रीभगवती सरस्वती देवीची एकनिष्ठेनें व ह्व्यासानें झालेली तपस्या फळास येऊन, श्रीसरस्वती देवीचें संगतं गुरुवर्यांच्या पूर्णभूतये झालें. विपद्विपदं अनुबध्नाति हा कविश्रेष्ठ बाणभट्टाचा वाक्यार्ध व्यवहारांत नेहमीं अनुभवास येतो. परंतु संपद् संपदं अनुबध्नाति याची प्रचीति क्वचितच येते. गुरुवर्यांचे बाबतींत मात्र हें वाक्य पूर्णांशानें खरें ठरलें, व त्यांच्या विपत्तीशीं चाललेल्या दीर्घकालीन झगड्यांत शेवटीं गुरुवर्य यशस्वी झाले.



प्रकरण ७ वें

# कुलपुरुष देवधर.

॥ एको गोत्रे स भवति पुमान् यः कुटुंबं बिभर्ति ॥

आमच्या गुरुवर्यांचें गांव सागवें हें पूर्वींच्या प्रकरणीं आलेंच आहे. गुरुवर्यांचें अजोळचें गांवही तेंच होय. अजोळघरचें उपनांव सोमण, गोत्र शांडिल्य. अजोबांचें नांव विठ्ठलभट असून ते भिक्षुकी करीत. गुरुवर्यांच्या मातुःश्रीचें नांव अन्नपूर्णाबाई हें होतें. मामा लक्ष्मणभट व वासुदेवभट हे दोघेही भिक्षुकी करीत असत. गुरुवर्यांना चौघे बंधु व तिघी बहिणी होत्या. त्यांचीं नांवें व जन्मशक पुढीलप्रमाणें आहेत. ज्येष्ठ बंधु रा० सदाशिवराव, (जन्म शके १७८०) गुरुवर्य स्वतां (१७८२) विष्णुपंत (१७८४) भगिनी ठकूबाई (१७८६) दुसऱ्या भगिनी सखूबाई (१७८८) तिसऱ्या भगिनी भागूबाई (१७९०) रामचंद्रपंत (१७९८) गणपतराव (१८००).

गुरुवर्यांच्या बहिणींचीं लग्नें कोंकणांतच झालीं. ठकूताई यांना, तळेंखाजण गांवांत करंदीकर घराण्यांत दिल्या. यांना एक मुलगी आहे. दुसऱ्या भगिनी सखूबाई यांना तारळ गांवीं वेलणकर यांचे घराण्यांत दिल्या. तिसऱ्या भगिनी भागूबाई यांना शिवणें गांवीं, पाटणकर घराण्यांत दिलें होतें. वेलणकरांकडे दिलेल्या बहिणीस (सखूताई) सहा मुलगे झाले ते १ नारायण, २ मोरेश्वर, ३ गंगाधर, ४ विष्णु, ५ सीताराम व ६ आत्माराम हे होत. गुरुवर्यांच्या तिघी बहिणींपैकीं अद्यापि दोन कोंकणांत हयात आहेत व तिसऱ्या भागूबाई ह्या नुकत्याच निवर्तल्या.

गुरुवर्यांजवळ त्यांचे भाचे चि० गंगाधर व सीताराम वेलणकर हे अनुक्रमें ४ व २ वर्षे शिक्षणासाठीं म्हणून येऊन राहिले होते. या वेलणकर मंडळींचें हल्लीं मुंबईस गिरगांवांत किराणामालाचें दुकान असून तें चांगलें चालत आहे. शके १८०६ सालच्या जेष्ठ महिन्यांत गुरुवर्यांनीं, गु० तरटेशास्त्री यांचें घरींच निराळें बिऱ्हाड केलें, व नंतर त्याच सालांत मुजुमदार यांचें घरीं बिऱ्हाड बदललें. याच सालचे कार्तिक महिन्यांत, गुरुवर्यांनीं आपले वडील व मातुःश्रींस सिंहस्थ–यात्रेकरितां कोंकणांतून आणून त्यांचेकडून सिंहस्थयात्रा करविली.

गुरुवर्यांस प्रथम कुटुंबापासून एक कन्या शके १८०९ चे ज्येष्ठांत झाली. हें पहिलें अपत्य. या प्रसूतीनंतर त्यांचें कुटुंब आजारीच राहिलें. याच सालचे मार्गशीर्ष महिन्यांत, वडील बंधु रा० सदाशिवराव यांचें लग्न कोंकणांत झालें. त्यांना दाभोळ येथील रा० लिमये यांची मुलगी दिली होती. गुरुवर्यांनींच वडील बंधूंच्या लग्नाचा आर्थिक भार उचलला होता. शके १८१० सालांत अष्टांगसग्रह छापण्यासाठीं, गु० तरटेशास्त्र्यांबरोबर गुरुवर्यांना मुंबईस जावें लागलें. याच सालचे आषाढांत मुलगी व फाल्गुन वद्य २ स कुटुंब निवर्तलें. गुरुवर्यांचा द्वितिय विवाह शके १८११ च्या वैशाखांत झाला. हा संबंध रा० अप्पाजी बाजीराव जोशी राहणार सोमेश्वर गोत्र शांडिल्य, यांचे ज्येष्ठ कन्येशीं झाला. हे नासिक जिल्ह्यांत मराठी शाळामास्तर होते. यांचे कुटुंबाचें नांव सौ० उमाबाई होतें. परंतु सर्व मुलें त्यांना आई या नांवानेंच हाक मारीत असल्यानें तेंच नांव रूढ झालें होतें. रा० रा० अप्पांना तीन मुली व दोन मुलगे एवढी संतति झाली. पैकीं वडील कन्या कु० दुर्गाबाई ह्याच गुरुवर्यांचें द्वितिय कुटुंब होत. धाकटी मुलगी सखूबाई यांस मुंबईस अभ्यंकराकडे दिलें असून त्यांना तीन मुलगे व एक मुलगी आहे. मुलांपैकीं चि० कृष्णा हा लवकरच निवर्तला. द्वितिय चिरंजीव रा० महादेव उर्फ बळवंतराव हे मुंबई जनरल पोस्ट ऑफिसांत नोकर आहेत. त्यांना दोन मुली व एक मुलगा आहे. रा० रा० अप्पा हे पेन्शन घेऊन नाशकास आदितवार पेठेंत गुरुवर्यांच्या

नजीकच स्वतंत्र बिऱ्हाड करून राहिले. उभयतां पतिपत्नी मोठे सुशील व प्रेमळ असत. रा० रा० बाळूमामांचेंही लहानपण व शिक्षण नाशकांतच झाल्यानें गुरुवर्यांची देखरेख त्यांचेवर होतीच व अद्यापही घरच्या माणसांप्रमाणें गुरुवर्य त्यांची काळजी वागवीत असून, रा० रा० बाळूमामाही गुरुवर्यांविषयीं अत्यंत आदर व प्रेम बाळगीत आहेत. गुरुवर्यांसही या घराण्यांतील सर्व लहानथोर मंडळींचा कोणत्याही घरगुती अडचणीच्या व सुखदुःखाचे प्रसंगीं घरच्या माणसांपेक्षांही जास्त उपयोग होत आला आहे.

गुरुवर्यांचे ज्येष्ठ बंधू रा० सदाशिवराव यांस प्रथम मुंबईस व्यापार करण्याकरितां शके १८१४।१५ सालांत गुरुवर्यांनीं आर्थिक सहाय्य केलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांचेकरितां म्हणून नाशकांत स्वदेशी कापडाचें दुकान भागीदारींत घालून दिलें. हें कापडाचें दुकान "देवधर आणि मंडळी, स्वदेशी कापडाचें दुकान", या नांवानें १८।२० वर्षें फार प्रसिद्ध होतें. या दुकानांत गुरुवर्यांनीं, आपल्या त्रिवर्ग बंधूंची निरनिराळ्यावेळीं योजना करून तिघांचीही व्यवहाराची उत्तम सोय लाविली होती. रा० रा० सदाशिवराव आणि रा० रा० रामभाऊ हे बंधु कांहीं वर्षें व रा० रा० गणपतराव हे बरीच वर्षे या दुकानांत काम करीत होते. शेवटीं हें दुकान बरेंच नुकसानींत आल्यानें बंद करावें लागलें.

रा० रा० सदाशिवराव यांस एक मुलगा व एक मुलगी झाली. पैकीं मुलगी चि० गंगूबाई इचा जन्म शके १८२० सालीं झाला. तिचें सर्व पालनपोषण व विवाह वगैरे गुरुवर्यांनीच केलें. तिचें लग्न शके १८३३ सालीं, रा० रा० पुरुषोत्तम रामचंद्र सहस्रबुद्धे राहणार कुर्ला, यांच्याशीं झालें. सौ० गंगूबाईस चिंतामणि या नांवाचा एक मुलगा आहे. इला वडिलमातुःश्रीचें सर्व सुख गुरुवर्य व त्यांचें कुटुंब यांचेपासूनच मिळत आलें आहे व अद्यापही तें तसेंच मिळत आहे. रा० रा० सदाशिवराव यांस शके १८२० सालीं क्षयाची भावना झाली व त्या रोगांतच त्यांचा नासिक येथें चैत्र शु० ३ शके १८२१ मध्यें अंत

झाला. वडील बंधूंच्या मृत्यूनंतर त्यांचें कुटुंबही फार दिवस जगलें नाहीं. शके १८२२ त त्याही निवर्तल्या. यांना गंडमालेचा विकार होता.

गुरुवर्यांचे कनिष्ठ बंधु रा० रामभाऊ यांनाही गुरुवर्यांनीं कोंकणांतून आणून आपणाजवळ ठेवून उद्योगधंद्यास लाविलें. शके १८१४ चे मार्गशीर्षांत त्यांचें लग्नही करून दिलें. परंतु रा० रामभाऊंचा स्वभाव मनमिळाऊ नसल्यानें त्यांचा काल गुरुवर्यांच्या सहवासांत फारसा गेला नाहीं व ते बहुतेक मुंबईसच असत. शेवटीं ते मुंबईहून प्लेगनें आजारी पडून शके १८२६ सालीं नाशकास वारले.

दुसरे धाकटे बंधु रा० गणतराव यांसही गुरुवर्यांनीं नाशकासच शाळेंत घातलें पण त्यांचें शिक्षण फारसें झालें नाहीं. त्यानंतर त्यांची योजना, स्वदेशी कापडाचें दुकानीं करण्यांत आली. रा० गणपतराव हे या दुकानीं १०।१२ वर्षे सारखे टिकून राहिले. यांचा विवाह, त्याच दुकानांतील एक भागीदार रा० रा० दादा थत्ते यांच्या भगिनी कु० वारूबाई यांचेशीं शके १८२२ चे फाल्गुनांत झाला. रा० गणूकाका व सौ० सरस्वतीबाई हे दोघेही कष्टाळू व सरळ स्वभावाचे असल्यामुळें, व गुरुवर्यांनीं त्यांचा सर्वतऱ्हेचा परामर्श घेतल्यानें दोघेही घरांत फार चांगल्यारीतीनें रहात असत. परंतु कापडाचें दुकानांत पुष्कळसाच तोटा आल्यानें व त्याचा बराच मोठा बोजा गुरुवर्यांना सोसावा लागून बरेंच आर्थिक नुकसान झाल्यानें रा० गणपतराव यांस मुंबईस जाऊन रहावें लागलें. हल्लीं ते तेथेंही कापडाचा व्यापार करीत आहेत.

गुरुवर्यांच्या बहिणी व मातुःश्रीही बरेच वेळां नाशकास येऊन रहात असत. त्यांचे वडील शके १८१६ च्या ज्येष्ठ महिन्यांत व मातुःश्री शके १८४६ च्या मार्गशीर्ष शु० ५ मीस कोंकणांत घरींच निवर्तल्या. वर आलेल्या हकीगतीवरून गुरुवर्यांनीं आपल्या वडील, मातुःश्री, बंधु, भगिनी, भाचे वगैरे सर्व कुटुंबीयांचा उत्कृष्ट परामर्श घेतल्याचें दिसून येईल. वृद्धांची सेवा, बंधूंचें शिक्षण, त्यांचीं लग्नें व त्यांना उद्योगास लावणें, भाचे व पुतणी यां सर्वांचा प्रतिपाळ करून सर्वांच्या आयु-

ण्याला उन्नतीचें वळण लागेल असे सर्व प्रयत्न त्यांनीं केलें व आपल्या बरोबरच सर्वांचें दैन्य हरण करण्याची चिंता वाहून, ' यः कुटुंबं बिभर्ति ' या वाक्यांतील पुमान् या संज्ञेला सर्वस्वी पात्र झाले. नाहीं तर स्वतांचे पायावर उभे राहून अनेक हालअपेष्टा सहन करून वर चढलेल्या अनेकांकडून आपल्या घरच्या मंडळींची वास्तपुस्त केली जावी ही अपेक्षा करणें न्याय्य व वास्तविक होईलच असें हल्लींच्या काळीं तरी म्हणवत नाहीं. गुरुवर्यांनींही घरच्या मंडळींचा परामर्ष घेतला नसता तरी घरांतील मंडळींना त्यांना दोष देतां आला नसता, व व्यवहारांतही त्यांचेवर कसलाच आक्षेप येऊं शकला नसता. पण हें व्यवहारांतील अगदींच व्यावहारिक समर्थन होय. परंतु कुलाभिमान, मातापितरांचें व बंधुबांधवांचे संबंधीं नैसर्गिक प्रेम व स्वतांचे कर्तव्याची जाणीव आणि सर्वांत महत्वाचें म्हणजे आपणांस जाचक झालेल्या आपत्तींची तीव्रता व दुसऱ्यावर तसला प्रसंग येऊं न देण्याबद्दल देत असलेलें स्मरण व त्यामुळें होत असलेलें कर्तव्याचें स्फुरण या सर्वांचा आणि इतर उच्च विचारांचा झालेला परिपाकच, गुरुवर्यांना स्वकर्तव्यतत्पर करून त्यांना कुलपुरुष बनविता झाला, असें म्हटलें पाहिजे. आपत्तींतून वर येऊन अर्ध्या हळकुंडांत पिवळ्या झालेल्या अनेकांनीं, आपल्या मोठेपणाला ( position ) कमीपणा येईल म्हणून, जुन्यातऱ्हेचा पंचा नेसणाऱ्या वडिलांना, " आमच्या घरचा ब्राह्मण, " म्हणणाऱ्या महाभागांनीं गुरुवर्यांचें उदाहरण धडा घेण्यासारखें नाहीं काय?

प्रकरण ८ वें.

# गुरु-सेवा.

गुरुवर्य देवधरांनीं आपले विद्यागुरु वे० शा० सं० परमपूज्य पंडित वैद्यराज गणेशशास्त्री यांची जी सेवा केली तिचें वर्णन या प्रकरणांत करण्याचें योजिलें आहे.

गुरुवर्यांना प० गु० तरटेशास्त्री यांचा लाभ शके १८०० सालीं झाल्याचें मागील प्रकरणांत आलेलें आहेच. गुरुवर्य आपल्या गुरूंजवळ अध्ययन करूं लागल्यावेळेपासूनच त्यांचे शुश्रूषेला वास्तविक प्रारंभ झाला. अलीबागेस असतांनाच प० गु० तरटेशास्त्री यांनीं गु० देव-धरांना आपलें घरींच राहण्यास सांगितलें होतें त्याप्रमाणें ते त्यांजकडे राहण्यास आले. ते शके १८०६ । ७ सालापावेतों ६ । ७ वर्षें त्यांचे जवळच रहात होते. अर्थात् या सात वर्षांच्या कालांत, गु० तरटे-शास्त्र्यांनीं आपल्या साधारण परिस्थितींतही सुतनिर्विशेष भावनेनें त्यांचा प्रतिपाल केला व आपल्या शिष्यास आपत्तीच्या गर्तेंतून ओढून काढून वैभवगिरीच्या शिखरास पोंचण्यास समर्थ केलें, यांतच गु० तरटेशास्त्र्यांच्या अंतःकरणाचा मोठेपणा उमटून दिसतो, यांत शंकाच नाहीं. तसेंच यावरून आम्हां पौर्वात्य आर्यांचीं गुरुशिष्यसंस्था किती उच्चभूमिकेवर, पवित्रभावनांवर, शुद्ध व सात्विक विचारांवर, आणि पुण्य, श्रेय व स्वर्ग्य अशा फलानुबंधतेवर, आणि दया, वात्सल्य, स्नेह व प्रेम या मृदु व मनोहर आणि रम्य अशा अंतःकरणाच्या रचनेवर उभारली आहे याचीही जाणीव होईल. या गुरुशिष्य संस्थेचीं उच्च व पवित्र अशीं लहानमोठीं सुंदर व भव्य मंदिरें पुरातनकालापासून तों या

[library stamp]

मितीपावेतों, आर्यावर्ताच्या मानदंडापासून तों महासागरपावेतों व पूर्वापर समुद्रावधि प्रदेशांत ठायीं ठायीं सहस्रावधि स्थापिलेली व विस्तारलेली दिसून येत आहेत. घरोघरीं विद्यालयें, पठनपाठन, व अध्ययन अध्यापन सदोदित होऊन व विद्यादेवीची उपासना सदोदित चालू राहून, स्वावलंबनाच्या तत्त्वावर "यदल्पमपि तद् बहु," या न्यायानें राष्ट्रांत अनेक विद्या जागृत ठेवण्याचें अलौकिक, महनीय व राष्ट्रीय धर्मकार्य सारखें घडत राहणें व या मोठ्या कार्याचें आपण आपल्या सामर्थ्याप्रमाणें अंशभाक् होणें या गुरुशिष्यसंस्थेनेंच ( हुवाबाजीनें नव्हे ) आजवर शक्य झालें आहे.

स्वतां मधुकरीवृत्तीनें रहावयाचें, विद्यावाचस्पति व्हावयाचें, शम–दमादिसाधनसिद्ध बनायचें, वाढत्या महत्वाकांक्षेला, चढत्या उत्कर्षाला व लाभत्या वैभवाला झिडकारावयाचें, "अकृत्वा परसंतापं अगत्वा खलमंदिरम् ।" जें मिळेल त्यावर संतुष्ट राहून आणि त्यांतच शिष्योपनयन चालू ठेवून आपल्या बेतापुरत्या लाभणाऱ्या शिदोरींतही त्याला भागीदार करावयाचें, हें शिक्षण व हीच पद्धति त्याचेही गळीं वागणुकीनें उतरवून ही परंपरा जागती व तेजोवती ठेवावयाची हें फक्त याच गुरुशिष्यसंस्थेनें या आर्यावर्तांत आजवर शक्य करून दाखविलें आहे. आमचे उभयतां गुरुवर्य हे तिचें मूर्तिमंत प्रतीकच होत, हें गु० तरटे–शास्त्र्यांच्या, गु० देवधरांसंबंधीं अनुभवास आलेल्या वागणुकीवरून व पुढें गुरुवर्य देवधरांनींही आपल्या शिष्यासंबंधीं ठेवलेल्या वर्तणुकीवरून सर्वांचे प्रत्ययास आल्याविना राहणार नाहीं, असा भरंवसा वाटतो

गुरुवर्यांनीं शिष्याच्या भूमिकेवर असतांना त्या ५।६ वर्षांत, आपणास पोटच्या मुलाप्रमाणें वागविणाऱ्या आपल्या गुरुवर्यांची पडेल ती सेवा अत्यंत मनोभावानें केली. घर झाडणें, सारवणें, स्वयंपाक, उष्टींखरकटीं, केरपोतेरें, भांडी घासणें, धोतरें धुणें, स्नानाला पाणि तापविणें व देणें, अंथरूण घालणें, अंग रगडणें, शेणगोठा करणें, बागेस पाणी देणें, औषधें कुटणें, खलणें, गोळ्या करणें, बाजारहाट वगैरे पडतील तीं कामें बिनबोभाट करणें, व हीं सर्व कामें सांभाळून

आपला अभ्यास करणें, आणि तापट स्वभावाच्या आपल्या गुरुजींना प्रसन्न ठेवणें, व इतक्या सर्व गोष्टी न कंटाळतां रोज करणें हें मोठेंच दिव्य नव्हें काय? गुरुवर्यांनीं या सर्व कर्तव्यांच्या सीमा यशस्वीपणानें ओलांडून विद्यादेवीला आपल्या गुरुवर्यांच्या सहजदुर्लभ अशा प्रेमवृत्तीसह जवळ केलें यांत, त्यांच्या अंगीं असलेल्या कौशल्य, औत्सुक्य, धैर्य, चिकाटी, कष्टाळूपणा, इ० गुणांची ओळख पटते. गुरुवर्यांनीं विद्यार्थीदशेंत, याप्रमाणें गुरुजींची सेवा केली. पण याहीपेक्षां अत्यंत उत्कटसेवेचा प्रसंग पुढेंच यावयाचा होता.

गुरुवर्य गणेशशास्त्री तरटे यांचे चिरंजीव रा० गंगाधरपंत व नातू चि० रामकृष्ण हे प्लेगला एकाएकीं (शके १८२४ सालीं) बळी पडल्यानें, त्यांच्यावर मोठा दुःखद प्रसंग ओढवला. घरांत एक अल्पवयी नातू चि० गोपाळकृष्ण आणि, म्हातारपण व दमा यांनीं त्रस्त झालेले ते स्वतां, यांशिवाय दुसरें कोणीही नव्हतें. हीच खरी परीक्षेची वेळ होती. त्या परीक्षेंत गु० देवधर हे पूर्णपणें उतरले. त्यांनीं त्या दुर्दैवी, दुःखी व सर्वस्वी निराधार अशा वृद्धाकडे जाऊन मोठ्या दुःखी व जड अंतःकरणानें, त्यांचें सांत्वन करून शेवटीं सुचविलें कीं "यापुढें आपण या घरांत एकटें न राहतां, शेजारी मजकडे राहण्यास चलावें." (दोघांचीं घरें आदितवारपेठेंत गंधी गल्लींत-हल्लींच्या देवधर आळींत-अगदीं शेजारीं आहेत.) "मनांत दुसरे कसलेही विचार आणूं नयेत. फार काय सांगूं? आपला शिष्य कृष्णा हा वारला व मुलगा गंगाधर हा जिवंत आहे असें समजावें."

या कळवळयाच्या व अंतःकरण उचंबळून सोडणाऱ्या वाक्यानें, ते मानी वृद्ध विरघळले, व लगेच शेजारच्या (गु० देवधरांच्या) घरीं राहण्यास आले. त्यावेळेपासून देहांतापर्यंत दुसरीकडे कोठेंही न जातां, कसलाही दुजाभाव मनांत न आणतां, आपल्या परमप्रिय शिष्याकडेच गु० तरटेशास्त्री आपल्या नातवासह राहिले. त्यांची सर्वतऱ्हेची, उचित सेवाशुश्रूषा मोठ्या आदरानें, आस्थेनें, नियमितपणें, उभयतां पतिपत्नी करीत हें सांगणें नकोच. गुरुवर्यांकडून, आपल्या अत्यंत पूज्य, वार्ध-



वैद्य गोपाळशास्त्री तरटे.

क्यानें विकल व शोकग्रस्त अशा गुरूंना, यत्किंचित् मानसिक किंवा इतरप्रकारें कोणाकडूनही दुःख होणार नाहीं अशी दक्षता ठेविली जात होती. गु० तरटेशास्त्र्यांस गु० देवधरांबद्दल किती आपलेपणा वाटत होता हें त्यांच्याच, पुढील आशीर्वादात्मक श्लोकावरून कळून येतें.

“ पुत्रादपि प्रियतमेन च कृष्णनाम्ना, ग्रंथो व्यलेखि बहुयत्नभरान्ममायम् ।
तेनातितुष्टहृदयेन मयापि तस्मै दत्ताशिषः सपदि कामदुधा भवंतु ॥ ”

चि० गोपालकृष्ण हा अल्पवयी, अत्यंत कृश व गंडमाळेच्या रोगानें पीडित असल्यानें, गु० तरटेशास्त्र्यांना त्यांचे अंतकालीं काळजी वाटूं लागली. आपले शिष्य रा० कृष्णशास्त्री देवधर हे त्याचा उत्तम रीतीनें सांभाळ करतील अशी त्यांची खात्री होतीच. तरीही गु० देवधरांनीं जेव्हां त्यांना बजावून सांगितलें कीं, “ योगायोगानें म्हणा किंवा कशानेंही म्हणा, बापाचे नांवापूर्वीं माझें नांव त्याचें नांवांत आलेलें आहे. याची जाणीव ठेवून मला जें करावयाचें तें मी करीन. आपण निष्काळजी असावें. ” यानंतर गु० तरटेशास्त्र्यांनीं चि० गोपाल-कृष्णाबद्दल चिंतेचा एक शब्दही काढला नाहीं. या मुलाला तो मोठा कर्ता होईतों आपण व देवधर विभक्त आहोंत याची जाणीवही नव्हती. गु० देवधरांनीं, आपल्या मुलांप्रमाणेंच किंबहुना कित्येकदां मुलांपेक्षांही जास्त त्याची व्यवस्था ठेविली होती. हें सर्व गु० तरटे-शास्त्री यांचे समक्ष कांहीं दिवस होत असल्यानें ते नातवाबद्दल निश्चित झाले असल्यास आश्चर्य काय ? गु० तरटेशास्त्री यांचें देहावसान शके १८२७ त झालें. त्यांचे अंत्यसंस्कार व क्रियाकर्मांतर त्यांच्या नांवलौकीकास साजेल असेच गुरुवर्यांनीं केलें.

रा० गोपाळकृष्ण गंगाधर तरटे यांचा जन्म शके १८१७ त झाला. यांचें मराठी ५ वी पर्यंत शिक्षण झाल्यानंतर त्यांना इंग्रजी शाळेंत घालण्यांत आलें. तेथें त्यांचें मॅट्रिकपर्यंत शिक्षण झालें. मराठी व इंग्रजी शिक्षण चालूं असतांना घरीं त्यांना काव्य वगैरे शिकवून संस्कृत भाषेचें ज्ञान देण्यांत आलें. नंतर वैद्यकीचें शिक्षणास सुरवात झाली. त्यांनीं वैद्यकाच्या, पुण्याची एक व बडोद्याच्या दोन परीक्षा

दिल्या. हें शिक्षण चालू असतांच धंद्याचा सर्व अनुभव व औषधें करण्याची माहीती त्यांना त्यावेळीं घरच्या सर्व मुलांत तेच मोठे असल्यामुळें अनायासें मिळत गेली.

रा० गोपाळराव यांनींही गुरुवर्यांकडे आपलेपणानें राहून सर्व बालपण व शिक्षणाचा कल फार व्यवस्थितपणें घालविला यांत शंका नाहीं. गोपाळरावांचें स्वतंत्र बिऱ्हाड होईपावेतों त्यांचे कुलधर्मकुलाचार व नैमित्तिक सर्व कृत्यें गुरुवर्यांकडेच होत असत. तसेंच त्यांची बहीण सौ० बारूताई हीस माहेरपणाचें सुखही गुरुवर्यांकडूनच मोठ्या आनंदानें व तत्परतेनें मिळत असे. हें सर्व होत असतांनाच, रा० गोपाळराव यांच्या प्रकृतीबद्दलची काळजी मात्र कायम असेच. नेहमीं बारीकताप, अशक्तपणा, निस्तेजस्कता, हीं असावयाची व त्यांकरितां औषधांची योजना नेहमीं चालू असावयाचीच. गंडमालेच्या गांठीही वाढत चालल्या होत्या. घरचीं व बाहेरचींही, इतर वैद्यडॉक्टरांचीं औषधें चालूच असत. शेवटीं सर्वानुमतें गंडमालेवर, शस्त्रक्रिया करवून घ्यावी असें ठरलें, व त्याप्रमाणें गुरुवर्य, रा० गोपाळराव यांस घेऊन मिरजेस गेले. तेथें २६ मार्च १९१६ रोजीं, गंडमालेच्या गांठीवर, मिशन हॉस्पिटल्-मध्यें, प्रख्यात डॉ० व्हेल यांजकडून, शस्त्रक्रिया करण्यांत आली. ती उत्तम होऊन व व्रण भरून येऊन त्यांना साधारण बरें वाटल्यावर एकंदर १।१॥ महिन्यानें गुरुवर्य त्यांचेसह नाशकास परत आले. त्यानंतर रा० रा० गोपाळरावांचें लग्न शके १८४० वैशाख शु० २ ता० १२ मे सन १९१८ रोजीं, नासिक येथें गुरुवर्यांचेंच घरीं मोठ्या थाटानें झालें. त्यांचें कुटुंब, गु० तरटेशास्त्र्यांचे मातामह प्रख्यात शिवबा बापू श्रोत्री यांचे घराण्यांतील, नासिक येथें कलेक्टर कचेरींत नोकरी करीत असलेले, रा० रा० विष्णुपंत श्रोत्रीय ( हल्लीं पेन्शनर ) यांची कन्या कुमारी कृष्णाबाई ( सौ० राधाबाई ) या होत. या लग्नासाठीं, रा० गोपाळरावांच्या आप्तसंबंधी सर्व मंडळीस मुद्दाम बोलावून आणिलें होतें; आणि त्यांच्या सर्वांच्या विचारेंच लग्नसोहळा साजरा करण्यांत आला. पुढें रा० गोपाळराव आपल्या पत्नीसह गुरु–

वर्यांकडे पांच वर्षे होते. त्या अवधींतील वयोमानाप्रमाणें होणारे सर्व संस्कार व सण वगैरे गुरुवर्यांकडेच साजरे झाले. यानंतर गुरुवर्यांनींच सर्व तऱ्हेची संसाराची मांडणी व बेगमी करून, व त्यांच्या घरांतील एकंदर परिस्थितीची जाणीव व माहीति करून देऊन त्यांची स्वतंत्रपणें राहण्याची व्यवस्था करून दिली. रा० गोपाळराव हे आपल्या घरांतून लहान असतांना निघाले ते, इतक्या वर्षांनीं, गृहस्थ होऊन गृहप्रवेश करते झाले. (सन १९२१)

गुरुवर्यांनीं, गु० तरटे यांच्या सर्व सामानाची व चीजवस्तूंची यादी करून ठेविली होती. अष्टांगसंग्रहाचीं बरींच पुस्तकेंही शिल्लक होतीं. त्यांची जसजशी विक्री होईल तिचा स्वतंत्र हिशेबही ठेविला होता. गु० तरटे यांच्या घराची बरीच दुरुस्ती करून त्यांत दोन बिऱ्हाडें राहतील अशी सोय करून ठेविली होती. घराचें उत्पन्न व खर्च यांचाही निराळा हिशेब ठेविला होता. औषधें, पुस्तकें, संसाराचें सर्व सामान वगैरे नीट व्यवस्थित तरटयांचें घरांत ठेविलें होतें. रा० गोपाळराव मोठे झाल्यावर गुरुवर्यांनीं त्यांचें सर्व सामान, चीजवस्तु, सुधारलेलें घर व ७५० रु० रोख शिल्लक ह्यांसह त्यांन्हे स्वाधीन केली. आमच्या माहितीप्रमाणें त्यांच्या पालनपोषणाचा, शिक्षणाचा, शस्त्रक्रियेचा व विवाहादि संस्कारांचा सर्व खर्च गुरुवर्यांनीं स्वतांच केला. गुरुवर्यांनीं कांहीं दिवस रा० गोपाळरावांना आपल्याच दवाखान्यांत पगार देऊन ठेवून घेतलें होतें. त्यानंतर रा० रा० गोपाळरावांनीं स्वतंत्र धंदा सन १९२४ सालीं सुरू केला. पुढें म्युनिसिपल कमीटींत एक आयुर्वेदिक दवाखाना काढण्याचें सन १९२८ या सालीं निश्चित ठरून आलेल्या अर्जांतून योग्य वैद्याची निवड करण्याचें काम गुरुवर्य देवधर व प्रस्तुत लेखक यांचेकडे आलें. रा० गोपाळरावांची निवड एकमतानें होऊन नगरसभेकडून त्यांस वैद्य म्हणून सन १९२८ सालीं नेमण्यांत आलें. त्यांस सुरवातीचा पगार ५० रुपये होता, व सध्यां त्यास ७५ रु० महिना मिळत आहे.

रा० गोपाळरावांना दोन मुलगे व तीन मुली आहेत. मुलांचे व्रतबंध-संस्कार झाले असून त्यांचें शिक्षण चालू आहे. रा० गोपाळ-रावांची प्रकृति अद्यापही मधून मधून बरी नसतेच. मध्यंतरी त्यांना २।३ मोठीं दुखणीं झाली त्यावेळीं काळजी करण्यासारखीच परिस्थिति होती, परंतु परमेश्वरकृपेनें ते त्यांतून निभावून आतां ते आपला व्यव-साय चांगला करीत आहेत. रा० गोपाळराव हे स्वभावानें अत्यंत शांत, सुशील, पापभीरू व कष्टाळू आहेत. त्यामुळें ते दवाखान्यांत, गावांत व गुरुबंधूंतही अत्यंत आदरणीय व प्रिय आहेत.

गुरुवर्य तरटे यांचा जवळजवळ वठून गेलेला वंशवृक्ष तग धरून, मुळांनीं खोल जाऊन, शाखोपशाखांनीं व पत्रपुष्पफलभारांनीं पुन्हा संपन्न, टवटवीत व फोफावलेला दिसूं लागला ही परमेश्वराची त्या घराण्यावर मोठी कृपाच होय. परंतु या सर्वांस निमित्तकारण किंबहुना उपादानकारण म्हणजे गुरुवर्य देवधरांची आपल्या गुरूंवरील निष्ठा, प्रेम, कर्तव्याची जाणीव, उच्च विचार तसेंच स्वार्थत्यागपूर्वक झीज सोसून वागण्याची हौस व तत्परता हींच, झालीं असें सर्व जाणतें नासिक म्हणत असल्यास त्यांत असत्य आणि अतिशयोक्तिकारक काय आहे ?

याप्रकारें गुरुशुश्रूषा करून आपल्या गुरूंचें बंद पडूं लागलेलें घर मंगलवाद्यांनीं पुनः उघडण्याचें व उघडें ठेवण्याचें श्रेय आमच्या गुरुवर्यांना लाभलें आहे. हें उच्च ध्येय, "आधीं केलें मग सांगितलें," या न्यायानें स्वतांच्या आचरणानें, अनेकांपुढें ठेवण्यास सांपडलें हें काय कमी महत्त्वाचें आहे ? आमच्या मतें हें फार मोठ्या पुण्यसंचयाचें व मागें वर्णिलेल्या गुरुशिष्य संस्थेच्या उज्वलतेचेंच फल होय.

## प्रकरण ९ वें

# आदर्श-संसार.

गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांनीं शके १८१६ चे आषाढ महिन्यांत घर विकत घेतलें. त्या घरांत ते श्रावण महिन्यांत रहावयास गेले. हें घर आदितवार पेठेंत गु० गणेशशास्त्री तरटे यांच्या घराशेजारींच असून तीन खणी रुंद व तेरा खण लांब, तीन मजली आहे, घरांत रहावयास आल्यापासून जवळ जवळ आजतागायत कांहींना कांहीं तरी या घराची नवीन बांधणी दरवर्षी चालूंच असते. गु० शास्त्रीबुवांना स्थापत्यशास्त्राची चांगली माहीती आहे हें त्यांनीं स्वतांचे देखरेखीखालीं बांधिलेलें त्यांचें घर पाहिलें असतां सहज कळून येईल. घरांतील सोईगैरसोई, घराची मांडणी, व त्यास लागणारे सर्वसामान यांची त्यांस उत्तम परीक्षा आहे. घरासाठीं लागणारे सर्व सामान अत्यंत चांगलें व टिकाऊ कसें मिळेल याकडे त्यांची दृष्टि असते. सुतारानें किंवा गवंड्यानें लाकूड, वीट किंवा दगड कसा बसविला असतां तो पक्का बसेल इकडे त्यांची बारीक नजर असते. अनेक वेळां केलेलें काम उस्तरून ते सांगतील त्याच पद्धतीनें करण्यास सुतार गवंड्यांना भाग पडत असे त्यामुळें त्यांचें घर अत्यंत मजबुत व सर्व तऱ्हेच्या सोईंनीं युक्त झालें आहे.

त्यांच्या घरांतील स्वच्छता व टापटीप अत्यंत वाखाणण्यासारखी आहे. घरांतील सर्व भाग झाडून सारवून स्वच्छ केलेले असावयाचे, घरांतील कोणत्याही मोरीला व शौचकुपांना डांबर दर वर्षी लागलें जावयाचेंच, प्रत्येक ठिकाणीं पाण्याचें लहान लाकडी टीप व तपेली असावयाची, घराला कोठेही जाळीं जळमटें नसावयाचीं यामुळें घर अत्यंत नीट नेटकें आणि

स्वच्छ दिसतें. या घराचें बांधकामांत आजवर अंदाजें २०।२२ हजार रुपये खर्चं झाले असावेंत.

## गुरुवर्यांची दिनचर्या

पहाटें ५ वाजतां उठून ते शौचमुख मार्जन करतात. नंतर स्नान संध्या व पुजा उरकून ७।-८ चे सुमारास देवघरांतून बाहेर येतात. त्यानंतर औषधालयाचें काम, ११।१२ चे आंत जेवण, भोजनोत्तर थोडी विश्रांती, दुपारी २ ते ४ वाजे पर्यंत अध्यापन संध्याकाळीं पुनः औषधालयाचें काम आणि रात्रीं ८-८।। चे आंत संध्या, जेवण वगैरे उरकून ९-९।। चे सुमारास ते झोपण्यास जातात. असा क्रम आज कित्येक वर्षें अव्याहत चालू आहे. या अत्यंत व्यवस्थित कार्यक्रमानें गुरुवर्यांची प्रकृति निकोप, कार्यक्षम आणि तेजस्वी अशी अद्यापिही आहे. गुरुवर्यांनीं आपल्या दिनचर्येनें, वाग्भटांतील

" नित्यं हिताहार-विहार-सेवी, समीक्षकारी विषयेष्वसक्तः ।
दाता समः सत्य परः क्षमावान्, अप्तोपसेवीच भवत्यरोगः "

या श्लोकाचा प्रत्यय पूर्णपणें आणून दिला आहे.

## गुरुपत्नि

गुरुवर्यांचा आयुष्यक्रम व्यवस्थित व रेखीव चालू राहण्यास त्यांना सौ० मातुःश्री रुक्मिणीबाई यांची चांगली जोड मिळाली यांत शंका नाहीं. त्या आपल्या वयाच्या १० व्या वर्षी देवधर होऊन आल्यापासून आज वयाच्या ५४ वर्षापावेतों ४४ वर्षें संसाराचा गाडा सुव्यवस्थित व गु० देवधरांचे लौकीकास साजेलसा चालवीत आहेत. वाढत्या संसाराचा बोजा शिरावर वाहूनही दीर, नणंदा, जावा, तसेंच आले गेले आप्तस्वकीय, अतिथिअभ्यागत, व घरींच राहून शिकत असलेले एकदोन विद्यार्थी या सर्वांचा सांभाळ करून, सर्वांशीं प्रेमानें आणि अगत्यानें वागावयाचें, ही ठेवण यांच्या स्वभावांत नसती तर गुरुवर्यांचा संसार इतका यशस्वी झाला नसता. अविभक्त कुटुंबपद्धतींत वडीलकी पत्करून ती कायम टिकवणें हें,' आपल्या स्वतांच्या सुखाकडे कानाडोळा केल्याशिवाय शक्य नसते. नुसती वडीलकी दुरून बरी दिसते, पण ती निभावून नेणें, हें, त्याकरितां सोसावा लागणारा त्रास सहन करण्या-



गुरुपत्नि ती. सौ. रुक्मिणीबाई देवधर.




कुटुंबीयांसह गुरुवर्य देवधर.

इतका मनाचा खंबीरपणा व सौजन्य अंगीं बाणल्याशिवाय अशक्य असतें. ह्या सर्व गुणांचा परिपोष उभयतां पतिपत्नींत झाल्यावांचून संसार सुखाचा होत नसतो. नाहींतर उभयतांही अपयशाचे, दुःखाचे व निंदेचे भागीदार होतात. यावरून कर्तबगार, संपन्न व सद्गुणी गृहस्थानांही संसारदक्ष, सात्विक महत्वाकांक्षा बाळगणारी, कष्टाळू, प्रेमळ आणि मनमिळाऊ अशा सहचारिणीची जोड मिळणें किती अगत्याचे आहे हें समजून येईल. सुगृहिणीशिवाय संसार हा खोटा व कपाळकरंटाच होय.

## अपत्यसुख

गुरुवर्य देवधरांना प्रथम कुटुंबापासून एक मुलगी झाली. पण ती मुलगी व तें कुटुंब लवकरच निवर्तलें. द्वितिय कुटुंबापासून त्यांना मुलगे व मुली मिळून बरीच संतति झाली परंतु सर्व मुली अल्पायुषी ठरल्या. मुलांपैकीं ज्येष्ठ चिरंजीव रा० दिनकर ऊर्फ बापूराव यांचा जन्म शके १८२२ अश्विन कृ० ५ रोजीं झाला. हेच हल्लीं गुरुवर्यांचें वैद्यकीय धंद्याचें काम पहात असतात. त्यांचा विवाह पनवेल तालुक्यांतील वावंजें गांवचे रा० रा० भास्कर सखाराम रानडे यांची कन्या कु० वेणूबाई यांचेबरोबर शके १८४५ वैशाख व० ७ ता ७ मे १९२३ रोजीं नाशकास मोठ्या थाटानें झाला. यांचें सासरचें नांव सौ० कमलाबाई आहे. ह्यांना एक पांच वर्षांची मुलगी असून तिचें नांव इंदुमती आहे. यांचीं एकंदर तीन पुत्र व दोन कन्या मिळून पांच अपत्यें गेलीं. द्वितीय चिरंजीव रा० रामचंद्रपंत यांचा जन्म शके १८२७ पौष व० १० स झाला. रा० रामभाऊंचें मराठी व इंग्रजी शिक्षण नासिक येथेंच झाले. प्रवेशपरीक्षेनंतर ते मुंबईस सिडनूहॅम कॉलेजमधून बी. कॉम्. झाले. यांचा विवाह इंदूर येथील प्रसिद्ध वकील रा० विश्वनाथ श्रीपत लेले यांची कन्या कु० सुंदराबाई यांचेशीं मिति वैशाख व० १ शके १८४६ सोमवार ता० १९ मे १९२४ रोजीं झाला. त्यांना दोन मुलगे आहेत. पैकीं वडील मुलगा चि० दामोदर याचा व्रतबंध यंदां वैशाख शु० १० शके १८५७ रोजीं मोठ्या

समारंभानें झाला. यांची एक मुलगी वारली. तृतिय चिरंजीव रा० वासुदेवराव यांचा जन्म शके १८३४ ज्येष्ठ व० १२ स झाला. यांचा व्रतबंध मि० वैशाख शु० ५ शके १८४२ रोजीं झाला. यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण नासिक येथेंच झालें. प्रवेशपरीक्षेनंतर नासिक येथील कॉलेजांतून ते प्रीव्हियस होऊन हल्लीं मुंबईस नॅशनल मेडिकल कॉलेजमध्यें शिक्षण घेत आहेत. सर्वच चिरंजीव सुशील, आज्ञाधारक, सुशिक्षित व घराण्याचा लौकिक कायम ठेवणारे असल्यानें व सुनांही चांगल्या स्वभावाच्या असल्यामुळें, गुरुवर्यांवर जरी कांहीं पुत्रपौत्र-शोकासारखे अत्यंत दुःखदायक प्रसंग दुर्दैवानें ओढवले असले तरीही एकंदरींत त्यांना अपत्यसुख चांगलें मिळत आहे.

## यात्रा व प्रवास

गुरुवर्यांनीं शके १८०५ सालीं आपल्या गुरुवर्यांबरोबर इंदूरला गेल्यावेळीं उज्जयिनी वगैरे ठिकाणीं प्रवास केल्याचें मागें आलेंच आहे. त्यानंतर शके १८१४ सालीं गुरुवर्य कोल्हापूर, नरसोबाची वाडी वगैरे ठिकाणीं जाऊन आले. यानंतर शके १८५२ चैत्र व० १० मीपासून, ज्येष्ठ शु० ११ पर्यंत गुरुवर्यांनीं उत्तरेकडे प्रवास करून, त्रिस्थळी, अयोध्या, हरिद्वार, हृषीकेश, मथुरा, वृंदावन, दिल्ली, आग्रा वगैरे स्थलीं व क्षेत्रीं जाऊन तीर्थयात्रा सांग पार पाडल्या. तसेंच शके १८५६ मध्यें औरंगाबाद, वेरूळ, निजामाबाद, हैद्राबाद, बंगलोर, श्रीरंगम्, त्रिचनापल्ली, मदुरा, रामेश्वर, धनुष्कोटी, तंजावर, कुंभ-कोणम्, चिदंबरम्, कांजीवरम्, आणि मद्रास हीं दक्षिणेकडील शहरें अवलोकिलीं व यात्रा पार पाडिल्या. दोन्ही प्रवास सपत्नीक केले.

## प्रकरण १० वें.

मराठी ग्रंथ संग्रहालय. स्थल प्रत सं. नं. ता.

# अध्यापन

गुरुवर्यांनीं वैद्यकीचा स्वतंत्र व्यवसाय सुरू केल्यानंतर, व्यवसायाबरोबरच आयुर्वेद, व प्रसंगविशेषीं संस्कृत काव्यादिकांचेंही अध्यापनास सुरवात केली. गुरुवर्यांचे पहिले शिष्य म्हणजे प्रख्यात विद्वान् कै० चिंतामण वामनशास्त्री खरे हे होत. यांची माहीति पुढें येईल. गुरुवर्यांनीं शके १८०५ सालापासून अध्यापनास प्रारंभ केला. तें अध्यापन अद्यापही चालूं आहें. गुरुवर्यांजवळ अध्ययन करून तयार झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आजतागायत ४२ – ४३ आहे. त्यांचीं नांवें कालानुक्रमें पुढें दिलीं आहेत. विशेष माहीति विद्यार्थ्यांच्या अल्प चरित्रांत पुढें येईलच.

| | | |
|---|---|---|
| १ | कै० चिंतामणशास्त्री वामनशास्त्री खरे | |
| २ | वामनशास्त्री खेडकर | मु० पो० नगरदेवळें जि० पूर्वखानदेश |
| ३ | वामनशास्त्री दातार | नासिक |
| ४ | विष्णुशास्त्री केळकर | ” |
| ५ | हरिशास्त्री पराडकर | अकोला ( वऱ्हाड ) |
| ६ | रामशास्त्री शेवडे | विरवारें गोठणें जि० रत्नागिरी |
| ७ | प्रो० परशुराम लक्ष्मण वैद्य | पुणें |
| ८ | भाऊशास्त्री जोशी | सांगली |
| ९ | केशवाचार्य अवधानी | विजापूर |
| १० | कै० सौ० दुर्गाताई खर्डीकर | पुणें |
| ११ | कृष्णाजी काशीनाथ सरवटे | करीरोड मुंबई |

| | | |
|---|---|---|
| १२ | दामोदरशास्त्री रंगमहाले | जळगांव पूर्वखानदेश |
| १३ | कै० सदाशिव अनंत सखदेव | जमखिंडी |
| १४ | चिंतामण पुरुषोत्तम गोखले | भोर |
| १५ | भास्करशास्त्री धर्माधिकारी | पाचोरा पूर्वखानदेश |
| १६ | दत्तात्रेयशास्त्री टिल्लू | चोपडे ,, |
| १७ | दादाशास्त्री संगीत | इंदूर |
| १८ | शंकरशास्त्री विंचूरकर | नागपूर |
| १९ | सीताराम गोपाळ पुराणिक | एरंडोल पूर्व खानदेश |
| २० | गोपाळशास्त्री तरटे | नासिक |
| २१ | मुकुंदशास्त्री जोशी | बेळगांव |
| २२ | रामचंद्र सदाशिव फणसळकर | शिपोशी जि० रत्नागिरी |
| २३ | रामदास कालिदास पाठक | यावल पूर्व खानदेश |
| २४ | कै० केशव बाळाजी अभ्यंकर | मुंबई |
| २५ | दिनकर कृष्ण देवधर | नासिक |
| २६ | कै० गोविंद विनायक सोहनी | ,, |
| २७ | भाईशंकर गुजराथी | पंचवटी ( नासिक ) |
| २८ | सदाशिवशास्त्री लवाटे | नासिक |
| २९ | पांडुरंग दिनकर अकोटकर | मालेगांव जहागीर ( अकोला ) |
| ३० | पांडुरंग प्रल्हाद दाणी | नासिक |
| ३१ | गजानन अप्पू वेदेश्वर | गोकर्ण |
| ३२ | त्र्यंबकशास्त्री दाते | नासिक |
| ३३ | शामराव शिंदे | गडहिंग्लज |
| ३४ | मनोहर खंडेराव जोशी | लोणी ( वऱ्हाड ) |
| ३५ | काशिनाथ श्रीधर जोशी | नेर ( धुळें ) |
| ३६ | सदाशिव विठ्ठल जोशी | जयसिंगपूर ( सं० कोल्हापूर ) |
| ३७ | शंकर श्रीधर साकरे | पिंपळगांव ( पूर्व खानदेश ) |
| ३८ | नरहर काशिनाथ भिडे | संगमेश्वर ( रत्नागिरी ) |
| ३९ | केशव विश्वनाथ जोशी | खांडवा ( नेमाड ) |

| | | |
|---|---|---|
| ४० | पांडुरंग गणेश निरंतर | नासिक |
| ४१ | राजाराम नीलकंठ कवीश्वर | त्र्यंबक (नासिक) |
| ४२ | भालचंद्र भास्करशास्त्री शुक्ल | ,, ,, |

याशिवाय पूर्वी येथें डॉक्टरकी करीत असलेले प्रसिद्ध डॉ० कै० शंकर रामकृष्ण दातार L. M & S. (वाई) हेहीं गुरुवर्यां जवळ वैद्यकीचे ग्रंथ म्हणत असत. अध्यापनाचा वेळ नियमीत दुपारीं २ ते ४ पर्यंत असतो. अध्यापनाची पद्धत मागें वर्णन केल्या प्रमाणेंच आहे. पुण्याच्या वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या व बडोद्याच्या वैद्यकीच्या परीक्षांस विद्यार्थ्यांना धाडण्याचा व त्या परीक्षांचा अभ्यासक्रम पुरा करून घेण्याची पद्धत चालू आहे. माधव निदान. अष्टांग हृदय, रसरत्न समुच्चय, मदनपाल निघंटु, चरक सुश्रुत. व अष्टांग संग्रह वगैरेंतील जरूरी पुरते भाग, व शार्ङ्गधर, भावप्रकाश वगैरे ग्रथ शिकविण्यांत येतात. संस्कृत व्युत्पत्तीचेही ग्रंथ जरूरी पुरते कांहीं विद्यार्थ्यांना पूर्वी शिकविले जात असत. या विद्यार्थ्यांपैकीं बहुतेक आपला वैद्यकीचा व्यवसाय निरनिराळ्या ठिकाणीं करीत असून ते नांवलौकिकास चढले आहेत, व आपल्या परंपरेचा प्रसार वैद्यकीचें शिक्षण देऊन करीत आहेत. विद्यार्थ्यांना "जें जें आपणासि ठावें। तें तें हळुहळू शिकवावें॥ शाहाणे करूनि सोडावे। सकलजन" या समर्थोक्ति प्रमाणें रहस्य न ठेवतां झीज सोसूनही शिकविण्याची व प्रत्यक्ष दाखविण्याची तत्परता गुरुवर्यांनीं ठेविल्यामुळें सर्व विद्यार्थ्यांचें गुरुवर्यांवर अत्यंत प्रेम असणें साहजिकच होय. प्रत्यक्ष औषधें करवून घेऊन आपल्याच दवाखान्यांत चिकित्सेचें ज्ञान देणे यामुळे ग्रंथ शिकून तयार झालेला विद्यार्थी व्यवहारांतही कच्चा राहणार नाहीं, अशी काळजी घेतली जाते. शिकत असलेल्या परस्थ गरीब विद्यार्थ्यांची जेवण्याची, राहण्याची, पुस्तकांची वगैरे हरतऱ्हेची सोय लावणें हा गुरुवर्यांचा नित्य व्यवसायच झाला आहे. आपल्या येथून विद्यार्थी तयार झाल्यावर त्याच्या धंद्याची सोय नसल्यास एखादे उत्तम ठिकाण शोधून तेथें पत्रें वगैरे पाठवून किंवा स्वतां जाऊन त्याची धंद्याची सोय करून देणें, एखाद्यास भांडवल नसल्यास त्याला प्रत्यक्ष पैशाचें अगर औषधाचें रूपानें सुरवातीस भांडवल पुरविणें असें

अनेकपरींनीं गुरुवर्यांनीं विद्यादानाचें बाबतींत प्रत्यक्ष कार्य केलें आहे. इतकेंच नाहीं तर आपल्या घरींही एक पासून ४।५ वर्षेंही विद्यार्थ्यांना सतत ठेवून त्यांचा सर्व तऱ्हेचा प्रतिपाळ मुलाप्रमाणें करून हें विद्यादानाचें व्रत गुरुवर्यांनीं आज पावेतों अखंड चालू ठेविलें आहे. वास्तविक आपला सुखाचा किंवा उद्योगाचा वेळ खर्ची घालून विना मोबदला विद्या शिकविणें हाच त्या विद्यार्थ्यांवर मोठा उपकार होय. या उपकाराचेंच ओझें सबंध आयुष्य-भर वाहणें हें त्या विद्यार्थ्यांचें नैतिक कर्तव्य होय. गुरुवर्यांनीं विद्यादाना-खेरीज दुसरी कोणतीही झीज सोसली नसती तरीही विद्यार्थ्यांना व समा-जाला त्यांचे संबंधी कृतज्ञ भावनेनें धन्योद्गार काढणें भाग होते मग जेथें सर्व प्रकारें झीज सोसून विद्यार्थ्यांची काळजी वाहिली गेली तेथें विद्यार्थी-वर्गानें आणि समाजानें त्यांचे विषयीं किती कृतज्ञ असलें पाहिजे ? ज्या विद्यार्थ्यांना गुरुगृहीं राहून त्यांचे पुण्य–सहवासाचा लाभ घडला व ज्यांस धंद्याच्या बाबतींत साहाय्य मिळालें ( मग त्या सहाय्याची परत फेड जरी त्या विद्यार्थ्यांनीं पुढें केली असली तरी ) त्यांचीं नांवें खालीं उद्धृत करीत आहोंत.

रा० रा० हरीशास्त्री पराडकर व रा० रामशास्त्री शेवडे, या दोघांची राहण्याची, व गांवांत सोय लागेपर्यंत जेवण्याचीही व्यवस्था गुरुवर्यांनीं स्वतांच्या घरींच केली. रा० हरीभाऊ पराडकरांना अकोल्यास धंद्यास लावण्यासाठीं, तेथील प्रतिष्ठित, वजनदार व परिचित मंडळींना पत्रें देणें, समक्ष जाऊन सांगणें, व धंद्याची बाब सुधरून देणें हें कार्य गुरुवर्यांना करावें लागलें आणि तें त्यांनी मोठ्या, प्रेमानें व आनंदानें केलें. रा० शंकरशास्त्री विंचूरकर यांना भंडाऱ्यास धंद्यानिमित्त ठिकाण दाखवून देऊन, आपल्या ओळखींचा उपयोग त्यांना होईल अशी व्यवस्था केली. रा० भाऊशास्त्री जोशी, केशवाचार्य अवधानी, कृष्णाजी काशीनाथ सरवटे, सदाशिव अनंत सखदेव, गोपाळशास्त्री तरटे, रामचंद्र सदाशिव फणसळकर, रामदास कालीदास पाठक, गजानन अप्पू वेदेश्वर हे विद्यार्थी ६ महिन्यांपासून तों ३।४ वर्षेपर्यंत गुरु-वर्यांकडे राहून अध्ययन करीत होते. यांचा सर्व भार गुरुवर्यांवरच

होता. खुद्द चरित्र लेखकास भांडवलाची मदत गुरुवर्यांनीं सन १९०४।५ सालीं केली आहे. यासर्वांपेक्षांही अत्यंत मोठी मदत प्रो० परशुराम लक्ष्मण वैद्य व कुमारी दुर्गाताई खर्डीकर यांना झाली आहे. रा० वैद्य हे बुद्धीनें अत्यंत तरतरीत पण घरच्या गरीबीनें हताश होऊन लहानपणींच विद्यार्जनाकरितां घराबाहेर पडले होते. त्यांचा व गुरुवर्यांचा योगायोगानें संबंध आल्यावर गुरुवर्यांनीं रा० वैद्यांना जवळ ठेवून, संस्कृत व वैद्यकी शिकवून त्यांचेकडुन लहान वयांतच पुण्याच्या दोन परीक्षा देवविल्या. पण त्यांचें वय बरेंच लहान, बुद्धीची तीव्रता विशेष, शिक्षण घेण्याचा उत्साह दांडगा हीं पाहून गुरुवर्यांनीं त्यांच्या इंग्रजी शिक्षणाची सोय केली. पुढें प्रवेश परीक्षा झाल्यावर, प्रो० पानसे यांच्या मार्फत रा० हरी नारायण आपटे यांच्या मदतीनें राहण्याची वगैरे सोय करवून उच्च शिक्षणाची व्यवस्थाही करवून दिली. रा० वैद्य हे पुढें पुढें आपल्या स्वतांच्या कर्तबगारीवरच आपला शिक्षणक्रम चालवूं लागले व यशस्वीपणानें प्रत्येक परीक्षेंत उत्तीर्ण झाले हें सर्वस्वी खरें आहे; तरी गुरुवर्यांचा सर्व तऱ्हेचा पाठिंबा त्यांना अखेरपावेतो सारखा होता यांत शंका नाहीं. डॉ० वैद्य यांची गणना, नामांकित विद्वानांत, पुण्यास व इतर ठिकाणींही होते. ते पुण्यास वाडिया कॉलेजमध्यें उत्तम प्रोफेसर म्हणून प्रसिद्ध आहेत. पाश्चात्य देशांत जाऊन त्यांनीं D. Lit. (फरान्स) ही पदवी मिळविली. त्यांनीं पाली, मागधी व अर्धमागधींतील अनेक ग्रंथ संशोधून प्रसिद्ध केले आहेत. या सर्वांस त्यांच्या आंगचे उत्साह, कर्तव्यतत्परता, बुद्धिवैभव, महत्त्वाकांक्षा वगैरे गुण जरी कारणीभूत असले तरी त्या सर्वगुणसमुच्चयांचा विकास व कार्यप्रवणता यांस प्रेरक व पोषक कोणी असेल तर ते आमचे परमपूज्य गुरुवर्यच होत. प्रोफेसर साहेबांसही याची पूर्ण जाणीव असून ते गुरुवर्यांसंबंधीं सतत प्रेम व आदर बाळगतात.

यांचे सारखेंच दुसरें उदाहरण म्हणजे आमच्या गुरुभगिनी कै० सौ० दुर्गाताई खर्डीकर यांचें होय. कै० दुर्गाताईचें मराठी व थोडें संस्कृत शिक्षण झाल्यावर त्यांना, गुरुजींनीं संस्कृत व वैद्यक

शिकविण्यास सुरवात केली. त्यांचे संस्कृत व वैद्यक ग्रंथ उत्तम तयार झाल्यावर त्यांस मोठया उमेदीनें वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षेस गुरुवर्य स्वतः घेऊन गेले. पण त्या सभेच्या नियमांच्या चौकटींत कै० दुर्गाताईंची परीक्षा घेणें बसेना म्हणून त्यांची परीक्षा घेतली गेली नाहीं. नंतर त्यांना पुण्यासच B. P. N. A. चा अभ्यास करावयास लावून व त्यांचेकडून ती परीक्षा देवबून यशस्वीपणाने नाशकास परत आणिलें. याबाबद खर्च वगैरे सर्व व्यवस्था गुरुवर्यांनींच केली. सौ० ताईवर त्यांचें कन्येप्रमाणें अतीशय प्रेम असे.

सारांश या सर्व उदाहरणावरून गुरुवर्यांनीं विद्यादानाकरितां, आपल्या विद्यार्थीदशेंतील आपत्तींची जाणीव ठेवून, शारीरिक, मानसिक आणि आर्थिक झीज किती सोसली हें दिसून येईल.

श्रीमदाद्यशंकराचार्यांनीं मोक्षदात्या गुरूसंबंधीं,

" दृष्टांतो नैवदृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः ।
स्पर्शश्चेत्तत्रकल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारम् ॥
न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सद्गुरुः स्वीयशिष्ये ।
स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमः तेनवाऽलौकिकोपि ॥ "

काढलेल्या या उक्तींतील, गोष्टी व्यावहारिक विद्या प्रदान करणाऱ्या निस्वार्थी गुरूंविषयींही तितक्याच खऱ्या आहेत. दुसऱ्या दृष्टीनें विचार करतां मोक्षदात्या गुरूपेक्षां, लौकिकविद्यागुरू एकापरीनें श्रेष्ठ ठरतो. कारण मोक्ष हा निर्मर्याद, निरुपम व स्वतःसिद्ध असल्यानें, देणाऱ्यास स्वार्थाचा त्याग करावा लागत नाहीं व घेणाऱ्यासही गुरूच्या स्वार्थाचा विच्छेद केला असें वाटत नाहीं. परंतु इतर ( व्यावहारिक ) विद्यांचें व त्या देणाऱ्या गुरूंचें मात्र तसें नसतें. ह्या विद्या त्या गुरूंच्या नित्योपजीविकेच्यीं आणि लौकिकाचीं साधनें असतात. अशा विद्या शिष्यांस देऊन, त्यांना आपल्याच गांवांत, चालत्या धंद्यांत वाटेकरी करावयाचें आपल्या वृत्तीवर नसती धोंड उत्पन्न करून स्वतःचें नुकसान करून घ्यावयाचें हें अधिक जोखमीचें आहे. या दृष्टीनें मोक्षगुरूपेक्षांही लौकिकविद्यागुरु हे अधिक श्रेष्ठ होत असें म्हणणें चुकीचें ठरणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ
सं. नं
ता.

## प्रकरण ११ वें

# भारतीय सन्मान.

गुरुवर्यांच्या वाढत्या उद्योगाला व चढत्या वैभवाला जनतेकडून होण्याऱ्या सन्मानाचीही जोड मिळणें क्रमप्राप्त व आवश्यकच होतें. त्याप्रमाणें प्रथम निरनिराळ्या वैद्यक विद्यालयांच्या परीक्षकाचा मान त्यांना मिळूं लागला. टिळक विद्यालय पुणें, आर्यांग्ल वैद्यक विद्यालय सातारा, आयुर्वेद विद्यालय नगर, वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें, निखिल भारत वर्षीय आयुर्वेद विद्यापीठ (विशारद व आचार्य परीक्षा) इ० संस्थातर्फे त्यांना परीक्षक होण्याचा मान कित्येक वर्षें मिळत आहे. एका परीनें वरील संस्थांचा गुरुवर्यांच्या परीक्षकत्वाने गौरवच झाला असें म्हणणें सयुक्तिक होईल.

गुरुवर्य देवधर स्वभावानें सडेतोड, जुन्या वळणाचे, व कोणत्याही सार्वजनिक चळवळींत न पडणारे, किंबहुना अशा चळवळींना फारसें अनुकूल नसणारे असे असल्यामुळें, कै० शंकर दाजी शास्त्री पदे यांनीं प्रथम नाशकास भरविलेल्या वैद्य संमेलनाचे वेळे पासूनच, या सम्मेलनांत व अशा इतर चळवळींत त्यांनीं प्रथम पासूनच भाग घेण्याचे टाळलें. इतकेंच नव्हे तर कांहीं बाबतींत त्यावेळीं कै० पदेशास्त्र्यांशीं समक्ष मतभेद प्रदर्शित करून विरोधही दर्शविला होता. कै० शंकरशास्त्री पदे यांनीं या सम्मेलनांत देऊं केलेल्या पदव्याही, या गुरु शिष्यांनीं ( तरटे व देवधर ) परत केल्या होत्या. त्या वेळे पासून तों अद्यापही आहे तीच वृत्ति कायम असल्यानें, सभा सम्मेलनांतून आपल्या विद्वत्तेला व योग्यतेला साजेसा अध्यक्षपदाचा मान या पूर्वीच मिळणें योग्य व सहज शक्य असतांही त्यांना तो मिळूं शकला नाहीं. मद्रास सरकारनें नेमलेल्या उस्मान

कमीटीच्या आयुर्वेदीय वैद्यांच्या गणनेंत निखिल भारतीय प्रख्यात वैद्यांत यांचा समावेश झाला नाहीं यांत नवल नाहीं. कोणत्याही वैद्य सम्मेलनांत कै० प्राणाचार्य लागवणकर किंवा गु० कृष्णशास्त्री देवधर या महाराष्ट्रीयांचे महाराष्ट्रातर्फे पहिलें अध्यक्षत्व, विद्या, वय, अनुभव, अध्यापन, इ० सर्व गुणांनीं आवश्यक असतां, या नांवांकडे लक्ष न जातां इतरांची वर्णी लागावी याचें ही कारण गुरुवर्यांचें पुरातन मतावलंबित्व व कीर्ति किंवा प्रसिद्धीची पर्वा न करतां आपलें कर्तव्य निमूटपणें करण्याची प्रवृत्ति हें व जनतेचेंही खऱ्या विद्वान् व विद्यासेवक पुरुषाकडे होत असलेलें दुर्लक्ष हेंच होय. पण हें झालेलें दुर्लक्ष कायम टिकलें नाहीं.

## प्रांतीय सन्मान.

वऱ्हाड प्रांतीय वैद्य संमेलनाचें द्वितीय अधिवेशन सन १९२१ सालीं मार्च महिन्यात अकोल्यास भरण्याचें नक्की ठरल्यावर त्या संमेलनाचें अध्यक्षपदाचा मान गु० कृष्णशास्त्री देवधरांना देण्यांत आला. हें अध्यक्षपद त्यांची इच्छा नसतांही, गुरुवर्यांचे प्रिय शिष्य वै० भू० भिषगाचार्य हरिशास्त्री पराडकर यांच्या आत्यंतिक आग्रहानें व प्रेमानें गुरुवर्यांस स्वीकारावें लागलें. या संमेलनास वऱ्हाडांतील सर्व वैद्य मंडळी जमली होती. शिवाय डॉ० बाबासाहेब परांजपे, वै० भू० पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर, वै० पं० गंगाधर शास्त्री गुणे व कृष्णशास्त्री कवडे, आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल, भि० र० गंगाधरशास्त्री जोशी वगैरे विद्वान् वैद्य व गुरुवर्यांचा शिष्यवृंद उपस्थित होता. हें सम्मेलन मोठ्या उत्साहानें व समारंभानें गुरुवर्यांच्या आधिपत्याखालीं पार पडलें.

## अखिल भारतीय सन्मान

सन १९२८ सालीं फत्तेपूर सीकर येथें निखिल भारतीय आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्षस्थानींही गुरुवर्यांची प्रचंड बहुमतानें योजना झाली. वास्तवीक याही वेळीं गुरुवर्यांनीं आपण अध्यक्षस्थान स्वीकारीत नाहीं असें स्वागत मंडळास तारेनें कळविलें होतें. पण स्वागत मंडळाच्या अत्याग्रहावरून त्यांना हें स्थान स्वीकारावें लागलें. गुरुवर्यांचा सन्मान म्हणजे महाराष्ट्राचा सन्मान या वृत्तीने आनंदित व उत्साहित होऊन गुरुवर्यांचे बरोबर

डॉ० तपस्वी बाबासाहेब परांजपे, आचार्य यादवजी त्रिकमजी, वै० प० गंगाधरशास्त्री गुणे, मि० र० गंगाधरशास्त्री जोशी, आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल ही महाराष्ट्रांतील प्रमुख वैद्य मंडळी व रा० रा० हरिशास्त्री पराडकर, वै० र० विष्णुशास्त्री केळकर, भाऊशास्त्री जोशी, रामदास शास्त्री पाठक व प्रस्तुत चरित्र लेखक ही शिष्य मंडळी असून गुरुवर्यांचे द्वितीय चिरंजीव रा० रामभाऊ देवधर हेही होते.

फत्तेपूर हें मारवाडांतील जयपूर राज्यापैकीं सीकर या लहानशा संस्थानचें राजधानीचें शहर होय. मारवाडांतला प्रवास अत्यंत कष्टदायक होय. आम्ही सर्व मंडळी गुरुवर्यांबरोबर मुंबईहून गुजराथ मार्गे मारवाड जंक्शनवरून फत्तेपुरास गेलों. स्टेशन पासून शहर ८ कोस लांब, सर्व प्रदेश वालुकामय व त्यामुळें कायमचा रस्ता नसल्यानें आम्हांस मोटारीनें फत्तेपूर शहरीं पोंचण्यास ६।७ तास लागले. येतांनाही असाच त्रास झाला. सामानाची वाहतूक उंटावरून करावी लागली. फत्तेपूर हें ३०।४० हजार वस्तीचें मोठें शहर आहे. या शहरांत अत्यंत धनाढय मारवाडी लोकांची वस्ती असून त्यांचे मोठमोठे वाडे आहेत. त्यांची बांधणी विटांची असून नकशी काम अत्यंत सुंदर आहे. या गांवांतील मारवाडी सर्व हिंदुस्थानांत व परदेशांतही फत्तेपुरी मारवाडी म्हणून ओळखिले जातात विकानेरचे मारवाडीही श्रीमंत असून सर्व देशांत व्यापाराकरतां दूरवर पसरले आहेत. हिंदुस्थानांत खेडोपाडीं लोटा व पोतें घेऊन हिंडणारा मारवाडी आपल्या देशांत किती श्रीमंत होऊन येतो व ऐषआराम भोगतो यांची साक्ष हीं दोन्हीं शहरें देतात. अत्यंत उच्च दर्जाची राहणी, तलम कपडा, हिऱ्याचीं कर्णभूषणें, गळयांत सोन्यामोत्याचे दागिने व रुबाबदार पोशाख पाहून यांची श्रीमंती व धनसंचय करून तो आपल्या देशांत आणण्याची वृत्ति व जन्मभूमीवरील प्रेम यांचें मोठें कौतुक वाटतें. जिकडे तिकडे, सौंदर्यहीन, मरुभूमि म्हणून या प्रांताची निंदा होत असली तरी, वालुकामय, निर्जल, सृष्टिसौंदर्यहीन व रुक्ष अशा या प्रदेशांतही, या सधन मारवाडी लोकांनीं जागजागीं कृत्रिम सौंदर्य निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला

दिसून येतो. पूर्वी कंगाल गणल्या गेलेल्या मारवाडांत सांप्रतचें श्रीलक्ष्मी-देवीचें वास्तव्य विशेष नजरेंत भरल्याशिवाय रहात नाहीं. अशा श्रीमंतीनें नटलेल्या शहरांतून संमेलनाचे दिवशीं सकाळीं सभापतींची मिरवणूक मोठ्या थाटानें काढण्यांत आली. शहरांतील सर्व श्रीमंत शेट सावकार लोक, सम्मेलनाकरितां आलेले प्रतिनिधि, विद्वान् व प्रसिद्ध वैद्यसमूह मिरवणुकींत सामील झाला होता. मिरवणूक सभापतींच्या निवासस्थानापासून सम्मेलनमंडपापर्यंत जावयाची असें ठरलें होतें. मिरवणुकीसाठीं मंगलवाद्यें व शृंगारलेला मोठा गजराज, छत्रचामरें वगैरे लव्याजम्यासह तयार होता.

## गुरुवर्यांची नम्रता व शालीनता

मिरवणुकीच्या सुरवातीस, सर्वांनीं सभापतींस विनंति केली कीं गजराजावर आरूढ होऊन अंबारींत बसावें. परंतु गुरुवर्यांनीं ती अत्यंत नम्रतेनें पण निश्चयपूर्वक नाकारिली. कारण सर्व उपस्थित विद्वानांनीं पायीं चालून आपणच एकट्यानें हत्तीवर बसावें हा त्यांचा अपमान होय असें त्यांस मनःपूर्वक वाटत होतें, त्यामुळें सर्वांनीं परोपरीनें पुनःपुनः केलेल्या आग्रहास त्यांनीं विनयपूर्वक नकार दिला. शेवटीं श्रीचरक-सुश्रुतादिग्रंथ – प्रत्यक्ष आयुर्वेदच – अंबारींत ठेवून मिरवणूक निघाली व सभापति सर्वांचे बरोबर पायींच चालले. गुरुवर्यांची ही शालीनता व विनम्रता पाहून, उतावळ्या व हत्तींवरून आणि मोटारींतून अध्यक्ष म्हणून मिरवण्याची हाव धरणाऱ्या व त्यासाठीं सूक्तासूक्त मार्गांनीं प्रयत्न करणाऱ्यांनीं योग्य तो बोध घ्यावा. गुरुवर्यांच्या या वागणुकीनें सर्वांचे मनांत त्यांचेसंबंधीं असलेला आदर पूर्वीपेक्षां अधिक वाढला. गुरुवर्यांची अध्यक्षीय कामगिरीही नांवाजण्यासारखीच झाली. संमेलन यशस्वीपणें पार पडलें. गुरुवर्यांनीं समारोपाचें भाषणांत, सर्व महाराष्ट्रीय वैद्यांचे विचारानें पुढील सम्मेलनास नासिक येथें निमंत्रण केलें. फत्ते-पुरास गुरुवर्यांना व सम्मेलनासाठीं आलेल्या प्रतिनिधींना बऱ्याच ठिकाणीं पानसुपाऱ्या आणि मेजवान्या झाल्या. सम्मेलन संपल्यावर गुरुवर्य सर्व महाराष्ट्रीय प्रतिनिधींसह, हिंदुस्थानचें पॅरिस म्हणून प्रसिद्ध असलेलें

जयपूर शहर पाहण्यास गेले. तेथें प्रख्यात भारतश्रेष्ठ पंडित वैद्य लक्ष्मीरामस्वामी यांनीं गुरुवर्यांचा अत्यंत आदरानें सत्कार केला व आपले पाहुणे म्हणून ठेवून घेऊन जयपूर व आसपासचीं प्रेक्षणीय स्थळें दाखविण्याची खास व्यवस्था केली. जयपूर पाहून गुरुवर्य दिल्ली आग्र्याकडे रवाना झाले व बाकीची मंडळी महाराष्ट्राकडे वळली.

## निर्घृण विधिघटना

गुरुवर्यांबरोबर त्यांचे शिष्य वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर, वैद्य रामदासशास्त्री पाठक व भाऊशास्त्री जोशी आणि चिरंजीव रामभाऊ ही मंडळी होती. ते दिल्ली आग्र्याचे मुक्कामांत असतांनाच नाशकास एक दारुण प्रसंग ओढवला. गुरुवर्यांचे तिसरे चिरंजीव रा० लक्ष्मणराव हे अपघातानें ता० ७ एप्रिल १९२८ रोजीं मृत्यु पावले. ता० ६।४।१९२८ रोजीं रा० लक्ष्मणराव नेहमींप्रमाणें संध्याकाळीं सायकलवर बसून त्र्यंबक रस्त्यानें येत असतांना, येथील प्रख्यात डॉ० पी. एस्. गुप्ते यांच्या "रॉंग साइड" नें आलेल्या टांग्याखालीं सांपडून, घोडयाच्या लाथा त्यांचे पोटावर बसल्या. त्या भयंकर अपघातानें कोठयांत रक्तस्राव होऊन ते बेशुद्ध झाले. तेथून त्यांना हॉस्पिटल्मध्यें पोंचविण्यांत आलें. तेथें शक्य ते उपचार करूनही, आघात फार मोठा झाल्यामुळें, त्यांचा ता० ७ । ४ । २८ रोजीं अत्यंत हृदयद्रावक अंत झाला. वडील जवळ नसल्यानें तर त्यांना व इतरांनांही अत्यंत वाईट वाटलें. वृद्ध व पंगु मातुःश्री, वडील बंधु रा० बापूराव व कनिष्ठ बंधु रा० वासुदेवराव यांना तर आपल्यावर अचानक आकाशाची कुऱ्हाड पडल्यासारखें झालें. आप्तजनांना फार दुःख झालें. सर्व शहरही हळहळलें. ही भयंकर शोकवार्ता प्रवासांत असलेल्या गु० शास्त्रीबुवांस कशी कळवावी हा मोठा प्रश्न पडला. भवति न भवति होऊन, "तावडतोब निघून या" अशी तार दिल्लीस करण्यांत आली. गुरुवर्यांना विशेष शंका येऊं नये म्हणून बरोबरच्या मंडळींनीं फार सावधगिरी ठेविली होती. गुरुवर्य घरीं आल्यावर त्यांचें सांत्वन करण्याकरितां मुंबईचे रा० विनायकराव परांजपे व पुण्याचे रा० भाऊसाहेब कानेटकर ही मंडळी

अगाऊ येऊन राहिली होती. गुरुवर्यांना यापूर्वी कन्या व पुत्रशोकाचे प्रसंग २।४ वेळां अनुभवावे लागले होते, हें जरी खरें असलें तरी इतका मोठा, हुशार, सद्गुणी व प्रेमळ असा मुलगा व तोही आपण समक्ष नसतांना अपघातानें करुणाजनक स्थितींत मृत व्हावा यामुळें तर त्यांचें जात्या मृदु व हळुवार अंतःकरण शतधा विदीर्ण झालें. गुरुवर्यांचें हें पुत्रवियोग दुःख कमी होण्यास फार प्रयास व दिवस लागले. अद्यापही तें अंतःसुप्त सर्पाप्रमाणें हृदयाचा डाव धरून कायम आहे. कसल्याही लहानशा दुःखद प्रसंगानें तें खडबडून पूर्वस्वरूप धारण करतें. आपल्या विवेकशील बुद्धीनें तें दावण्याचा गुरुवर्यांचा प्रयत्न सारखा चालूं असतो.

चि० रा० लक्ष्मणराव यांचा जन्म शके १८३१ चे भाद्रपद वद्यांत (ता० ९।१०।१९०९) झाला. त्यांचा व्रतबंध शके १८४० चे चैत्र वद्यांत झाला. त्यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण येथेंच झालें. ते १९२८ सालीं प्रवेश परीक्षेस बसणार होते. मृत्युसमयीं त्यांचें वय १९ वर्षांचें होतें. त्यांचा स्वभाव मनमिळाऊ, प्रेमळ व विनम्र असा होता. बुद्धि तरतरीत असून महत्वाकांक्षा मोठी व हुरूप दांडगा होता. गुरुवर्यांचे ठिकाणीं त्यांचें आत्यंतिक प्रेम होतें.

## स्वागताध्यक्षाचा मान.

या प्रसंगानंतर फत्तेपूर येथें स्वतां बोलाविलेलें निखिलभारतीय वैद्य संमेलन नाशकास भरतें किंवा नाहीं या संबंधीं मोठी काळजीच होती. पण गुरुवर्यांनीं कर्तव्याकडे दृष्टि ठेवून विवेकानें शोक आवरला व 'प्रारब्ध-स्यांत गमनम्' या तत्वाप्रमाणें सम्मेलनाचें कार्यास अनुमति दर्शविली, आणि सर्व महाराष्ट्रीय वैद्य मंडळीनें दिलेलें स्वागताध्यक्षत्व स्वीकारून सम्मेलनाची धुरा धारण केली. प्रत्यक्ष संमेलनाचे ४ दिवस अत्यंत श्रम घेतले. पाहुण्यांनीं गुरुवर्यांचें घर अगदीं फुलून गेलें होतें. गुरुवर्यांनीं पाहुण्यांचा योग्य परामर्ष घेतला. संमेलनाचे अध्यक्ष कॅप्टन श्रीनिवासमूर्ति, पंडित लक्ष्मीरामस्वामी, पंडित यादवजी, ० डेग्वेकर, व महाराष्ट्रांतील प्रख्यात विद्वान् मंडळी यांना एक थाटाची मेजवानी देऊन गुरुवर्यांनीं त्यांचा सन्मान केला.

या नंतर गुरुवर्यांच्या सन्मानाचा प्रसंग म्हटला म्हणजे पुण्याच्या ताराचंद रामनाथ आयुर्वेदिक रुग्णालयांतील शव विच्छेदन मंदिराचा समारंभ गुरुवर्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला हा होय. या प्रसगीं गुरुवर्यांनीं अध्यक्षस्थान मंडित करावें अशी पुण्याचे प्रसिद्ध कार्यधुरंधर आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल यांची हार्दिक इच्छा होती, म्हणून त्यांनीं बरीच खटपट केली. तिला यश येऊन गुरुवर्यांनीं हें स्थान स्वीकारिलें. या रुग्णालयाच्या वार्षिक समारंभाचे या पूर्वीचे अध्यक्ष राजे महाराजे, श्रीमंत शेट सावकार, नामदार असे बडे बडे लोक झाले होते. गुरुवर्यांनीं हें अध्यक्षपद पत्करून त्या विद्यालयाच्या आजपर्यंतच्या अध्यक्ष परंपरेला कोणत्याही प्रकारें न्यूनत्व येऊं दिलें नाहीं. गुरुवर्यांचें त्या प्रसंगाचें भाषण अत्यंत सुंदर, ओजस्वी, कळकळीचें, मार्गदर्शक व विद्वत्तादर्शक झालें. पुण्यास येवढ्या मोठ्या समारंभाचे अध्यक्ष होणें व पुण्याचे नरकेसरी श्री० तात्यासाहेब केळकर व व रा० ब० शेट हणमंत रामनाथ वगैरे सारख्यांची गुरुवर्या संबंधीं आदरदर्शक व गौरवपूर्ण भाषणें होणें हें कांहीं सामान्य नव्हे. गुरुवर्यांनीं आपल्या सुंदर व भारदस्त भाषणाबरोबरच विद्यालयाच्या शवविच्छेदन मंदिराचें कार्यास स्थैर्य येण्यासाठीं कर्तव्यबुद्धीनें एक हजार रुपयांची देणगी दिली.

## भिषगाचार्य

गुरुवर्यांची अनुमति असती तर आतां पर्यंत त्यांस अनेक पदव्या मिळाल्या असत्या पण गुरुवर्य या बाबतींत पूर्ण उदासीन असल्यामुळें त्यांनीं कोणत्याच पदवीचा स्वीकार केला नाहीं. तथापि गुरुवर्यांना श्रीक्षेत्र काशीच्या भारत धर्म महामंडळानें भिषगाचार्य ही पदवी देऊन गौरविलें आहे. ते विद्यामान-पत्र पुढें देत आहों.

श्रीः

महतस्तमसः पारे पुरुषं ह्यतितेजसम्।
यं ज्ञात्वा मृत्युमत्येति तस्मै ज्ञेयात्मने नमः॥

# विद्यामानपत्रम्।

**श्रीयुक्त पण्डित कृष्णशास्त्री देवधर वैद्य महाशय नासिक.**

ज्ञानस्य जननी विद्या। अविद्यारूपं तमो यया निरस्यते सा विद्या। पारमार्थिकं च तस्या विद्यायाः स्वरूपं संस्कृतां देवगिरं द्वारीकृत्येव जगति प्राकाश्यत। साम्प्रतमधःपतितायामार्य्यजातौ सद्विद्यां पुनः प्रचार्य्याऽज्ञानोद्य-मराहित्यादिदोषजातं च दूरीकृत्य यावदस्यां धर्म्मशावतर्न पुनराविर्भाव्यते तावदस्याजीवनरक्षा कर्त्तुं न शक्यते। आदिशिक्षितायामादिमननशीलाया-मादिविज्ञानविदि जगद्गुरुत्वेनाऽभिमतायामार्य्यजातौ सद्विद्यायाः पुनर्वि-काशार्थं सनातन-धर्म्मस्य पुनरभ्युदयसाधनपुरस्सरं जगत्कल्याणकारिण्या धर्म्मशवतेराविर्भावार्थं च सकलधर्म्मसभाधर्म्मालयानां समष्टिरूपायाः श्रीभारत-धर्म्ममहामण्डलाख्याया विराडंधर्म्मसभायाः स्थापनमभूत्।

यत्र ये केचित् श्रीसरस्वतीदेव्याः कृपास्पदीभूता विद्वांसो विद्योन्नतौ रतास्ते सर्व्वेऽप्यस्याः स्वजातीयविराडधर्म्मसभायाः प्रेम भाजनानीति भवतः

**वैद्य विद्या** योग्यतया प्रसन्नेयं स्वजातीयधर्म्ममहासभा सद्विद्यायाः सम्मानवृद्ध्यर्थं भवन्तं **भिषगाचार्य** विद्योपाधिरूपालङ्कारेणाऽलङ्कृत्य परमं प्रमोदमश्नुते। सर्वज्ञानमयस्य सर्व्वशक्तिमतः परमेश्वरस्य चरणकमलयोः सविनयं प्रार्थयते च भवत आध्यात्मिकमुन्नतिर्भूयादिति शम्।

श्रीकाशीधाम्नि
श्रीभारतधर्म्ममहामण्डलप्रधानकार्य्यालयः।
तिथौ ११ पक्षे कृष्णे मासे पौषे वर्षे १९७५
रामचंद्र नायक कालिया
प्रधानाध्यक्षः।

श्रीरमेश्वर सिंह
सभापतिः
श्रीभारतधर्म्म महामण्डलस्य।

## प्रकरण १२ वें.

# मित्रपरिवार व दातृत्व

गुरुवर्यांच्या इष्टमित्र व चाहत्या मंडळींत अनेकांचा समावेश होतो, त्यांत कै० नामदार उपासनी धुळें, कै० अप्पासाहेब सबरजिस्ट्रार, प्रख्यात हरि-दास कै० गणेशशास्त्री मोडक, कै० प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले, कै० प्रो० नानासाहेब पानसे, कै० श्री० सरदार राजेबहाद्दर ( हल्लींच्या नासिकच्या राजेबहाद्दरांचे वडील ) इ० दिवंगत व प्रख्यात कवि नागरिक कविकौस्तुभ बाबासाहेब कुलकर्णी, भाऊसाहेब कानेटकर ( पुणें ), भाऊसाहेब प्रभुणे, गोविंदराव शौचे इ० विद्यमान पुरुष येतात. शिवाय मुंबईचे परांजपे घराणें व नासिक कडील दाणी घराणें यांचाही अंतर्भाव होतो.

यांपैकीं प्रो० नानासाहेब पानसे व भाऊसाहेब कानेटकर हे जिव्हाळयाचे स्नेही होत. रसिक कवि प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले यांचें गुरुवर्यांवर अकृत्रिम प्रेम होतें. व ते गुरुवर्यांबद्दल आदर बाळगीत असत. एकदां गुरुवर्य पुण्यास गेले असतां प्रो० लेले यांस दुपारीं भेटण्यास गेले त्यावेळीं प्रो० लेलेशास्त्री झोंपले असल्याचें त्यांचे मुलांकडून समजल्यानें गुरुवर्य तसेच परतले आणि कामाच्या निकडीनें पुनः न भेटतां नाशकास निघून आले. प्रो० लेले यांना हें समजतांच फार वाईट वाटलें व त्यांनीं गुरुवर्यांना क्षमायाचनेचें अत्यंत आदरपूर्ण संस्कृत श्लोकमय पत्र पाठविलें तें पुढें देत आहों. त्यावरून प्रो० लेलेशास्त्रीबुवांची गुरुवर्यांसंबंधीं किती आदरपूर्ण वृत्ति होती हें दिसून येईल.

॥ श्री ॥

वे० शा० सं० लक्ष्मणशास्त्री लेले यांचेकडून आलेलें

## पद्यात्मक पत्र

( वैशाख शुद्ध १, शके १८४८. )

गुरुरपि लघुतां वृणुते कृष्णोऽप्यङ्गी करोति पाण्डुरताम् ।
विजनत्वं भजति जनस्थानेऽपि जयत्यहो कृष्णः ॥ १ ॥
विलसन्त्वनन्तनतयो नः पदकञ्जे महात्मनस्तस्य ।
श्रीगौतमीतरङ्गास्तरङ्गयन्ति स्म मङ्गलं यस्य । २ ॥
सुगृहीतनामधेया देवधराः कृष्णशास्त्रिणः सुधियः ।
तीर्थात्तशास्त्रनिधयः पीयूषकरागिरः शृणुत ॥ ३ ॥
नीतागृहाश्चरणधूलिभिरस्मदीयाः ।
पावित्र्यमेतदुपकारनिदर्शनं हि ॥
प्रौढां यदा परिणतिं सुवृतानि यान्ति ।
मन्ये तदेव कुशलानि नरो लभंते ॥ ४ ॥
श्रीमतां दर्शनेनैव धन्यतां गमिता वयम् ।
संल्लापः किं व्यधत्तेति भाषितुं नैव पार्यते ॥ ५ ॥
मित्रस्येवोदयो जातो भवतां प्रातरेव हि ।
वयं प्रजागरक्लान्ता आस्म स्वापपरायणाः ॥ ६ ॥
भवदागमनं श्रुत्वा क्षिप्रं भवनबालकैः ।
प्रबोधिताः सप्रतलं प्राप्तवन्तः समुत्सुकाः ॥ ७ ॥
भवत्स्वविनयं श्रुत्वा बालकानामजानताम् ।
अत्राजिष्म परं खेदं तच्छुद्ध्यै प्रायतामहि ॥ ८ ॥
" लवाटे " इत्युपाव्हो वः शिष्यो दिष्ट्या समागतः ।
व्यस्राक्ष्म तस्मै भवतामर्थे लघुसरस्वतीम् ॥ ९ ॥
मन्ये परिगृहीतार्था भवन्तो तेन वै कृताः ।
अनेन कालेन, सतां कोपः प्रणमनावधिः ॥ १० ॥
दर्शितं चापलं बालैः क्षन्तव्यमिति याच्यते ।

करुणाशालिनां लोके भूषणं हि क्षमापनम् ॥ ११॥
लेखार्पितं सुमनसा क्षमादानमपेक्ष्यते ।
लप्स्यामहे ततः शान्ति सा प्रतिष्ठा परा तनोः ॥ १२ ॥
गोदायामभिषेकार्थं देवतादर्शनाय च ।
तीर्थ–मुख्यं जनस्थानं प्रस्थातुमनसोऽचिरात् ॥ १३ ॥
भवद्भिर्भविता सङ्गस्तदानीं मोदवर्धनः ।
परेशकृपया स्वान्ते एवमाशास्महे वयम् ॥ १४ ॥
॥ अलं पल्लवितेनेति शम् ॥

## दातृत्व

गुरुवर्यांनीं आपल्या वाढत्या लोकप्रियतेला अनुसरून आपल्या परिचयांतील लहानथोर इष्टमित्रांच्या लहानमोठया संकटकालीं किंवा मंगल कार्यांत, स्नेह्यांच्या अपेक्षेप्रमाणें आजवर अनेक प्रकारें सहाय्य केलें आहे. आपल्या पत्रांनें, ओळखीनें, प्रत्यक्ष भेटीनें व अन्यप्रकारें ते त्यांच्या उपयोगीं पडतात. श्रीमंत प्रतिष्ठित गृहस्थांकरितां जी प्रयत्नांची पराकाष्ठा, तीच गरीब पण एकनिष्ठ अशा इष्टमित्रांसाठीं ते करतात. सारांश आपल्या आयुष्याचा सदुपयोग होईल असें वागून, विचार, उच्चार आणि आचार यामध्यें एकरूपता ठेवण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. यामुळें, “ चित्ते वाचि क्रियायां च महतां एकरूपता ” या वाक्याची सत्यता पटते.

गुरुवर्यांनीं आयुर्वेदाचें अध्यापन, विद्यार्थ्यांसाठीं झीज सोसूनही केलें असल्याचें मागें आलेंच आहे. याशिवाय नित्यनैमित्तिक कार्यप्रसंगीं सढळ हातानें धर्मादाय करणें, अतिथि अभ्यागतांचा व निरनिराळ्या पंडित विद्वानांचा परामर्श व सत्कार करणें, आप्तस्वकीयांना हरघडी आर्थिक सहाय्य देणें, यांवरून त्यांचें औदार्य प्रतीत होतें. तथापि गुरुवर्यांनीं आपणांस मिळालेल्या धनाचा सदुपयोग व्हावा व त्यापासून अनेक संस्थांना थोडेफार सहाय्य मिळावे, आणि आपल्या दिवंगत आप्तांचें थोड्याफार अंशानें स्मारकही व्हावें, या अनेक उद्देशांनीं

निरनिराळ्या संस्थांस निरनिराळ्या वेळीं पुढीलप्रमाणें देणग्या दिलेल्या आहेतः--

५०० रु० वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें
के० गुरुवर्य गणेशशास्त्री तरटे यांचे स्मरणार्थ. या रकमेच्या व्याजांतून १५ रु० आयुर्वेद अध्यापकास व १० रु० आयुर्वेद परीक्षोत्तीर्ण विद्यार्थ्यास मिळावे अशी योजना आहे.

६१५ रु० सागवें ( गु० मूळ गांव ) जि० रत्नागिरी येथील देवालयाच्या जीर्णोद्धारासाठीं.

२७०० रु० परमप्रिय दिवंगत पुत्र चि० लक्ष्मणराव यांचे स्मरणार्थ नासिक हायस्कूल लक्ष्मण कृष्ण देवधर स्कॉलरशिप. या रकमेचे व्याजांतून नासिक येथील हायस्कूलांतील इयत्ता ७ वी मधील ब्राह्मण विद्यार्थ्यास. ( विशेषतः चित्पावन ब्राह्मण विद्यार्थ्यास )

२००० रु० च्या गव्हर्मेंट प्रॉमिसरी नोटा, समस्त ब्रह्मवृंद गायरान सारा भरण्याकरितां. वार्षिक ७० रु० व्याजांतून.

३०० रु० च्या ग० प्रॉ० नोटा शुक्ल यजुर्वेदीय पाठशाला वार्षिक १०॥ रु० व्याज. के० चि० लक्ष्मण याचे स्मरणार्थ विद्यार्थ्यास ५॥ रु० व गुरुजीस संभावना ५ रु०

३०० रु० च्या ग० प्रॉ० नोटा, गोविंद कृष्ण पाठशाला रत्नागिरी. वार्षिक १०॥ रु० व्याज के० चि० लक्ष्मण याचे स्मरणार्थ, विद्यार्थ्यास ५॥ रु० व गुरुजीस संभावना रु० ५.

२५ रु० नासिक सार्वजनिक वाचनालय, महाराष्ट्र शब्दकोशाकरितां, चि० लक्ष्मण याचे स्मरणार्थ.

२५ रु० हनुमान व्यायाम शाळा, यावल

३७५ ,, आनंदवनभुवन श्रीसमर्थ गुरुकुल विद्यापीठ मु० इंदुरबोधन.

१२ ,, वार्षिक, पुणें अनाथ विद्यार्थी गृह नासिक शाखा.

१०० ,, नासिक जिल्हा चित्पावन संघ.

१००० ,, आयुर्वेद महाविद्यालय शवच्छेदनशाला, पुणें.

२५० ,, नवरोसजी वाडिया कॉलेज, पुणें.
२५ ,, आयुर्वेद विद्यालय, मुंबई,
२०० ,, विलिंग्डन कॉलेज सांगली
३५ ,, वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें
१२५ ,, कोटैयूर येथील श्री योगानंद सरस्वती मंदिर जीर्णोद्धार
१०० ,, मुंबई प्रांतीय आयुर्वेदीय संशोधन मंडळ
१००० ,, व्यंकटेश मंगल कार्यालय नासिक
१००० ,, किरकोळ देणग्या

वरील देणग्यांच्या संख्येवरून गुरुवर्यांनीं आपला सर्व सांसारिक व्याप सांभाळूनही आपल्या संपत्तीचा अंशभाग निरनिराळया सार्वजनिक कार्यांत खर्च करून आपली त्यागवृत्ति प्रगट केली आहे असें दिसून येईल. हाच क्रम अद्यापही थोडया फार प्रमाणांत त्यांनीं चालू ठेविला आहे.

येथवर गुरुवर्यांच्या चरित्राचें निरनिराळया प्रकरणांतून आम्हीं वर्णन केलें आहे. त्याकडे दृष्टि दिली असतां गुरुवर्यांचें चरित्र अत्यंत श्रेष्ठ, यशस्वी व प्रभावी असल्याचें निदर्शनास येईल. गुरुवर्यांचा निरलस, निर्व्यसनी, पवित्र, रेखीव, ध्येयानुगामी, लोकोपकारक, विद्योत्तेजक आणि संतत कार्यतत्पर असा स्वभावच या प्रभावी चरित्रास सर्वस्वीं कारणभूत झाला आहे व त्यामुळें आमचे गुरुवर्य अत्यंत कष्टमय अशा आपत्तींतून बाहेर येऊन सर्वांच्या आदरास पात्र झाले आहेत, आणि स्वकुलाचे कुलदीपक, आयुर्वेद विद्येचें प्रदीप, परंपरेचे संचालक, अनेक विद्यार्थ्यांचा यशस्वी जीवनाचें संजीवक होऊन महाराष्ट्र वैद्य समूहास ललामभूत झाले आहेत.



प्रकरण १३ वें

# महाराष्ट्रांतील प्रमुख वैद्यपरंपरा

## आयुर्वेद-सेवेचें महत्व.

गुरुवर्य तरटेशास्त्री यांनीं स्थापिलेल्या व गु० देवधरांनीं संवर्धित केलेल्या परंपरेचे आम्हांस माहित असलेलें चरित्र व वृत्त यथाशक्ति वर्णिलें आहे. त्यावरून गुरुवर्यांच्या उज्वल चरित्राचें, त्यांनीं चालविलेल्या आणि वाढविलेल्या वैद्य परंपरेचें महत्व व महाराष्ट्र-देशव्यापित्व सर्वांच्या लक्ष्यांत आल्यावाचून राहणार नाहीं असा आम्हांस भरवसा वाटतो. गुरुवर्यांच्या या उद्योगानंतर महाराष्ट्रांत व अखिलभारतांतही आयुर्वेदासंबंधीं मोठी जागृति झाली. वैद्यांची प्रांतीय संमेलनें, भारतीय संमेलनें, आयुर्वेद विद्यापीठाची स्थापना, ठिकठिकाणीं निरून बद्धमूल झालेलीं आयुर्वेद विद्यालयें, रुग्णालयें, औषधालयें व आयुर्वेदीय औषधांचे कारखाने यांनीं आयुर्वेदाच्या सर्वांगीण उन्नतीला नवजीवन मिळाल्यासारखें होऊन आयुर्वेदाचा प्रसार सर्व देशभर जोमानें झाला आहे व होत आहे यांत शंका नाहीं. तथापि गुरुवर्यांनीं केलेल्या आयुर्वेद – सेवेचें महत्व केव्हांही नष्ट न होतां त्या सेवेचें वैशिष्ठ्य अबाधित राहील. कारण वर वर्णन केलेले सांप्रत चालू असलेले उद्योग संभूयसमुथ्थानांचे ( सामुदायिक ) आहेत. गुरुवर्यांचा उद्योग वैयक्तिक आहे आणि हेंच त्याचें वैशिष्ट्य होय.

महाराष्ट्रांत, अशा तऱ्हेचे वैयक्तिक उद्योग मोठ्या शिकस्तीनें व सर्वस्वीं स्वार्थत्यागानें करणारे आणखी दोन चार थोर पुरुष व दोन चार घराणीं त्या वेळीं होतीं, व त्या सर्वांचे उद्योग इतकेच पवित्र व आयुर्वेदास सर्वतोपरी पोषक होते यांत शंका नाहीं. अशा थोर व वंदनीय महानुभावांसे

आमच्या गुरुवर्यांप्रमाणेंच आम्ही विनीत भावानें व सद्गदित अंतःकरणानें सहस्रशः प्रणाम करीत आहों. कोल्हापूरचे प्रख्यात वैद्यराज भिकुशास्त्री द्रविड, वैद्यराज हणमंतशास्त्री पाध्ये, भोरचे वैद्यराज गोखले, परममान्य रंगोपंत वाकणकर, मुंबईचे वैद्यराज वासुदेवशास्त्री कऱ्हाडकर, व वैद्यराज वासुदेवशास्त्री ऐनापुरे, वैद्यवर त्र्यंबकशास्त्री वैद्य, कृष्णशास्त्री भाटवडेकर व पनवेलचे कृष्णशास्त्री पुराणिक, महर्षि अण्णासाहेब पटवर्धन व कै० बापूसाहेब मेहेंदळे या सर्व वंदनीय विभूति होत. या सर्व महाभागांनीं आयुर्वेदाची सेवा निरनिराळ्या पद्धतींनीं, व शिकस्तीच्या प्रयत्नांनीं केली आहे यांत शंका नाहीं. या पेक्षांही अत्यंत मोठी बृहन्महाराष्ट्राला किंबहुना भरतखंडालाही व्याप्त करणारी आयुर्वेदाची सेवा, मान्यवर वैद्यरत्न त्र्यंबक शास्त्री अंबुशास्त्री जोशी वाराणसी, प्राणाचार्य प्रातःस्मरणीय बाळशास्त्री लागवणकर व मूळ आर्श्वीचे राहणारे पण विशाल वटवृक्षाप्रमाणें इतस्ततः पसरलेलें गुणे घराणें यांची सेवा बहुमोल व चिरस्थायी अशी आहे.

## त्र्यंबकशास्त्री ( काशी )

वैद्यरत्न त्र्यंबकशास्त्री यांचें नांव भारतप्रसिद्ध आहे. त्यांनीं आयुर्वेदाचा व महाराष्ट्राचा कीर्तिध्वज आज कैक वर्षें परप्रांतांत सारखा फडकावीत ठेविला आहे व आपल्या परंपरेची जागती व तेजस्वी ज्योत उत्तमोत्तम शिष्य तयार करून सर्वत्र प्रकाशित केलेली आहे. प्रसिद्ध वैद्य अप्पाशास्त्री साठे व श्रीनिवासशास्त्री वगैरे यांचे शिष्य आहेत. अनेक राजे महाराजे, वरिष्ठ अधिकारी, कोट्याधीश व्यापारी ज्यांचा गुणगौरव करीत आहेत व ज्यांचा धीरगंभीर व उग्र स्वभाव सांभाळीत आहेत असे हे महाभाग होत.

## प्राणाचार्य लागवणकर

प्राणाचार्य बाळशास्त्री लागवणकरांसंबंधीं व गुणे घराण्यासंबंधीं लिहावे तितकें थोडेंच होणार आहे, इतकें मोठें कार्य त्यांनीं महाराष्ट्रांत करून ठेवलें आहे. पुण्याचे वैद्यभूषण गणेशशास्त्री जोशी, उमरावतीचे भिषङ्मणि पुरुषोत्तमशास्त्री हेर्लेकर व सुप्रसिद्ध वैद्य आयुर्वेदाचार्य पुरुषोत्तमशास्त्री नानल व त्यांचें विशाल व सर्वोपकरण सुसज्ज असें

ताराचंद रामनाथ रुग्णालयें, त्यांची ती आयुर्वेद रसशाला, व आयुर्वेद महाविद्यालय आणि हाडांची काडें करून उभारलेला लक्षावधि द्रव्यनिधि, त्यांचा दीर्घोद्योग, ध्येयनिष्ठा व गंभीर पांडित्य व सर्व महाराष्ट्रभर पसरलेला शिष्यगण व त्यांचा कीर्तिसुगंध म्हणजेच प्राणाचार्य लागवणकर होत. अशीं अनेक नररत्नें ज्यांनीं शिकवून पढवून व वागवून निर्माण केलीं व महाराष्ट्राच्या आणि आयुर्वेदाच्या सेवेकरितां पणास लाविलीं, ज्यांची प्रखर विद्वत्ता, खणखणित वक्तृत्व, प्रचूर पांडित्य, उत्तम अध्यापन, असीम कळकळ व जन्मभर म्हणजे मरणाच्या घटकेपावेतोंची धडपड हीं सर्व आयुर्वेदाच्या सेवेंत व्यतीत झालीं त्या महाभागाचें वर्णन कोठवर व किती करावें ?

## गुणें घराणें

जें महत्व प्राणाचार्य लागवणकरांनीं दीर्घोद्योगपूर्वक चालविलेल्या परंपरेला व घराण्याला, तेंच महत्व आणि तोच मान गुणे घराण्यासंबंधीं सार्थ होय. वस्तु भिन्न पण कार्य एकच. गुणें घराण्याचें वर्णन करावयाचें म्हणजे कोणाकोणाचें करावें ? प्रख्यात वृद्ध वैद्य बाबा गुणे यांचें, त्यांचे चि० यशवंतराव यांचें, पंढरपूरच्या डॉ० गुण्यांचें, कीं जे – आयुर्वेदाचा जागता अभिमान बाळगतात व सर्वस्वीं आयुर्वेदीय औषधींचा उपयोग करतात – त्यांचे, कां गणेशशास्त्री गुणे यांचें वर्णन करावयाचें ? त्यांत आपले घराण्याचा कीर्तिध्वज ज्यांनी सर्व जगाला दिसेल इतका उंच उभारला त्या श्रीमत् कुवलयानंदांचें व मान्यवर गंगाधरशास्त्री गुणे यांचें वर्णन केलें म्हणजे सर्व गुणे घराण्याचें वर्णन केल्या सारखेंच आहे. पण या उभयतांचेंही वर्णन आम्ही किती करणार ! त्यांचें यथातथ्य वर्णन करण्यास स्वतंत्र ग्रंथच लिहावे लागतील. उपरि वर्णित थोर पुरुषांचें व त्यांच्या परंपरांचें आणि त्यांनीं घडवून आणिलेल्या कार्याचें स्वतंत्र चरित्र–ग्रंथ निर्माण होणें आवश्यक आहे, असें आमचें प्रांजळ मत आहे. सांप्रतच्या उद्योगशील व जागृत कालांत हें कार्य लौकरच घडून येईल अशी आशा करण्यास हरकत नाहीं.

## इतर वैद्य घराणीं

वर वर्णन केलेल्या थोर पुरुषांच्या पूर्वीं आणखी कोणी थोर आयु-

ग्रं. क्र. ५२५०३



वेदज्ञ व परंपरा–चालक महाराष्ट्रांत झालेच नसतील असें नाहीं. श्री० शेंडाणीकरांचें घराणें व त्याचे आजचे संचालक भिषगाचार्य त्र्यंबकशास्त्री आपटे, जबलपूरचें देसाई–घराणें व त्या घराण्याचा सक्रिय अभिमान बाळगणारे पं० डेग्वेकर अशी थोर मंडळी नजरेसमोर वावरत आहेत. परंतु त्या घराण्यांचा व त्या थोर पुरुषांचा सगौरव उल्लेख केवळ आमच्या अपुऱ्या माहीतीमुळें, या प्रकरणांत करणें अशक्य झालें आहे पूज्यपूजा व्यतिक्रमाची बुद्धि त्यांत नाही इतकें नमूद करणें अवश्य आहे. या सर्व घराण्यांनीं व परंपरांनीं आणि थोर पुरुषांनीं आयुर्वेद वृक्षाचीं मुळें खोल रुजविलीं व त्या वृक्षास वठूं दिलें नाहीं. या दृष्टीनें अत्यंत मोठें कार्य या सर्वांकडून झालें आहे. तसेंच या सर्वांचे हे सदुद्योग केवळ एकेकट्याच्या जबाबदारीवर व कर्तृत्वांवर, आणि ज्या काळांत कोणाकडून कसलीही सामुदायिक, वैयक्तिक किंवा राजाश्रयाची मदत मिळणें सर्वथा अशक्य होतें अशा विपद्ग्रस्त कालांत, झाले आहेत हें अत्यंत महत्वाचें होय.

## आक्षेपांचें वैयर्थ्य

सर्वसाधारणपणें ह्या परंपरा व परंपराप्रवर्तक मंडळी आपणास परंपरेनें प्राप्त झालेल्या व आपणांपाशीं असलेल्या साधनसामुग्रीनेंच शिक्षण देऊन शिष्यपरंपरा चालवीत होती. हे सर्व थोर लोक व ह्यांच्या सर्व शिष्यवर्गाची शैक्षणिक व मूळची आर्थिक परिस्थिति पाहतां केवळ पौर्वात्य पद्धतीनें पाठशालांतून किंवा घरगुती मिळेल तेवढें संस्कृत भाषेचें विनामूल्य ज्ञान विद्यार्थीदशेंत अत्यंत हालांत राहून मोठ्या कष्टानें मिळवून वैद्यकाचें यावल्लभ्यज्ञान मिळवावें आणि आपलें व आयुर्वेदाचें डोकें बरोबरच वर काढावें हाच क्रम बहुतांशीं दिसून येतो. इतक्या अल्प व श्रमसाध्य साधनांनी मिळालेलें ज्ञान संग्रहित करून या सर्व वैद्यवरांनीं आयुर्वेदाच्या आज दिसत असलेल्या आशाजनक परिस्थितीचा आणि भविष्यकालीन सर्वांगीण उन्नतीचा पाया घातला. असें असतांही पाश्चात्य वैद्यकाचें शिक्षण घेऊन त्यासच ज्ञानसर्वस्व समजणारे कांहीं लोक आयुर्वेदशास्त्रासंबंधीं यत्किंचितही ज्ञान न मिळवितां या शास्त्रास नांवें ठेवितात; आणि वर वर्णन केलेल्या विकट परिस्थितींत अध्ययन

करणाऱ्या वैद्यवर्गावर कर्तृत्वशून्य दुराग्रही, असमंजस इ० दोषारोप करतात! पालकांच्या भरपूर द्रव्यसाहाय्यानें, राजाश्रय असणाऱ्या व सर्व साधनांनीं सुसज्ज अशा कॉलेजांतून शिक्षण संपादन करणाऱ्या सुखासीनांना वैद्य-वर्गाच्या कष्टांची कल्पना कशी व्हावी ? पूर्वोक्त कर्तबगार वैद्यांपैकीं कोणत्याही एकाच्या चरित्राकडे पाहण्याची त्यांनीं तसदी घेतल्यास आपल्या आक्षेपांचें वैय्यर्थ त्यांस सहज कळून येईल. आम्ही तर आव्हानपूर्वक असें सांगतों कीं सर्व साधनसामुग्री, राजसत्तेचें पाठबळ, द्रव्याचा भरपूर पुरवठा व लोकांचें प्रोत्साहन हें जर वैद्यवर्गास मिळेल तर पांचदहा वर्षांचें अवधींतच आयुर्वेदाचें सर्वांगीण महत्व निदर्शनास आल्याशिवाय राहणार नाहीं.

श्री ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत

## प्रकरण १४ वें.

# आयुर्वेदीय शिक्षणपद्धति

मागील प्रकरणांत वर्णन केलेल्या परंपरांतून व महनीय पुरुषांकडून जरी आयुर्वेदसेवा घडत राहिली आणि त्यांच्या परंपरा टिकून आजला कार्यक्षम दिसत असल्या तरी त्या थोरपुरुषांकडून मिळणारें आयुर्वेदाचें शिक्षण आयुर्वेदाच्या अष्टांग स्वरूपाच्या दृष्टीनें कसें होतें याकडे दृष्टि दिली असतांना मात्र फार वाईट वाटतें. कांहीं रसायनें, कांहीं औषधें व आयुर्वेदाचे कांहीं ग्रंथ यांची माहीति शिक्षणक्रमांत होत असे. यापेक्षां जास्त माहीति मिळणें अशक्य होतें. महाराष्ट्रांतील आयुर्वेद शिक्षणाची परिस्थिति याप्रमाणें बरींच शतकें होती. त्यामुळें ग्रंथाचें पठन पाठण व मिळेल तें औषधाचें व रोगाचें ज्ञान देण्याघेण्यापेक्षां यांना जास्त कांहींच करतां येणें शक्य नव्हतें.

### दुःस्थितीची कारणपरंपरा

वस्तुतः आयुर्वेद आठ अंगांचा, भौतिक ज्ञानाचा व प्रत्यक्ष शिक्षणाचा विषय असूनही त्याच्या आठही अंगांचा, भौतिकत्वाचा, व प्रत्यक्ष शिक्षण देण्याचा व त्याकरितां निरनिराळ्या अंगोपांगाच्या साधन संपन्नतेचा महाराष्ट्रांत तरी बरीच शतकें अभाव दिसून येतो. इतकेंच नव्हें तर त्या वेळच्या समाजांतील बौद्धिक वर्ग म्हणजे ब्राम्हण वर्ग या शास्त्रापासून बराचसा अलिप्त दिसतो. ज्या शास्त्राला बुद्धिवान् लोकांनीं सोडिलें त्या शास्त्राचा ऱ्हास होण्यास उशीर तो किती लागणार? देशांतील राजकीय अस्वस्थता, मुसलमानांची दंडेली, सामाजिक व नैयक्तिक अस्थिरता, व

एकंदर सर्व अस्थिर वातावरण हें जरी या सर्व शास्त्रांच्या वाढीला प्रतिबंधक व नाशकारक असलें तरी, आमच्या मतानें, निदान वैद्यशास्त्रापुरतेंच बोलावयाचें असल्यास, बुद्धिमान् ब्राम्हणवर्गानें बऱ्याच काळापासून या शास्त्राची केलेली अनास्था हेंही मोठेंच कारण असावें – नव्हे आहे – असें आमचें प्रामाणिक मत आहे. कारण ही सर्व प्रतिकूल व अनिष्ट कारण-परंपरा वैद्यकशास्त्राबरोबर इतर सर्वच पौरस्त्य शास्त्रांनाही जाचक आणि विनाशक होती. पण याही प्रतिकूल परिस्थितींत, महाराष्ट्रांत वेदविद्या, न्याय, व्याकरण, वेदांतादि शास्त्रें, श्रौतकर्में, पूर्वमीमांसा, धर्मशास्त्र इत्यादिकांचें अत्युच्च कोटीचें अध्ययन केलेले शेकडों नव्हे सहस्रावधि विद्वान् पंडित तयार होत होते व आपल्या ज्ञानाच्या व शोधकबुद्धिच्या योगे नवीन ग्रंथ-निर्मिती करून वाङ्मयांत भर टाकितच होते कीं नाहीं ? त्यावेळीं हे विद्वान् लोक मोठमोठ्या शहरांतून व राजधान्यांतून तर बहुसंख्य असतच पण लहान सहान खेडेगांवांतूनही पंडित मंडळी पुष्कळच आढळत असत. चारही वेदांच्या सस्वर पाठांचे अनादिकालापासून यथावत् रक्षण साऱ्या भारतानें केलें असलें तरी त्या रक्षणाचें यश महाराष्ट्र व तैलंगण या प्रांतांनाच विशेषत्वानें लाभलें. इतकी ज्यांची वेदविद्येविषयीं कर्तव्यनिष्ठा दिसून येते व न्याय, वेदांत, व्याकरण, धर्मशास्त्रादि सर्व शास्त्रांचा त्या शास्त्रांना पोषक असा ज्वलत् अभिमान अनुभवास येऊन वर लिहीलेल्या सर्व प्रतिकूल परिस्थितींतही जोरांत फोफावतो; त्यांना वैद्यविद्येचें रक्षण करतां येणें अशक्य होतें काय ? आम्हांला हे अशक्य वाटत नाहीं. याच्या मुळाशीं, या शास्त्रा-संबंधीं ब्राम्हणवर्गानें स्वीकारलेलें उपेक्षेचें धोरण असावें असें वाटतें. कारण या उभ्या महाराष्ट्रांत वैद्यकाचीं घराणीं व त्यामध्यें निष्णात असलेले पुरुष हाताचे बोटावर मोजण्याचा प्रसंग येतो. नवीन ग्रंथनिर्मिति तर महाराष्ट्रांत शून्यमयच आढळते. चरकसुश्रुत वाग्भट वगैरे ग्रंथांची दुर्लभता जाणवते व या ग्रंथाचें पठन–पाटनही तुरळकच होत असलेलें दिसून येतें, आणि सर्व शिष्ट व विद्वान् लोकांच्या प्रतिष्ठावलींत वैद्यांचा सर्रास समावेश नसावा इतकेंच नव्हे तर त्यांना हीन व धर्मशास्त्रदृष्ट्या सर्वस्वीं पांक्त लेखलें जाऊं नये हें कशाचें द्योतक आहे ? राजे रजवाड्यांकडून वेदविद्या व इतर शास्त्रें

यांना केवळ उत्तेजक व पोषक म्हणून इनाम, जहागिऱ्या, सन्मान, दक्षिणा जशा मुक्तहस्तानें ठिकठिकाणीं दिलेल्या आढळतात तसें केवळ आयुर्वेद-विद्येच्या उत्तेजनार्थ कांहीं मिळत असलेलें कोठेंच दिसून येत नाहीं, हें लक्ष्यांत ठेवण्यासारखें आहे. कांहीं घराण्यांतून जहागिऱ्या, इनामें, वगैरे चालत असलीं तर तीं त्या त्या वैद्यश्रेष्ठानें आपल्या वैद्यक्रियेपुळें ज्यांचे जीव रक्षण केले अशा राजेमहाराजे व शेट सावकार यांचेकडून मिळालेला तो संतोषाचा मोबदला होय. तो विद्येचें उत्तेजन म्हणून मिळालेला दिसत नाहीं. यावरून त्या कालाचा उच्चवर्णीय व बुद्धीमान् समाज आणि सत्ताधारी लोक यांनीं आयुर्वेदाची उपेक्षा केली आहे या आमच्या म्हणण्यास बळकटी येते.

## उपेक्षेचीं कारणें

या उपेक्षेचीं कारणें शोधूं गेल्यास वैदिककालापर्यंत दूर जावें लागलें. अश्विनीकुमारांना प्रथम यज्ञीय हविर्भाग न मिळणें हें काय दर्शवितें? सर्वमान्य अशा यज्ञीय हविर्भाग उपभोगणाऱ्यां शिष्टांच्या पंक्तींत अश्विनी-कुमारांना त्याच दर्जाचे शिष्ट म्हणून मान नसणें म्हणजे त्यांची विद्या इतर शिष्ट देवांच्या समानश्रेष्ठतेची त्यावेळींही गणली जात नव्हती हेंच ना? आणि दक्षाचें शरःसंधान केल्यानें किंवा चंद्राचा क्षयरोग दूर केल्यानें पाठीमागून यज्ञीय हविर्भाग त्या अश्विनीकुमारांना मिळूं लागला हें त्यांच्या विद्येस उत्तेजन नसून उपकाराची फेड किंवा केलेल्या कामाचा मोबदलाच नाही तर दुसरें काय? चार वेदांतही अथर्वण वेदाला तो वेद असूनही त्याचें पहिल्या तीन वेदांच्या तोलाचें वेदत्व गळून पडल्यासारखेंच होऊन चतुर्वेदांऐवजीं वेदत्रयीलाच महत्व आलें हें कशाचें द्योतक आहे? हेंही त्या अथर्वणवेदाला एकप्रकारें वाळींत टाकल्यासारखेंच नाहीं काय? चार्वाकानें 'त्रयो वेदस्य कर्तारः' या वाक्यानें तीन वेदांच्या तिघां कर्त्यांनाच निंदिलें यावरून समाजांत नास्तिकांपावेतोंही अथर्ववेदाचें वेदत्व लक्षांत येऊं नये येथवर मजल आली, आणि या अथर्ववेदाचाच उपवेद आयुर्वेद गणला जात आहे. अर्थात् जी मुख्याची संभावना तीच उपांगाची झाल्यास नवल काय? तसेंच, "चिकित्सकान् देवलकान् मांसविक्रयिणस्तथा ॥
विपणेन च जीवंते वर्ज्याःस्युर्हव्यकव्ययोः" ॥ १५२ मनु अ० ३ ॥

ही मनुची आज्ञा किंवा निर्णयसिंधु, धर्मसिंधूंतील उत्तममध्यमाधम ब्राम्हणांच्या गणनेंत अधमवर्गांत वैद्यांची झालेली गणना, किंवा

उत्तमा वेदविद्या स्यात् शास्त्रविद्या तु मध्यमा ।
ज्योतिर्विद्याऽधमा चैव वैद्यविद्याऽधमाऽधमा ॥

या उक्तीनें झालेली वैद्य–विद्येची संभावना, ही आयुर्वेदाला त्यावेळे-पासून सुशिक्षित ब्राम्हण व पंडित समाज व त्यांच्या पायावर पाय देऊन चालणारा इतर समाजही श्रेष्ठ विद्येंत गणीत नव्हता इतकेंच नाहीं तर त्या विद्येला अधम विद्या व ती विद्या शिकणाऱ्याला, दैवपैतृककार्यीं अधम ब्राम्हण म्हणून संबोधीत होता हेंच सिद्ध करते.

अर्थात् अशा अनुत्तेजित किंवा निंदित विद्येच्या अध्ययनासाठीं कोणता उच्चवर्गीय शिष्यगण अहमहमिकेनें धावून येईल ? व स्वतःला अधम म्हणून घेईल व अनादरास पात्र करून घेईल ? या दुःस्थितींचें व अवहेलनेचें फल म्हणजे आयुर्विद्येचा सर्वस्वी झालेला नाश होय. जाति-भेदाचा विचार न करतांही असें केव्हांही म्हणतां येईल कीं विद्येची किंवा शास्त्रांची वाढ ही शास्त्र–जिज्ञासु व अभ्यासु बुद्धीशिवाय केव्हांही होऊं शकत नाहीं व शकणारही नाहीं. सांप्रत सरस्वतीदेवीचीं मंदिरें सर्वांस सरास सारखींच मोकळीं असतांही सार्वत्रिक साक्षरता वाढून एक प्रकारचा ठरीव साच्यांतील शैक्षणिक पदवीधराचा दर्जा जरी सामान्यपणें मिळूं शकत असला तरी सरस्वतीचे भक्त व शास्त्रांचे उपासक किती थोडे निर्माण होतात इकडे नजर टाकली असतां शास्त्रांविषयींच्या नैसर्गिक अभ्यासु बुद्धीच्या जरूरीचें महत्व पटतें. असे अभ्यासु, बुद्धिमान् व श्रेष्ठ दर्ज्याचे उपासक बरींच शतकें आयुर्वेदाला वर लिहिलेल्या कारणांनीं न लाभल्यामुळेंही आयुर्वेदाचा ऱ्हास झालेला आज आपणांस पहावा व भोगावा लागत आहे.

## निवृत्तिधर्मांचा व अध्यात्माचा छंद

उच्चवर्णीय बुद्धिमंतांची आयुर्वेदविषयक दृष्टि अशा प्रकारची होण्याचें कारण निवृत्तिधर्माचा व अध्यात्माचा भारताला लागलेला छंद हें होय. परा व अपरा विद्या असे भेद पडून मोक्षविद्येला पराविद्येचें स्थान

मिळालें. बाकींच्या शास्त्रादि विद्यांपैकीं कांहीं, पराविद्येच्या पूरक तर कांहीं दर्शक व कांहीं स्तावक असा दर्जा पत्करून समाजांत नांदूं लागल्या. पण गणित व वैद्यक या विद्या, त्यांतूनही – पूर्ण भौतिक अशी – वैद्यक विद्या ही पराविद्येच्या उपयोगी पडण्यास अनुत्सुक म्हणूनच कीं काय उपेक्षिली गेली. कारण पराविद्या, सर्व जगत् नश्वर असून मोक्ष मात्र नितांत सत्य व अबाधित आहे असें अट्टहासानें सांगणार व भौतिक सुखांचा आणि परंपरेनें शरिराचाही मोह सोडावयास उपदेशिणार, तर अयुर्वेदविद्या शरिराची सुरक्षितता हेंच, आपले साध्य आहे असें प्रतिज्ञेचें कंकण बांधून एक प्रकारें पराविद्येला विरोध करणार ? अर्थात् पराविद्येच्या भजकांनीं या विद्येला, अधम म्हणून संबोधून उपेक्षूं नये तर काय करावें ? जगत् नश्वर, देहही नश्वर तेव्हां नश्वर म्हणून नको असलेला देह सुरक्षित व पुष्ट आणि संपन्न करणारा व देहाची नश्वरता कांहीं काल तरी हरप्रयत्नानें लांबवूं पहाणारा आयुर्वेद आपणांस मुळीं नकोच असे या पराविद्येच्या उपासकांनीं मनांत आणिले असावें. या आपत्तींतच अहिंसाव्रताच्या तीव्र उपासकांची ( बौद्ध व जैन ) समाजांत भर पडली. मग काय विचारतां ? “ गंडस्योपरि पिटिका संवृत्ता ” असें बिचाऱ्या आयुर्वेदाचें झालें.

आयुर्वेद हा शरिराच्या सुरक्षिततेकरिता (चैनी करतां नव्हे) व रोगमुक्ततेसाठीं, हिंसा–प्रभव मांसशोणितादि प्राणीज पदार्थांच्या उपयोगाचा हरघडी उपदेश करतो म्हणून तो या अहिंसकांना अमेध्य, व द्वेष्य वाटलाच पाहिजे. या अहिंसाव्रताच्या उठलेल्या व सर्वत्र फैलावलेल्या कल्लोळानें, आयुर्वेदांतील शस्त्र व शालाक्य या अंगांचा व अनेक तऱ्हेच्या आहार योग्य पदार्थांचा, व उत्तमोत्तम औषधी चिकित्सेचा सर्वतोपरी नाश झाला. शरीर शास्त्राच्या ज्ञानाची जरुरी व मातब्बरी वाटेनाशी झाली. प्रसूतिकरण विद्या नष्ट झाली, व आठही अंगांनीं संपन्न असणारा आयुर्वेद व्यवहारांत सर्वस्वीं विकलांग झाला. गुरुवर्यांचे चरणांजवळ बसून अध्ययन समाप्त केल्यावर प्रस्तुत लेखकानें, अष्टांगहृदय ग्रंथाच्या आठही अंगांचें पांक्त अध्ययन करूनही वनस्पतींचें, शारीराचें, शस्त्रक्रियेचें, मूर्धांग चिकित्सेचें, पंचकर्मांचें, बालरोगांचें, विषांगाचें यथावत् व प्रत्यक्ष ज्ञान आपणांस आज मिळत नस-

त्यानें वैद्यक आणि वैद्य यांची किती शोचनीय स्थिति झाली आहे व अशा स्थितींतही, आयुर्वेद अजून धुगधुगी धरून आहे व आपणा वैद्यांचा योगक्षेम चालवीत आहे हें त्याच्या तेजस्वितेचें लक्षण समजलें पाहिजे असें नम्रपणानें निवेदन केल्याचें चांगलें स्मरतें. या प्रसंगीं उभयतांनाही आयुर्वेदाच्या झालेल्या व होत असलेल्या हानीबद्दल सद्गदित होऊन अश्रुसिंचन करावें लागले.

इतकें विस्तृतपणानें विवेचन करण्याचें कारण हेंच कीं समाजाची किंवा राष्ट्राची एकांगी विचारसणी त्या आधिभौतिक किंवा अध्यात्मिक सर्व आकांक्षांना नेहमीं मारक होते. आम्ही वेदांत-विद्येला, पराविद्येला आणि अहिंसाव्रताला अत्यंत उज्वल कल्याणकारक व पवित्र मानून आणि देहाची व जगाची नश्वरता पूर्णांशानें अंतःकरणांत बिंबवूनही नम्रपणानें इतकें लिहूं शकतों कीं, ही पराविद्या, हें अहिंसाव्रत ही देहाची व जगाची नश्वरता याचें ज्ञान व त्याकरितां करावयाचें आचरण या नश्वर जगांत व देहांत राहूनच करावें लागतें ना ? व हें सर्व पूर्ण साधेतोंपर्यंत जगावें लागतें ना ? आणि हें सर्व जगणें व करणें या भौतिक जगांतील, भौतिक द्रव्यांच्या, भौतिक साधनांच्या उपयोगावरच अवलंबून असतें ना ? तर मग हें साधण्यासाठींच कां होईना भौतिक शास्त्रांचा कंटाळा किंवा तिरस्कार करून कसें चालेल ? भगवान् सांगतात, “ शरीरयात्राऽपि च ते न प्रसिध्येदकर्मणः ” तें याच करितां. तसेंच,

“ न हि देहेन कथंचित् व्याधिजरामरणदुःखविधुरेण ।
क्षणभंगुरेण सूक्ष्मं तद् ब्रम्होपासितुं शक्यं ॥ १ ॥
यज्ञाद्दानात्तपसो वेदाध्ययनाद्दमात्सदाचारात् ।
अत्यंत भूयसी किल योगवशादात्मसंवित्तिः ॥ २ ॥
आयतनं विद्यानां मूलं धर्मार्थकाममोक्षाणाम् ।
श्रेयः परं किमन्यत् शरीरमजरामरं विहायैकम् ॥ ३ ॥
अस्मिन्नेव शरीरे येषां परमात्मनो न संवेदः ।
देहत्यागादूर्ध्वं तेषां तद् ब्रम्ह दूरतरम् ॥ ४ ॥

( रसरत्न समुच्चय )

यासाठीं आजवर झालेला पराविद्येचा एकांगी पाठलाग थोडा आवरून थोडें अपराविद्येकडे, आणि त्यांतही विशेषतः भौतिक विद्येकडे यापुढें सावधानपणें लक्ष देणें अत्यंत निकडीचें आहे. जसा, एक्या पराविद्येच्याच पाठीमागें लागलेला समाज हा व्यावहारिक क्षेत्रांत उदासीन, कर्तव्य-शून्य, मंद, हतप्रभ, निर्वीर्य झालेला दिसतो व मात्स्यन्यायानें दुसऱ्याचें भक्ष्य बनतो व परा आणि अपरा विद्यासह जीवितवित्तास व प्रतिष्ठेस मुकतो तसाच केवळ अपरा व त्यांतूनही भौतिकशास्त्रें व विद्या यांच्याच मागें धावणारा समाज, उच्छृंखल व अमर्याद होऊन बंधनाच्या पलीकडे जातो; आणि असंतुष्ट, क्रूर, व पाशवीवृत्तीचा होतो, आणि अखेरीस या अपरा व भौतिक विद्यांपासून होणाऱ्या सुखांना, आणि परा विद्येच्या समाधानाला आपल्या जीवितवित्त व प्रतिष्ठेसह मुकतो. दोघींचा एकांगीपणानें अंगिकार केल्यास शेवटीं परिणाम एकच होतो.

भगवद्गीतेंत, दैवी व आसुरी संपत्तीचें ग्राह्याग्राह्यत्व भगवंतांनीं वर्णिलें आहेच. त्यांत वर्णिलेला " दैवीसंपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता " हा त्याचा फलपरिणामही त्रिकालाबाधित आहे. तथापि आमच्या मतें, या विमोक्षद दैवी-संपत्ति आंगीं बाणण्यास, किंवा तें लक्ष्य समजून त्यावर चित्ताचें शरसंधान करण्यास, तसेंच आसुरी संपत्तीचा आपल्यावर सदोदित होणारा मारा परतवून त्यापासून पराजित न होण्यास मानुष संपत्तीवर स्थिर होणें अत्यंत जरूर आहे. आपलें भारतवर्ष व तद्देश-वासीय मानुषसंपत्तीचें स्थानापासून च्युत झाले आहेत. या स्थानीं स्थिर होऊन, पाश्चात्यांप्रमाणें आसुरसंपत्तीचें माऱ्यानें जर्जर न होतां दैवी संपत्तीवर लक्ष ठेवून, श्रीमान् जनकराजाप्रमाणें देहांत राहून विदेही, भोग भोगूनही त्यागी, जनांत राहूनही विजनी, राजा होऊन व राजा राहून ऋषि असें या भारतानें व्हावें आणि रहावें, आसुरी संपत्तीला दासी बनवून, दैवी संपत्तीला देवी म्हणून समजावें व मानुषसंपत्तीला पट्टराणी करून गृहस्थाश्रम करावा अशी जर आम्ही इच्छा बाळगली तर ती काय वावगी आहे ?

## प्रकरण १५ वें.

# चरित्रलेखनाची फलश्रुति

उदयोन्मुख भारताचा सर्व बाजूंनीं उदय व्हावा व त्याचा कीर्तिसूर्य मध्यान्हावर येऊन सर्व विश्वाला प्रकाशित रहावा, अशी इच्छा धरणाऱ्या भारतसंतानानें, आपण ज्या कलेंत, ज्या विद्येंत, ज्या उद्योगांत असूं त्या कलेचा, त्या विद्येचा व त्या उद्योगाचा पूर्ण अभिमान धरून त्यांत नवनवोन्मेषशालिनी बुद्धि चालवून सारखा उत्कर्ष साधल्यासच या भारताचा कीर्तिसूर्य माध्यान्हीं तळपत राहील. यासाठीं आयुर्वेदाच्या कक्षेंत पडलेल्या व पडूं इच्छिणाऱ्या भारतीय वैद्यांनीं आपल्या आयुर्वेदाच्या सर्वांगीण उन्नतीविषयीं प्रयत्न करणें यापुढें अपरिहार्य आहे; आणि असे प्रयत्न करीत असतांना, आपल्या स्वतांच्या सद्यःकालीन परिस्थितीचें पूर्णज्ञान करून घेणें व आत्मपरीक्षण करणें अत्यंत जरूरीचें आहे. आपणांस चालावयाच्या वाटचालीची दिशा, तिचा मुक्काम, ती वाट किती चालून झाली व किती चालावयाची राहिली, तसेंच त्या वाटेंतील अडचणी, त्या दूर करण्यासाठीं उपयोगीं पडणारीं साधनें, त्या साधनांची जुळवाजुळव इत्यादींचें ज्ञान असणें अगत्याचें आहे व यासाठींच हें चरित्रलेखनरूपीं सिंहावलोकन आम्हीं केलें आहे.

आमच्या गुरुवर्यांनीं तसेंच त्यांच्याही गुरुवर्यांनीं आणि अशाच इतर थोर महाभागांनीं आयुर्वेदाची परंपरा जिवंत ठेऊन वाढविली हें अत्यंत मोठें कार्य जरी झाले असले व यासाठीं, आपण हीं चरित्रें कृतज्ञता बुद्धीनें

कर्तव्यास जागून लिहीत व प्रकाशित करीत असलों तरी त्यामुळें, आपलें कार्य साधलें व कर्तव्य संपलें असें मानतां येत नाहीं. तर गुरुवर्य व तत्स-दृश इतर थोरांच्या कर्तबगारीचें व त्यांनीं केलेल्या कर्तव्याचें पुण्यस्मरण करीत करीत आपणांस व आपल्या पुढील कित्येक पिढ्यांस भली मोठी वाट चालावयाची आहे याची कल्पना आपल्या बुद्धींत नीट समावून ठेऊन पुढील मार्ग आक्रमावा व हा मार्ग आक्रमीत असतां आयुर्वेदोन्नतीच्या उत्तुंगशिखराच्या पायथ्याशींच आपण आहोंत ही खूण गाठ, मनाशीं बांधावी, व हिंमत आणि जोर धरून चढण चढावी. अशी चढण चढत असतांना थकवा, नाऊमेद, घाबरटपणा, स्वकर्तव्यच्युतीची लहर येऊं नये म्हणून आपल्या गुरुवर्यांनीं, वैयक्तिक सामर्थ्यावर केवढी मोठी कामगिरी करून ठेविली याचें पुण्यस्मरण, कर्तव्य जागृतीसाठीं सतत दृष्टिसमोर असावें यासाठींच आम्ही आमच्या अत्यंत वंदनीय व परमप्रिय गुरुदेवांचें चरित्र त्यांच्या परंपरेसह मोडक्या तोडक्या शब्दांत चित्रित केलें आहे. गुरुवर्यांच्या परंपरेंतील शिष्यांनी व आयुर्वेदोद्धारक अशा इतर वैद्य बंधूंनींही प्रगतिपथ आक्रमीत असतां या चरित्राचा, पाथेयासारखा उपयोग करून ताजेंतवानें व्हावें व आपली प्रगति करावी अशी आमची प्रबल इच्छा आहे एवढें विनम्रभावानें दर्शवून, तो सर्व शक्तिमान् प्रभू आमच्या परम-पूज्य गुरुवर्यांना त्यांच्या कुलजांना, त्यांच्या परंपरा–समाविष्ट सर्व शिष्यांना आयुरारोग्य व ऐश्वर्य देऊन त्यांचे करवीं भविष्य कालांत अनुपम, व अत्यंत महत्वाची अशी आयुर्वेदाची चिरस्थायी सेवा सदोदित घडवीत राहो व त्यामुळें आयुर्वेदाचें वैभव वाढून त्याची कीर्ति विश्वप्रतिष्ठित करो अशी त्याचे चरणीं सद्गदित भावानें प्रार्थना करून व आमच्या गुरुदेवांचीं पूत पदकमलें सर्व सतीर्थ्यांसह शतशः अभिवादित करून आम्ही वाचकांची अनुज्ञा घेतों.

भाग तिसरा.

# शिष्यांचीं अल्पचरित्रें.

मराठी ग्रंथ संग्रहालय,
स्थळ प्रत
नं.
ता.
ठाणे

# गु० देवधरांच्या

# शिष्यांची अल्प-चरित्रें.

## प्रास्ताविक.

प्रस्तुत पुस्तकाच्या या शेवटच्या भागांत गुरुवर्यांनीं वाढविलेल्या वैद्यक-परंपरेची वंशावळी देण्याचा हेतु आहे. या वंशावळींत गुरुवर्यांनीं अध्यापित केलेल्या त्यांच्या शिष्यांची माहिती क्रमशः खालीं देत आहोंत.

हें प्रकरण देण्याचा हेतु इतकाच कीं महाराष्ट्रांत ठिकठिकाणीं विखुरलेल्या आणि पसरलेल्या त्यांच्या शिष्यगणाची माहिती एकत्र संकलित व्हावी व पुढें मागें ह्या परंपरेंतून तयार झालेल्या अगर होणाऱ्या एखाद्या देदीप्यमान् अशा पुरुषाकडून जर आयुर्वेदोद्धाराचें अत्यंत मोठें कार्य घडून आलेंच तर परंपरेचा धागादोरा नीट लक्षांत रहावा.

याशिवाय या परंपरेचा अभिमान बाळगणाऱ्या आणि परंपरेंतील अध्ययन संपादून उपजीविका आणि वैभव संपादन करणाऱ्या पारंपरिक वैद्यानें आपल्या परंपरेचा विसर पडूं न देतां परंपरेच्या ध्येयनिष्ठेशीं एकनिष्ठ राहून आयुर्वेदाच्या सेवेत सतत तत्पर राहण्याची जागृति त्याचें अंतःकरणांत सतत रहावी हाही हें प्रकरण लिहिण्याचा दुसरा हेतू होय.

हें प्रकरण लिहितांना गुरुवर्यांच्या ज्या शिष्यांचीं संक्षिप्त चरित्रें आम्ही देणार आहोंत, ते सर्व शिष्य शिष्यत्वधर्मानें आणि गुरु-बंधूंच्या नात्यानें एकाच कक्षेंतील एकाच प्रेमरज्जूनें बांधलेले असे आहेत. या शिष्यांच्या चरित्रांतील कमी अधिक, लहान मोठीं अशीं जीं कांहीं प्रतिवृत्तें येतील व असतील त्यांवरून जनतेच्या दृष्टिस त्यांचे विषयीं कमी अधिकपणा दिसून आला

तरी गुरूंचे ठायीं त्या सर्वांबद्दल शिष्यवात्सल्य एकाच दर्जाचें आहे. व प्रसिद्ध कवि भवभूतीची,

> वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे ।
> न च खलु तयोर्ज्ञाने शक्तिं करोत्यपहंति वा ।
> भवति च पुनर्भूयान् भेदः फलं प्रति तद्यथा ।
> प्रभवति च शुचिर्बिंबग्राहे मणिर्न मृदां चयः ॥ १ ॥

ही उक्ति गुरुवर्यांचे अध्यापनाविषयींही पूर्णपणें लागूं आहे.

गुरुवर्यांच्या शिष्यवृंदापैकीं बहुतेक शिष्यांनीं पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या व बडोदे येथील श्रावणमास दक्षिणा परीक्षेंतील आयुर्वेद विषयाच्या परीक्षा दिलेल्या आहेत. व सर्वांचें संस्कृत अध्ययनही कमी अधिक प्रमाणानें झालेलें आहे. मात्र इंग्रजीचें अध्ययन बहूतेक कोणाचें झालेलें नाहीं.

बहुतेक शिष्य अत्यंत गरीब स्थितींतलें कोणत्याही तऱ्हेची शिक्षणाची तरतूद त्यांच्या स्वतःच्या घरांतून न होऊं शकलेले असे आहेत. आणि बहुतेक शिष्यांचीं घराणीं जुन्या भिक्षुकी किंवा शास्त्री या परंपरेपैकीं आहेत.

## १ कै० चिंतामण वामनशास्त्री खरे.

गुरुवर्यांचे पहिले शिष्य होण्याचा मान महाराष्ट्रांतील प्रख्यात दिवंगत पंडित चिंतामण वामनशास्त्री खरे यांस लाभला. रा० चिंतामणशास्त्री खरे यांचें मूळगांव कोंकणांतील गुहागर, गोत्र कौशिक, हिरण्यकेशी, चित्पावन ब्राम्हण. वडिलांचें नांव वामनशास्त्री, उपनांव खरे, मातोश्रींचें नांव मनूबाई ऊर्फ गंगाबाई. चिंतामणशास्त्री यांचा जन्म शके १८८८ कार्तिक शु॥ ९ (सन १८६६) शुक्रवार रोजीं झाला. शास्त्रीबोवास बंधू तीन. पैकीं वडील बंधू कृष्णशास्त्री (वैय्याकरणी), वासुदेवशास्त्री व तिसरे परशुरामशास्त्री हे होत. पैकीं वासुदेवशास्त्री हे सर्व महाराष्ट्रांत कवि, नाटककार, व उत्कृष्ट ऐतिहासिक ग्रंथकर्ते व प्रख्यात इतिहाससंशोधक म्हणून माहीत आहेतच. चिंतामणशास्त्री यांचें अध्ययन कांहीं गुहागरास, कांहीं सांगलीस, कांहीं नाश-



कै० चिंतामणशास्त्री खरे.

कास, व कांहीं इंदुरास असें झालें. कारण ते आजन्म विद्यार्थीच होते. उत्तम पट्टीचे दशग्रंथी वैदिक, व्याकरणाचें महाभाष्यांत अध्ययन केलेले, न्यायवेदांत ग्रंथांचें परिशीलन केलेले व वैद्यशास्त्राचें अध्ययन केलेले असे हे चतुरस्र पंडित होते. त्यांचें व्याकरणाचें अध्ययन नाशकास चतुःशास्त्र संपन्न कै० हरिशास्त्री फडके यांचेजवळ झालें. व आयुर्वेदाचें अध्ययन गुरुवर्य कृष्ण-शास्त्री देवधर यांचेजवळ त्यांनीं केलें. शास्त्रीबोवा नाशकास संस्कृत पाठ-शाळेंत कांहीं दिवस अध्यापकाचें काम करीत होते. अनेक विद्या संपन्न झाल्यावर पनवेल येथील श्रीधूतपापेश्वर औषधी कारखान्यांत अध्यापक व वैद्य म्हणून आठ वर्षें राहीले. त्यानंतर इंदोर येथें राजकीय संस्कृत महा-विद्यालयांत आयुर्वेदाचे अध्यायक म्हणून ह्यांची नेमणूक झाली. ते तेथें अध्यापक म्हणून १२ वर्षें राहिले. बडोदे येथील राजकीय संस्कृत विद्यालयांत, यांची आयुर्वेदाचे अध्यापक म्हणूनच नेमणूक झाली व तेथेही ते ५।६ वर्षें होते. नंतर पुन्हां इंदूरास परत जाऊन तेथेंच ते कायम राहिले.

शास्त्रीबोवा अध्ययन आणि अध्यापन करण्यांत आपला बहुतेक काळ घालवीत असत. राहणी साधी, स्वभाव तापट व काटकसरी, व व्यवहार पटुतेचा पूर्ण अभाव अशी ह्यांची स्वभावरचना असल्यामुळें यांना आयु-र्वेदीय धंद्यांत फारसें यश लाभलें नाहीं. कुशाग्रबुद्धि, विद्येचा प्रचंड ह्व्यास, निरलसपणा, व कार्यातील चिकाटी ह्या गुणांमुळें त्यांनी मरणकालपर्यंत अनेक शास्त्रांचा सारखा व्यासंग ठेविला होता तरी वैद्यशास्त्राचा शोधपूर्वक व्यासंगही ते करीतच होते. त्यांनीं धातूपधातु यांचें मारण व पारदसंस्कार या विषयीं व अनेक वनस्पतींच्या गुणधर्माविषयीं काळजी पूर्वक अभ्यास करून प्रयोगही चालविले होते. शास्त्रीबोवा आपला वेळ रिकामा कधींही दवडीत नसत. सदोदित वाचन लेखन अध्ययन अध्यापन व विचार यांत गढून गेलेले असत. यांनीं न्यायशास्त्रावर एक टीकाग्रंथ, कृष्णयजुर्वेदभाष्याची टीका, व वैद्यकांतील रसरत्न समुच्चय या ग्रंथाची टीका, असे महत्वाचे ग्रंथ केले असून कांहीं दुसरेही ग्रंथ लिहिले आहेत. रसरत्नसमुच्चयावरील टीका पुणें येथील आनंदाश्रमांत दाखल असून ती पुढें मागें प्रसिद्ध होणार आहे.

असा हा पुरुष आपल्या वयाच्या ६१ व्या वर्षी शके १८४९ भाद्रपद व॥ १० ( २० सप्टेंबर १९२७ ) रोजी दिवंगत झाला. यांस पदवीधर दोन मुलगे होते. पैकीं डॉ० दत्तोपंत खरे एम्. बी. बी. एस्. हे इंदुरास धंदा करीत आहेत.

## २ आयुर्वेदपटु वामन जयकृष्ण खेडकर

रा. वामनशास्त्री खेडकर हे दुसरे शिष्य होत. यांचा जन्म शके १८०२ श्रावण व॥ ६ रोजीं नगर देवळें जि. पू० खानदेश येथें झाला. यांचे वडिलांचे नांव जयकृष्णशास्त्री. हे ऋग्वेदीय देशस्थ ब्राम्हण. यांचें गोत्र शांडिल्य. यांचा संस्कृत भाषेचा कांहीं अभ्यास घरींच त्यांचे वडील जयकृष्णशास्त्री यांचे जवळ झाला. त्यानंतर ते पुढील अभ्यासासाठीं नाशिक येथें आले. पंचवटींत वे० शा० सं० सखाराम दीक्षित शास्त्री वैय्याकरण यांचे पाठशाळेंत त्यांनीं कौमुदी व संस्कृत भाषेचें अध्ययन केलें. त्याचवेळेस प्रख्यात धर्मशास्त्री व याज्ञिक वे० शा० सं० रा० रा० नारायण भट कोळश्वेकर यांचेजवळ याज्ञिक विषयाचें अध्ययन केलें. यानंतर वे० शा० सं० गु० कृष्णशास्त्री देवधर यांचे जवळ शके १८१८ चे सुमारास आयुर्वेदाचें अध्ययन ६ वर्षे केलें. हे हल्लीं खानदेशांत नगरदेवळें मुक्कामीं धंदा करीत असतात. यांना श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य मठसंकेश्वर यांनीं त्यांचा चाळीसगांव येथें मुक्काम असतांना श्रींना औषधोपचार दोन महिने केल्यामुळें श्रींनीं त्यांस " आयुर्वेदपटु " ही पदवी दिली. यांनीं आपले चि० रा० पुरुषोत्तम व इतर २।३ विद्यार्थी यांना व्युत्पत्ति शिकविली आहे. हे वर्ष दोन वर्षांनीं आपल्या गुरुवर्यांस भेटण्याकरितां व औषधें करण्याकरितां नाशिकास येत असतात. यांची गुरुवर्यांचे ठिकाणीं अत्यंत निष्ठा आहे. हे याज्ञिकींत व पुराणें वगैरे सांगण्यांतही अत्यंत चतुर आहेत. स्वभावानें शांत सौजन्यपूर्ण व धर्म-कर्मनिष्ठ आहेत.



आयुर्वेद पटु वामन जयकृष्ण खेडकर.



वैद्यभूषण वामन केशवशास्त्री दातार.

## ३ वैद्यभूषण वामन केशवशास्त्री दातार

जन्म सन १८८३ ऑगस्ट ता. २८ शके १८०५ श्रावण व॥ ११ मंगळवार रोजीं नासिक येथें झाला. आमचें मूळ गांव कोकणांत अडेली व मुरुड हीं होत. मुरुड गांव बसवितांना आमचा एक पुरुष कामास आला त्यामुळें आम्हांस तेथें महाजनाचे व देवीच्या पूजेचे अधिकार आहेत. तेथून आमचे पूर्वज महाराष्ट्रांत आले. आमचा मुक्काम गंगापूर, नासिक क्षेत्रीं सुमारें २०० वर्षांपूर्वीपासून आहे. आमची चालू पिढी ही सहावी सातवी होय. आमचें घराणें वैदिक व शास्त्री आहे. घराण्यांत अनंतशास्त्री दातार (निपणजे), नारायणशास्त्री दातार (चुलत पणजे) व अच्युतशास्त्री दातार (आजे) हे प्रसिद्ध विद्वान् शास्त्री-पुरुष होऊन गेले. वडील केशवशास्त्री, पुराणिक होते. आम्ही चित्पावन ऋग्वेदीय ब्राह्मण असून आमचें गोत्र शांडिल्य होय. कुलदैवत देवी व उपास्यदैवत श्रीनारायण होय.

माझी मातोश्री तीर्थस्वरूप सौ० लक्ष्मीबाई माझ्या वयाच्या पहिल्या वर्षीं वारली. त्यानंतर माझा संभाळ माझ्या चुलत्यांनीं व चुलतीनें केला. वयाच्या आठवे वर्षीं नाशिकास वडिलांजवळ आलों. उपनयन संस्कार झाल्यावर शिकण्यास सुरुवात झाली. मला वयाचे ५ वर्षांपर्यंत बोलतां व चालतां येत नव्हतें. माझें मराठी प्राथमिक शिक्षण अत्यंत कमी, दुसऱ्या इयत्तेपर्यंतच झालें. घरींच रूपावली, समासचक्र, अमर व कांहीं ब्रह्मकर्म आजोबांजवळ शिकलों. आमचें घराजवळील देवीच्या मटांत असलेल्या संस्कृत पाठशाळेंत नंतर शिकण्यास गेलों. त्या वेळेपासून माझे सहाध्यायी वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर हे आहेत. पाठशाळेंत परमपूज्य गुरुवर्य कै० वासुदेवशास्त्री वैद्य यांचेजवळ पंचकाव्यें, नाटकें, चंपू, भागवत व लक्ष्मी-सहस्र वगैरे ग्रंथांचें अध्ययन केलें. वयाचे १६ वें वर्षी १८९९ सालीं वडील वारले. त्यानंतर माझा सांभाळ माझे ज्येष्ठ बंधूंनीं केला. वयाचे १७ वे वर्षी धुळयास भिक्षुकीकरितां गेलों. तेथें श्री० कर्पूर श्रीनिवास एक्झिक्युटिव्ह एंजिनियर यांचा परिचय झाला, व त्यांचेबरोबर सिंधप्रांतांत प्रवास केला.

या साहेबांबरोबर अनेक संस्कृत नाटकें वाचलीं. सन १९०१ या सालीं परत आलों.

यापूर्वीच १८९७।९८ सालीं सुप्रसिद्ध सावरकर मंडळींशीं निकट संबंध आला. विशेषतः बॅ० सावरकर यांच्या सहवासानें ज्ञानलालसा, वाचनाची अभिरुचि, देशस्थितीची जाणीव वगैरे गुण उत्पन्न होऊन वाढीस लागलें होते. त्यामुळें निरनिराळया विषयांच्या संस्कृत व मराठी पुस्तकांचें वाचन चालूं राहिलें. याच विषयापुरतें मी बॅ० सावरकर यांस एका दृष्टीने गुरू समजत आहे. सन १९०१ ते २ या दरम्यान् गुरुवर्य के० गणेशशास्त्री तरटे यांचेजवळ वैद्यकाचें अध्ययनास सुरुवात केली. त्यांनीं गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांजपाशीं अध्ययन करण्यास सांगितल्यावरून गुरुवर्यांकडे जाऊं लागलों. १९०५ अखेर गुरुवर्यांकडे वैद्यकाचें यथामति अध्ययन केलें व स्वतंत्र धंद्यास सुरवात केली.

**बडोद्यास प्रयाण ( १९०९ ते १२ ):**— पुढें राजकीय आंदोलनाच्या संकटप्राय अवस्थेनें १९०९ सालीं नासिक सोडणें भाग झालें मग मी बडोद्यास गेलों. तेथें श्रीगंगनाथ राष्ट्रीय विद्यालयांत शिक्षकाचें काम व शह-रांत स्वतंत्र धंदा करीत होतो. या वेळेस बडोद्यास साहित्याच्या दोन परीक्षा दिल्या. सन १९१२ अखेर अशाच तऱ्हेच्या राजकीय आंदोलनाच्या वावटळी-मुळें बडोदे सोडणें सक्तीचें झालें व मी नाशकास आलो. १९१३ ते १९२० पावेतों नाशिकास स्वतंत्र धंदा करीत होतो. १९२० ते १९२७ अखेर गंगा-राम छबिलदास आयुर्वेद विद्यालय व औषधालय, येवले या सुप्रसिद्ध संस्थेंत विद्यालयाच्या स्थापनेपासून ७ वर्षे होतों. घरगुती अडचणींमुळें व वडील बंधूंच्या मृत्यूमुळें येवले सोडून नाशकास येणें जरूर झालें. १९२७ पासून आज पर्यंत मी नाशिकास वैद्यकीचा व्यवसाय करीत आहे. परमेश्वराच्या कृपेनें व गुरुवर्यांच्या आशीर्वादानें योगक्षेम व्यवस्थित चालूं आहे.

**राजकीय आंदोलनः**— १९०४ ते १९०९ अखेर बंगालच्या फाळ-णीनें उत्पन्न झालेल्या स्वदेशी चळवळीच्या आंदोलनांत व त्याचेही आधी स्थापन झालेल्या अभिनव भारत ऊर्फ मित्रमेळा या सुप्रसिद्ध संस्थेच्या स्वातं-त्र्याच्या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेऊन सर्व महाराष्ट्रांत विशेषतः नाशिक

शहरांत अनेक चळवळी केल्या. व्याख्यानें दिलीं. त्याच चळवळीमुळें उत्पन्न झालेल्या वंदेमातरम् खटल्यांत दंडाची शिक्षा होऊन जामीन घेण्यांत आला. १९१० सालीं नाशिकच्या कलेक्टरचा खून झाल्यानंतर बडोद्याहून पकडून नाशकास आणलें गेलें व २ महिनें नजर-बंद अवस्थेंत होतो. १९१७ सालीं लोकमान्यांचा होमरूल लीग ऊर्फ स्वराज्य संघ स्थापन झाल्यानंतर त्या संघाच्या शाखेची स्थापना नाशिक येथें केली व त्या संघाच्या शाखेचा १९२० पावेतों मी चिटणीस होतों. त्या अवधींतही संघाचें प्रचार-कार्य मी केलें. १९२१ पासून सुरू झालेल्या असहकारितेच्या चळवळींतही सामील होऊन येवलें येथें तालुका काँग्रेस कमिटी स्थापन केली व तेथील सुप्रसिद्ध राष्ट्रीय विद्यालय स्थापन करण्याचें यथाशक्ति प्रयत्न केले. राष्ट्रीय सभेच्या सर्व तऱ्हेच्या चळवळी त्या शहरांत व महाराष्ट्रांतही दौऱ्यांत सामील होऊन केल्या. येवले येथील तालुका काँग्रेस कमिटीचा मी, ३ वर्षें मुख्य चिटणीस होतों.

त्यानंतर कौन्सिल प्रवेशाच्या चळवळींतही सामील होऊन यथाशक्ति प्रयत्न केला. सांसारिक जबाबदाऱ्या दिवसेंदिवस वाढत चालल्यानें ह्या चळवळींतून अलिप्त राहणें आवश्यक झालें.

**वैद्यकीय चळवळः--** येवल्याहून नाशिक येथें आल्यानंतर परमपूज्य गुरुवर्यांस अखिल भारतीय वैद्य संमेलनाचे, १८ वे अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळाल्यानंतर सन १९२९ सालीं १९ वें वैद्य संमेलन नासिक येथें भरविण्याकरितां म्हणून जे प्रयत्न करावे लागले त्यांत मी मंत्री म्हणून काम केलें. त्या संमेलनाच्या यशस्वितेकरितां गुजराथ, वऱ्हाड, महाराष्ट्र व कर्नाटक या भागांतून इतरांच्या सहकार्यानें जवळ जवळ १ वर्षभर दौरा काढावा लागला. व तें संमेलन सर्वांच्या सहकार्यानें व गुरुवर्यांच्या आशीर्वादानें अत्यंत यशस्वितेनें पार पडलें.

सन १९३३ अखेर पनवेल येथें महाराष्ट्रीय वैद्यांची त्रिदोष चर्चा परिषद् भरविली गेली. त्या परिषदेच्या मंत्र्यांपैकीं मी एक होतो. सन १९३५ च्या नोव्हेंबर महिन्यांत श्रीक्षेत्र वाराणसी येथें भरलेल्या सुप्रसिद्ध अखिल भारतीय पंचमहाभूत व त्रिदोष चर्चा परिषदेचें सहमंत्रित्वही मजकडे होतें.

कलकत्ता, पुणें, मुंबई, बडोदे, इंदूर, राजमहेंद्री फत्तेपूरसीकर, म्हैसूर, अकोला, दार्व्हा या ठिकाणीं झालेल्या निखिल भारतवर्षीय आयुर्वेदीय संमेलनास व प्रांतीय वैद्यकीय संमेलनांस मी गेलो होतो.

**अध्यापनः**— आयुष्याचा असा वर्तनक्रम चालू असता सन १९०२–१९०३ सालापासून संस्कृत अध्यापनाचेंही यथाशक्ति कार्य चालू होतें. विशेषतः हायस्कूल मधील मुलें, संस्कृत शिकण्यासाठीं मजकडे येत असत. अशा अनेक मुलांपैकीं ज्यांनीं मजजवळ विशेष अध्ययन केलें त्यांचीं नांवें मीं खालीं दिलीं आहेत. तसेंच बडोद्याहून नाशकास आल्या नंतर १९१३ ते १९२० या कालखंडांत नाशकास; १९२० ते १९२७ या कालखंडांत येवल्यास व १९२७ पासून हा काल पावेतों पुनः नाशकास, संस्कृत व वैद्यक विषयांचें ज्या विद्यार्थ्यांस शिक्षण दिलें, त्यांचीं नांवें क्रमानें खालीं देत आहे.

**संस्कृताचे विद्यार्थीः**— प्रो० दत्तात्रेय गोविंद केतकर एम. ए. विनायक नरहर बर्वे बी. ए. एल्. एल्. बी.; गजानन विनायक जोशी मु. रोहे.

**वैद्यकः**— यशवंत मनोहर पुराणिक मु. विंचूर, अनंत वंडो जोशी हल्ली मु. येवले, रामचंद्र बाळकृष्ण शिऊरकर, आयुर्वेदाचार्य; भालचंद्र अनंत शारंगपाणी, मॅट्रिक आयुर्वेद विशारद, मुरलीधर सदाशिव जोशी बडोदा मध्यमा, मॅट्रिक, आयुर्वेद विशारद; डॉ० प्रल्हाद सदाशीव महाजन, मॅट्रिक आयुर्वेद विशारद, एल्. सी. पी. एस्.; मणीराम बाळाजी गुळसकर (साळी) आयुर्वेद विशारद; शंकर श्रीधर जोशी थर्ड ईअर मास्तर आयुर्वेद विशारद; पुरुषोत्तम नथूशास्त्री पाटणकर पुणे वेदशा. सभा परीक्षा २. "वैद्यरत्न" बडोदे, नारायण विठ्ठल सातपुते बडोदे मध्यमा वैद्यक, गोपाळ शंकर देव बडोदे मध्यमा वैद्यक, नरहर गोविंद देशपांडे बडोदे मध्यमा वैद्यक, गोविंद विनायक वझे बडोदे मध्यमा वैद्यक, कलकत्ता सं. काव्य प्रथमा, दत्तात्रेय त्रिंबक भार्गवे बडोदे मध्यमा कलकत्ता सं. काव्य प्रथमा, रघुनाथ दामोदर फणसे कलकत्ता सं. काव्य प्रथमा, विष्णु मोरेश्वर दाते कलकत्ता सं. काव्य प्रथमा, बडोदे वैद्यक मध्यमा; रामचंद्र शंकर महाजन बडोदे वैद्यक मध्यमा, सखाराम वामन दातार बडोदे वैद्यक मध्यमा. पुरुषोत्तम नथूशास्त्री पाटणकर हे प्रथम

## शिष्यांची अल्प-चरित्रें.

स्थळ प्रत
नं. ९

पुणें वेद शा. सभा व्युत्पत्ति इयत्ता १ व इयत्ता २ उत्तीर्ण होऊन नंतर वैद्यकी शिक्षणास आले. रामचंद्र शंकर महाजन पुणें वेदशा. सभा व्युत्पत्ति इयत्ता १, अद्वैत वेदांत इयत्ता १, कलकत्ता सं. यु. अद्वैत वेदांत इयत्ता १, उपनिषद् इयत्ता १ व्याकरण इयत्ता १ ह्या परीक्षा देऊन नंतर वैद्यक शिक्षणास आले. शांताराम दाजी जोशी धुळें हा विद्यार्थीही इतरांचे बरोबर अभ्यास करीत आहे.

## पुस्तकांचें संशोधन व प्रकाशन.

१ त्रिदोषतत्व ( १९१२ ) संस्कृत निबंध कलकत्ता संमेलन
२ चरकसंहिता चक्रदत्त टीके सहित संशोधन
३ संमेलन विषयक विचार १९२८
४ १९ वें वैद्य संमेलन पत्रिका व महाराष्ट्र वैद्य समिति पत्रिका ( संपादक )
५ कवि गोविंद यांचें चरित्र ( मराठी )
६ १९ वे वैद्य संमेलनाचें इतिवृत्त ( मराठी )
७ १९ वे वैद्य संमेलनांतील निबंधसंग्रह ( संस्कृत ) संपादन
८ त्रिदोषचर्चा परिषदेचें इतिवृत्त
९ त्रिदोष विमर्श ( संस्कृत ) १९३५
१० प्राणाचार्य गुरुवर्य देवधरशास्त्री यांचें चरित्र

सुप्रसिद्ध चरकसंहिता चक्रपाणि दत्त टीकेसहित महाराष्ट्रांत हा वेळ पावेतों दुर्मिळ होती. याचे बरेचसें मुद्रण कलकत्त्यास कविराज हरिनाथ विशारद यांनीं केले होतें. सदरहू टीकाग्रंथ संपूर्ण उपलब्ध करून छापण्याचें कार्य मी नाशकास वैद्य निरंतर यांचे येथे टीकेसहित चरकसंहिता ग्रंथ आहे अशा समजुतीने अंगावर घेतले. परंतु दुर्दैवानें ती टीका नाशकास मिळाली नाहीं म्हणून त्या टीकेच्या शोधाकरितां विकानेर ( मारवाड ) जयपूर बनारस व कलकत्ता याठिकाणीं प्रवास करून जेमतेम संपूर्ण टीकेचें एक पुस्तक जमवावें लागलें. व तिचे संशोधन करून चरकाची पहिली आवृत्ती बाहेर पडणें शक्य झालें.

मी शके १८३५ सालीं श्रावणांत एकाच वर्षांत बडोदे येथील श्रावण

मास दक्षिणा परीक्षेच्या वैद्यक विषयांतील तिन्ही परीक्षा उत्तीर्ण झालो. त्याच सालीं अश्विन महिन्यामध्यें इंदूर येथेही जाऊन परीक्षा दिली. सदर परीक्षांत लाभलेलें यश, हातून घडलेली आयुर्वेद व लोकसेवा, त्याच प्रमाणें बऱ्या प्रमाणांत चाललेला योगक्षेम हे सर्व मी गुरुवर्यांच्या कृपाप्रसादाचेंच फळ मानतो.

अशा तऱ्हेने गुरुवर्यांच्या कृपेनें व आशीर्वादानें मजकडून जी जी सेवा झाली ती सादर केली आहे. यांतही श्री साधु तुकाराम महाराजांचे अभंगांत वर्णिलेल्या प्रमाणें " फोडिलें भांडार । धन्याचा हा माल । मी तो हमाल । भारवाही ॥ " अशीच वस्तुस्थिति आहे.

## ४ वैद्यरत्न विष्णु गणेशशास्त्री केळकर

वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांचा जन्म शके १८०६ तारणनाम संवत्सर आषाढ व॥ १४ रोजीं नाशिक येथें आपले मातुलगृहीं (श्री. महाबळ) झाला. हे ऋग्वेदीय कोकणस्थ ब्राम्हण गोत्र शांडिल्य ऋग्वेद शाकलशाखा आश्वलायन सूत्राचे होत. यांचें मूळ कोंकणांतील गांव हरिहरेश्वर हे असून सुमारें २०० वर्षांपूर्वीपासून या घराण्याचें नाशकास वास्तव्य आहे.

**बालपण:--** वयाचे ५ वर्षांचे आंतच यांस वडील गणेशभट व मातोश्री यांचा वियोग झाला. यांचें संगोपन यांचे वृद्ध पितामह प्रख्यात वैदिक केशव भटजी केळकर यांनीं केलें.

**शिक्षण:--** मराठी ५ ईयत्तांचें शिक्षण झाल्यावर इंग्रजी शिक्षण न घेतां, संस्कृत शिकण्याची प्रवृत्ति नैसर्गिक असल्यानें आजोबांनीं ह्यांना संस्कृत शाळेंत घातलें. कारण त्यांना इंग्रजी शिकून नोकरी करण्यासंबंधीं तिरस्कार असे.

**संस्कृत अध्ययन:--** नासिक येथील संस्कृत पाठशाळेंत कै० वे० शा० सं० वासुदेवशास्त्री वैद्य यांचेजवळ संस्कृत पंचकाव्यांचें अध्ययन झालें.



वैद्यरत्न विष्णु गणेश केळकर.

व ह्यांच्या वयाचे १६ व्या वर्षी पितामह केशवभटजी केळकर यांनी त्यांचा विवाह करून दिला व ते कैलासवासी झाले.

**वेदशास्त्राचा अभ्यासः—** विष्णुशास्त्र्यांचे वडील बंधु रा० वासुदेव भटजी यांनीं वैद्यशास्त्र शिकण्याची प्रेरणा केली. पण दुर्दैवानें वडील व धाकटे बंधु आणि एकुलती एक वडील बहीण फारच थोडया कालांत दिवंगत झाल्यानें रा० विष्णुशास्त्री यांचेवर प्रपंचाचा सर्व भार पडला. अशा स्थितींतही वैद्यकाचें अध्ययन चालूंच होतें. याच अध्ययनाबरोबर याज्ञिक विषयाचेंही अध्ययन वे० कै० तात्याभटजी मराठे यांचेजवळ यांनीं केलें.

**धंद्यास प्रारंभ व संकटः--** सन १९०९ सालीं वैद्यकीच्या धंद्यास स्वतंत्रपणें सुरुवात केली नाही तोंच, नासिक येथील त्यावेळेचे कलेक्टर मि० जॅक्सन यांचे खुनाचे खटल्यांत शास्त्रीबोवांस पकडण्यांत आलें, आणि त्यांस ३॥ वर्षे तुरुंगवास घडला. तुरुंगांतून सुटका झाल्याबरोबर धंदा करावा तर सरकारच्या भीतीनें लोक दूरदूर राहूं लागले व शिक्षणाची मर्यादाही जनतेला दाखवितां येईना. तेव्हां पुन्हां वैद्यकाचा अभ्यास करून शके १८४० मध्यें बडोदें येथील वैद्यकाच्या मध्यमा उत्तमा अशा दोन्ही परीक्षा एकाच वेळीं दिल्या. त्यांत चांगल्या प्रकारें उत्तीर्ण झाल्यानें "वैद्यरत्न" ही पदवी, सन्मानसूचक शाल व १२५ रुपये दक्षणा मिळाली. त्यानंतर इंदूर येथेंही शके १८५१ सालीं आयुर्वेदाची परीक्षा देऊन आयुर्वेद शास्त्राच्या उत्तम परीक्षेचा दाखला मिळविला व धंद्यास सुरुवात केली.

**पुन्हां धंद्यास प्रारंभः--** सर्व हिंदुस्थानमध्यें संधिकज्वराची ( इन्फ्लुएंझाची ) सांथ आल्यावेळीं, त्या सांथीचा नाशिकमध्येंही कहर उडाला होता. त्या समयाला अत्यंत परिश्रम केल्यामुळें १० पैकीं ८ प्रमाणानें रोगी सुधारले. गरोदर स्त्रियांचाही बचाव झाला. तेव्हांपासून धंद्याचा जम बसला तो अद्यापपावेतों कायम आहे.

**इतर चळवळीः--** वैद्यकीचा नित्यव्यवहार आटोपल्यावर राहिलेल्या इतर वेळीं थोडेंफार सार्वजनिक काम व्हावें ह्या इच्छेनें "लोकसत्ता"

या नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र सन १९२० च्या डिसेंबरांत सुरूं केलें. सन १९३४ सालापासून तें द्विसाप्ताहिक स्वरूपांत निघत आहे. पत्राचें धोरण सनातनधर्मानुयायी राष्ट्रीय स्वरूपाचें असून तें नासिक जिल्ह्याचें जिल्हापत्र म्हणून गणलें जातें. महाराष्ट्रांत या पत्राबद्दल आदरही चांगला आहे.

ईश्वरीकृपेनें वडील मुलगा इंग्रजी वैद्यक शिकून आयुर्वैद्यक शिकत आहे. इतरही ३।४ विद्यार्थी वैद्यशास्त्र शिकून धंद्याला लागले आहेत. एक विद्यार्थी लिंगराज कॉलेजमध्यें वैद्यक शिक्षकाचें काम करीत आहे.


वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर हे गुरुवर्यांच्या शिष्य वर्गामध्यें लौकिकवान् शिष्य आहेत. हे लहानपणापासूनच बाणेदार, देशाचे व धर्माचे कट्टे भक्त, देशस्वातंत्र्याचे चाहते, व ह्या सर्व कार्याकरितां, तनमनधनानें स्वार्थत्याग पूर्वक प्रयत्न करणारे व कणखर वृत्तीचे असे आहेत. लहानपणापासून तों हा कालपर्यंत कोणत्याही योग्य अशा सार्वजनिक चळवळींत हे नाहींत असें नाहीं. कारागृहांतून मुक्त झाल्यावर तर हे नाशिकचे प्रमुख कार्यकर्ते म्हणून गणले जात आहेत. यांचें नाशिकच्या जनतेंत चांगलें वजन असून अनेक सार्वजनिक कार्यांचा भार यांचेवर पडत आहे. नाशिकास नांव घेण्यासारखे राष्ट्रीय बाण्याचें जिल्हा वर्तमानपत्र, रा. अनंत वामन बर्वे यांचे "लोकसेवा" पत्र अस्तास गेल्यापासून मुळींच नव्हतें, ही उणीव ह्यांनीं मोठ्या धडाडीनें भरून काढली आहे. यांना नोकरशाहीकडून राष्ट्रकार्याकरितां व धर्मकार्याकरितां अनेक कष्ट व छळणूक सहन करावी लागली असूनही त्यांचा स्वकार्यनिष्ठेंतील ताठरपणा यत्किंचितही कमी झाला नाहीं. हे अत्यंत बाणेदार, एका शब्दाचाही अपमान सहन न करणारे, व चिकाटीचे कार्यकर्ते आहेत. पुढें मागें नाशिक शहराचा इतिहास लिहावयाचा झाल्यास लेखकास त्या इतिहासांत वैद्यरत्न केळकरांचा, एका भागांत समावेश करणें आवश्यक होईल.



भिषगाचार्य हरीशास्त्री पराडकर

# ५ भिषगाचार्य हरीशास्त्री पराडकर

जन्म लग्न कुंडली.




जन्म शके १८०७ आश्विन शु॥ १३ बुधवार ( ता. २१।१०।१८८५ )
जन्मस्थल मुक्काम देवळे ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी जन्म शक १८०७ आश्वीनमास जात कऱ्हाडे ब्राम्हण गोत्र जमदग्नि.

वैद्यराज हरीशास्त्री पराडकर यांनी आपला वृत्तांत स्वतःच सविस्तर लिहून पाठविला आहे तोच यापुढें देत आहों. त्यांचे बद्दल आम्हांस इतकेंच सांगावयाचे कीं, ते अकोला, वऱ्हाड, येथें सुप्रसिद्ध चिकित्सक म्हणून नांवाजलेले असून त्यांचा धंदाही बऱ्याच वरच्या दर्जाचा आहे. त्यांचेही लक्ष आपल्या देशाच्या व आयुर्वेदाच्या सर्वांगीण उन्नतीकडे लागून रहात असून त्याकरिता ते यथाशक्ति प्रयत्नही करीत असतात. अकोला येथील वऱ्हाड प्रांतीय २ रें संमेलन १९२१ सालीं झालें तें प्रामुख्यानें यांच्याच श्रमाचें फल होय. आयुर्वेद विषयक यांची महत्वाची सेवा म्हणजे, अष्टांगहृदयाचे हेमाद्री, सर्वांगसुंदरा व चंद्रिका ह्या टीकांच्या मिळतील त्या ठिकठिकाणच्या हस्तलिखित प्रति जमवून अत्यंत शुद्ध असें मुद्रण, ही होय. के० तरटेशास्त्री यांची अष्टांग संग्रहाची सेवा, आम्ही यथाशक्ति केलेली चक्रपाणि टीकेसहित चरकसंहितेच्या संपादनाची सेवा, व वैद्यराज पराडकरशास्त्री यांनीं अष्टांगहृदयाची केलेली सेवा, ह्या सर्व सेवा आमच्या परंपरेंतून झाल्यामुळें परंपरेनें आयुर्वेदाच्या अध्ययनास बरेंच सहाय्य झालेलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. यापुढेंही या परंपरेंतून संहिता ग्रंथांचें संशोधन

किंवा आयुर्वेदीय स्वतंत्र ग्रंथांचें उत्पादन घडत रहावें अशी अपेक्षा केल्यास ती परंपरेस साजेशी आयुर्वेदाच्या दृष्टीनें अत्यंत जरूरीची अशी आहे; असो! गुरुवर्यांच्या शिष्य वर्गांत वैद्यराज पराडकर यांचा क्रम बराच वरच्या दर्जाचा लागेल.

**अध्ययन व परीक्षा:**— वयाचे १९ वर्षेपर्यंत संस्कृत, ज्योतीषशास्त्र वगैरे अध्ययन कऱ्हाड येथें झालें नंतर वयाचे २० व्या वर्षापासून आयुर्वेदाचें अध्ययन प्रथमतः १॥ वर्षपर्यंत इंदूर येथील संस्कृत महाविद्यालयांत कै० गु० वे० शा० सं० **चिंतामणशास्त्री खरे** यांचेपाशीं झालें. याच वेळीं इंदूर येथें मित्रवर्य रामभाऊ शेवडे व मि० प्रो० परशराम भाऊ वैद्य हे दोघेही आयुर्वेदाचे अध्ययनाकरितां आले. तेव्हां तेथें कित्येक दिवस पर्यंत हे दोघे व मी अशा तिघांचें अध्ययन एकत्र चालू असतांनांच गुरुवर्य **भिषगाचार्य कृष्णशास्त्री अण्णा देवधर** रा० नाशीक यांची कीर्ति गु० चिंतामण-शास्त्री खरे यांचेकडून व अन्य तऱ्हेनेंही आमचे कानांवर आली. तेव्हां आम्हीं तिघानींही विचार करून नाशिक येथें गुरुवर्यांपाशीं अध्ययनाकरिता जावयाचें, असें ठरवून लगेच गुरुवर्यांस पत्रद्वारें " आह्मां तिघांस आपले पाशीं आयुर्वेदाचें अध्ययन करावयास यावयाचें आहे तरी आपण आम्हांस शिकविण्याची कृपा कराल काय? " अशी विनंति केली. थोडेच दिवसांत त्यांचेकडून आम्हांस उत्तेजनपर उत्तर आलें. व त्या प्रमाणें आम्हीं तिघेही इंदुराहून थोडया दिवसांचे फरकानें नाशकास आलों. व तेव्हांपासून तिघांचें अध्ययन गुरुवर्यांपाशीं बरोबरच झालें. शके १८२९ चे फाल्गुन महिन्यांत, पुणें येथील वेदशास्त्रोत्तेजक सभेची पहिली परीक्षा व शके १८३१ चे वैशाख महिन्यांत दुसरी परीक्षा दिली. दोनही परीक्षेंत गुरुकृपेनें उत्तीर्ण होऊन पहिल्या परीक्षेंत २० रुपये व दुसऱ्या परीक्षेंत ३० रुपये अशीं बक्षिसेंही मिळालीं. नंतर शके १८३१ च्या श्रावण महिन्यांत बडोद्याच्या श्रावणमास दक्षिणा कमेटीच्या वैद्यक परीक्षा एकाच वर्षीं दिल्या. त्यांतही गुरुकृपेनें उत्तीर्ण होऊन बक्षीस ७५ रुपये मिळालें.

**धंदा:**— गुरुवर्यांचे कृपेनें व अनुज्ञेनें शके १८३२ च्या आषाढ महिन्यापासून अकोला-वऱ्हाड येथें ' आयुर्वेदिक श्रीकृष्ण चिकित्सालय '

स्थापन करून वैद्यकीय धंदा सुरू केला व तो आजपर्यंत सुरू आहे. माझा मुलगा चिरंजीव गंगाधर यानेंही मॅट्रिक झाल्यावर आयुर्वेदाचें शिक्षण घेतलें असून तो याच वर्षी '**आयुर्वेदतीर्थ**' झाला आहे.

**विशेष कार्य**:-- (१) अकोला येथें सन १९२१ च्या मार्च महिन्यांत "**वऱ्हाड प्रांतिक वैद्य संमेलन**" भरविलें. त्याच्या स्वागत-मंडळानें एकमतानें **गुरुवर्यांना अध्यक्षस्थान** देण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें त्यांच्या अध्यक्षतेखालीं तें प्रांतिक वैद्य संमेलन अत्यंत यशस्वी रीतीनें पार पडलें. त्या संमेलनाचें **स्थायी कार्य** म्हणून त्यावेळीं येथील व्यापारी मंडळींत अत्यंत खटपट करून निश्चित केलेलें "**आयुर्वेदिक धर्मार्थ औषधालय**" लगेच थोडे दिवसांनीं सुरू झालें व अजूनपर्यंत फार चांगल्या स्थितीत सुरू असून त्याचा फायदा हजारों गरीब लोकांना मिळाला व मिळत आहे. तेथील रोग्यांची रोजची सरासरी १२५ ते १५० आहे.

(२) अकोला जिल्हाकौन्सिल (जिल्हा बोर्ड) मार्फत अकोला जिल्ह्यांत '**आयुर्वेदिक धर्मार्थ दवाखाने**' सुरू करण्याबद्दल खटपट केली. ती यशस्वी होऊन अकोला जिल्ह्यांत हल्लीं ५ आयुर्वेदिक धर्मार्थ दवाखाने सुरू झाले आहेत. त्यांतील एका दवाखान्यावर माझे एक गुरुबंधु श्री० पांडुरंग दिनकर अकोटकर हे अधिकारी वैद्य म्हणून नेमले गेले असून कायमही झाले आहेत व त्यांस दरमहा पगार ५० रुपये आहे.

(३) गुरुवर्यांचे कृपेनें नाडीकला शिकत असतानांच, अष्टांग-हृदयावरील सर्वांगसुंदरा टीका व हेमाद्रीची आयुर्वेदरसायनटीका ह्या फारच अशुद्ध, फार चुकीच्या अशा छापलेल्या आहेत असें दिसून आल्या-मुळें त्यांचें संशोधन झालें पाहिजे, अशी इच्छा होती. त्याप्रमाणें हल्लीं ठिक-ठिकाणांहून २०।२५ जुन्या हस्तलिखित प्रति मिळवून त्यांच्या आधारानें अष्टांगहृदयसंहिता, सर्वांग सुंदरा टीका व हेमाद्रीटीका या अत्यंत शुद्ध करून, मूळ पाठ निश्चित करून जागजागीं चरक, सुश्रुत, संग्रह, वगैरे ग्रंथांच्या आधारानें महत्वाच्या अशा टीपा व पाठभेद देऊन, यंत्रशस्त्रांचीं चित्रें काढून हेमाद्रीची निदानस्थान व चिकित्सास्थान यांवरील शक्य तेवढी टीका मिळवून, सर्वांगसुंदरा व आयुर्वेदरसायन या दोन टीकांसह अष्टांगहृदयाची नवीन

शुद्ध अशी आवृत्ति तयार केली आहे. तिचा एक भाग सूत्र, शारीर, निदान, चिकित्सा, या ४ स्थानांचा छापून तयार झाला असून पुढील भाग तयार करण्याचें काम सुरूं आहे.

पदवीः— श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य स्वामी महाराज मठ संकेश्वर व करवीर, यांचा मुक्काम अकोला येथें चातुर्मासाकरितां असतानांच शके १८५६ च्या आश्वीन महिन्यांत श्रींनीं अत्यंत संतोषानें आशीर्वादपूर्वक " **भिषगाचार्य** " ही पदवी दिली आहे.

---

## ६ वैद्यराज रामशास्त्री शेवडे

वैद्यराज रामचंद्र अनंत शेवडे यांचें जन्मस्थान राजापूर तालुक्यांतील विखारें गोठणें हें होय. यांचा जन्म शके १८०४ सालीं झाला. हे कऱ्हाडे ब्राह्मण, ह्यांचें गोत्र वासिष्ठ.

अध्ययनः— सांगली येथील व्याकरण पाठशाळेंत कै० गु० वे० शा० सं० व्यंकटरमणाचार्य यांजपाशीं थोडें काव्य आणि सिद्धांत कौमुदी असें झालेलें आहे. पुढें गुरुवर्य प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांजपाशीं वैद्यकाचें अध्ययन करून वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें येथें वैद्यक पहिल्या इयत्तेची शके १८२९ सालीं परीक्षा देऊन संमतिपत्र आणि बक्षीस रुपये २० मिळविले आहेत.

अध्यापनः— शके १८५१ या वर्षी वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें च्या वैद्यक पहिल्या इयत्ते साटीं यांचे चिरंजीव चि० विष्णुशास्त्री व विद्यार्थी, जुआठी या गांवचे वासुदेव वामन सप्रे यांस तयार करून पाठविले होते. ते दोघेही परीक्षेंत पास होऊन त्यांना सभेकडून प्रमाणपत्रें मिळालीं आहेत विल्ये या गांवचे आणखी एक शिष्य नरहर भिकाजी जोशी हे यांचेजवळ अध्ययन करून विखारे गोठणें येथें वैद्यकीचा धंदा करीत आहेत.



प्रो. परशुराम लक्ष्मण वैद्य

## ७ प्रो. परशराम लक्ष्मण वैद्य पुणें

प्रख्यात प्रोफेसर परशराम लक्ष्मण वैद्य हे आमच्या गुरुवर्यांच्या शिष्योत्तमांतील मूर्धन्य होत. ह्यांचा जन्म पुणें येथें ता० ३० जून १८९१ सालीं झाला. प्राथमिक शिक्षण सिद्धेश्वर ( भोर संस्थान ) व जांभुळपाडा येथें झालें. संस्कृताचें अध्ययनास प्रारंभ सिद्धेश्वर येथें वयाचे सातवे वर्षी, पुढें सांगली व्याकरण शाळेंत कौमुदीचें अध्ययन झालें.

**वैद्यकीचें शिक्षणः—** प्रथम कोल्हापूर येथें वैद्य हणमंतशास्त्री यांचे जवळ वैद्यकाचें शिक्षणास सुरवात झाली. सुमारें १५ च दिवसांत तेथें प्लेग सुरू झाल्यामुळें व सहाध्यायी रामभाऊ हेच आजारी पडल्यानें कोल्हापूर सोडावें लागलें. तेथुन इंदूरास जाऊन तेथील महाविद्यालयांत वैद्य चिंतामण शास्त्री खरे यांजजवळ शिकण्यास सुरवात केली. पण तेथेंही प्लेगाची आपत्ति ओढवल्यानें इंदूर सोडावे लागलें. वैद्यराज चिंतामणशास्त्री खरे यांचे सांगण्यावरून नाशिकास गुरुवर्य वैद्यराज देवधरशास्त्री यांचे घरीं आगमन सन १९०६ मे. तेथेंच वाग्भट माधवनिदान चरक व सुश्रुत यांचें अध्ययन. वेदशास्त्रोत्तेजक सभेची वैद्यकाची पहिली परीक्षा उत्तीर्ण १९०८. दुसरी परीक्षा १९०९. सहाध्यायी श्री० रामचंद्र अनंत शेवडे व श्री. हरीशास्त्री पराडकर. १९१३ सालीं बडोदे येथें काव्य व अलंकार या विषयांच्या परीक्षा दिल्या.

**इंग्रजी शिक्षणः—** वरील प्रमाणें वैद्यकाचें शिक्षण झाल्यावर इंग्रजी शिक्षणास खाजगीरीतीने रोहें जि० कुलाबा येथें सुरवात झाली ( जून १९०९ ). त्याच सालीं नाव्हेंबरमध्यें नाशिक येथें हायस्कूलांत चवथ्या इयत्तेंत प्रवेश. १९१० मध्यें पुणें येथें न्यूइंग्लिश स्कूलमध्यें ५ व्या इयत्तेंत प्रवेश. सन १९१२ स मॅट्रिक पास. तींत जगन्नाथ शंकर शेट स्कॉलरशिप मिळाली. पुढें फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रवेश. सन १९१८ सालीं बी. ए. ची परीक्षा पहिल्या वर्गांत ( संस्कृत मध्यें सन्मानासह ) पास व भाऊदाजी प्राईझ. ताबडतोब प्रोफेसरच्या जागेची प्राप्ती. राजाराम कॉलेज कोल्हापूर येथें सन १९१८ सालीं प्रोफेसरची जागा मिळाली. १९१९ सालीं सांगली विलिंग्डन

कॉलेजमध्यें संस्कृत प्रोफेसरच्या जागेवर नेमणूक. १९२० सालीं कलकत्ता विश्वविद्यालयाची एम्. ए. ची परीक्षा पालीभाषा घेऊन दिली व तींत पहिला वर्ग मिळाला.

**शिक्षणाकरितां विलायतेंत प्रयाण:**— १९२१ सालीं हिंदुस्थान सरकारची संशोधन शिष्यवृत्ति मिळवून विलायतेस गमन. सन १९२३ सालीं पॅरीस विश्वविद्यालयाची " डॉक्टर ऑफ लेटर्स " ही पदवी मिळविली.

संस्कृत पाली व प्राकृत ह्या भाषांचे प्रोफेसर सांगली विलिंग्डन कॉलेज १९१९ ते १९३०; फर्गुसन कॉलेज १९३० ते १९३२; नवरोजी वाडिया कॉलेज १९३२ पासून पुढें.

## ग्रंथ लेखन व प्रकाशन

१ वैद्यकांवरील कांहीं ग्रंथांच्या मराठी भाषांतरांचें संशोधन.
२ संस्कृतमध्यें निरनिराळे लेख.
३ विजयिनी कथा ( १९११ )
४ मोरोपंतांचें संस्कृत काव्य ( १९१७ )
५ धम्मपद पाली ( १९१९; दुसरी आवृत्ती १९३२ )
६ आर्यदेव व चतुःशतक ( तिबेटी संस्कृत फरेंच १९२३ )
७ सूत्रकृतांग प्राकृत ( १९२७ )
८ बौद्धधर्माचा अभ्युदय आणि प्रसार ( १९२८ )
९ हैम व्याकरण प्राकृत ( १९२८ )
१० वररुचिकृत प्राकृत प्रकाश ( १९३० )
११ न्यायावतार संस्कृत जैनन्याय ( १९२८ )
१२ जसहर चरित ( अपभ्रंश. १९३१ )
१३ निरयावली, विपाकसूत्र पएसिकहाणयं ( जैनांचे आगमग्रंथ, १९३१, १९३३, वगैरे )

सध्यां अपभ्रंश भाषेंत लिहिलेल्या जैनांचें " महापुराण " नांवाच्या प्रचंड ग्रंथाचें संशोधन व प्रकाशन चालूं आहे.

वरील सर्व माहिति प्रोफेसर साहेबांनीं स्वतः लिहून पाठविली त्यावरून दिली आहे. या माहितीवरून प्रोफेसर साहेबांची तीव्र बुद्धिमत्ता, श्रमसातत्य, कार्याचा व्याप, लोकनिदर्शनास येईल. प्रोफेसर साहेबांस त्यांच्या घरच्या गरिबी-मुळें इतकें उच्च दर्जाचें शिक्षण मिळणेंच अशक्य होतें हें आपण पूर्वीं पाहिलें आहेच. यांना अत्यंत जरूर असें उत्तेजन मिळालें नसतें तर त्यांचा व त्यांच्याच बरोबर प्राचीन वाङ्मयाचा होत असलेला उत्कर्ष आपणांस दिसला नसता.

---

## ८ रा० त्रिंबक उर्फ भाऊशास्त्री जोशी

जन्मस्थान हरिपूर. जन्म शके १८०८ कोंकणस्थ ब्राह्मण, गोत्र शांडिल्य, मराठी व इंग्रजी ४ थ्या इयत्तेपर्यंत प्राथमिक शिक्षण. संस्कृत अध्ययन व्युत्पत्ति, व्याकरण, थोडासा न्याय, व थोडासा वेद, वैद्यक शास्त्राचें अध्ययन गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचे जवळ. हल्लीं वैद्यकीचा धंदा सांगलीस करीत असतात. त्यांचें घराण्यांतील कांहीं मंडळी वैद्यच आहेत, पैकीं एक शाखा बेळगांव शहापूर येथें आहे. हे शास्त्रीबोवांचे घरींच शिकावयास होते. स्वभाव गरीब व पापभीरु आहे.

## ९ वैद्यभूषण केशवाचार्य नरहराचार्य अग्रधानी

यांचा जन्म शके १८१३ पौष शु॥ ९ स मु॥ मणूर ता. अफझुलपुर स्टेट निझाम, येथें झाला. जात ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, माध्व वैष्णव गोत्र मौनभार्गव.

अध्ययनः— शके १८३१ पासून अदमासें ३ वर्षे साहित्य व व्याकरण यांचें अध्ययन साताऱ्चे प्रसिद्ध विद्वान् बाळाचार्य गजेंद्रगडकर यांचेकडे झालें व वेदशास्त्रोत्तेजक सभेची व्युत्पत्तीची परीक्षा दिली. त्यानंतर गुरुवर्य देवधरांकडे आयुर्वेदाचें अध्ययन प्रत्यक्ष शिक्षणासह ६ वर्षे केलें. शके १८३९ मध्यें बडोदा राजधानींत श्रावणमास दक्षिणा परीक्षेंत आयुर्वेदाच्या शेवटच्या परीक्षेंत उत्तीर्ण झाले व 'वैद्यभूषण' ही पदवी मिळाली.

अध्यापनः— सन १९१८ पासून ३ वर्षांपावेतों सातारा येथें आर्यांग्ल वैद्यक विद्यालयांत शिक्षक होते. तेथें आयुर्वेदाचे संपूर्ण ग्रंथ शिकवीत असत. तेथून विजापूरचे सुप्रसिद्ध वकील वैकुंठवासी राघवेंद्रराव केंभावी यांनीं विजापूर येथें स्थापन केलेल्या आर्यवैद्यक शाळेंत शिक्षकाचें काम करणेसाठीं १९२१ मध्यें बोलावल्यावरून हे विजापूर येथें गेले व त्या वेळेपासून तेथेंच आज १५ वर्षे वैद्यकीचा धंदा करून अध्यापन करीत आहेत. हेही गुरुवर्यांकडे राहात असत.



वैद्यभूषण केशवाचार्य अवधानी.



कै० सौ० दुर्गाताई दसनूरकर.

# १० कै. सौ. दुर्गाताई दसनूरकर ( ताई खर्डीकर )

गुरुवर्यांच्या शिष्यमालिकेंत एका बुद्धिमती तेजस्विनी व सुशील अशा विद्यार्थीनीचाही समावेश झाला असल्यानें गुरुवर्यांचें स्त्रीदाक्षिण्य व स्त्रियांनाही आयुर्वेद शिकविण्याची इच्छा स्पष्ट होत आहे. सौ० दुर्गाताई खर्डीकर यांचा जन्म शके १८१४ ता. २५ । ९ । १८९२ रोजीं झाला. ह्या कै० गुरुवर्य गणेशशास्त्री तरटे यांचे सख्खे भाचे रा० भास्करराव खर्डीकर ह्यांच्या चिरंजीविनी होत. यांचें बालपण नाशकास गेले. यांचे वडील रा० भास्करराव हे प्रथम पोलिस खात्यांत नोकर होते परंतु बाणेदारपणामुळे त्यांस नौकरी सोडावी लागली. नंतर त्यांनीं मराठी शिक्षकाचें काम पुष्कळ वर्षे केलें. हे स्वभावानें व आर्थिक परिस्थितीनेंही गरीब होते. त्यांची साधी रहाणी व उच्च विचारसरणी वाखाणण्यासारखी होती. यांनी आपल्या मुलीस व अनंत नांवाच्या मुलास घरींच बरेंच शिकविलें व मराठी शाळेंत घातलें.

नासिक येथील कपुरथल्ला संस्थानचें राम मंदिरांत संस्थानाकडून नेमणूक केलेले एक पंडितजी असत. ते संस्कृतज्ञ असून वैद्यकीही करीत असत. त्यांचा धंदा उत्तम चालत असे. ते आर्यसमाज-मतानुयायी होते. त्यांचे येथें मोठी बैठक असे. त्या बैठकींत रा० भास्करराव खर्डीकर हे नित्य बसत असत.

रा० भास्कररावांनीं आपल्या मुलामुलींना त्यांचेकडूनच संस्कृताचें प्राथमिक ज्ञान देवविलें. सौ० ताई खर्डीकर यांचें मराठीचें प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यावर रा० भास्करराव यांनीं त्यांची पुढील संस्कृत व वैद्यक शिक्षण देण्याची सोय गुरुवर्य देवधरांकडे केली.

सौ० ताई खर्डीकर अत्यंत बुद्धिमान् असल्यानें लवकरच त्यांचें पंचकाव्य व संस्कृत नाटकें या ग्रंथांचें अध्ययन पूर्ण झालें. व आयुर्वेदाचें अध्ययनास सुरुवात झाली. माधवनिदान, अष्टांगहृदय, अष्टांगसंग्रह, व चरक सुश्रुताचे कांही भाग येवढे अध्ययन त्यांनीं केलें. या ग्रंथांपेकीं बराच भाग त्यांस मुखोद्गत होता. व ग्रंथांची समजूतही चांगली झाली होती.

गुरुवर्यांनीं, आपल्या विद्यार्थिनीस वेदशास्त्रोत्तेजक सभेच्या परीक्षेस बसवावें म्हणून त्या परीक्षेची त्यांचेकडून तयारी करविली व सन १९१४ सालीं गुरुवर्य स्वतः त्यांस पुण्यास घेऊन गेले. त्या वेळेस सभेचे चिटणीस प्रो० नारायण दासो बनहट्टी हे होते. त्यांनी सौ० ताई खर्डीकर ह्या (त्या वेळेस अविवाहित असलेल्या) अनाश्रमी असल्यानें त्यांस परीक्षेस बसवितां येत नाहीं असा निर्णय देऊन या विद्यार्थिनीस व गुरुवर्यांस अत्यंत कष्टी केलें. या विषयावर त्यावेळीं वर्तमानपत्रांतून गुरुवर्यांच्या तर्फेनें लोकांनीं बरीच चर्चा केली.

वास्तविक एका प्रतिष्ठित व प्रसिद्ध अशा विद्वान् पंडितानें शिकवून तयार केलेल्या व विद्यार्थी दशेंतील आवश्यक असणाऱ्या निग्रहपावित्र्यादि सर्वगुणांनीं मंडित असणाऱ्या एका सुशील विद्यार्थिनीस प्रचलित रूढ असलेल्या धर्मशास्त्राच्या किरकोळ मुद्यावर परीक्षेस बसण्यास हरकत करण्यांत यावी ही अत्यंत दुःखाची, खेदाची व संताप उत्पन्न करणारी गोष्ट होय. आयुर्वेदविद्येंत हुशार विद्यार्थ्यांचा भरणा कमी. त्यांतूनही त्यावेळेस स्त्रियांस शिक्षण कमी मिळत असल्यानें स्त्री–विद्यार्थिनी मिळणें तर अत्यंत दुर्घट. अशी स्थिती असतांना ह्या विद्यासंपन्न विद्यार्थिनीस परीक्षेस प्रतिबंध व्हावा हें खरोखरच परागतीचें दर्शक होय. ह्याच विद्यार्थिनीनें पाश्चात्य विद्यांचें अध्ययन करून त्या परीक्षा दिल्या असत्या तर समाजानें तिचें मोठें अभिनंदन केलें असतें. यावरून पाश्चात्य शिक्षण घेतलेला व अंतर्बाह्य पौर्वात्य संस्कृतीचा द्वेष करणारा शत्रू पुरवतो पण पौर्वात्य संस्कृतीनें संपन्न झालेला असा त्या संस्कृतीचा मित्र प्राचीन मताच्या समाजास मानवत नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. असो.

वर लिहिल्याप्रमाणें परीक्षेसंबंधीं हिरमोड झाल्याबरोबर गुरुवर्यांनीं कु० दुर्गाताईस इंग्रजी पद्धतीनें नर्स व मिडवाईफ होण्याकरितां पुण्यासच ठेविले. या अवधींत खाजगी रीतीनें कु० दुर्गाताई ह्या इंग्रजीही शिकत असत. पुण्यांतील अभ्यासक्रम संपवून व परीक्षा देऊन त्या नर्स व मिडवाईफ होऊन नाशिकास आल्या व स्वतंत्र धंदा करूं लागल्या. त्यांचा नाशकास धंद्यांतही जम हलके हलके बसूं लागला.

१९२२।२३ सालीं गंगाराम छबिलदास आयुर्वेद विद्यालय व औषधालय, यांत त्यांची स्त्रीचिकित्सक म्हणून रुपये ६० वर नेमणूक झाली. तेथेंही त्या आपलें काम फार हुशारीनें व आस्थेवाईकपणानें करीत असत व विद्यालयांत आयुर्वेद शिकवीत असत. ह्या कालपावेतों (वयाच्या ३०।३१ वर्षांपावेतों) त्या अविवाहितच होत्या. येवल्यास असतांना रा० भास्करराव खर्डीकर यांचे पूर्वपरिचित व पंडितजींच्या बैठकींत बसणारे रा० शंकरराव दसनूरकर हे पोलीस सब् इन्स्पेक्टर म्हणून येवल्यास बदलून आले. अध्ययनाचा व अंगावर पडलेल्या विशिष्ट कर्तव्याचा भार कमी झाल्यावरच विवाह व्हावा असा उभयतांचा पूर्वसंकेत असावा, असें आम्हांस वाटतें. कारण रा० शंकरराव हेही प्रथम कुटुंब निवर्तल्यावर बरींच वर्षे अविवाहित असेंच होते व तेही आपला आयुष्याचा काल अत्यंत शुद्ध व सात्विक अशा मार्गानेंच नेत होते.

ह्या कालपावेतों सौ० ताई खर्डीकर यांचे वडील दिवंगत झाले होते धाकटा बंधू रा० अनंतराव ह्या गुरुकुलांतील शिक्षण संपवून परत आलेला होता. त्याचा विवाहही सौ० दुर्गाताईनींच करून दिला होता. आपल्या वरील जबाबदारी अशा रीतीने पार पाडल्यावर सन १९२३ सालीं रा० शंकरराव दसनूरकर व दुर्गाबाई खर्डीकर यांचा विवाह झाला ह्या अंतःशाखीय विवाह असल्यानें यांसही एक प्रकारें महत्व आहे. कारण रा० शंकरराव दसनूरकर हे देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हण असून सौ० दुर्गाताई खर्डीकर या यजुःशाखीय होत.

परिस्थितींत बदल पडल्यामुळें सौ० दुर्गाताई दसनूरकर ह्या गंगाराम छबिलदास विद्यालय व औषधालय यांतून मुक्त झाल्या. गुरुवर्यांना ह्या विवाह मुळींच संमत नव्हता.

सौ० दुर्गाताई दसनूरकर ह्या १९२८ सालापर्यंत येवल्यास होत्या. तेथें त्यांचा स्वतंत्र धंदा अत्यंत उत्तम चालत असे. पुढें रा० शंकरराव हे सन १९२९ सालीं सटाण्यास बदलले. तेथेही त्यांनी प्लेग, मलेरिया वगैरे सांथींचे रोगावर हजारों लोकाना फुकट औषधोपचार करून उपकृत केलें. १९३२ सालअखेर त्यांनीं आपलें पुणें हें कायमचें ठिकाण केलें व तेथें दवाखाना

सुरू केला. १९३३ ते ३४ ही दोन वर्षें, पुणें शहरांतही आपल्या गुणांमुळें प्रसिद्धीस येण्यास त्यांना चांगलीं उपयोगीं आलीं, व त्यांची प्रसिद्धी बरीच होऊं लागली. सन १९३४ च्या प्रारंभापासून दवाखान्याची भरभराट होऊं लागली. पुण्यांतील टिळक आयुर्वेद विद्यालयांतील मुलीसुद्धां त्यांचेपासून शिक्षणाचा फायदा घेत असत. नुकतेच सुरू झालेलें पब्लिक हेल्थ-संबंधीचें शिक्षण घेऊन त्यांनीं १९३४ सालीं परीक्षा दिली व सर्टिफिकेट मिळविलें. सौ० ताई दसनूरकर यांचें ज्ञान-संपादन व पुस्तकांचें वाचन सारखे चालू होतें. त्या स्वतः संस्कृतमध्यें उत्तम लिहूं शकत असत. चरक संहितेच्या संशोधनाचे वेळीं, आम्हांस त्यांचें बरेच सहाय्य झालें.

ह्या स्वभावानें अत्यंत शांत, सालस, कर्तव्यनिष्ठ, सतत उद्योगवृत्तीच्या अशा असत. ह्यांची टापटीप व सुव्यवस्था अत्यंत वाखाणण्यासारखी होती. गोरगरिबांस व परिचितांस संकटाचे वेळीं यांचा अत्यंत उपयोग होत असे. रुग्णांची शुश्रूषा करणें व रोग्यास योग्य तऱ्हेची चिकित्सा देणें यांत ह्या फार सावधानपणा ठेवीत असत. बऱ्याचशा निर्लोभवृत्तीनें व कर्तव्यबुद्धि जागृत ठेवूनच ह्या रुग्णजनांशीं वागत असत. परमेश्वरानें यांना ह्यापेक्षां जास्त आयुष्य दिलें असतें तर ह्यांचा पुण्यास फार मोठा लौकिक झाला असता. परंतु दुर्दैवानें प्रसूतीच्या वेळेसच ता. ३० । ३ । १९३५ शके १८५७ रोजीं ह्या एकाएकी दिवंगत झाल्या.

गुरुवर्य शास्त्रीबोवांनीं ह्या पुण्याहून शिकून येईपावेतों यांचेकरितां पोटच्या मुलीप्रमाणें व अत्यंत प्रेमानें अनेक कष्ट केलें. त्यावेळेस लागणारा सर्व खर्च गुरुवर्यांनींच केला.

तसेंच सौ० दुर्गाताई यांनींही आपणासाठीं आपल्या गुरुवर्यांस लागलेली द्रव्याची झळ लक्षांत ठेऊन, आपल्याकरितां खर्च झालेलें द्रव्य गुरुवर्यांस कांहीं दिवसांनीं साभार परत केलें. (गुरुवर्यांची अपेक्षा नसतांनाही) सौ० दुर्गाताई खर्डीकर यास १ मुलगा व १ मुलगी अशीं २ लहान अपत्यें आहेत.

---

श्री ... संग्रहालय ... ५१२

## ११ रा. कृष्णाजी काशिनाथ सरवटे

## १२ रा. दामोदर रंगमहाले

हे दोन विद्यार्थी गुरुवर्यांचे जवळच अध्ययन संपादन करून तयार झाले आहेत. यांस ३ । ३ पत्रें पाठविलीं असतांही पत्राचें उत्तर न आल्यामुळें व यांचेसंबंधीं जास्त कांहींही माहिती उपलब्ध नसल्यानें देतां येत नाहीं.

---

## १३ कै. रा. सदाशिव अनंत सखदेव

हे विद्यार्थी नाशिक येथें गुरुवर्यांचे घरींच राहून त्यांचेजवळ शिकत असत. परंतु त्यांस एकाएकीं चित्तविभ्रम झाल्यामुळें त्यास शिक्षणास मुकावें लागून कांहीं दिवसांनीं त्यांतच त्यांचा अंत झाला.

---

## १४ रा. चिंतामण पुरुषोत्तम गोखले वैद्य

रा० गोखले हे भोर येथील प्रख्यात राजवैद्य श्रीधरशास्त्री गोखले यांचे पुतणे होत. हे १९१३ सालीं प्रथम नाशकास आले व गोपाळराव बिवलकर यांचेकडे वैद्यक शिकूं लागले. तेथेंच प्रख्यात पंडित वे. हरीशास्त्री गर्गे यांची ओळख झाली व त्यांचेजवळ त्यांनीं संस्कृताचें अध्ययनास सुरवात केली. या तऱ्हेनें एक वर्ष गेल्यावर प्राणाचार्य गोपाळराव बिवलकर दिवंगत झाले. व पुढील अध्ययनाकरितां रा० गोखले हे गुरुवर्य देवधरांकडे येऊं लागले. त्यांचेंजवळ माधव निदान वाग्भट वगैरे ग्रंथांचें अध्ययन त्यांनीं केले. परंतु नाशिकास प्लेग सुरूं झाल्याने परीक्षा वगैरे न देतां रा० गोखले यांस भोर येथें जावें लागलें. परत शिक्षण घेण्यासाठीं नाशिकास येण्यास वडिलांनीं परवानगी न दिल्यानें हे पुनः येऊं शकले नाहींत. सांप्रत हे भोर येथें धंदा करीत आहेत.

---

## १५ वैद्य भास्करशास्त्री धर्माधिकारी

रा० भास्करशास्त्री यांचा जन्म पाचोरें येथें ( पूर्वखानदेश ) शके १८१८ आषाढ वा॥ १३ शुक्रवार ता. ७ ऑगस्ट १८९७ इसवी रोजीं झाला. हे शुक्ल यजुर्वेदीय पंचप्रवरी आर्ष्टिषेण गोत्रीय ब्राम्हण होत. यांचें प्राथमिक शिक्षण व संस्कृत शिक्षण नाशिक येथें येण्याचे अगोदरच झालें होतें. आयुर्वेदाचें अध्ययन गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचेजवळ झाले. हे बडोद्याची आयुर्वेदीय मध्यमा परीक्षा उत्तीर्ण आहेत. हे पाचोरे येथें वैद्यकीय धंदा करीत आहेत. ह्यांचा धंदा तेथें चांगला चालू आहे. प्रभाकर हरी जोशी नांवाच्या विद्यार्थ्यास शिकवून यांनीं तयार केलें आहे. सदर विद्यार्थी आयुर्वेद विशारद झाला आहे. दुसरा विद्यार्थी यादव नानाजी जोशी हा यांचें जवळ शिकला.

रा० भास्करशास्त्री धर्माधिकारी हे खानदेशांतील तरुण होतकरू व आयुर्वेदाची चळवळ करणारे वैद्य आहेत. सन १९२९ च्या वैद्यक संमेलनाचे वेळीं खानदेशांत दौरा काढला असतांना आम्हांस ह्यांचा अत्यंत उपयोग झाला आहे. हे स्वभावानें गरीब कष्टाळू आणि उत्साही असे आहेत.



वैद्य भास्करशास्त्री धर्माधिकारी.



वै० दत्तात्रेय बळवंत टिळक.

## १६ वैद्य दत्तात्रय बळवंत टिल्लू

रा० दत्तूशास्त्री टिल्लू खानदेशांतील चोपडे गांवचे राहणारे होत. यांचा जन्म शके १८१३ श्रावण व॥ १२ सोमवार रोजीं झाला. शुक्ल यजुर्वेदीय माध्यान्ह शाखीय ब्राम्हण गोत्र गार्ग्य.

**अध्ययनः**-- संस्कृत पंचकाव्य व, गुरुवर्यांचे, जवळ वैद्यशास्त्राचें अध्ययन करून पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची प्रथमा परीक्षा उत्तीर्ण झाले.

**अध्यापनः**-- दत्तात्रय देवकृष्ण थळनेरकर व चंपालाल मोतीलाल श्रावगी हे दोन विद्यार्थी यांचेजवळ शिकून भिषक् परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. १।२ विद्यार्थी यांचेजवळ अभ्यास करीत आहेत. हे आपल्या जन्मभूमीस-चोपड्यासच-वैद्यकीचा धंदा करीत असून ह्यांचा धंदा तेथें चांगला चालला आहे. ह्यांनीं सत्याग्रहाचे चळवळींत भाग घेतल्यानें सरकारी पाहुणचाराचा उपभोग घेतला आहे. हेही खानदेशांत प्रसिद्ध असून स्वभावानें सुशील आहेत.

---

## १७ वैद्य श्री. दादाशास्त्री संगीत

हे वर लिहीलेल्या मंडळी बरोबरच गुरुवर्यांकडे वैद्यकाचें शिक्षण घेत होते. तेथून इंदुरास आत्मारामशास्त्री भागवत यांचेकडे गेल्याचें समजतें. या पेक्षां जास्त माहिती उपलब्ध नाहीं.

---

## १८ वैद्य शंकरशास्त्री जोशी विंचूरकर

रा० शंकरशास्त्री जोशी यांचा जन्म संस्थान विंचूर जि० नासीक येथें शके १८१५ भाद्रपद शु॥ ९ रोजी झाला. हे शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण, गोत्र वासिष्ठ. यांचें संस्कृत अध्ययन नाशिक येथील पाठशाळेंतील गुरुजी वे० शा० सं० रामशास्त्री वैद्य यांचेजवळ झालें. गुरुवर्य देवधर यांचेजवळ आयुर्वेदाचें अध्ययन करून ह्यांनीं पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची वैद्यक प्रथमा व बडोदे येथील वैद्यक प्रथमा ह्या परीक्षा दिल्या नंतर २ वर्षें मनमाड येथें व १२ वर्षें भंडारा येथें वैद्यकीचा धंदा केला. हल्लीं हे नागपूर येथें धंदा करीत आहेत.

## १९ वैद्य सीताराम गोपाळ पुराणिक

हे एरंडोल येथें वैद्यकीचा धंदा करीत आहेत. यांचेही वैद्यशास्त्राचें अध्ययन गुरुवर्य देवधरशास्त्री यांचेकडे झाले. यापेक्षां अधिक माहिती त्यांचे कडून आली नाहीं.

## २० वैद्यराज गोपाळ गंगाधरशास्त्री तरटे


हे सुप्रसिद्ध परमपूज्य परमगुरु गणेशशास्त्री तरटे यांचे नातू होत. हे हल्लीं नासिक येथील म्युनिसीपालिटीच्या आयुर्वेदीय दवाखान्यावर काम करीत आहेत. यांचे संबंधी सर्व माहिती यापूर्वी येऊन गेलीच आहे.

## २१ वैद्य मुकुंदशास्त्री जोशी बेळगांव

रा० मुकुंदशास्त्री जोशी यांचे संबंधीं विशेष माहिती उपलब्ध नाही. ते उत्तम अधीत असून गुरुवर्यांच्या जवळ त्यांनीं आयुर्वेदाचा अभ्यास पुरा केला आहे. स्वभावानें तापट व थोडे एककल्ली असे असल्याने गुणवान्



वै० शंकरशास्त्री जोशी विंचूरकर.



कै० रामचंद्र सदाशीव फणसळकर.

निर्भीड व पवित्र वृत्तीचे असतांही ह्यांचे व्यवहारांत लोकांशीं फारसें पटत नाहीं. व त्यामुळें यांची व्यावहारिक कुचंबणा फार होते. सातारा आर्यांग्ल शाळेंतही हे कांहीं दिवस शिक्षक होते पण तेथेंही त्यांचे जमले नाहीं. हे अलीकडे बेळगांवास आहेत असें ऐकण्यांत येतें. धाडलेल्या पत्रांचीं उत्तरें न आल्यानें या पेक्षां अधिक माहिती नाइलाजानें देतां येत नाहीं.

---

## २२ वैद्य रामचंद्र सदाशिव फणसळकर शिपोशी

रा० फणसळकर कऱ्हाडे ब्राम्हण. यांचा जन्म सन १९०१ कार्तीक वा॥ १ रोजी वेरवली बुद्रुक ता० संगमनेर जि० रत्नागिरी येथें झाला. यांचे वडील हे ६ महिन्याचे असतांच वारले. पुढें यांचें संगोपन त्यांचे मातामहांनीं केलें. मराठी ४ इयत्तेपर्यंतचें शिक्षण शिपोशी येथें झाले. नंतर तेथेंच वेद शाळेंत संहिता, ब्राह्मण, पदे, यांचें अध्ययन केलें. पुढें संस्कृत शिकण्याची इच्छा झाल्यावरून हे काशीस गेले. व तेथें कांहीं व्युत्पत्तीचे ग्रंथ व कौमुदी यांचें अध्ययन केलें. काशीस प्रकृतीला बरें वाटेना म्हणून नाशकास येऊन गुरुवर्य देवधरांच्या घरींच राहून वैद्यकीचा अभ्यास सुरू केला. व पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची प्रथमा परीक्षा उत्तीर्ण झाले. हे हल्लीं शिपोशी येथें असून तेथेंच धंदा करीत आहेत.

---

## २३ वैद्यराज रामदास कालीदास पाठक

रा० रामदासशास्त्री यांचा जन्म शके १८२३ मार्गशीर्ष शु॥ ७ रोजीं झाला. हे शुक्ल यजुर्वेदीय ब्राम्हण, गोत्र कृष्णात्रेय. राहण्याचा गांव यावल (पूर्वखानदेश) हा आहे. घराण्यांत परंपरागत वैद्यकीचा धंदा आहे. यांचे वडील कालीदास नाना पाठक हे खानदेशांत प्रसिद्ध वैद्य ह्मणून नांवाजलेले आहेत. रा० रामदासशास्त्री हे १९२० च्या डिसेंबरांत गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधरांकडे वैद्यकाचें अध्ययनास आले. सन १९२५ चे मे महिन्यांत यावल येथें धंद्यास सुरवात केली. यांनीं पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची प्रथमा परीक्षा व बडोदा श्रावणमास परीक्षेची मध्यमा परीक्षा देऊन पारितोषिकें मिळविलीं आहेत. आयुर्वेदाचें अध्यापन करून दत्तात्रय बाळाजी कौंडिण्य व प्रल्हाद नीळकंठ जोशी हे दोन विद्यार्थी तयार केले आहेत. पैकीं जोशी रोहिणखेडा जि० बुलढाणा येथें धंदा करीत आहे, व कौंडिण्य हे इंदूर संस्थानांत एका आयुर्वेदीय दवाखान्यांत काम करीत आहेत.

रा० रामदासशास्त्री यांनीं लिहून पाठविलेल्या आपल्या वृत्तांतात ते लिहितात " नासिक येथें शिकत असतांना खानपानादिकांचा सर्व भार गुरुवर्यांवरच होता. पांच वर्षांचे सहवासानें गुरुवर्यांकडील सर्व मंडळी मजला आपल्या घरांतील एक असे समजतात व माझी समजूतही या शरीरांतील रक्तमांस गुरुवर्यांकडूनच मिळालें आहे अशी आहे.

सन १९३० सालीं वृद्ध गुरुवर्य व गुरुपत्नी यांचे समागमें त्रिस्थली महायात्रेचा योग मजला घडल्यामुळें तरुणवयांत ईश्वर विषयक भावना उद्दीपित होऊन आयुष्यांत एक प्रकारें धर्मभावनांचा योग्य परिपोष झाला असें घडलें. गुरुवर्यांकडील सहवासाने त्यांचे ऋणानुबंधी व आप्तस्वकीय यांचा परिचय होऊन एक प्रकारे सत्समागम झाल्याचें समाधान वाटतें. अध्ययन करीत असतांना केशव बाळाजी अभ्यंकर हे सहाध्यायी होते त्यांचें प्रेमळ व सज्जन सहवासाचा योग आल्यानें मूळच्या हूड स्वभावांत पुष्कळ बदल झाला ही गोष्ट येथें नमूद केल्या शिवाय रहावत नाहीं. त्यांचा सुमारें दोन वर्षे सहवास झाल्यावर अकस्मात् निर्घृण कालानें त्यांस आमचे जवळून दूर केल्याने त्यांचे सज्जन सहवासास मुकावें लागलें."



वै० रामदास कालिदास पाठक.



वैद्य दिनकर कृष्णशास्त्री देवधर.

## २४ केशव बाळाजी अभ्यंकर

० . केशव बाळाजी अभ्यंकर मु॥ मुंबई हे विद्यार्थी गुरुवर्यांजवळ वैद्यकी शिकत होते परंतु लवकरच दिवंगत झाले.

---

## २५ वैद्य दिनकर कृष्णशास्त्री देवधर

रा० दिनकर कृष्ण ऊर्फ बापूराव देवधर हे आमच्या गुरुवर्यांचे ज्येष्ठ चि. होत. यांचा जन्म नासिक येथें तारीख १४ आक्टोबर १९०० रोजीं झाला.

प्राथमिक शिक्षणः-- यांचें प्राथमिक शिक्षण मराठी ५ इयत्तेपर्यंत म्यु० शाळा नं० १ येथें झालें. सन १९१२ सालीं येथील सेंट जॉर्ज हायस्कूलमध्यें दाखल होऊन ५ व्या इयत्तेपर्यंत यांचें शिक्षण झालें व पुढचे शिक्षण सरकारी हायस्कूलमध्यें झालें. हे सन १९१९ सालीं मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. इंग्रजी शिक्षण चालू असतांच ह्यांनी गुरुवर्यांजवळ संस्कृताचा अभ्यास केला. या अध्ययनाचा त्यांना चांगला उपयोग झाला. हे सन १९२० सालीं सांगली विलिंग्डन कॉलेजमध्यें दाखल होऊन प्रिव्हिएस झाले. व पुढें ग्रँट मेडिकल कॉलेजमध्यें डॉक्टरीचा अभ्यास करण्याकरितां गेले. कांहीं महिने अभ्यासक्रम व्यवस्थित चालू असतांना हे मलेरियानें आजारी पडले व हा आजार यांच्या पाठीमागें बरींच वर्षे सारखा लागला त्यामुळें नाइलाजानें ह्यांना घेतलेला शिक्षणक्रम सोडावा लागून त्यांची अत्यंत निराशा झाली. हे सन १९२३ सालीं नाशिक येथें कायम राहूं लागले. यांना वर्षसव्वावर्षानें हलकें हलकें बरें वाटल्यानंतर यांनीं घरींच गुरूवर्यांजवळ वैद्यकीचा अभ्यास सुरूं केला. परंतु घेतलेला शिक्षणक्रम सोडावा लागल्यामुळें त्यांचा उत्साह नाहींसा झाला. तथापि ते १९२७ सालीं श्रावणमास दक्षिणा परीक्षा बडोदेच्या, मध्यमा परीक्षेंत, वैद्यक विषयांत उत्तीर्ण झाले. अखिलभारतीय आयुर्वेद विद्यापीठानें ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आचार्यपरीक्षेस बसण्याची अनुमती दिली आहे. याच अवधींत त्यांनीं ॲलोपाथी, होमिओपाथी, व बायोकेमिक पद्धतींचें परिशीलन खाजगी चालूं ठेवलें होते व हल्लींही तें चालू आहे. बडोद्याची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर गुरुवर्यांचे हाताखालीं आपले घरींच धंद्यांतील प्रत्यक्ष

अनुभव घेण्यास त्यांनीं सुरवात केली. नाणावलेल्या व कसलेल्या चिकित्सकाच्या हाताखालींच काम करण्यास मिळाल्यामुळें हे प्रत्यक्ष शिक्षणांतही तरबेज झाले व आपले तीर्थरूप गुरुवर्य, धंद्यानिमित्त बाहेरगांवीं गेले असतांना त्यांच्या धंद्याचा बोज व जबाबदारी पार पाडण्यास हे समर्थ झाले.

गुरुवर्यांचा वैद्यक व्यवसाय मोठमोठ्या लोकांत असल्यामुळें यांचाही अनायासें तेथें प्रवेश झाला. इतकेंच नव्हें तर सुरगाणा संस्थानचे त्या वेळचे अधिपति राजे प्रतापराव शंकरराव देशमुख यांचे कुटुंब-वैद्य, आमचे गुरुवर्य असल्यानें त्यांना वारंवार सुरगाणें संस्थानांत जावें लागत असे. एके प्रसंगीं गुरुवर्य धंद्यानिमित्त बाहेरगांवीं गेल्यानंतर संस्थानांतून त्यांना निकडीचें बोलावणे आलें. अशा स्थितींत गुरुवर्यांचें, महत्वाचें चिकित्सेचें कार्य रा० बापुराव यांनाच करावें लागलें. या वेळेस संस्थानिकांचे चिरंजीव श्रीमंत युवराज नानासाहेब हेच आजारी होते. श्रीमंतांना यांच्या चिकित्सेमुळें लवकरच आराम वाटला. यामुळें श्रीमंत राजेसाहेबांची मर्जी यांचेवर बसली व यांना श्रीमंतांकडे १०।१२ वेळेस त्यांच्या खास निमंत्रणावरून जावें लागलें. व आमचे आपण वैद्य आहांत असें संबोधून, मोठ्या संतोषानें त्यांनीं त्यांना गौरविलें.

रा० रा० बापुराव यांचा बडोदें येथील वैद्यरत्न परीक्षा देण्याचा मानस होता व आहेही परंतु गुरुवर्यांच्या चिकित्सा व्यवसायाची व घरांतील प्रपंचाची जबाबदारी दिवसें दिवस वाढत चालल्यावर व यांचे दुसरे कनिष्ठ बंधु रा० लक्ष्मणराव देवधर यांचा आकस्मिक भयंकर अपघातानें याच सुमारास अंत झाल्यानें यांना परीक्षा देण्याचा विचार मोठ्या दुःखानें सोडून द्यावा लागला. यांनीं आपलीं कांहीं स्वतंत्र औषधेंही तयार करून श्रीकृष्ण फॉर्मसी या नांवाची शाखा स्थापन केली आहे. व ही शाखा दिवसें दिवस वाढविण्याचा त्यांचा मानस आहे.

श्री० बापूराव हेच आज गुरुवर्यांच्या घरांतील मोठे कर्ते आहेत. गुरुवर्यांना यांच्या टापटिपीच्या व निरलस उद्योगप्रियतेने व आपल्या व्यवसायांतील कौशल्याने अलीकडे बरीच विश्रांति मिळूं लागली आहे.



कै० गोविंदराव सोहनी.

## २६ कै. गोविंदराव सोहोनी बी. ए.

रा० गोविंद विनायक सोहोनी हे नाशिक येथील रहिवासी होते. यांचा जन्म ता. २९ डिसेंबर सन १८९९ सालीं झाला. सोहोन्यांचें घराणें नाशकास प्रतिष्ठित व नामांकित गणलें जातें. रा० गोविंदरावांचे आजोबा माधवराव सोहोनी हे नाशिक येथें नांवाजलेले हेडमास्तर होते. हे कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण. यांचे वडिलांचें नांव विनायकराव. रा० गोविंदरावांचें सर्व प्राथमिक शिक्षण नाशिक येथेंच झालें. यांना उच्च शिक्षणाचा लाभ मिळून हे बी. ए. झाले. रा० गोविंदराव पदवीधर झाल्यावर नाशिक येथें न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षक म्हणून काम करूं लागले. शिक्षकाचा व्यवसाय संभाळून ह्यांनीं ज्योतिषशास्त्र व वैद्यशास्त्र ह्यांचा अभ्यास केला. वैद्यशास्त्राचें अध्ययन गुरुवर्य कृष्णशास्त्री यांचेकडे झालें. हे स्वभावानें शांत, मनमिळाऊ होते. मनाची वृत्ति कोमल असल्यानें कोणत्याही सुखदुःखात्मक गोष्टींचा तीव्र परिणाम यांचे मनावर तावडतोब होई. ह्याच परिणामांचा जोर होण्याइतका आघात, त्यांची प्रिय पत्नी लौकरच दिवंगत झाल्यानें त्यांना फार जाणवला व मानसिक भ्रमाची उत्पत्ति होऊन त्यांतच ह्या सुशील तरुणाचा अंत झाला.

ग्रंथ संग्रहालय

## २७ भाईशंकर विठ्ठलजी उपाध्याय

रा० रा० भाईशंकरजींचा जन्म मोटीवडाळ ( काठियावाड स्टेट ) येथें कार्तिक शु॥ ५ शके १८२० रोजीं झाला. हे त्रिवाडी मेवाडा ब्राह्मण आहेत. यांचें शिक्षण गुजराथी ७ व्या ईयत्तेपर्यंत झालें. संस्कृत शिक्षण सावरकुंडला संस्कृत पाठशाला संस्थान भावनगर येथें झालें. यांचें आयुर्वेदाचें अध्ययन गुरुवर्यांजवळ झालें. हे वैद्यकी करीत नाहींत. हे पंचवटींतील शेट प्रागजीभाई दयाळ हरियाणी यांचे धर्मशाळेचे मॅनेजर आहेत.

---



रा० भाईशंकर विट्ठलजी उपाध्याय.



वैद्य सदाशिवशास्त्री लवाटे.

## २८ वैद्य रा. सदाशिव काशीनाथ लवाटे

रा० सदाशिवशास्त्री लवाटे यांचा जन्म ता. १०।१०।१८९९ इसवी रोजीं झाला. हे कोकणस्थ चित्पावन ब्राह्मण, नासिक येथील रहिवासी, गोत्र काश्यप, शिक्षण मराठी इयत्ता ५ व इंग्रजी मॅट्रीकपर्यंत. संस्कृत अध्ययन गुरुवर्य गणेशशास्त्री मेणके व गुरुवर्य रामशास्त्री वैद्य, नासिक, यांचे जवळ झालें. आयुर्वेदाचें अध्ययन गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचेकडे केलें. खालीं दिलेल्या परीक्षा ह्यांनीं देऊन त्यांत उत्तीर्णता संपादन केली.

| | | |
|---|---|---|
| व्याकरण प्रथमा व मध्यमा | कलकत्ता | १९२३ |
| इंग्रजी मॅट्रीक | | १९२४ |
| काव्यतीर्थ | कलकत्ता | १९२५ |
| वैद्यक प्रथमा | वे. शा. स. पुणें | शके १८४८ |
| आयुर्वेद मध्यमा | बडोदे | संवत् १९८४ |
| आयुर्वेद उत्तमा | बडोदे | संवत् १९८५ |
| पूर्वमीमांसा | बडोदे | संवत् १९८६ |

रा० सदाशिवशास्त्री लवाटे हे नाशिक येथील सुखवस्तु असून मोठे उद्योगी व तीव्र बुद्धीचे आहेत. स्वभावानें मनमिळाऊ. वृत्तीनें धार्मिक असल्यानें, धार्मिक चळवळींत हे समाविष्ट असतात. हे नासिक येथें वैद्यकीचा धंदा करीत आहेत.

## २९ वै. पांडुरंग दिनकर आकोटकर

श्री. पांडुरंगशास्त्री हे अकोला (वऱ्हाड) जिल्ह्यांतील अकोट या गांवचे रहिवासी. हे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. गुरुवर्य देवधरांकडे यांनी ५-७ वर्षं अध्ययन केले. सन १९२८ सालामध्यें यांनी बडोदे श्रावणमास दक्षिणा परीक्षेची आयुर्वेद मध्यमा परीक्षा दिली व त्यांत ते उत्तीर्ण झालें. नंतर सुमारे १-२ वर्षं नासिक जिल्हा लोकल बोर्डाच्या दवाखान्यांत यांनी नोकरी केली. दवाखान्यास बोर्डाकडून पुरविल्या जाणाऱ्या औषधाबाबद व इतर गोष्टींत यांचा बोर्ड–अधिकाऱ्यांशीं मतभेद झाल्यानें यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला. हे हल्ली वऱ्हाडांतील, अकोला जिल्हा कौंसिलच्या माले-गांव जहागीर येथील दवाखान्यांत आहेत.



वै० पांडुरंग दिनकर आकोटकर.




वैद्य पांडुरंग प्रल्हाद दाणी.

# ३० वैद्य पांडुरंग प्रल्हाद दाणी

जन्मस्थान मालेगांव जिल्हा नासिक. जन्म आषाढ शु॥ ११ शके १८१९ ता. १० जुलई १८९७ इसवी. देशस्थ ब्राह्मण, गोत्र मौन. इंग्रजी मॅट्रीकचें अध्ययन पूर्ण. आयुर्वेदाचें अध्ययन प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांचेकडे. परीक्षा- बडोदे मध्यमा.

रा० तात्याशास्त्री दाणी हे नासिक येथेंच धंदा करीत आहेत. हे गुरुवर्यांच्या अत्यंत स्नेही अशा दाणी घराण्यांतील असून गुरुवर्यांचा यांचेवर मोठा लोभ आहे. हे स्वभावानें अत्यंत कष्टाळू व गरीब आहेत, व आपलें काम फार काळजीनें करणारे आहेत.

## ३१ वैद्य गजानन अप्पू वेदेश्वर
## मु. गोकर्ण जि. कारवार

हे गोकर्णाहून येथें शिकण्यास आले. कांहीं दिवस गुरुवर्यांकडे होते. त्यांचें संस्कृत अध्ययन नासिक येथें व वैद्यकाचें अध्ययन गुरुवर्यांकडेच झालें. हे हल्लीं गोकर्ण येथें धंदा करीत आहेत.



वै० गजानन अप्पू वेदेश्वर.



वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते.

## ३२ वैद्य त्र्यंबकशास्त्री दाते

वैद्यराज त्र्यंबकशास्त्री दाते हे प्रसिद्ध श्री० आबाशास्त्री दाते या वैद्यक घराण्यांतील होत. हे श्री० आबाशास्त्री दाते यांचे नातू होत, हे पूर्वी आलेले आहेच. यांचा जन्म नासिक येथें शके १८२७ वैशाख शु॥ ६ ता. १०।५।१९०५ रोजीं झाला. हे हिरण्यकेशीय कोंकणस्थ ब्राह्मण, ह्यांचें गोत्र वासिष्ठ.

**अध्ययनः**— काव्यग्रंथ व कौमुदी यांचें अध्ययन येथील संस्कृत पाठशाळेचे सुप्रसिद्ध शिक्षक वे० शा० सं० रा० रा० रामशास्त्री वैद्य यांचेजवळ झालें. सुप्रसिद्ध न्यायरत्न वे० शा० सं० नारायणशास्त्री वाडीकर यांचेजवळ तर्कशास्त्राचें थोडें अध्ययन झालें. आयुर्वेदाचें अध्ययन गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचेजवळ करून ह्यांनीं वैद्यकीच्या बडोदा मध्यमा व वेदशास्त्रोत्तेजक सभा प्रथमा या दोन परीक्षा दिल्या व त्यांत हे उत्तीर्ण झाले.

**वैद्यकीच्या धंद्यास प्रारंभः**— आश्विन शु॥ १० शके १८५३ तारीख २०।१०।१९३१ रोजीं केला.

**अध्यापनः**— वैद्य भगवान माधव खेडकर, मार्तंड भिकाजी जोशी व पांडुरंग गणेश निरंतर या तीन विद्यार्थ्यांस ह्यांनीं आयुर्वेदाचें शिक्षण दिलें व या विद्यार्थ्यांच्या अनुक्रमें १ बडोदा मध्यमा व पुणें मध्यमा, २ बडोदा मध्यमा, ३ बडोदा मध्यमा या परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. हल्लींही दोन विद्यार्थी यांचेजवळ शिकत आहेत.

रा० त्र्यंबकशास्त्री दाते हे आपल्या परंपरेचा लौकिक उत्तम रीतीनें राखून आहेत. हे स्वभावानें शांत, प्रेमळ व अबोल असून आपले अंगावर घेतलेलें कोणतेही कार्य व्यवस्थितपणें करीत असतात. यांना रसायनें व औषधें अत्यंत उत्तम रीतीनें व टापटिपीनें करण्याचा अभ्यास आहे. हे नाशिकास पुढेंमागें उत्तम वैद्य म्हणून गणले जातील असा भरंवसा आहे.

## ३३ वैद्यरत्न शाम मजेराव शिंदे हसूरकर

वैद्यराज शामराव शिंदे यांचा जन्म शके १८२७ विश्वावसू नाम संवत्सरे या सालांत हसूरचंपू पो० गडहिंग्लज जि० बेळगांव येथें झाला. हे देशस्थ ब्राह्मण असून यांचें गोत्र काश्यप होय.

प्राथमिक शिक्षणः-- मराठी ६ व इंग्रजी ५ इयत्तेपर्यंत झालें. संस्कृत अध्ययन पंचकाव्यांपर्यंत करून पुढें वैद्यकाचें अध्ययन गुरुवर्य देवधरांकडे केलें. पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभा वैद्यक प्रथमा परीक्षा व बडोदा श्रावणमास परीक्षा, मध्यमा व उत्तमा अशा परीक्षा देऊन यांनीं 'वैद्यरत्न' ही पदवी मिळविली. हल्लीं हे गडहिंग्लज येथें धंदा करीत आहेत. यांचा धंदा चांगला चालला आहे. ह्यांची बुद्धि तीव्र असून ते मोठे उद्योगी आणि महत्वाकांक्षी आहेत. यांची वैद्यक विषयाची तयारीही उत्कृष्ट आहे.



वैद्यरत्न शामराव मर्जेराव शिंदे.

## ३४ आयुर्वेद विशारद मनोहर खंडेराव जोशी

वैद्य मनोहर खंडेराव जोशी यांचा जन्म शके १८२८ ज्येष्ठ शुक्ल ८ रोजीं सुलतानपूर ता. मेहेकर जि० बुलढाणा येथें झाला. गोत्र अत्रि.

प्राथमिक अध्ययन झाल्यावर श्रीसखाराम महाराज सं० लोणी येथें वयाच्या १७।१८ व्या वर्षापर्यंत वैदिक अध्ययन साधारण झालें. नंतर श्रीक्षेत्र नासिक पंचवटी येथें श्रीमत् प० प० शंकराचार्य कूर्तकोटी यांनीं स्थापन केलेल्या संस्कृत विद्यापीठांत पंचकाव्यांचें ३ वर्षें अध्ययन केलें. ऐच्छिक विषय म्हणून आयुर्वेदाचा अभ्यास ४ वर्षेंपर्यंत गुरुवर्य देवधरशास्त्री यांचेजवळ केला. वेदशास्त्रोत्तेजक सभेची आयुर्वेदीय प्रथमा परीक्षा व बडोदा येथील आयुर्वेदीय मध्यमा परीक्षा देऊन, त्यांत हे उत्तीर्ण झाले. यानंतर अ० भा० महामंडळाची " आयुर्वेद विशारद " ही परीक्षा दिली.

श्री० सखाराम महाराज सं० लोणी येथें श्री० म० पू० प्रल्हाद महाराज यांनीं एक लहानसा आयुर्वेदिक धर्मार्थ दवाखाना उघडला आहे. त्या दवाखान्यांत हे वैद्याचे जागेवर काम करीत आहेत.

## ३५ वैद्यरत्न काशिनाथशास्त्री जोशी

रा० रा० काशिनाथ श्रीधर जोशी यांचा जन्म १५।८।१९०५ रोजीं झाला. हे यजुर्वेदीय माध्यंदिन वाजसनीय ब्राह्मण असून यांचें गोत्र वात्स्यायन आहे. यांचें मराठी शिक्षण इयत्ता ७ वी पर्यंत होऊन त्यांनीं व्हं० फा० परीक्षाही दिली. यांचें संस्कृत अध्ययन जगद्गुरु संस्कृत विद्यापीठ पंचवटी नासिक येथें झालें. यानंतर गुरुवर्यापाशीं अयुर्वेदाध्ययन करून हे पुणें वेद-शास्त्रोत्तेजक सभेची आयुर्वेद प्रथमा व बडोदे येथील आयुर्वेद मध्यमा आणि उत्तमा या परीक्षा देऊन वैद्यरत्न झाले. वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांचेजवळ अनुभव घेऊन ते सध्यां नेर ता० धुळें येथें लोकलबोर्डाचे दवा-खान्यांत वैद्य आहेत.



वैद्यरत्न काशिनाथशास्त्री जोशी



वैद्यरत्न सदाशिव विठ्ठल जोशी

## ३६ वैद्यरत्न सदाशिव विठ्ठल जोशी उदगांवकर

रा० रा० सदाशिव विठ्ठल उदगांवकर राहणार उदगांव (कोल्हापूर) यांचें संस्कृत शिक्षण नासिक येथील जगद्गुरु संस्कृत विद्यापीठांत झालें. यांनीं पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची साहित्य प्रथमा व बडोदे येथील साहित्य मध्यमा या परीक्षा दिल्या. यांचें न्यायशास्त्राचें अध्ययनही चांगलें झालें आहे. गुरुवर्यांजवळ आयुर्वेदाचा अभ्यास करून पुणें वेदशास्त्रोत्तेजक सभेची आयुर्वेद प्रथमा व बडोदे येथील आयुर्वेद मध्यमा व उत्तमा या परीक्षा देऊन ते वैद्यरत्न झाले. सर्व परीक्षांत त्यांस पारितोषिकें मिळालीं आहेत. हे सध्यां श्री० शेट सूरजी वल्लभदास यांचे आयुर्वेदीय धर्मार्थ दवाखाना देवळाली येथें वैद्य आहेत.

## ३७ वैद्य शंकर श्रीधर साकरे

वैद्य साकरे शुक्ल यजुर्वेदीय माध्यदिन गोत्र भारद्वाज. यांचा जन्म शके १८२८ ज्येष्ठ शु॥ १ (सन १९०६) रोजीं पिंपळगांव हरीहरेश्वर ता० पाचोरा जि० पूर्वखानदेश येथें झाला. हे सन १९२८ ते १९३१ पावेतों गुरुवर्य प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांचेकडे शिकत होते. यांनीं संवत् १९८६, सन १९३१ सालीं बडोदे येथील वैद्यकाची मध्यमा परीक्षा दिली व त्यांत यशस्वी होऊन बक्षीस रुपये ५० मिळविलें. हल्लीं हे पिंपळगांव येथेंच लोकल बोर्डाच्या दवाखान्यावर वैद्य म्हणून काम करतात.

## ३८ नरहर काशिनाथ भिडे

हे विद्यार्थी गुरुवर्यांकडे शिकण्यास होते. हे संगमेश्वरचे राहणारे असून शिक्षण मराठी व्हॅ० फा० परीक्षा पास. संस्कृत काव्याचें शिक्षण जगद्गुरु शंकराचार्य ( डॉ० कूर्तकोटी ) यांचे संस्कृत विद्यापीठांत झालें.



वैद्य शंकर श्रीधर साकरे.



वैद्य केशव विश्वनाथ वैद्य

# ३९ वैद्य केशव विश्वनाथ वैद्य

रा० केशवराव वैद्य यांचा जन्म ता. २२ जून १९१० रोजीं झाला. यांचे राहाण्याचें ठिकाण सावदे पूर्व खानदेश हे होय. हेही शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेचे आहेत. यांचें प्राथमिक शिक्षण मराठी ६ इयत्ता पूर्ण असून इंदूर येथें यांनीं संस्कृत महाविद्यालयांत संस्कृतचें अध्ययन ३ वर्षें केलें. पुढें नाशिक येथें वैद्यकाचें अध्ययन गुरुवर्य देवधरशास्त्री यांचेकडे करून हल्लीं हे खांडवा येथें स्वतंत्र धंदा करीत आहेत. खांडव्यास जैन धर्मार्थ आयुर्वेदीय दवाखान्यावर ह्यांनीं वर्ष दीडवर्ष उत्तम काम केलें आहे व ह्यांचा खांडव्यास जम जमत चालला आहे. हे स्वभावानें मनमिळाऊ असून होतकरू आहेत.

---

## ४० वैद्य पांडुरंग गणेश निरंतर

वैद्य पांडुरंगशास्त्री हे सुप्रसिद्ध श्री० गोविंदशास्त्री निरंतर यांचे नातू होत. नाशिकास वैद्य निरंतर यांचें घराणें प्रख्यात असल्याचें मागें आलेंच आहे. यांचा जन्म नाशिक येथें शके १८३५ आश्विन शुद्ध १ ता. १ आक्टोबर १९१३ रोजीं झाला. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. यांचें गोत्र भारद्वाज. यांचें प्राथमिक शिक्षण नासिक येथेंच झालें. हे थोडेसे इंग्रजीही पण शिकले आहेत. यांचा व्युत्पत्तीचा अभ्यास वे० शा० सं० रामशास्त्री वैद्य यांचेजवळ झाला व वैद्यकाचें अध्ययन गुरुवर्य देवधरशास्त्री यांचेकडे व नंतर वैद्यराज त्र्यंबकशास्त्री दाते यांचेजवळ झालें. ह्यांनीं बडोदे येथील वैद्यक विषयाची मध्यमा परीक्षा दिली आहे. व हल्लीं पुढील परीक्षांचा अभ्यास करीत आहेत. हे नाशिक जिल्ह्यांत लोकल बोर्ड दवाखान्यावर भैरवाचे वडनेर येथें वैद्य म्हणून काम करीत आहेत.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय



वैद्य पांडुरंग गणेश निरंतर.



काव्यतीर्थ राजारामशास्त्री कवीश्वर.

## ४१ काव्यतीर्थ राजाराम नीलकंठ कवीश्वर

रा० रा० राजाराम नीलकंठ कवीश्वर यांचा जन्म शके १८२४ भाद्रपद शु॥ १४ रोजीं झाला. हे ऋग्वेदीय देशस्थ ब्राह्मण आहेत. यांचें गोत्र कौंडिण्य. यांचें शिक्षण प्रीव्हियसपर्यंत झालें. कलकत्त्याच्या संस्कृत ॲसोसिएशनची काव्यतीर्थ पदवी परीक्षा, हे पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाले. यांनीं पौर्वात्य आणि पाश्चिमात्य ज्योतिषाचा तुलनात्मक अभ्यास केला आहे. पौवात्य ज्योतिषाचा अभ्यास यांनीं प्रसिद्ध गीता-प्रवचनकार भास्करशास्त्री शुक्ल यांचेजवळ केला. हे पुराण, कीर्तन व प्रवचनेंही करतात. बडोद्याच्या श्रावणमास दक्षिणा परीक्षेच्या आयुर्वेद मध्यमा परीक्षेंत हे शके १८५७ सालीं प्रथमश्रेणींत पहिले आले व यांस ५० रुपये पारितोषकही मिळालें. यांचा आचार्य परीक्षेचा अभ्यास सुरू आहे.

## ४२ काव्यतीर्थ भालचंद्र भास्करशास्त्री शुक्ल

रा० रा० भालचंद्र भास्करशास्त्री शुक्ल यांचा जन्म शके १८३१ चैत्र शु॥ १ ला श्रीक्षेत्र त्र्यंबक येथें झाला. हे ऋग्वेदीय देशस्थ ब्राह्मण. यांचें प्राथमिक शिक्षण त्र्यंबक येथें व प्रवेश परीक्षे ( मॅट्रिक ) पर्यंतचें शिक्षण नासिक येथें त्यांचे मातुल श्री० वामनशास्त्री चांदोरकर यांचे देखरेखीखालीं झालें. कलकत्ता सं० ॲ० च्या साहित्याच्या तीन व व्याकरण मध्यमा या परीक्षा त्यांनीं दिल्या, व ते काव्यतीर्थ झाले. यांचें साहित्याचें अध्ययन त्यांचे तीर्थरूप प्रसिद्ध गीताप्रवचनकार भास्करशास्त्री यांजवळ, व व्याकरणानें अध्ययन त्यांचे पितृव्य श्री० पांडुरंगशास्त्री यांजवळ झालें. शके १८५५ सालीं हे गुरुवर्यांकडे वैद्यकीचें शिक्षण घेण्यास आले. बडोदे व पुणें येथें हे पुढील वर्षी परीक्षेस जाणार आहेत.

## या भागासंबंधीं दोन शब्द.

येथपर्यंत पूर्वसंकलित योजनेप्रमाणें गुरुवर्यांच्या शिष्यांचीं अल्प चरित्रें मिळालेल्या माहितीवरून वर्णिलीं आहेत. या विभागाच्या सुरुवातीसच आम्ही हीं चरित्रें लिहिण्याचा हेतू दिला आहे. या शिष्यवृंदांपैकी कांहींचीं चरित्रें संपलीं आहेत. कांहींचीं चरित्रें उत्कर्षास आलेलीं अशी आहेत. कांहींच्या चरित्राची वाढ खुंटली आहे व कांहींचीं चरित्रें बनत आहेत; असें निदर्शनास येईल. शिष्य संप्रदायाच्या पद्धतीप्रमाणें व गुरुगृहांत वास्तव्य करण्याचा सर्वांना समान अधिकार असल्यानें, सर्व विद्यार्थ्यांच्या चरित्रांचा समावेश करणें हे जरूर होय. आणि या दृष्टीनें चरित्रें लिहीत असतां व देत असतांना वर्ण्यवस्तूंच्या महत्वाकडे व सार्वजनिक उपयुक्ततेकडे पहाण्याची जरुरी असत नाहीं. याच दृष्टीनें येथें या चरित्रांचा समावेश केला आहे.



काव्यतीर्थ भालचंद्रशास्त्री शुक्ल.

गुरुवर्यांच्या घरीं गुरुवर्यांचे चरणाजवळ बसून या सर्व शिष्यांनीं निरनिराळया वेळीं गुरुसामीप्याचा सुखानुभव घेतला असेल. तसेंच अध्यापनाच्या एकेक पर्याय चालू असतां, त्या पर्यायांत असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एकत्र सहवास घडला आहे. तथापि गुरु माऊलीच्या कृपाकटाक्षाखालीं निरंतर बसण्याची इच्छा व हाव, व सर्व सतीर्थ्यांचें एकत्र सदैव संमेलन हे कालाच्या व परिस्थितीच्या मानानें सर्वदा अशक्य, हें तर ठरलेलेंच. तथापि ही इच्छा पूर्ण होऊन व हें संमेलन प्रत्यक्ष शक्य नसलें तरी अप्रत्यक्षपणें सदैव घडत असावें हाही या चरित्रास हें प्रकरण जोडण्याचा महत्त्वाचा उद्देश होय. आपलीं चरित्रें कांहींतरी निमित्तानें लिहिलीं जाऊन प्रसिद्ध व्हावींत, असा क्षुद्र विचार या प्रकरणाच्या मुळाशीं नाहीं व सर्व शिष्यांच्या अंतःकरणांतही वास्तव्य करीत नाहीं हे येथें नम्रपणें नमूद करणें अवश्य वाटतें. मानुषजीवनाच्या कोणत्याही विभागांत अत्यंत उत्कटत्वानें आपलें अस्तित्व दाखविल्याशिवाय चरित्रलेखनास पात्रता येत नाहीं हें, सर्व शिष्यवृंद जाणून आहे. शिष्यांच्या चरित्र दर्शनानें झालें तरी गुरुवर्यांचेंच चरित्र संपूर्ण होणार आहे. अर्थात् त्या चरित्राच्या पूर्ततेसाठींही हा भाग लिहिणें जरूरच होतें. अर्थात् गुरुवर्यांच्या चरित्राचाच हा एक भाग होय. ह्या चरित्रांत आढळून येणारा अकर्तृत्वादिक दोषांचा जो कांहीं भाग असेल तो शिष्यवृंदाचा नैसर्गिक होय. आणि कर्तृत्वाचा अंश जो कांहीं आढळून येईल तो गुरुवर्यांच्या कृपेचें फळ होय.

यदत्र सौष्ठवं किंचित् तत्गुरोरेव मे नहि ।
यदत्राऽसौष्ठवं किंचित् तन्ममैव गुरोर्नहि ॥ १ ॥

इतकें स्पष्टीकरण करून हें प्रकरण आम्ही येथें संपवितों.

परिशिष्ट.

# समारंभाचें इतिवृत्त.




सत्कार-समारंभाचे वेळीं.

# भिषगाचार्यांचा सत्कार.

( वृत्तलेखक:- केशव गोपाळ दाते नासिक. )

श्री आणि सरस्वती यांचीं निवासस्थानें निसर्गत:च भिन्न असतात आणि म्हणूनच जगतांत कोठें श्री-सरस्वतींचा संयोग दिसून आला तर ती असामान्य अशी गोष्ट मानली जाते-श्री सरस्वतींनी एकत्र केलेल्या, अशा निवासाला महत्व प्राप्त होतें. भिषगाचार्य श्री. कृष्णशास्त्री देवधर यांचें ठिकाणीं श्रीसरस्वतींचा अपूर्व संयोग झालेला असल्यानें ते, कौतुकाचा आणि आदराचा विषय होऊन रहावे यांत नवल काय? आयुर्वेदसरस्वती भिषगाचार्य देवधरांच्या जिव्हेवर नाचत आहेच पण श्रीनेंही आपलें कृपाछत्र त्यांच्यावर मोठ्या प्रसन्नतेनें धरले आहे. या दोहोच्या सार्थाला विनयानेंही आपली गर्द छाया गुरुवर्य देवधरांवर पसरलेली असल्यानें त्यांच्या श्री-सरस्वतीच्या ऐश्वर्याला एकप्रकारचें तेज चढलें आहे यांत संदेह नाहीं. श्री-सरस्वती आणि विनय यांनी मंडित असलेल्या श्री० देवधरांच्या 'वामनमूर्तिपुढें' सहृदयजनांनी आदरानें नतशीर्ष व्हावें यांत आश्चर्य कसलें? विशेष संबंध न येणारानेंही ज्यांच्यापुढें साहजीकच नम्र व्हावें हा ज्यांचा महिमा, त्याच महाभागांच्या चरणाजवळ बसून ज्यांनी अध्ययन केले व आपल्या भावी यशस्वी आयुष्याचा आराखडा आखून घेतला त्या शिष्यवृंदांनी गुरुजींचें अपूर्व स्वागत करण्याची मनिषा अंत:करणांत बाळगावी हें साहजीकच!!

## सत्काराची कल्पना व मूर्तस्वरूप.

गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांच्या शिष्य मंडळींच्या मनांत त्यांचा सत्कार करण्याचें फार दिवसापासून असलें तरी परवापर्यंत ती

कल्पना सत्यसृष्टींत येऊ शकली नाहीं हें खरें! प्रत्येक शिष्यानें गुरुजींचें मनोमय स्वागत करून सत्काराची तहान भागविली असेल पण प्रत्येकाच्या पुण्याईनें प्रत्येकाला " थाटाचा सत्कार करण्यास मिळून, " आपली फार दिवसाची स्वेच्छा परवा तृप्त करतां आली. ही इच्छातृप्तिही त्यांच्या गुरुकृपेचेंच फळ होय. गुरुवर्य देवधरांकडे त्यांच्या नातवाची मुंज गेल्या वैशाखांत झाली. त्यानिमित्तानें बरीच शिष्य मंडळी नाशकास जमण्याचा योग आला. बरेच शिष्य एकत्र जमल्यावर " संहतिः कार्यसाधिका " या न्यायानें जी सत्काराची गोष्ट एकेकजण करू शकत नव्हता ती चुटकीसरशी साधू लागली. वे० मू० वामनशास्त्री दातार यांच्या दवाखान्यांत ता० १२।५।३५ रोजीं उप-स्थित शिष्यवृंद जमा झाला आणि " सामुदायिक सत्कार " करण्याचें निश्चित करण्यांत आलें. पुढील व्यवस्थेपैकीं एकेका गोष्टीचा भराभर उलगडा होत जाऊन कार्यव्यवस्थेसाठीं एक मंडळही निवडण्यांत आलें.

## कार्यकारी मंडळ.

अध्यक्षः- वे० मू० वामनशास्त्री दातार.

उपाध्यक्षः- वे० र० विष्णुशास्त्री केळकर.

मंत्रीः- वे० त्र्यंबकशास्त्री दाते व सदाशीवशास्त्री लव्हाटे.

कोषाध्यक्षः-वे० दिनकर कृष्णशा० देवधर.

सभासदः- वे० गोपाळशास्त्री तरटे, पांडुरंगशा० दाणी, पांडुरंगशा० निरंतर, राजारामशा० कवीश्वर, भालचंद्रशा० शुक्ल.

सर्वारंभास्तडुलाः प्रस्थमूलाः म्हणतात त्याप्रमाणें सत्कार मंडळाने पहि-ल्यानें अर्थाची व्यवस्थाच हातीं घेतली. सत्काराला प्रत्येक शिष्याचा हार्दिक पाठिंबा होताच. प्रत्येक शिष्याचा याबाबदचा उत्साह सारखाच असला तरी विषम जगांतच ते सर्व वावरत असल्यानें द्रव्याबाबद समता राखणें त्यांना कसें साधणार? पण इतकी गोष्ट खरी कीं प्रत्येकाने आपापल्यापरी सत्कारार्थ द्रव्य देण्याचे पत्करून मोकळ्या अंतःकरणानें आपला वाटा उचलला.

सत्कार मंडळाचे अध्यक्ष दातारशास्त्री यांचेवर गुरुवर्यांच्या चरित्रलेख-नाची जबाबदारी टाकण्यांत आली व त्यांनीही ती योग्यतया पार पाडली.

अध्यक्ष, मंत्री व इतर सभासद यांच्या निरलस मेहनतीने सत्कारसमारंभाच्या आधींचें प्राथमिक कार्य अत्यंत व्यवस्थितपणें पार पडून ता. २१।१२।३५ रोजीं व्हावयाच्या सत्कारसमारंभाची पार्श्वभूमि ठाकठीक रंगवून ठेवण्यात आली. धुळयाचे प्रसिद्ध महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांनी समारंभाचे नेतृत्व स्वीकारण्यास संमती दिल्यानें कार्यकारी मंडळाचा उत्साह द्विगुणित झाला असेल यांत आश्चर्य कसलें? वृद्ध गुरुवर्यांना त्रास होऊ नये एवढ्यासाठीं सत्कार मंडळानें सर्व व्यवस्था गुरुजींच्या घरींच ठेवली. जाहीर सत्कारासाठींच फक्त श्रीबालाजीच्या भव्य मंदिरांत व्यवस्था करण्यांत आली होती.

## अगोदर दोन दिवस

समारंभ शनिवारीं होता. पण शिष्यवृंदापैकी पर ठिकाणी असणारे शिष्य गुरुवारपासूनच येण्यास प्रारंभ झाला. येणारांच्या ताज्या उत्साहामुळें सत्कार मंडळाचा उत्साह वाढतच होता. एकंदर सर्वच वातावरण आनंदमयच झालें होतें. पुण्याहून भिषगाचार्य नानल समारंभास मुद्दाम आले होते. रा. कालिदास नाना पाठक, पांडुरंगशा० शुक्ल, निलकंठबुवा कवीश्वर, गुरुजींचे मित्र श्री. भाऊसाहेब कानेटकर व बळवंतराव प्रभुणे, व्याही कल्याणचे बाबुराव रानडे, बंधु गणपतराव सहकुटुंब, जांवई बाबुराव सहस्त्रबुद्धे सहकुटुंब सहपरिवार, ही व इतर मंडळीही आलेली दिसत होती.

## परस्थ शिष्य मंडळी

प्रो. प. ल. वैद्य पुणें, हरीशा० पराडकर अकोले, रामदासशा० पाठक यावल, वे. भू. केशवाचार्य अवधानी विजापूर, वे. र. शामशा० शिंदे हसूरचंपू, वे. र. सदाशीवशा० जोशी देवळाली, वे. र. काशिनाथशा० जोशी नेर, पांडुरंगशा० अकोटकर मालेगांव जहागीर, वे. सावदेकर खांडवा, आयुर्वेद वि० मनोहरशा० जोशी लोणी (वऱ्हाड), वे. भास्करशा० धर्माधिकारी पाचोरे, दत्तुशा० टिल्लू चोपडे, आयुर्वेदपटु वामनशा० खेडकर नगरदेवळें, वे. गोखले भोर, वे. निरंतरशा० वडनेर, ही शिष्यमंडळी मुद्दाम परगांवहून आली होती. गांवांतील सर्व शिष्यमंडळीही सत्कारासाठीं झटत होतीच.

शनिवार मार्गशीर्ष वद्य ११

## सकाळचें पूजन.

सर्व शिष्यवृंदातर्फे विद्यमान शिष्यांपैकी सर्वांत ज्येष्ठ शिष्य आयुर्वेदपटु वामनशा० खेडकर यांनी शनिवारीं सकाळीं ८ वाजतां गु. देवधर यांचें पुण्याहवाचनयुक्त समधुपर्क पूजन केलें. गुरुमातोश्री सौ. रुक्मिणीबाई यांचीही पूजा करण्यांत आली. सनई चौघडयाच्या मंजुळ निनादांत व गांवांतील ठळक ठळक चतुःशास्त्रीय ब्रह्मवृंदांच्या पवित्र सहवासांत पूजन समारंभ फारच थाटानें पार पडला. म. म. पाठकशास्त्री यांनी तो देखावा पाहून 'अपूर्व समारंभ' असे आश्चर्योद्गार काढले. पूजनाचे वेळीं वेदघोषही सुरू होता. पूजनानंतर गुरुजींचा सोवळयांतच सपत्नीक फोटो काढण्यांत आला. सशिष्य असेंही एक छायाचित्र घेण्यांत आलें. पाहुणेमंडळीसह एक फोटो घेण्यांत आला. अध्यक्ष पाठकशास्त्री यांचा फोटो काढण्यांत आला. एवढे होऊन सकाळचा कार्यक्रम पार पडला.

## जाहीर सत्कार

सायंकाळीं श्रीबालाजी मंदिराच्या भव्य सभामंडपांत जाहीर सत्काराची व्यवस्था करण्यांत आली होती. अध्यक्ष व गुरुवर्य देवधर यांच्यासाठीं उच्चासन ठेवण्यांत आले होते. आमंत्रित सद्गृहस्थांसाठीं पेशवाई थाटाच्या भव्य बैठकीची योजना केलेली दिसत होती. येणाऱ्या गृहस्थांना सन्मानानें योग्यजागीं बसविण्याची सत्कारमंडळाकडून काळजी घेतली जाताना दिसत होती. सत्कार समारंभापूर्वी अध्यक्ष, गुरुवर्य देवधर, गांवांतील प्रमुख वैद्य डॉक्टर मंडळी, इतर गृहस्थ व शिष्य यांचा फोटो घेण्यांत आला व सायंकाळीं अदमासे ५॥ ला समारंभास प्रारंभ झाला.

सभारंभास शहरांतील निरनिराळया व्यवसायाचे व दर्जाचे लोक उपस्थित होते. उपस्थित मंडळींत सरदार भय्यासाहेब विंचूरकर, मालेगांवचे सरदार राजेबहादूर, नासिकचे सरदार राजेबहादूर, श्रीमंत नानासाहेब बालाजीवाले, कवि कौस्तुभ बाबासाहेब कुलकर्णी, वे. शा. सं. रामशास्त्री वैद्य, वासुदेव दी. खेडकर, नानासाहेब कुटे, वे. अण्णाशा० वारे, रावसाहेब शौचे, ह. भ. प.



पूजनानंतर गु० देवधर व गुरुपत्नी

पांगारकर, श्री. भाऊसाहेब पाटणकर, श्री. भाऊसाहेब अकूत, श्री. दादासाहेब गद्रे, काकीसाहेब गद्रे, किसनलालशेट चक्रपाणी, रावसाहेब पंचाक्षरी, रा. सा. व्ही. एम्. कुलकर्णी, डॉ. आठवले, चोभे, दामले, देवळालकर, गद्रे, पाठक, गायधनी, श्री. बाळासाहेब वैशंपायन श्री. सरदार अण्णासाहेब देशपांडे, वैद्यराज घारुअण्णा रानडे, ऑनररी मॅ. श्री. तळाजिया, श्री. अनंतराव वेलदे, शेट भिकचंद रायचंद, उत्तमचंद अमोलकचंद, चांदमलशेट, दामुअण्णा चंद्रात्रे, सखारामबुवा पुजारी वगैरे मंडळी प्रामुख्यानें दिसत होती.

प्रारंभी गायनपटु दीक्षित यांच्या नाथ संगीत विद्यालयांतील विद्यार्थ्यांनीं सुस्वरांत ईशस्तवन म्हटल्यावर वैद्य रा. तात्याशास्त्री महाजन यांनी खालील स्वकृत कविता गाऊन दाखविल्या

जायंते यदि बहुमानवाः पृथिव्याम् ।
नश्यंति क्वचिदपि, का तु तत्र वार्ता ।।
जातः स, प्रथितयशः प्रभाभिभूतान् ।
लोकान् यः खलु कुरुते, नरोऽत्र कश्चित् ।। १ ।।
यो राजवैद्यगणभूषणकृष्णशास्त्री ।
कीर्त्या, धिया, सदुपकारतया, प्रसिद्धः ।।
दानैकतत्परमतिर्नवनीतचेताः ।
प्राप्नोतु मंगलततिं शरदां शतं सः ।। २ ।।
सच्छास्त्रपाठनिरतो निजशिष्यवृंदं ।
विद्यां ददावुभयलोकहितप्रदां यः ।।
रुग्णार्तिनाशनपरः किमु देववैद्यः ।
प्राप्नोतु मंगलततिं शरदां शतं सः ।। ३ ।।
अन्यो गुरुर्यदपि शिक्षयति स्वशिष्यं- ।
साम्यं ददाति सकलं, न तदर्थहानिः ।।
वैद्यो गुरुः प्रकुरुते निजवित्तहानिं ।
गुर्वन्तराच्च सकलात् स तु किं न भूयान् ।। ४ ।।
सत्तीर्थधामकृतचंक्रमणः क्षमावान् ।

श्रीकृष्णपूजनरतो बहुकार्यदक्षः ॥
दानेन सत्यमवशीकृतदातृवर्गः ।
प्राप्नोतु मंगलततिं शरदां शतं सः ॥ ५ ॥
काव्यशास्त्रविहीनेन । तमोभिहतबुद्धिना ॥
भक्त्याकृतमिदं काव्यं । पादयोरर्प्यते मया ॥ ६ ॥

यानंतर देवधरांचेच एक शिष्य काव्यतीर्थ राजारामशा० कवीश्वर यांनी म. म. केशवराव ताम्हन नागपूर यांचेकडून आलेला यशश्चितनपर श्लोक म्हणून दाखविला.

जातो देवधरान्वये सहृदयः श्रीकृष्णसंज्ञः सुधीः ।
लब्धाचार्यपदः स्वधर्मनिरतो वैद्याग्रगण्यो गुरुः ॥
दातारादिभिरद्य शिष्यनिवहैः स्थाने मुदाऽभ्यर्च्यते ।
श्रेयःसाधनमुद्यमोऽत्रभवतां कस्याभिनन्द्यो न हि ॥ १ ॥

एका पंचवटीवासी कवींनी केलेल्या खालील कविताही राजारामशास्त्री यांनीच म्हटल्या

अयि नासिकपूर्निवासिनां भिषजां भूषण कृष्णपंडित ।
क्रियते धर ! देवपूर्व ! ते सदसि स्वागतमत्र संप्रति ॥ १ ॥
निसर्ग एवैष लघीयसो यत् कुतो नु विद्या बत निर्धनस्य ।
इति प्रजल्पन्ननधीत एव व्यर्थं स आयुः क्षपयत्यशेषम् ॥ २ ॥
जातेनाप्यधनेन दुर्विधिवशात् विद्याभिलिप्सावता ।
कष्टामप्यतिपावनीं मधुकरीं वृत्तिं मुदाऽऽश्रित्यहि ॥
तास्ताः क्लेशकरीर्विपह्य विपदः शांत्या समाराधिता ।
प्राणिप्राणहरामयास्वपहरा विद्या त्वया श्रद्धया ॥ ३ ॥
अन्यादृशी ते स्वगुरौ गणेशे भक्तिर्यतस्त्वं निलये तदीये ।
यप्राप्तकालं किल तद्विधाय व्यस्मार यस्तं तनयं गतासुम् ॥४॥
स्वगतां वितीर्य विद्यां कृपया समुदारचेतसा भवता ।
नूनमुपकृता नितरां छात्रास्त्वीया अदूरपंचाशाः ॥ ५ ॥
प्रदाय नैकसंस्थाभ्यः भवता मुक्तपाणिना ।
स्वार्थस्सार्थकतां नीतः जीयात्ते यश इत्यलम् ॥ ६ ॥

श्री. देवधरशास्त्री यांचे मित्र कविकौस्तुभ बाबासाहेब कुलकर्णी यांनी खास समारंभासाठीं केलेल्या खालील सुंदर कविता बाबासाहेबांचे भाचे श्री. पुरुषोत्तमपंत गोसावी यांनी म्हटल्या.

अधो भवति मानुषं भवति मूर्ध्नि नागाकृतिः ।
चतुर्भुजमलंकृतं रुचिरभूषणैश्चायुधैः ॥
तदेव पुरतोऽस्तु ते प्रतिपलं गणेशं महः ।
कटाक्षलवतोऽपि यत् जगदिदं बिभर्ति स्वयम् ॥ १ ॥

विश्वेषामखिलचराचरात्मकानाम् ।
उत्पत्तिस्थितिलयकृद्धरेः प्रसादात् ॥
जीवत्वं सुखमवनौ सुराजमान्यः ।
वर्षाणां शतमधिकंच वा यथेष्टम् ॥ २ ॥

निर्व्याधिर्निरभिभवोनिरस्तशंको ।
भुंजानः सुखमविनाशिलुप्तदुःखम् ॥
दीर्घायुर्युतसदपत्यशोभिपार्श्वः ।
जीव त्वं विशदमते शतं समानाम् ॥ ३ ॥

अक्षय्याऽमलशरदच्छमेघपंक्तिः ।
निर्दोषाऽमलशरदिंदुचंद्रिका वा ॥
कीर्तिस्ते लसतु दिगंतरालधाम्नि ।
सार्धं सा हतरिपुभिर्विनष्टकामैः ॥ ४ ॥

स्वस्त्यस्तु देवधरवंशसमुद्भवाय ।
कृष्णाय वैद्यगणराजदयावराय ॥
सच्छिष्यवृंदसुखदाय भिषग्वराय ।
प्राज्ञाय पञ्चदश-पञ्च-समाक्रमाय ॥ ५ ॥

न स्वागतं कर्तुमसौ समर्थः ।
न चापि दातुं किमपि क्षमोऽयं ॥
न चापि वक्तुं रसनास्यमूढा ।
वृद्धस्य शक्ता गुणवर्णने ते ॥ ६ ॥

शांडिल्यगोत्रोद्भवरामचंद्र- ।
तनूभुवत्र्यंबकवर्णितेयम् ॥
अल्पाकृतिः प्रीतियुता ददातु ।
कृष्णाय सश्रीकसुदीर्घमायुः ॥ ७ ॥

## स्वागतपर भाषण

कार्याध्यक्ष वैद्यभूषण दातारशास्त्री यांनी खालील आशयाचें भाषण करून सर्वांचें स्वागत केलें.

'भिषगाचार्य गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांच्या वयास ७५ वर्षें पूर्ण होऊन ते ७६ व्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. त्यानिमित्त आजचा हा सत्कारसमारंभ आहे. आम्हां गुरुवर्यांच्या सर्व शिष्यांच्या आयुष्यांतील हा अत्यंत महत्वाचा व आनंदाचा दिवस आहे. ज्यांच्या चरणाजवळ बसून आम्हीं आयुर्वेदाचें अध्ययन केलें व ज्यांच्या कृपाप्रसादानेंच आम्हीं सर्व आपापलें उदरपोषण करीत आहोत त्या महाभागांच्या ७६ व्या वर्षी त्यांचा सत्कार करण्याचें भाग्य आम्हांस लाभलें ही गोष्ट खरोखर अत्यंत आनंदाची आहे. आपण सर्व आमच्या विनंतीस मान देऊन गुरुवर्यांच्या सत्कारांत भाग घेण्यासाठीं येथें जमलात याबद्दल आम्हांस अत्यंत समाधान वाटत आहे. आजच्या समारंभाला तपोनिष्ठ, धर्मनिष्ठ, समाजकार्यतत्पर, विद्वद्शिरोभूषण महामहोपाध्याय श्रीधरशास्त्री पाठक यांच्यासारखा अधिकारी अध्यक्ष लाभला आहे. आपला फार वेळ न घेता, आपलें सर्वांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करून, म. म पाठकशास्त्री यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें अशी मी त्यांस नम्र विनंती करतो.'

सूचनेस अनुमोदन देताना वाडीया कॉलेजांतील सुप्रसिद्ध प्रोफेसर श्री. प. ल. वैद्य म्हणाले 'गुरुवर्य देवधरांची योग्यता इतकी मोटी आहे कीं, त्यांच्या सत्कार समारंभाला त्यांच्या तोडीचा अध्यक्ष कसा लाभेल हाच आमच्यापुढें प्रश्न येऊन पडला होता. तितक्या योग्यतेचा अध्यक्ष लाभूनही तो जर गुरुवर्यांचें चरित्र सम्यक्तया न जाणणारा असा असता तर त्याला आम्ही शिष्यांनीं दिलेल्या माहितीवरच अवलंबून रहावे लागले असते. त्यादृष्टीनें

समारंभाला उणेपणाच आला असता. पण आज आपणांस लाभलेले अध्यक्ष सर्वप्रकारांनी योग्य असेंच आहेत. विद्वत्तेंत त्यांचा अधिकार मोठा आहेच पण त्यांचा आमच्या गुरुजींशीही चांगलाच परिचय आहे. 'म. म. पाठकशास्त्री यांनी अध्यक्षस्थान स्वीकारावें' या सुचनेस मी अनुमोदन देतो.'

वे. रा. भास्करशास्त्री धर्माधिकारी यांनी सुचनेस पुष्टि दिली.

वानप्रस्थाश्रमी म. म. पाठकशास्त्री हे गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधरांना घेऊन आसनस्थ झालें तेव्हां सर्वांनी टाळयांच्या गजरांत त्यांचें स्वागत केलें. उभयतांना पुष्पहार घालण्यांत आले. वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार केलेल्या म. म. श्रीधरशास्त्री पाठकांची मूर्ती तेजस्वी व शांत अशी दिसत असल्यानें समारंभास एक प्रकारची शोभा व तेज चढल्याचें दिसत होतें.

अध्यक्षांनी थोडक्यांत प्रास्ताविक भाषण करून कार्यक्रमास सुरवात करण्याची अनुज्ञा दिल्यावर वे. भू. वामनशास्त्री दातार यांनी समारंभानिमित्त आलेले शुभचिंतनपर संदेश वाचून दाखविले.

## संदेश

सत्कार समारंभाला ज्या सद्गृहस्थांना येणें शक्य झाले नाहीं त्यांनीं शुभचिंतनपर संदेश पाठवून गु० देवधरांबद्दल आपली पूज्य बुद्धि व्यक्त केली. भिषगाचार्य यांच्या चाहत्यांनीं शुभचिंतनाच्या निमित्तानें पाठविलेल्या संदेशांत ठिकठिकाणीं आयुर्वेदशास्त्राचें महत्व व भिषगाचार्यांच्या अंगीं वसत असलेल्या नानाविध गुणांचे प्रतिबिंब फारच सुंदर रीतिनें व्यक्त होत असल्यानें त्यांतील निवडक भाग देण्याचा मोह आम्हास आवरत नाहीं.

म. म. वासुदेवशास्त्री अभ्यंकर, पुणें:— आपण योग्यवेळीं अत्यंत स्तुत्य असे करण्याचे योजिले आहे.

श्री समर्थदास रामदासी, मठ इंदुरबोधन:— या समारंभास माझी पूर्ण सहानुभूति आहे.

वैद्यपंचानन गंगाधर गोपाळ गुणे, नगर:— आपली कल्पना अपूर्व आहे. योजनाही उत्कृष्ट व नामी आहे. समारंभाची रचना चातुर्य—

परीपूर्ण आहे. या सर्व कार्याच्या मुळाशी असलेली भावनाही अपूर्वच आहे. श्री० देवधरशास्त्री यांनीं आजवर शिष्यशाखा पढवून आयुर्वेद राखला याबद्दल त्यांचेही आभार मानणें मी माझे कर्तव्य समजतो. शरीरानें नसलो तरी मनानें मी या समारंभास आहे असे समजा, म्हणजे या गोड समारंभाच्या स्मृतीचा गोडपणा मला अधिकच गोड वाटेल.

श्री० ना. गो. चापेकर, बदलापूरः— प्राचीन आयुर्वेदाच्या परंपरेचा अभिमान बाळगून जनतेला अभिमान वाटण्यासारखी लोकसेवा श्री० देवधरशास्त्री यांनी केली असल्यामुळें त्यांचा सत्कार समारंभ होऊन त्यांच्याबद्दल वाटणारा आदर व कृतज्ञताबुद्धि जनतेनें व शिष्यमंडळींनी व्यक्त करावी हे अगदी स्वाभाविकच आहे.

डॉ० के. एस्. म्हसकर, मुंबई (दादर):— गु० देवधर यांच्या विद्वत्तेबद्दल, कामगिरीबद्दल व आयुर्वेदसेवेबद्दल अत्यंत आदर वाटतो.

श्री० चिटणीस वेदशास्त्रोत्तेजक सभा, पुणें:— सभेच्या कार्याची उपयुक्तता श्री० कृष्णशास्त्री यांस मान्य होऊन त्यांनी सुमारें दहा वर्षापूर्वी सभेस ५०० रुपये देऊन उपकृत केले आहे. ती देणगी देतांना श्री० कृष्णशास्त्री यांनी त्यांचे गुरु कै० गणेशशास्त्री तटे यांस (कृतज्ञतांजली) वाहिली होती कारण त्या रकमेच्या व्याजाचा विनियोग श्री० तटेशास्त्री यांच्या नांवानें पारितोषिकें देण्यांत करण्याविषयीं अट घातलेली आहे. तोच कृतज्ञताबुद्धिचा उत्कर्ष त्यांना आज आपणासारख्या शिष्यवृंदाच्या कृतज्ञतांजलिपूर्वक ग्रंथ समर्पणानें पहावयास मिळत आहे हें त्यांचें थोर भाग्य होय.

श्री० चिटणीस आर्यांग्ल वैद्यक विद्यालय, सातारा:— आर्यांग्ल वैद्यक विद्यालयातर्फे गु० देवधरांना दिर्घायुष्य चिंतावें अशी नम्र विनंति आहे.

श्री० शंकर श्रीकृष्ण देव, श्रीसमर्थ वाग्देवता मंदीर, धुळें:— भिषगाचार्यांच्या औदार्याचा व धार्मिकवृत्तीचा लाभ श्री समर्थ कार्याला

अनेकदां झाला आहे. आतां परवा त्यांनीं या मंदीरास १०१ रुपयांची मदत केली आहे याबद्दल मला नेहमीं कृतज्ञता वाटत आली आहे.

रावबहादुर हणमंतराम रामनाथ, पुणें:— श्री० देवधरशास्त्री यांची अपूर्व विद्वत्ता व परोपकारवृत्ति पाहतां हा समारंभ आपण करण्याचे ठरविले ते फारच उत्तम केले.

राजवैद्य पं० किशोरीदत्तशास्त्री, कानपूर:— विदुषां सत्कार एव स्वकीयः शास्त्रसत्कारः। समुचित एवायं सत्कारः।

वैद्यपंचानन कृष्णशास्त्री कवडे, प्रधानमंत्रि नि० भा० आयुर्वेद महामंडळ विद्यापीठ व भिषगाचार्य त्रिंबकशास्त्री आपटे, आयुर्वेद विद्यापीठ मंत्री, पुणें:— प्राणाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांनीं केलेली आयुर्वेदाची सेवा अमोल आहे यांत संशय नाहीं. त्यांनीं आजमितीपर्यंत अध्ययनाअध्यापनाची आपल्या गुरुंची उज्वल परंपरा कायम टेविली आहे. महाराष्ट्रांत आपली शिष्यशाखा पसरविली आहे व त्यांचा जीवनक्रम भावी वैद्यांना आदर्शभूत झाला आहे.

चिटणीस प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई:— गुरुवर्य देवधर यांचा अधिकार वैद्यकशास्त्रात फार मोठा आहे. अशा थोर गृहस्थांचा आपण सत्कार करण्याचे ठरविले हे अत्यंत उचित आहे.

डॉ० द. व. खाडिलकर, नाशिक हल्ली पंचगणी:— अजून प्रकृति सुधारली नाहीं. मला गुरुवर्य देवधरांबद्दल अत्यंत आदर वाटतो. समारंभास मी हजर नसलो तरी आपण गुरुवर्य देवधरांस जी सत्कारांजली अर्पण करणार आहांत त्यांत माझेही एक आदरसुमन वैद्यवर्यास अर्पण करण्यास चुकूं नये. नाशिक येथें एकादें आयुर्वेदीय रुग्णालय सुरूं करून तेथें गु० देवधर यांचा सन्मान करण्याची वेळ आपण सर्वजण आणूं तेव्हांच या कर्तबगार पुरुषाचे ऋणांतून आपण अंशतः तरी मुक्त होऊं असें मला वाटते.

पंडित एम्. दुरैस्वामी अय्यंगार, मद्रास:— श्री देवधर महाशयानां अविश्रांतं श्रेयः, अखिलदिग्व्यापि यशः, अति दीर्घं निरामयम् चायुः अहं आशासे.

श्री० त्रिंबकशास्त्री धामणकर, मुख्य अध्यापक महाराष्ट्र आयुर्वेद विद्यालय मुंबई व सहकारी शिक्षकः– गेल्या पन्नास वर्षांत आयुर्वेदाची निस्सीम सेवा ज्या महाभागांनीं केली त्यापैकीं कै० बाबासाहेब लांग-वणकर पुणें व त्यांच्याच तोडीचे महान् कार्यकर्ते वयोवृद्ध, ज्ञान-वृद्ध, आयुर्वेदाचें शिक्षण देऊन आयुर्वेद महाराष्ट्रांत टिकवून धरून त्याचा प्रसार व प्रचार करणारे थोर पुरुष गुरुवर्य कृष्णशास्त्री देवधर यांचे अभिनंदन व सत्कार होत आहे हे महाराष्ट्राला भूषणास्पद आहे. प्रतिकूल परिस्थितींत कोणाची फारशी मदत व उत्तेजन नस-तांना आयुर्वेद ज्यांनी सशास्त्र टिकवून धरून जनतेच्या आदरास पात्र केला अशा कार्यकर्त्यांची उदाहरणें सर्वांना स्फूर्तिदायक व अनु-करणीय आहेत.

श्री० लक्ष्मण गंगाधर प्रभुणे, दर्यापूरः– नाशिक हें जसे महा-राष्ट्राचें धार्मिक केंद्र आहे तसे गेल्या ४० वर्षांपासून हें एक वैद्यकीय केंद्र श्री० देवधरशास्त्री यांनीं बनविलें.

श्री० केशव गणेश जोशी, आरोग्यालय रत्नागिरीः– श्री० देवधरशास्त्री यांच्या सारख्या थोर व कर्तव्यदक्ष विभूतीचा त्यांच्या शिष्यवर्गाकडूनच काय पण उभ्या महाराष्ट्राकडूनही सत्कार होणें उचित आहे.

श्री. गिरधर शर्मा चतुर्वेदः, संस्कृत कॉलेज जयपूरः– भिषगाचार्य श्री कृष्णशास्त्री देवधरमहाभागानां यदभिनंदनमनुष्ठीयते तदिदं अतीव हर्षा-स्पदं सर्वात्मना मे सहानुभूतिः

श्री. वैद्यभूषण गोविंद मेराळ चंद्रात्रे व डॉक्टर गंगाधर गोविंद चंद्रात्रे, जळगांवः– गुरूस अध्यात्मिक पिता मानणें व अशा गुरूच्या सान्निध्यांत विद्यार्थ्यानें शिक्षण घेणें हें आर्यपरंपरेचें वैशिष्ट्य. या शिक्षण पद्धतीनें गुरुशिष्यांचे दळणवळण सतत राहून गुरूस स्नातकांच्या उन्नतीकडे वैयक्तिक लक्ष देण्यास सुलभ जातें. शीलसंवर्धन, आत्मगुणपरिपोषण, व्यक्तित्वविकसन, व स्वकर्तव्यक्षमता हे हिंदूशिक्षणाचे मुख्य उद्देश असून

ते मिळविणेंचे कामीं गुरुसान्निध्य शिक्षणपद्धति श्रेष्ट दर्जाची भूमिका होय. आजच्या शाळा कॉलेजांतून मिळणारें शिक्षण कितीही उच्च असले तरी तें वरील कसोटीला कमीच उतरते असा अनुभव येऊं लागला आहे. आपणांस श्री. कृष्णशास्त्री हे विद्वान, सरळ, प्रेमळ व कळकळ बाळगणारे असे गुरुवर्य लाभले. त्यांनी केलेलें सोज्वल कार्य यापुढें महाराष्ट्रास द्योतक आहे.

वैद्यचूडामणी गोपाळशास्त्री राजवाडे, हिमालय वैद्य नागपूरः— श्रीमद्भिः आरब्धं कार्यम् अतीव योग्यं अस्ति। स्थाने एव नियोगः भवति अत एव.मम हृदयपुरःसरा सहानुभूतिः अस्ति।

आयुर्वेदाचार्य पांडुरंग हरी देशपांडे, पुणेंः— गुरुवर्य देवधर शास्त्रीबुवांना सा. नमस्कार सांगावा. त्यांचा माझा प्रत्यक्ष परिचय नसला तरी नाशिकचें संमेलन, येथें त्यांचें झालेलें भाषण व आ. म. मंडळांतील त्यांचा सन्मान याप्रसंगी त्यांच्या विद्वत्तेची कल्पना येऊन त्यांचेविषयीं आदर वाटूं लागला.

श्री. गणेश त्रिंबक वैद्य लागवणकर, मुंबईः— मंत्रोपदेशाचे गुरूचे सत्कार समारंभ नेहमी होत असल्याचे ऐकूं येते परंतु हा समारंभ अपूर्व आहे. हा सत्कार श्रीयुत शास्त्रीबुवांचा हे खरे. त्यांनी आयुर्वेदपठण करून तो अनेक शिष्यांस पढविला व त्याची वृद्धि केली त्याचाही हा समारंभ आहे.

वैद्य नारायण विठ्ठल सातपुते, बाळापूर वऱ्हाडः— एकाद्या आयुर्वेद सुप्रसिद्ध संस्थेप्रमाणेंच आपला वेळ सांभाळून शिष्य प्रशिष्य रूपानें गु. अण्णांनी बृहन्महाराष्ट्राला सुसंस्कृत वैद्य पुरविण्याचे अतिशय महत्वाचें कार्य केलेले आहे. (सदर गृहस्थ हे वैद्यभूषण दातारशास्त्री यांचे शिष्य होत.)

रावबहादुर पुराणिक, वणी वऱ्हाडः— आपण मान्य पुरुषाचा सत्कार करून योग्य अभिनंदन करीत आहां याबद्दल मला अनिर्वचनीय आनंद वाटत आहे. श्री० देवधरशास्त्री हे होणाऱ्या सन्मानास अगदी पात्र आहेत अशी माझी मनोभावना आहे.

श्री० केशव बाळकृष्ण परांजपे, सोलापूरः- वास्तविक पहातां आपल्या छात्रगणानें हा समारंभ मागेच घडवून आणणें जरूर होते. प्रेमळ व अंतःकरणपूर्वक लौकर नाहीं तरी उशिरा कां होईना छात्रगणानें समारंभ करण्याचे योजिले हे त्यांना व त्यांच्या गुरुवर्यांना भूषणकारक व तसेंच आनंदकारक होय. हल्लींच्या काळांत गुरुसत्कारप्रसंग हे क्वचितच येतात. पण हा समारंभ ज्या दीर्घ, निस्वार्थी केवळ परोपकारवृत्तिच्या शैक्षणिक उद्योगासाठीं झाला तो उद्योग व परोपकार आणखीही दीर्घ काल करण्यास शास्त्रीबोवांना सामर्थ्य येवो.

वैद्य गोपाळकृष्णशास्त्री केतकर, इलिचपूरः- श्रीमान् कृष्णशास्त्री देवधर हे आपणा सर्वांप्रमाणें आम्हासही पूज्य व वंद्य आहेत.

महेश्वर रामजोशी पुराणिकः- एतत्तु कृतज्ञता व्यक्तिमात्रफलमाचार्यपूजनं न ऋणापकारणं भवति ।

श्री० अच्युत बाळकृष्णशास्त्री पाध्ये गुर्जर, आयुर्वेद विद्यालयाध्यापक व रघुनाथ कृष्ण पाटणकर, श्री संस्कृत पाठशाला राजापूर रत्नागिरीः-

श्रीमद्भिः शिष्यप्रवरैरद्य यावद्धि स्वीकृतं ।<br>
विज्ञानं गुरुपादेभ्यस्तन्मूल्यं जातु नो भवेत् ॥<br>
अथापि स्वल्पमात्रं यत् श्रीगुरोश्चरितं शुभम् ।<br>
संपाद्य संमुद्य तदा चार्पणं गुरुपादयोः ॥<br>
नियोजितं यच्छ्रीमद्भिस्ततप्रशंसापरं खलु ।<br>
अस्माकिने भूप्रदेशे सागवे खेटकं हि यत् ॥<br>
भिषक्तमानां भिषजां जन्मभूः कृष्णशास्त्रिणां ।<br>
अभिमानास्पदं तद्धाऽस्मादृशां बुधसेविनां ॥

Dr. Y. Laxmi Narasinha sastry, Mysore:— Thanks for your invitation for the gracious occasion of honouring your all revered Guruji Sriman Bhishagacharya sri Krishnasastri Deodhar Mahashaya in whom I have the honour of

keeping great reverence as well, by being familiar with his high learning and capacity of instructions adorned by his utmost simplicity.

---

वरील विशेष उल्लेखित संदेशाखेरीज खाली लिहिलेल्या महाभागांनीही प्रसंगोचित संदेश पाठवून समारंभ यशस्वी होण्यास सहाय्य केले असल्यानें त्यांचा नामनिर्देश करणें जरूर आहे.

विद्युत संदेशः– आचार्य जादवजी त्रिकमजी मुंबई, वैद्य पुराणिक धूतपापेश्वर पनवेल, श्री जगन्नाथ वाजपेई बनारस, पंडित डेग्वेकर जबलपूर, श्री० नाईक यावल, श्री० परांजपे सांगली.

पत्रें:– श्रीमंत पंडित पंतप्रतिनिधि सं० औंध, श्रीमंत सरकार सं० इचलकरंजी, श्रीमंत प्रतापशेट प्रतापमिल्स अंमळनेर, प्रो० रा० माणिकराव बडोदे, श्री० लक्ष्मीरामस्वामी जयपूर, वैद्य सदाशिवशास्त्री आराध्ये कोल्हापूर, श्री० गणेश जिजाजी कुळकर्णी नांदगांव, श्री० विठ्ठलराव जोशी रत्नागिरी, श्री० रामचंद्र रावजी गाडगीळ मुंबई, डॉ० बाकरे व्यायाम प्रसारक मंडळ बेळगांव, श्री० महादेव हरी गोखले वैद्य जळगांव, श्री० दा. वि. गोखले केसरीमराठा संस्था पुणें, डॉ० व्ही. व्ही. आठले सातारा, श्री० सदाशिव गंगाधर पाडळीकर सातारा, डॉ० व्ही. एम्. भट येवले, श्री० गो. अ. देसाई भगूर, श्री० देवीदास मनोहर देव रावेर, श्री० रामचंद्र अनंत शेवडे विखारे गोठणे (देवधर यांचे एक शिष्य), श्री० पु. रा. सहस्रबुद्धे कुर्ला, श्री० नारायण कृष्ण अभ्यंकर मुंबई, श्री० आप्पासाहेब जोगळेकर त्रिंबकेश्वर, वैद्यरत्न विनायकशास्त्री जोशी मुखेड, श्री० कवीरत्न नारायणप्रसाद द्विवेदी कानपूर, श्री० रा. आ. साठे कॅम्प देवळाली.

---

## कृतज्ञतांजली समर्पण.

संदेश वाचनानंतर वैद्यराज हरीशास्त्री पराडकर यांनी आपल्या खडया आवाजांत, शिष्यवृंदानें गुरुवर्यांच्या चरणीं वाहण्यासाठीं तयार केलेली संस्कृत कृतज्ञतांजली वाचून दाखविली व अध्यक्षांच्या हस्तें चांदीच्या सुंदर करंडकांतून ती गुरुवर्यांना अर्पण केली. शिष्यांनी गुरुचरणीं वाहिलेल्या कृतज्ञतांजलीचें परक्यानें कांहीं वर्णन करणें अथवा तिचा सारमुद्दा सांगणें, यांत निश्चयानें वैगुण्यच येणार !! कृतज्ञ असलेल्या शिष्यवरांचे अंतरीचे बोल त्यांच्याच भाषेंत व शब्दांत वाचणें यांतच खरा आस्वाद आहे म्हणून कृतज्ञतांजलींत यत्किंचितही फरक न करतां ती जशीच्या तशीच खालीं दिली आहे.

गुरुवर्य भिषगाचार्य कृष्णशास्त्री देवधरेभ्यः समर्पणीयाः

### कृतज्ञतांजलयः

श्री सकलाघनाशिन्या भगवत्या गोदावर्याः पावनेन महिम्ना, तथा श्रीमद्दाशरथिकरुणाकटाक्षवीक्षणेनानुगृहीता वयं सर्वेऽपि श्रीमद्गुरुचरणानां अंतेवासिनः ज्ञानवयस्तपोभिः प्रथितया विद्यया च आभारतप्रसिद्धानां श्रीमतां अस्मद्गुरुपादानां पंचसप्ततिमिते प्रवयसि अत्र संभूय शिष्यजनोचिते सत्कारपूर्वक-कृतज्ञतांजलि-समर्पणे अद्य शक्ता भवामः, अतः धन्यः पुण्योऽयं समुदितो दिवसः ।

श्रीमद्गुरुपादाः !! बाल्ये वयसि वर्तमानैरपि अज्ञानतमोहंत्र्या भगवत्या विद्यादेव्याः समुपार्जने गृहीतोत्कंठैः अत्रभवद्भिः श्रीमद्भिः स्वीकृतः श्रमभरः, अवहेलिता परावहेलना, समाश्रिता माधुकरीवृत्तिः, सोढा अत्यंतदुःसहा विपत्परंपरा कष्टतरा च दशा । अस्यां कष्टतरायां दशायामपि अपरित्यक्तविद्याभ्यसनानां वात्सल्यभरितांतःकरणायाः श्रीसरस्वत्याः कृपापूरैः परिष्वक्तगात्राणां श्रीमतां भवतां विद्यासंपादनवद्धैकलक्ष्यं द्विजन्मोचिताध्ययननिर्भरनिष्ठावंतं किं तं कालमुपवर्णयामः ? उत " गुरुशुश्रूषया विद्या " इति वाक्यं मनसि निधाय स्वगुरुशुश्रूषणैकतत्परैः श्रीमद्भिः अहर्निशं कायेन मनसा वाचा धिया धनेन परःशतैः सेवा–

रूपैः कर्मभिः परितोषितगुरुपादेभ्यः परमवंदनीयेभ्यः श्री गणेशशास्त्री तरटे महाभागेभ्यः समवाप्तां, "पुत्रादपि प्रियतम इति महनीयां" श्रीमद् गुरुसेवायाः परमश्रेष्ठप्रतीकरूपां पदवीमधिकृत्य किमपि लिखामः ? उत द्विजन्मनामुचिते सहजे अध्यापनकर्मणि प्रारब्धे अध्ययनार्थं समुपागतान् अंतेवासिनोऽस्मान् वात्सल्यपूरितांतःकरणेन सर्वथा सुतनिर्विशेषं परिपाल्य वितरितायुर्वेदविद्यानां पुनरुज्जीवितायुर्वेदशिक्षाप्रणालीनां अर्थसंक्रातिरूपो–भयाध्यापन–कौशल–कुशलानां श्रीमतां यावदायुःप्रवर्तिताध्यापनतपस्यां संकीर्तयामः ? अथवा श्रीमत्सु स्वस्वरूप प्रकटनायेव समाश्रितानां देवद्विज-गुरुभक्तिमत्व – स्वधर्मैकशरणत्व – परिपूताचरणत्व – शुद्धचरितत्व – सद्देश–कालपात्रदानशौंडत्व – अंतःकरणवृत्तिमृदुत्व – करुणाशीलत्वाद्यनेक गुण–निकराणां वर्णनं कुर्मः ?

श्रीगुरुदेवाः ! ! श्रीमद्भिः परमदयालुभिरस्माकं अंतेवासिनां कृते यावत् शक्यं सर्वमपि कृतं येन वयं सर्वेऽपि स्वकुटुंबपोषणसमर्थाः, रुग्णजनचिकित्साकर्मणि लब्धप्रतिष्ठाः, धन्ये गृहस्थाश्रमे समारूढपादाः विद्यया धनेन यशसा जनसम्मानेन च परिपूरिताकांक्षाः परमाभ्युदये समर्थाः समभवाम ।

कथमस्माभिर्भगवतः परमदयालोः परमेश्वरस्येव सद्गुरोरपि आनृण्यं संपादयितुं शक्यते ? कस्य वा स्वीय–द्रव्यस्य वयं श्रीमद्भ्यः समर्पणं कुर्मः ? विद्यते वाऽस्माकमस्मदीयमिति वक्तुं सुलभं किंचिदपि ? कोटि-शतैर्धनैर्वा लभ्येतानृण्यम् ? सर्वथाऽसमंजसप्रायोऽयं पंथाः । अतः केवलं

नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वा । पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥
नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते । नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥

इतिवचनानुसृतार्जुनमार्गैरस्माभिः सर्वथा कृतज्ञतांजलयः सादरं सोत्कंठं सोल्लासं सगद्गदं समर्प्यंते । तेषां स्वीकरणेन कृपाकटाक्षलवैकभागिनो वयं विधेया इति प्रार्थ्यंते ।

मार्गशीर्ष कृष्ण एकादश्यां
शाके १८५७ मंदवासरे
जनस्थानम् (नासिक)

भवदीयाः परमनम्राः

सर्वेऽपि अंतेवासिनः

## चरित्रग्रंथ, महावस्त्र व थैली

त्यानंतर सर्व शिष्यांतर्फे गुरुवर्य देवधर यांना 'देवधर चरित्र ग्रंथ, जरीचें महावस्त्र, पागोटें व ५०१ रुपये थैली' समर्पण करण्यांत आलीं. त्या वेळीं वै. भू. दातारशास्त्री यांनीं सद्गदित अंतःकरणानें सांगितलें कीं 'आम्हीं हा करीत आहोत तो सत्कार कांहींच नाहीं. पण गुरुवर्यांनीं ह्या फुलाच्या पाकळीचाच स्वीकार करून आह्मांस आणखी उपकृत करावे.'

काव्यतीर्थ वैद्यराज सदाशीवशास्त्री लव्हाटे यांनी संस्कृतांत अस्खलित भाषण करून 'आजचा प्रसंग कसा महत्वाचा आहे, गुरुवर्य देवधरांची योग्यता कशी असामान्य आहे, त्यांचे शिष्यांवर कसे उपकार झाले आहेत, त्यांची आयुर्वेदसेवा कशी अप्रतिम आहे हे अत्यंत परिणामकारक तऱ्हेनें प्रतिपादन केलें.

## थोर गुरूंचे थोर शिष्य

भिषगाचार्य देवधर यांच्याप्रमाणेंच त्यांचे शिष्यही थोर आहेत, विद्वान आहेत, अभ्यासी आहेत व आयुर्वेदाच्या उन्नतीसाठीं झटणारे असेंच आहेत याची प्रचीतिही समारंभांत पहावयास मिळाली. सत्कार मंडळाचे अध्यक्ष वैद्यभूषण दातारशास्त्री यांनी आपण केलेला "त्रिदोष विमर्श" हा नूतन संस्कृत ग्रंथ व अकोल्याचे वैद्यराज हरीशास्त्री पराडकर यांनी सर्वांगसुंदरा व हेमाद्री या टीकांसह परिश्रमपूर्वक संशोधून छापून काढलेला वाग्भट ग्रंथाचा पहिला भाग गुरुचरणीं सादर समर्पण केला.

## मानपत्र

त्र्यंबकेश्वरचे श्री० पांडुरंगशास्त्री शुक्ल यांनीं गु० देवधर यांना काव्यमय मानपत्र समर्पिलें. त्यांतील कांहीं भाग खालीलप्रमाणें आहे.

भोः श्रीकृष्ण श्रीकृष्ण ध्यानतत्परमानस ।
सर्ववैद्योत्तम श्रीमन् पंडितश्रेष्ठ सज्जन ॥
वयोवृद्ध तपोवृद्ध ज्ञानवृद्ध द्विजोत्तम ।
पूर्वोक्तगुणयुक्तस्य नतिस्ते चरणाबुजे ॥
तवागाधगुणान्वक्तुं नाहं शक्तः कदाचन ।

तथापि त्वच्चरणयोः प्रेम्णा प्रेरितवागहं ॥

## वैद्यमण्डळाची कुसुमांजलि.

नासिक येथें नुकत्याच स्थापन झालेल्या वैद्य मंडळ या संस्थेतर्फे देण्यांत यावयाचें मानपत्र वैद्यरत्न विष्णुशास्त्री केळकर यांनीं वाचून दाखविले व वैद्यराज घारुअण्णा रानडे यांनीं ते श्री० देवधरशास्त्री यांना अर्पण केलें. तें मानपत्र मुद्दाम खालीं दिले आहे.

श्रीमान् भिषगाचार्य कृष्णशास्त्री देवधर वैद्य

मु० श्रीक्षेत्र नाशिक यांचे सेवेसी

नासिक येथें स्थापन झालेल्या वैद्यमंडळाचे सर्व सभासद यांजकडून

ईश्वर कृपेनें आपल्या वयाचीं ७५ वर्षें पूर्ण होऊन आपण ७६ व्या वर्षांत पदार्पण करीत आहांत या बद्दलच्या आनंददायक महत्वाच्या सत्कार समारंभाचे वेळी आपणांस वैद्य मंडळाचे सभासद कृतज्ञतापूर्वक व व अभिवादन पूर्वक नम्रतेने

### सन्मान पत्र.

समर्पण करीत आहेत त्याचा आपण स्वीकार कराल अशी आशा आहे.

मनुष्य मात्राच्या जीवनाचें व अभ्युदयाचें मुख्य साधन आरोग्य, त्या आरोग्याचे संरक्षण अनादिकालापासून अद्ययावत् भारतीय आयुर्वेदानें केलेलें आहे. अशा धर्मार्थ सुखसाधक आयुर्वेदाचें उपबृंहण, प्राचीन कालीं परम-श्रेष्ठ चरक सुश्रुत वाग्भटादि मुनिवर्यांनीं आपलें ज्ञान व तपस्या आणि दिव्य आयुष्य खर्चून केलें आणि त्यामुळें आपला आयुर्वेद उज्वल तेजानें-युक्त व विश्वव्यापी झाला हें सर्वांस माहित आहेच. परंतु चक्रनेमिक्रमन्यायानें मध्यंतरीच्या संकटग्रस्त कालांत आयुर्वेदाच्या अध्ययनाध्यापनाची परंपरा लुप्तप्राय झाल्यामुळें आयुर्वेदाच्या ऱ्हासाचें दुःख आपणा सर्वांस उपभोगावें लागत आहे अशा हीन दीन, हताश व परावलंबी परिस्थितींत ज्या अनेक महात्म्यानीं दीर्घ प्रयत्नानें, स्वार्थत्यागानें व बुद्धिवैभवानें आयुर्वेदाची ज्ञानज्योति पुन्हा प्रज्वलित केली त्या महात्म्यामध्यें आपली प्रामुख्यानें गणना होत आहे.

आपण आयुर्वेदाचें सांगोपांग अध्ययन करीत असतानां ज्या अनेक आपत्ति सोसल्या व कष्ट सहन केले आणि गुरु शुश्रुषा करून गुरुकृपा संपादिली त्याकडे लक्ष दिल्यास महाभारतांतील प्रख्यात उत्तंक शिष्यांची आठवण होते. व आपण धन्य आहांत असे साहजिक उद्‌गार निघतात.

अशा कष्ट साध्य प्राप्त विद्येचा प्रसार आपण मोठ्या प्रेमानें अनेक शिष्यानां पढवून महाराष्ट्रभर केला आहे व करीत आहांत. ही आपली आयुर्वेदाची भरीव कामगिरी चिरस्मरणीय आहे.

आपण वरील प्रकारें आयुर्वेदाची मननीय सेवा करीत असतांही महाराष्ट्रांतील निरनिराळ्या शिक्षणसंस्थानां निरनिराळ्या कार्याकरतां लहान मोठ्या देणग्या देऊन व होतकरू आणि असहाय विद्यार्थ्यांना मदत करून जें औदार्य प्रगट केले तें अत्यंत अभिनंदनीय आहे.

भारतीय वैद्यवरांनीं निखिल भारतवर्षीय वैद्य संमेलनाचें अध्यक्षस्थान आपणांस देऊन आपला योग्य सत्कार यत्पूर्वीच केला आहे. तेव्हां आम्हीं जगन्नियंत्या परमेश्वरापाशी हीच प्रार्थना करतो कीं, आपणाला चिरकाल आरोग्यलाभ व दीर्घायुष्य प्राप्त होऊन आपणाकडून आयुर्वेदाची अखंड सेवा घडो.

मार्गशीर्ष वद्य ११<br>
शके १८५७<br>
ता. २१।१२।१९३५

आपले नम्र व शुभचिंतक

वैद्य मंडळाचे सभासद

## आहेर.

भिषगाचार्य कृष्णशास्त्री देवधर यांना त्यांच्या खालील परस्थ व नासिक नगरवासी चाहत्यांनी मोठ्या प्रेमानें आहेर केले.

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमंत सरदार भय्यासाहेब विंचूरकर, | महावस्त्र व पगडी |
| २ | ,, ,, राजेबहादूर नासिक, | शाल व रौप्यपात्र |
| ३ | ,, नानासाहेब बालाजीवाले, | श्री बालाजीची सुंदर रौप्य मूर्ति व फोटाफरेम |
| ४ | वेदशास्त्रोत्तेजक सभा पुणें, | रुपये १० |
| ५ | श्री० रा० कालीदास नाना पाठक, | शाल |
| ६ | श्री० गोविंद आबाजी शौचे | शाल |
| ७ | वे० मू० नानलशास्त्री पुणें, | महावस्त्र |
| ८ | श्री० विनायकशास्त्री जोशी मुरुड, | रुपये ५ |
| ९ | कै० विश्वनाथ धुंडिराज गायधनी यांचे घरुन, | रुपये १० |
| १० | शेट उत्तमचंद अमोलकचंद, | शाल |
| ११ | शेट चांदमल बिरदीचंद | शाल |
| १२ | शेट भिकचंद रायचंद | रेशमी उपरणें |
| १३ | श्री० किसनलाल चक्रपाणी तिवारी, | रेशमी उपरणें |
| १४ | शेट शिवनाथ मारवाडी, | रेशमी धोतरजोडी उपरणें |

## सार्वत्रिक सत्कार.

भिषगाचार्य देवधर यांच्या शिष्यांनी आपल्या प्रिय व मानधन गुरुविषयीं अंतःकरणांत सतत जागृत असलेली व वारंवार उचंबळून येणारी कृतज्ञता जाहीर रीतिनें व्यक्त व्हावी म्हणूनच जरी सत्कार समारंभाची योजना केली असली तरी ती योजना जाहीर होताच, भिषगाचार्य यांच्या विभूतिमत्वामुळें, उज्ज्वल चारित्र्यामुळें व विविध कार्यकर्तृत्वामुळें शिष्यवृंदापुरती मर्यादित न राहता तिला सहाजिकच सार्वत्रिक स्वरूप प्राप्त झालें. कस्तुरीचा सुवास लपत नाहीं म्हणतात. कीर्ति ही सुवासांत कस्तुरीवरही ताण करणारी आहे देवधरांचा कीर्तिसूर्य आज कितीक वर्षे तेजस्वी रीतिनें तळपत आहे. मग अशा कीर्ति–

मान पुरुषाच्या पवित्र सत्कारसमारंभांत सहभागी होऊन आपल्यातर्फे अभिनंदनाचें फूल वाहण्यास संस्थांनी वा व्यक्तींनी पुढें येऊन आपला आदर व्यक्त करावा हें केव्हांही स्वाभाविकच ठरणार !! खालील निरनिराळ्या संस्थांच्या प्रतिनिधींनी समयोचित भाषणें करून गुरुवर्य देवधरांच्या गळ्यांत पुष्पहार घातले.

१ कीर्तनसंस्था, ह. भ. प. गोपाळबुवा पेठणकर
२ नासिक मेडिकल युनियन, डॉ० आठवले
३ नासिक अनाथ विद्यार्थीगृह, डॉ० देवधर
४ अद्वैतेश्वर संस्कृत पाठशाला, श्री० बाळासाहेब वैशंपायन
५ श्री काळेराम मंदीर, वे० सखारामबुवा पुजारी
६ संयुक्त खानदेश वैद्यक मंडळ,
७ नासिक गायरान संस्था, श्रीमंत अण्णासाहेब देशपांडे
८ नासिक सार्वजनिक वाचनालय, डॉ० देवळालकर
९ वर्णाश्रम संघ शाखा नासिक व सनातन धर्म सहाय्यक निधि मंडळ, श्री० दामुअण्णा चंद्रात्रे
१० चित्पावन ब्राह्मण संघ नासिक, श्री० रानडे वकील
११ समस्त ब्रह्मवृंद, वे० धर्माधिकारी
१२ सनातन धर्म सहाय्यक मंडळ, श्री० शौचे वकील
१३ अहिल्याराम व्या० शाळा व वेलीबाई दवाखाना, डॉ० पाठक
१४ मधलीहोळी व्या० शाळा, श्री० विनायकराव शुक्ल
१५ गुलालवाडी व्या० शाळा, श्री० शुक्ल वकील
१६ गीर्वाण वाग्वर्धिनी सभा, वे० पुराणिकशास्त्री
१७ देशस्थ ऋग्वेदी शिक्षण संस्था, रा० यार्दी वकील
१८ यशवंत व्यायाम शाळा, श्री० महाबळ गुरुजी
१९ मध्यवर्ती व्यायाम संस्था, श्रीमंत बालाजीवाले
२० वसंत व्याख्यान माला, श्री० बाळशास्त्री शारंगपाणी
२१ लोकसत्ता नासिक, डॉ० केळकर
२२ आयुर्वेद महा विद्यालय नगर, गृहीतायुर्वेद गुणे

२३ व्यंकटेश मंगल कार्यालय, श्री० श्रीराम गोसावी
२४ यजुःशाखीय शिक्षण संस्था, श्री० गोविंदराव शौचे
२५ नासिक हिंदुसभा, श्री० किसनलाल चक्रपाणी
२६ सनातनी मंडळीतर्फे, श्री० वासुदेवराव पंचाक्षरी
२७ श्री० कुळकर्णी फोटोग्राफर ( फोटो परेमसह )
२८ श्री० बाळासाहेब प्रभुणे

२९ श्री० गोविंदराव शौचे हे श्री० देवधरशास्त्री यांचे बरेच निकटवर्ती व समवयी स्नेही असल्यानें त्यांनी मित्राच्या ७६ व्या वाढदिवस समारंभाचे दिवशीं उचंबळत्या हृदयानें त्यांचें आयुष्यचरित्र समग्र गावें हे स्वाभाविकच आहे. त्यांनी देवधरांच्या अंगीं वसत असलेल्या विविध गुणांचें आपल्या मार्मिक वाणीनें वर्णन करून देवधरशास्त्री यांनी यजुर्वेदी वेदशास्त्र पाठशाळेस दिलेल्या ३०१ रुपये देणगीचा अत्यंत कृतज्ञतापूर्वक व आभारप्रदर्शक उल्लेख केला. रा० शौचे यांनी सभेंत वाचून दाखविलेली हकीकत चरित्रग्रंथांत येऊन गेली असल्यानें ती देऊन द्विरुक्ति न करतां, श्री० गोविंदराव यांनी केलेल्या मार्मिक व अर्थपूर्ण संस्कृत कविता खाली दिल्या आहेत.

आयुर्वेदमहाब्धिपारगबुधो विद्वच्छिरो भूषणं ।
' तर्टे ' इत्युपनाम सद्गुरुवरः शास्त्री गणेशाव्हयः ॥
तेनाध्यापित एव पुत्रवदसौ कृष्णाख्यबालः सुधीः ।
सद्विद्याध्ययनोच्छुकोऽल्पवयसि त्वत्रागतः कोंकणात् ॥१॥
श्रीमद्देवधरोपनामसुकुलोदन्वत्सुधांशुः पुनः ।
श्रौतस्मार्तसनातनीयपथभाक् वंशावलीदीपकः ॥
धर्माचारविशुद्धकीर्तिविलसत्सद्वंशमुक्ताफलं ।
सद्वंशोद्भवसंगि सद्गुणयुतः कृष्णोऽस्यशिष्यः प्रियः ॥२॥
साष्टांग वैद्यकमहार्णवपारगोऽसौ ।
स्वल्पावधौसमभवत्खलु कृष्णशास्त्री ॥
भूरिश्रमानलसतीव्रकुशाग्रबुद्धिः ।
प्राग्धारणा गुरुकृपादि हितार्थसिद्धः ॥ ३ ॥

श्रीवेदादि समुन्नतधर्मविहितज्ञानोन्नतीच्छुः सदा ।
नानाशास्त्ररहस्यवित्सुविमलाचारश्चशुद्धाशयः ॥
विद्यावृद्धिसुतत्परो गुणिजनोत्कर्षार्थमुद्योगकृत् ।
सत्कार्यंकृतवानुदारमनसा वित्तस्य दानं सदा ॥ ४ ॥

परोपकृतिचेतसा विविधशास्त्रशिक्षागुणः ।
प्रशस्ययशसावृताखिलमहीप्रदेशोऽभितः ॥
अनेक गणनीय सद्गुणगणाढ्य विद्वन्मणिः ।
अतोऽस्य तपसां फलं गुरुपदाधिकारोन्नतिः ॥ ५ ॥

निरिच्छविनयी सदा परगुणादरेसन्मतिः ।
परोपकृतिकृच्च तद् गुणगणो न केषां मुदे ॥
शशांककरसंहतिर्जलनिधिं यथा कर्षति ।
तथैव जनमानसं गुणगणोऽस्यचाकर्षति ॥ ६ ॥

वित्तं यस्य निजश्रमार्जितफलं सत्पात्रदानव्ययं ।
विद्या यस्य परोपकारसुधिया तद्दानतो विस्तृता ॥
शीलं यस्य बुधप्रशस्यचरितं वाणी सुधामाधुरी ।
वाक्स्तंभः परदूषणे निजगुणे धन्यः स धन्यो नरः ॥ ७ ॥

यशोदया बद्धविधेयवृत्तिः ।
धर्माभिमानी विजयाभिषंगः ॥
सद्वृंदवंद्यः कृतगोहितोऽयं ।
विभात्यहो कृष्ण इव द्वितीयः ॥ ८ ॥

हे विश्वेश्वर विश्वपालक विभो लोकत्रयेश प्रभो ।
तस्मै देवधराय पूज्यगुरवे कृष्णाय सच्छास्त्रिणे ॥
देहि त्वं सुकृपार्द्रदृष्टिवशतो दीर्घायुरारोग्यताम् ।
कृत्स्नं मंगलमेव सौख्यममितं शश्वज्जयं सद्यशः ॥ ९ ॥

श्रीगोदारघुवीरशंकरपदांभोजप्रसादाशिषा ।
प्राणाचार्यपदांकितो गुरुवरः श्रीकृष्णशास्त्री कृती ॥
सौभाग्यान्वित भार्यया सह सुतैः कौटुंबिकैस्तैश्वतैः ।
जीव्याद्वर्षशतं सुखान्यनुभवन् सत्कार्यकीर्तिं तथा ॥१०॥

गोपाळं सुयशो रविं च विगदं स्वानंदमंत्रापतिं ।
आरोग्यं मुरमर्दनं रघुपतिं बाधाशमं जीवनं ।।
धैर्यं शौरिमविघ्नतां गणपतिं चेतोदमं मारुतिं ।
याचामोगुरुकृष्णशास्त्रिकृतिनो भूत्यै चिरं श्रेयसे ।।११।।

।। इतिशं ।।

---

श्री. नानलशास्त्री यांचें भाषण.

पुण्यपत्तनवासी, आयुर्वेदाचे कट्टे सेवक भिषगाचार्य पुरुषोत्तम-शास्त्री नानल यांनी श्री० देवधरांना आयुर्वेद महाविद्यालय, ताराचंद रामनाथ रुग्णालय व आयुर्वेद रसशाला ह्या पुण्याच्या तीन संस्थातर्फे पुष्पहार समर्पण केला. ते आपल्या विद्वत्ताप्रचुर भाषणांत म्हणाले.

"वेळ बराच झाला असल्यानें आपला फार वेळ घेणें बरें नाहीं पण गुरुवर्य देवधरांसारख्या आयुर्वेद तपस्व्याच्या उत्सव समारंभाचेवेळीं दोन शब्द बोलल्यावाचूनही रहावत नाहीं. आयुर्वेदाला त्याच्या निकृष्ट पडत्या काळांत सावरून धरून तेजोवान् ठेवल्याबद्दलच आपण गु० देवधरांसारख्या विभूतीचा सत्कार करीत आहोंत. विद्या ही राजाश्रयाशिवाय कधीही तेजोवती राहूं शकत नाहीं. आयुर्वेदासारख्या अत्यंत आवश्यक अशा विद्येला राजाश्रय न राहिल्यानें भरतभूचें अति नुकसान झालें आहे. वणिकवृत्तीच्या राज्यकर्त्यांनीं, न्याय, वेदांत, व्याकरण या-सारख्या निरुपद्रवी आर्यशास्त्रांचा पुरस्कार केला पण आर्यवैद्यशास्त्राकडे मात्र त्यांनीं अनादरानेंच पाहिले व अजूनही तीच स्थिती कायम आहे. आयुर्वेदाचा पुरस्कार राज्यकर्त्यांकडून पहिल्यापासून झाला असता तर आजपर्यंत परदेशांत गेलेले कोट्यावधी रुपये स्वदेशांत राहिले असते. डॉक्टर लोकांची जी सर्वस्वी परतंत्र स्थिती दिसते तशी वेळ आली नसती. जनतेकडूनही आयुर्वेदाची उपेक्षा झाली. अशा सर्वस्वी कठीण परिस्थितींत आयुर्वेद तेजस्वी ठेवण्याचें श्रेय ज्यांचेकडे आहे त्यांत देवधर, लागवणकर यांचा क्रम

फार वरचा आहे. देवधरशास्त्रीबुवांनी तिरस्कृत वैद्यकीय धंद्यास सन्मानाचें स्थान मिळवून दिलें व आपली सव्यसाची शिष्यपरंपरा निर्माण केली. देवधरांचें ज्ञान एकांगी नसून डोळस आहे. आयुर्वेदाच्या सर्वांगीण उन्नतीची काळजी ते वहात असतात. गेल्या १५०० वर्षांत आयुर्वेदपरंपरेनें शवच्छेदन या महत्वाच्या गोष्टीकडे पूर्ण डोळेझाक केली. देवधरांना ह्या उणिवेची पूर्ण जाणीव आहे. पुणें येथें आम्ही विद्यालयांतील विद्यार्थ्यांना शरीराचें प्रत्यक्ष ज्ञान व्हावें म्हणून शवच्छेदनशालेची योजना करण्यासाठीं कितीक वर्षे धडपड केली. अधिकाऱ्यांच्या विरोधामुळें आमची योजना यशस्वी होईना पण तीच योजना कलेक्टरच्या एका हुकुमानें झाली. त्या योजनेला कित्येकांनीं मान डोलवली पण "आपरितोषात् विदुषां" ह्या उक्तिप्रमाणें देवधरां-सारख्यांचें अनुकूल मत लाभेपर्यंत मला समाधान वाटत नव्हते. शवच्छेदन-शालेचें उद्घाटन करून व १००० रुपये देणगी देऊन शास्त्रीबुवांनी अलौकिक कामगिरी केली आहे. त्यावेळीं शास्त्रीबुवांनी सद्गदित होऊन केलेलें भाषण व गहिवरलेल्या अंतःकरणानें शवाला केलेलें नमन ह्या गोष्टी अजून मजसमोर जशाच्या तशाच दिसत आहेत."

श्री० नानलशास्त्री यांचे भाषणानंतर श्री० देवधरशास्त्री हे उत्तरा-दाखल भाषण करण्यास उभे राहिले तेव्हां सर्वांनीं टाळ्यांचा गजर करून भाषणश्रवणाची उत्कंठा व्यक्त केली.

## भिषगाचार्यांचें निवेदन

"येथें जमलेला समाज हा परमेश्वर स्वरूपच आहे त्या समष्टिरूप परमेश्वराला अभिवादन करून मी आपल्या भाषणास प्रारंभ करतो श्रीयुत वामनशास्त्री दातार यांनी आजच्या या समारंभांत शिष्यवृंदाबरोबर इतरानाही गोवले आहे. वामनशास्त्री यांच्या डोक्यांत सत्काराची ही कल्पना १५ वर्षा-पासून घोळत आहे. सात वर्षापासून तर मलासुद्धां ती माहीत आहे पण सत्कार करण्यासारखे माझ्यांत काय आहे हेंच मला समजत नाहीं. मी अगदीं सामान्य मनुष्य आहे. आयुष्यांत प्रपंचाशिवाय मी काय केले आहे. ४।२ विद्यार्थी पढविलें यांत मोठेसे ते काय झालें? अशी वस्तुस्थिती असताही आपण माझा इतका सत्कार करता हें पाहून मला गहिंवरून येत आहे.

मला लाभलेले शिष्य सुबुद्ध व कुलीन असेच असल्यानें त्यांच्यामुळेंच माझी प्रसिद्धी झाली. दातारशास्त्री यांच्या कर्तबगारीमुळेंच मी इतका मोठा झालो. मजवर त्यांनी हत्तीवर बसण्याचाही प्रसंग आणला होता. आपण माझी भरपूर स्तुती केलीत पण मी त्यास बिलकूल पात्र नाहीं. पुष्पहार व स्तुती याखालीं मी दडपून गेलो आहे.

आयुर्वेदाची अध्ययन परंपरा कांहीं आजची नाहीं. आयुर्वेद हा ऋग्वेदाचा अथवा अथर्ववेदाचा उपवेद आहे.

॥ ब्रह्मा स्मृत्वाऽयुषोवेदं । प्रजापतिमजिग्रहत् । सोऽश्विनौ तौ सहस्राक्षं । सोऽत्रिपुत्रादिकान् मुनीन् । तेऽग्निवेशादिकांस्तेतु पृथक् तंत्राणि तेनिरे ॥

या श्लोकांतून आयुर्वेद परंपरेचा इतिहास समजून घेण्यासारखा आहे. त्यावरून आपणास असे दिसून येईल कीं अत्रिपुत्रादि मुनींपर्यंत आयुर्वेदग्रंथ लिहिलेले नव्हते. अग्निवेशांपासून आयुर्वेदाध्ययन ग्रंथरूपानें सुरू झालें. या श्लोकावरून महत्वाची अशी एक गोष्ट आपल्या ध्यानांत येईल कीं 'गुरुनें विद्यार्थ्याजवळ जाऊन त्यास विद्या द्यावयाची असते. विद्यार्थी शिकावयास आला तरच शिकवावयाचें असें नाहीं. आपल्यास येत असलेली विद्या दुसऱ्यास शिकविणें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.' तें मी केलें यांत विशेष ते काय झालें. माझी अध्ययनपरंपरा असें जें म्हटलें जातें तें बरोबर नाहीं. ब्रह्मदेवापासून चालत आलेल्या आयुर्वेदाध्ययनपरंपरेंतील मी एक दुवा आहे इतकेंच. श्री० केळकरशास्त्री यांनी परवाच्या लोकसभेंत म्हटल्याप्रमाणेंच 'आजचा समारंभ मी माझा समजत नसून तो आयुर्वेदाच्या अध्ययन परंपरेचा आहे' असें मानतो.

आपण, सरदार, इनामदार, जहागीरदार, व्यापारी, विद्यासंपन्न अशी सर्व प्रकारची मंडळी जमलात व माझा सत्कार केलात. वास्तविक मी आपणामुळेंच इतका पुढें आलो. "विनाश्रयं न शोभन्ते पंडिताः वनिता लताः" हें कविवचन पूर्ण सत्य आहे. वऱ्हाडांत श्री० रामकृष्णपंत ओक, नाशकास कै० सरदार आबासाहेब विंचूरकर

व इतर कित्येक सद्‌गृहस्थ यांच्या सारख्यांचा आपुलकीचा आधार मिळाला म्हणून तर वैद्यकीय धंद्यांत मी पुढें येऊ शकलो.

मला शिष्य हुशार व गुणी मिळाले. स्वतःच्या चरितार्थाचीही पर्वा न करता, आयुर्वेदसेवा व लोकसेवा करणारे दातार व १८।१९ व्या वर्षी 'ए बी सी' शिकावयास सुरवात करून त्या विद्येंत पांडित्य संपादन करणारे परशुरामभाऊ वैद्य यांचीं उदाहरणें माझ्या शिष्यांची योग्यता पटवून देण्यास पुरेशी आहेत. रा. दातारशास्त्री, हरीभाऊ पराडकर यांनी आयुर्वेदविषयक शास्त्रीय वाङ्मय लिहीलेलें आहे याबद्दल मला अभिमान वाटतो. आमची अध्ययनपरंपरा श्री० वामन-शास्त्री दातार, केळकरशास्त्री, दातेशास्त्री, लव्हाटेशास्त्री, केशवाचार्य अवधानी यांनी चालू ठेवली आहे याबद्दल मला अत्यंत समाधान वाटत आहे.

पन्नास वर्षांपूर्वी वैद्यास नाशिकांत आपल्या धंद्यावर आपला निर्वाह करण्याची पंचाईत पडत असे. पण त्याच नाशकांत हल्ली २५ डॉक्टर व ५-२५ वैद्य असतांही सर्वांचा चरितार्थ उत्तम तऱ्हेनें चालू शकतो या गोष्टीचें मला आश्चर्य वाटतें. वाढत्या लोकसंख्येच्या मानानें डॉक्टरवैद्यांची संख्या थोडी फार वाढावयाची हें लक्षांत घेऊनही, हल्लीं नाशकास असलेल्या डॉक्टरवैद्यांचा प्रचंड आकडा मन उद्विग्नच करतो. माझ्या शिष्यांना पैसा मिळतो ह्यामुळें मला आनंद होत असला तरी शहराची कमी होत असलेली आरोग्यशक्ति पाहून मला वाईटच वाटते.

हल्ली जनतेंतील रोगप्रतिकारशक्ति अत्यंत कमकुवत झाली आहे. किरकोळ तक्रार उत्पन्न झाली कीं धांव डॉक्टरकडे अशी वृत्ति वाढत आहे. नाशिक शहराचें आरोग्य कमी होण्यास म्युनिसिपालिटीचें घाणीकडे दुर्लक्ष व शहरवासियांची स्वच्छता ठेवण्याबद्दल अनास्था हींच मुख्य कारणें आहेत.

प्रत्येकानें व्यायाम करून आरोग्य प्राप्त करून घ्यावें, वैद्याची बिलकूल जरूर नसावी हें मला पूर्ण संमत आहे. व्यायामांत प्रमाण-

बद्धता असणें मात्र जरूर आहे. हल्लीं विक्रमाचें जें एक नवीन खूळ निघालें आहे तें आरोग्य-घातक आहे. मजकडे येणाऱ्या रोग्यांना ‘ व्यायाम घेत जा ’ असाच मी उपदेश करीत असतो. मी स्वतः कधी औषध घेत नाहीं. रोग्यास जास्त दिवस औषध द्यावयाचें नाहीं असा माझा प्रघात आहे. जुन्या पिढींत व्यायामाची आवड असें म्हणूनच त्यावेळीं आरोग्य समाधानकारक होतें.

यापेक्षां जास्त कांहीं मला बोलवत नाहीं. आपण जो माझा एवढा सत्कार केलात त्याबद्दल उतराई कसे होता येईल हेंच समजत नाहीं. आपणच कांहींतरी उपाय सुचविल्यास ठीक पडेल. कवीला स्तुति करण्याची कला चांगलीच साधलेली असते. कडू कारल्याचे सर्व दोष अलगत लपवून त्याचे गुण तेवढे भडक रंगांत मांडण्याचें कौशल्य एका संस्कृत कवीनें करून दाखविलें आहे. माझें आज होत असलेलें स्वागत तसलाच एक नमुना आहे.

मला जी थैली आत्ता देण्यांत आली त्यांत किती द्रव्य आहे हें मला माहीत नाहीं. त्यापैकीं स्वत्व म्हणून एक रुपया काढून घेऊन व बाकीच्या रकमेंत तितकीच भर घालून ती सर्व रक्कम मी, पनवेल त्रिदोष परिषदेंत जी ग्रंथनिर्माण समीति स्थापन झाली तिच्याकडून तयार होत असलेल्या त्रिदोषविषयक ग्रंथाच्या छपाईखर्चासाठीं देत आहे. छपाईसाठीं तितकीही रक्कम कमी पडली व त्यावेळीं मी जगलो वाचलो आणि मला द्रव्याची अनुकूलता असली तर मी तुम्हास दुसरीकडे याचना करू देणार नाहीं. जे २-३ शे रुपये कमी पडतील ते मी देईन.

आपण माझा सत्कार केलात पण वास्तविक श्री० नानलशास्त्री यांच्या सारख्यांचा सत्कार व्हावयास हवा. आपण त्यांचा सत्कार त्यांना त्यांच्या अंगीकृत कार्यांत सक्रिय मदत करून करावा अशी माझी विनंती आहे. माझ्या गुरुजींनी वाग्भटग्रंथाचें जें संशोधन-प्रकाशन केलें त्यावेळीं मजकडून झालेल्या सेवेनें संतुष्ट होऊन त्यांनी मला मंगल आशीर्वाद दिला त्यांतच थोडा फार फरक करून मी

माझ्या शिष्यांना आजच्या प्रसंगीं खालील शुभाशीर्वाद देतो.

विद्यार्थिसंघेन कृतश्च योऽयं मदीय सत्कारविधिस्त्वपूर्वः ।
तेनातितुष्टेन मयाऽपि तस्मै दत्ताशिषाः कामदुघा भवन्तु ॥

जाता जाता एका गोष्टीचा खुलासा करणें अत्यंत आवश्यक वाटतें. शिक्षण, ग्रंथप्रधान असावे कीं विषयप्रधान असा वाद हल्लीं चालू आहे. शिक्षण ग्रंथप्रधानच असलें पाहिजे असें माझें ठाम मत आहे. ग्रंथांतील विषय ध्यानांत ठेवण्याच्या प्रयत्नापेक्षां ग्रंथाचा समग्र अभ्यास विशेष उपकारक ठरतो. पूर्वीच्या आयुर्वेदाचार्यांनी असेंच सांगितलें आहे कीं कोणताही एक ग्रंथ समग्र आत्मसात् झाला म्हणजे इतर ग्रंथ सहज लावता येतात. अमक्याचे १० अध्याय तमक्याचे १५ असें शिक्षण देणें काय कामाचें? वाग्भटाचार्यांसारख्यांनी समग्र ग्रंथ लिहीण्याचें कष्ट केले तें काय उगीच?

आज माझ्या शिष्यांनी जसा माझा सत्कार केला तसल्या तऱ्हेचाच सत्कार त्यांचे शिष्य त्यांचा करोत व असले सत्कार वाढत्या प्रमाणांत होवोत अशी माझी इच्छा आहे. मी आपणा सर्वांचा अत्यंत ऋणी आहे.'

## म० म० पाठकशास्त्री यांचें भाषण.

भिषगाचार्य देवधरांचें भाषण झाल्यावर म. म. श्रीधरशास्त्री यांनी खालील आशयाचें समारोपात्मक भाषण केलें.

"मला आतां बोलावयास कांहीं उरलेच नाहीं. भिषगाचार्य देवधर यांनी अगोदरच सर्व सांगून टाकलें आहे. तेव्हां कांहीं तरी बोलावयास पाहिजे म्हणून मी बोलणार आहे इतकेंच.

महाराजांनी आपल्या भाषणांत आपण सत्कारास बिलकूल पात्र नाहीं असें सांगितलें. आपल्या सर्व कीर्तिचें श्रेय त्यांनी शिष्यांकडेच दिलें आहे. पण ही गोष्ट खरी धरून चाललो तरी चांगले शिष्य तयार होण्यास चांगलाच गुरु लागतो हें त्यांनी सांगितलेलें नाहीं हें आपण विसरू नका. वामनशास्त्री यांनी आपणास हत्तीवर बसविण्याचा प्रसंग आणला होता असें सांगून कीर्तिचें श्रेय शिष्यवृंदाच्या पदरांत टाकणारे




अध्यक्ष म० म० श्रीधरशास्त्री पाठक धुळें.

भिषगाचार्य, फत्तेपूर सीकर येथें संमेलनाचें वेळीं अध्यक्ष म्हणून त्यांना तेथील लोक हत्तीच्या सुशोभित अंबारींत बसा म्हणून परोपरीनें सांगत व विनवीत असताही, अंबारींत न बसतां आयुर्वेदग्रंथ त्यांत ठेऊन व आपण सर्वांबरोबर पायीं चालून आपलें अलौकिकत्व दाखविलें ही गोष्ट मात्र सांगण्याचें टाळीत आहेत. सन्तांचें वर्तन नेहमीं आश्चर्य-मयच असतें. ते सर्वांना नेहमीं पूजनीय असेंच असतात. देवधरशास्त्री-बुवांसारख्यांचा सत्कार सर्वांनीच करावयास पाहिजे मग त्यांच्या शिष्यांनी तो करावाच हें काय सांगावयास पाहिजे. भिषगाचार्य देवधरांच्या सर्व शिष्यांनी सत्कारसमारंभ करण्याचें योजिलें हें अत्यंत योग्य झालें. श्री० दातारशास्त्री यांना मी दोष देतो तो इतकाच कीं त्यांनी समारंभ जरा उशिरा केला. सत्कार, समावर्तनाचें वेळीं व्हावयास पाहिजे होता. पण अद्यापही बिघडलें नाहीं.

आजचा प्रसंग उपाकर्माचा आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिष्यांनी गुरुसमीप जाऊन आपल्या चुका त्यांना सुपूर्द करण्याचा हा प्रसंग आहे. अशा महत्वाच्या प्रसंगाला मजसारख्यास अध्यक्ष कां नेमलें हाच मजपुढें मोठा प्रश्न आहे. सर्व विद्वान एकत्र जमल्यावर सुरू होणाऱ्या 'विद्वत् संभाषेंत' भाग घेणें तर दूरच पण त्या विद्वत् आलापांचें आकलन होणेंही मजसारख्यास कठीण. दातारांचें गोत्र शांडिल्य व मीही शांडिल्य गोत्री इतकाच काय तो मला अध्यक्ष बनवण्यांत धागादोरा दिसतो.

रघुवंशांत असा एक प्रसंग आला आहे कीं, वरतंतु मुनीनें कौत्साकडून १४ कोटी दक्षिणा घेऊन तो आणखी देत असलेलें धन त्यांनी निस्पृहतेनें नाकारलें. देवधरांनी त्या प्रसंगावरही ताण केली आहे. त्यांना शिष्यांनी अर्पण केलेली रक्कम त्यांनी सर्वच्या सर्व परत केलीच पण शिवाय त्यांत तितकीच भर घालून, हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे. रक्कम परत करताना महाराजांनी एक मोठी चुकी मात्र केली आहे. दातारशास्त्री यांच्याजवळ ती रक्कम 'त्रिदोषविषयक' पुस्तकाच्या प्रकाशनासाठीं देण्यांत आली आहे. गु० देवधर शिष्यांजवळ पैसे देतात

पण त्यासाठीं त्यांच्याजवळ पुस्तक घेऊन जावें लागते.

विद्या ही नुसत्या अध्ययनानें कधीच पूर्ण होत नाहीं. आगम, प्रवचन, अध्यापन व व्यवहार यामुळें विद्येस नेहमी पूर्णत्व येत असतें. दातारशास्त्री यांच्या सारख्यांना ' आपल्या क्षेत्रांत शास्त्रीय ग्रंथ संपत्तीची भर टाकण्यास ' हीच सुसंधी आहे.

चरकाचार्यांची अशी एक दंतकथा प्रचलीत आहे कीं एकदा आचार्य वैश्वदेव आटोपून अतिथींची मार्गप्रतीक्षा करीत द्वारदेशी उभे असता, कांहीं शंका निरसन करून घेण्यासाठीं वेशांतर करून आलेले अश्विनीकुमार तेथें प्राप्त झालें व त्यांनी आपली शंका आचार्यास विचारली. आचार्यांनी अगोदर त्यांना भोजनास बसविलें व मग शंका ऐकली. आपल्या एका राजयक्ष्मा झालेल्या रोग्यास सर्व औषधें देऊन पाहिली असताहीं, गुण कां येत नाहीं अशी अश्विनीकुमारांची पृच्छा होती. यावर तो रोगी विषदृष्टी आहे त्याचें डोळे बांधून त्यास औषध द्या इतकेंच आचार्यांनी सुचविलें व कुमारांना तें पटलें. यावरून आपल्या सहज ध्यानांत येईल कीं वैद्यास किती तीक्ष्ण व तल्लख बुद्धि लागते. पूर्वी आयुर्वेदाची निंदा झाली असें कोणी समजू नये. निंदा झाली असेल ती पोटभरू चिकित्सकांची. ' आयुर्वेदोपदेशेषु विधेयः परमादरः ' असाच आपणास पूर्वजांचा उपदेश आहे तो विसरून चालणार नाहीं. अध्यक्षस्थान दिलेत याबद्दल आभारी आहे. "

यानंतर वैद्यरत्न केळकरशास्त्री यांनी अध्यक्ष, श्रोते व सत्कारसमारंभांत समाविष्ट झालेल्या प्रत्येकाचें हार्दिक आभार मानले.

पानसुपारी, अत्तरगुलाब, गुच्छ यांचा स्वीकार करून सुंदर समारंभानें अगोदरच प्रसन्न झालेल्या मनाला अधिक संतोषवीत श्रोतृवर्ग घरोघर गेला.

---



गुरु-शिष्य संमेलन.

रविवार सोमवार

## गुरुशिष्य संमेलन.

शनिवारीं सार्वजनिकदृष्टीनें सत्कार समारंभ समाप्त झाला असला तरी गुरुशिष्यांच्या दृष्टीनें रविवार व सोमवार हे दिवस महत्वाचेच होते. सूर्यचंद्र हे जितके या भूतलावर रहाणाऱ्या प्राणिमात्रांच्या विकासाला उपयुक्त तितकेच हे दोन वार, शिष्यवृंदांच्या आयुष्यांत त्यांच्या दृष्टीनें उपयुक्त म्हणूनच समजले जातील यांत शंका नाहीं. रविवारीं शिष्यवृंदानें गांवांतील प्रमुख सद्गृहस्थांसमवेत आपल्या गुरुजींना मेजवानी दिली तर सोमवारीं गुरुजींनी आपल्या सर्व शिष्यांना प्रसाद दिला. या दोन दिवसांतील गुरुशिष्य संमेलनांत एकमेकांत झालेली आयुर्वेदचर्चा, शंका त्यांचें समाधान या गोष्टी शिष्यांना, भोजनार्थ केलेल्या सुग्रास व सुमधुर पदार्थांपेक्षां मधुरतर वाटाव्या हे सहाजीकच. सोमवारीं भिषगाचार्य देवधरांनी आपल्या सर्व उपस्थित शिष्यांना कोणास उपरणें तर कोणास शिरोधारणार्थ फेटा असा प्रसाद दिला. त्यादिवशीं शिष्यवृंदातर्फे वे० भू० दातारशास्त्री यांनी गुरुजींविषयीं कृतज्ञता व्यक्त केली तर गुरुजींनीही आपल्या हृदयस्पर्शी भाषणानें शिष्यांच्या भावना हलवून सोडल्या. दरवर्षी डिसेंबरांत ता० २१।२२।२३ रोजीं सर्वांनी एकत्र जमून आयुर्वेदाच्या उन्नतीस पोषक होईल अशी चर्चा करून यथाशक्ति आयुर्वेद सेवा करावयाची असा संकेत ठरून संमेलन समाप्त झालें.

REFBK-0005273

# सत्कार समारंभाचा जमाखर्च.

| | | | |
|---|---|---|---|
| १६७५–०–० | शिष्यांकडून जमा झालेली वर्गणी. | ८–१२–० | स्टेशनरीखातें |
| | | २०– ०–० | अध्यक्षांकरिताखर्च |
| | | ७–१०–० | वाहनखातें |
| | | ७७–११–० | गुरुपूजनखातें |
| | | ५७– ०–० | रौप्यकरंडक |
| | | ५०१– ०–० | गुरुदक्षिणा |
| | | २५– ०–० | चरित्राची हस्त–लिखित प्रत करणेंबद्दल |
| | | ७५– ८–० | फोटोखातें |
| | | १२४–१२–० | ब्लॉक्स |
| | | ३१– ४–६ | हारतुरेअत्तरगुलाब |
| | | १२५– ८–६ | भोजनखर्च |
| | | १६– ०–६ | पोस्टेजखातें |
| | | | २३॥।≡॥ पूर्वी झालेला |
| | | | ७२८– होणारा |
| | | | अंदाजी खर्च |
| | | ६– ०–० | वाजंत्री |
| | | २५–१३–६ | धर्मादायखातें |
| | | ३– ०–० | मजुरी. |
| | | १०– ०–० | किरकोळ |
| | | ४८०– ०–० | छपाईखर्च |
| १६७५–०–० | | १६७५– ०–० | |

त्र्यंबकशास्त्री दाते
सदाशिवशास्त्री लव्हाटे
मंत्री, सत्कारमंडळ.